# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्र

# मराठाकालीन अंतर्गत संस्था

**(Institutions under the Marathas)**

नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० नुसार सुधारित अभ्यासक्रम
शैक्षणिक वर्ष २०२२-२३ पासून

**एम. ए. भाग-१ : सत्र-२ अ**

**इतिहास**

HIST-201 (Compulsory Paper)

© **कुलसचिव,** शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर (महाराष्ट्र)
**प्रथमावृत्ती :** २०१८
द्वितीय आवृत्ती : २०२१
सुधारीत आवृत्ती : २०२३
एम. ए. भाग - १ करिता (मराठाकालीन अंतर्गत संस्था)
सर्व हक्क स्वाधीन. शिवाजी विद्यापीठाच्या परवानगीशिवाय कोणत्याही प्रकाराने नक्कल करता येणार नाही.

**प्रती : १,०००**

■

**प्रकाशक :**
**डॉ. व्ही. एन. शिंदे**
प्रभारी कुलसचिव,
शिवाजी विद्यापीठ,
कोल्हापूर - ४१६ ००४.

■

**मुद्रक :**
**श्री. बी. पी. पाटील**
अधीक्षक,
शिवाजी विद्यापीठ मुद्रणालय,
कोल्हापूर - ४१६ ००४.

■

ISBN- 978-81-939381-2-6

★ दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्र आणि शिवाजी विद्यापीठ याबद्दलची माहिती पुढील पत्त्यावर मिळू शकेल.
शिवाजी विद्यापीठ, विद्यानगर, कोल्हापूर-४१६ ००४ (भारत)

## दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्र
## शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर


■ सल्लागार समिती ■

**प्रा. (डॉ.) डी. टी. शिर्के**
कुलगुरू,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) पी. एस. पाटील**
प्र-कुलगुरू,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) प्रकाश पवार**
राज्यशास्त्र अधिविभाग,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) एस. विद्याशंकर**
कुलगुरू, केएसओयू,
मुक्तगंगोत्री, म्हैसूर, कर्नाटक-५७० ००६

**डॉ. राजेंद्र कांकरिया**
जी-२/१२१, इंदिरा पार्क,
चिंचवडगांव, पुणे-४११ ०३३

**प्रा. (डॉ.) सीमा येवले**
गीत-गोविंद, फ्लॅट नं. २,
११३९ साईक्स एक्स्टेंशन,
कोल्हापूर-४१६००१

**डॉ. संजय रत्नपारखी**
डी-१६, शिक्षक वसाहत, विद्यानगरी, मुंबई विद्यापीठ,
सांताक्रुझ (पु.) मुंबई-४०० ०९८

**प्रा. (डॉ.) कविता ओझा**
संगणकशास्त्र अधिविभाग,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) चेतन आवटी**
तंत्रज्ञान अधिविभाग,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) एम. एस. देशमुख**
अधिष्ठाता, मानव्य विद्याशाखा,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) एस. एस. महाजन**
अधिष्ठाता, वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखा,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) श्रीमती एस. एच. ठकार**
प्रभारी अधिष्ठाता, विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखा,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्राचार्या (डॉ.) श्रीमती एम. व्ही. गुळवणी**
प्रभारी अधिष्ठाता, आंतर-विद्याशाखीय अभ्यास विद्याशाखा
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**डॉ. व्ही. एन. शिंदे**
प्रभारी कुलसचिव,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**डॉ. ए. एन. जाधव**
संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**श्री. ए. बी. चौगुले**
प्रभारी वित्त व लेखा अधिकारी,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) डी. के. मोरे** (सदस्य सचिव)
संचालक, दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्र,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## दूरशिक्षण केंद्र, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

### ■ अभ्यासमंडळ : इतिहास ■

अध्यक्ष – **डॉ. चंद्रवदन मोहनराव नाईक**
देवचंद कॉलेज, अर्जुननगर, ता. कागल, जि. कोल्हापूर

- **डॉ. अवनिश आर. पाटील**
  इतिहास अधिविभाग,
  शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

- **डॉ. अभयकुमार जगन्नाथ पाटील**
  सद्गुरू गाडगे महाराज कॉलेज, कराड,
  ता. कराड, जि. सातारा

- **डॉ. श्रीमती आरती बळवंत नाडगोंडा**
  देवचंद कॉलेज, अर्जुननगर, ता. कागल, जि. कोल्हापूर

- **डॉ. श्रीमती कविता अशोक गगराणी**
  द न्यू कॉलेज, कोल्हापूर

- **डॉ. श्रीमती उर्मिला एन. क्षिरसागर**
  मथुबाई गरवारे कन्या महाविद्यालय, सांगली

- **डॉ. जयपाल चंद्रकांत सावंत**
  शंकरराव जगताप आर्टस कॉलेज, वाघोली, ता. सातारा

- **डॉ. संभाजी आनंदा मोरे**
  एम. एच. शिंदे महाविद्यालय, तिसंगी, ता. गगनबावडा,
  जि. कोल्हापूर

- **डॉ. प्रमोदकुमार अंकुश ओलेकर**
  आर्टस अॅण्ड कॉमर्स कॉलेज, आष्टा, ता. वाळवा,
  जि. सांगली

- **डॉ. चंद्रकांत संदिपान चव्हाण**
  इतिहास अधिविभाग, वालचंद कॉलेज ऑफ आर्टस अॅण्ड
  सायन्स, अशोक चौक, सोलापूर

- **डॉ. तेजस मदन घारगे**
  डायरेक्टोरेट ऑफ आर्किओलॉजी अॅण्ड म्युझियम, संत
  गोर्गे फोर्ट, संत गोर्गे हॉस्पिटल प्रिमाईसेस, फोर्ट, मुंबई

- **डॉ. नंदा पारेकर**
  एव्हरग्रीन होम, टॉवर डी, फेज ४, फटॅट नं. २०८,
  राजहंस प्रिंटींग प्रेस समोर, प्रभू हॉस्पिटल रोड,
  नागाळापार्क, कोल्हापूर

- **डॉ. निरंजन कुलकर्णी**
  इतिहास अधिविभाग, मा. श्री. आण्णासाहेब डांगे, आर्टस,
  कॉमर्स अॅण्ड सायन्स कॉलेज, हातकणंगले, जि. कोल्हापूर

- **श्री. सदानंद कदम**
  शिवराज, १०८२, दक्षिण वसंत नगर, छत्रपती शिवाजीराजे
  मार्ग, सांगली.

# प्रस्तावना

शैक्षणिक वर्ष २००७ पासून शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर, यांच्या वतीने दूरशिक्षण केंद्रामार्फत बहिःस्थ विद्यार्थ्यांना दूरशिक्षण कार्यक्रम राबविण्यात येत आहे. तसेच यंदाच्या वर्षापासून म्हणजे २०१७-१८ पासून अभ्यासक्रम बदललेला आहे, सत्रपद्धती राबविण्यात येत आहे. त्यानुषंगाने, एम. ए. भाग-१ इतिहास या वर्गाच्या विद्यार्थ्यांसाठी ''मराठाकालीन अंतर्गत संस्था'' या विषयाचे स्वयंःअध्ययनासाठी हे पुस्तक २०२२-२०२३ या शैक्षणिक वषात सुधारीत आवृत्ती येत आहे. सदर पुस्तकाच्या लेखनासाठी शिवाजी विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रातील पदवी व पदव्युत्तर विभागात अध्ययन करणाऱ्या अनुभवी व तज्ज्ञ लेखकांकडून या विषयाच्या अभ्यासक्रमानुसार असलेल्या विविध घटकांचे लेखन करून घेण्यात आले आहे. या पुस्तकातील विविध घटक लिहिताना साधी व सोपी भाषा, संकल्पनात्मक स्पष्टता, विषयाच्या आकलनासाठी तक्ते, इत्यादींचा वापर केलेला आहे. वाचक व विद्यार्थ्यांना समजेल अशी विषयाची सोपी व सुटसुटीत मांडणी करण्यात आलेली आहे. प्रत्येक घटकाच्या शेवटी स्वयंःअध्ययन प्रश्न व त्यांची उत्तरे दिलेली आहेत. तसेच घटकाच्या शेवटी सरावासाठी स्वाध्याय, पारिभाषिक शब्द, विषय व अधिक वाचनासाठी संदर्भ ग्रंथांची सूची दिलेली आहे.

मराठाकालीन अंतर्गत संस्था या स्वयंअध्ययन साहित्यामध्ये मराठा राज्य व राजपद, प्रशासन, समाज, धर्म आणि संस्कृती इ. घटकांचा समावेश करण्यात आलेला आहे.

या पुस्तकामध्ये विविध घटकांच्या विवेचनात अचूकता आणण्याचा प्रयत्न केलेला आहे. परंतु त्यामध्ये कांही उणिवा असल्यास वाचक व विद्यार्थ्यांनी त्या आमच्या निदर्शनास आणून द्याव्यात. त्याचा उपयोग पुढील आवृत्ती अधिकाधिक सुधारित करण्यासाठी निश्चितपणे होईल. हे पुस्तक पदवी, पदव्युत्तर व विविध स्पर्धा परीक्षांच्या विद्यार्थ्यांना उपयुक्त ठरेल असा आम्हाला विश्वास आहे. सदर पुस्तक पूर्ण करण्यासाठी घटक लेखकांनी जे परिश्रम घेतले. पुस्तक प्रकाशनासाठी शिवाजी विद्यापीठाचे प्रशासकीय अधिकारी, कर्मचारी, दूरशिक्षण विभागातील सर्व अधिकारी व कर्मचारी यांनी जे परिश्रम घेतले त्याबद्दल त्यांचे मनःपूर्वक आभार.

**■ संपादक ■**


**डॉ. सुरेश शिखरे**
श्री शहाजी छत्रपती महाविद्यालय,
दसरा चौक, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) अवनिश पाटील**
इतिहास अधिविभाग,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## अभ्यास घटकांचे लेखक

| लेखक | घटक क्रमांक |
|---|---|
| **डॉ. सुरेश शिखरे**<br>श्री शहाजी छत्रपती महाविद्यालय, दसरा चौक, कोल्हापूर<br>**डॉ. विकास कदम**<br>कर्मवीर भाऊराव पाटील महाविद्यालय, पंढरपूर | १<br><br>१ |
| **डॉ. विकास येलमार**<br>छत्रपती शिवाजी कॉलेज, सातारा, जि. सातारा | २ |
| **डॉ. महेशकुमार अरुण घाडगे**<br>मु. पो. शिरगाव, ओझेवाडी, जि. सोलापूर | ३ |
| **डॉ. मुफिद मुजावर**<br>दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्र, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर | ४ |

**■ संपादक ■**

**डॉ. सुरेश शिखरे**
श्री शहाजी छत्रपती महाविद्यालय,
दसरा चौक, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) अवनिश पाटील**
इतिहास अधिविभाग,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# अनुक्रमणिका


| घटक क्रमांक | घटकाचे शीर्षक | पान क्रमांक |
|---|---|---|
| १. | मराठा राज्य व राजपद | १ |
| २. | प्रशासन | २६ |
| ३. | समाज | ५३ |
| ४. | धर्म आणि संस्कृती | ७९ |

## ■ विद्यार्थ्यांना सूचना

प्रत्येक घटकाची सुरुवात उद्दिष्टांनी होईल. उद्दिष्टे दिशादर्शक आणि पुढील बाबी स्पष्ट करणारी असतील.

१. घटकामध्ये काय दिलेले आहे.

२. तुमच्याकडून काय अपेक्षित आहे.

३. विशिष्ट घटकावरील कार्य पूर्ण केल्यानंतर तुम्हाला काय माहीत होण्याची अपेक्षा आहे.

स्वयं मूल्यमापनासाठी प्रश्न दिलेले असून त्यांची अपेक्षित उत्तरेही देण्यात आलेली आहेत. त्यामुळे घटकाचा अभ्यास योग्य दिशेने होईल. तुमची उत्तरे लिहून झाल्यानंतरच स्वयं अध्ययन साहित्यामध्ये दिलेली उत्तरे पाहा. ही तुमची उत्तरे (किंवा स्वाध्याय) आमच्याकडे मूल्यमापनासाठी पाठवायची नाहीत. तुम्ही योग्य दिशेने अभ्यास करावा, यासाठी ही उत्तरे 'अभ्यास साधन' (Study Tool) म्हणून उपयुक्त ठरतील.

---

प्रिय विद्यार्थी,

हे स्वयंअध्ययन साहित्य या पेपरसाठी एक पूरक अभ्याससाहित्य म्हणून आहे. असे सूचित करण्यात येते की, विद्यार्थ्यांनी २०२२-२३ पासून तयार केलेला नवीन अभ्यासक्रम पाहून त्याप्रमाणे या पेपरच्या सखोल अभ्यासासाठी संदर्भपुस्तके व इतर साहित्याचा अभ्यास करावा.

**सत्र २ : घटक १**

## मराठा राज्य व राजपद
## (Maratha State and Kingship)

अनुक्रमणिका

१.० उद्दिष्टे

१.१ प्रास्ताविक

१.२ विषय विवेचन

१.२.१ स्वराज्य: ध्येय आणि उद्दिष्टे (Swarajya: aims and objectives)

१.२.२ राजपदाचा सिद्धांत आणि पद्धती (Theory and practice of kingship)

१.२.३ मराठा राजमंडळ: उदय आणि विकास (Maratha Confederacy: origins and growth)

१.३ पारिभाषिक शब्द, शब्दार्थ

१.४ स्वयं अध्ययन प्रश्नांची उत्तरे

१.५ सारांश

१.६ सरावासाठी स्वाध्याय

१.७ संदर्भ ग्रंथ आणि अधिक वाचनासाठी पुस्तके

### १.० उद्दिष्टे :

१. स्वराज्य संकल्पना स्पष्ट करता येईल.

२. स्वराज्याची ध्येय व उद्दिष्टे कोणती होती याची माहिती होईल.

३. स्वराज्याची वैशिष्ट्ये समजून येतील.

४. अष्टप्रधान मंडळाची रचना आणि वैशिष्ट्ये सांगता येतील.

५. मराठाकालीन राजपदाचा सिद्धांत आणि पद्धती समजून येईल.

६. मराठा राजमंडळाचा उदय, विकास आणि ऱ्हास कसा झाला याची माहिती मिळेल.

## १.१ प्रस्तावना:

महाराष्ट्रामध्ये १७ व्या शतकात छत्रपती शिवाजी महाराजांनी हिंदवी स्वराज्याची स्थापना करून एका नव युगाची सुरुवात केली. याचबरोबर त्यांनी शिवशक कालगणनेची सुरुवात केली, नवीन नाणी पाडली. शिवाजी महाराजांनी स्थापन केलेल्या स्वराज्याला राष्ट्रीय ध्येय आणि हिंदूंच्या उदात्त परंपरापासून स्फूर्ती मिळालेली होती. शिवकाळातील राजपदाची संकल्पना ही परंपरेनुसार चालत आलेल्या हिंदू परंपरेचे विकसित रूप होते. इस्लामी सत्तेच्या अगोदर भारतातील राजपदाच्या संकल्पनेवर हिंदू धर्म, श्रुती, स्मृती, शुक्रनीती व चाणक्यनीचा प्रभाव होता. विजयनगर साम्राज्याच्या ऱ्हासानंतर शिवाजी महाराजांनी हिंदू धर्माच्या रक्षणासाठी हिंदू परंपरेवर आधारलेल्या स्वराज्याची स्थापना केली. शुक्रनीतीनुसार राजा हा राज्याचा प्रमुख असतो. पराक्रम, बुद्धिमत्ता, शक्ती आणि शौर्य हे प्रमुख गुण त्याच्याजवळ आवश्यक मानलेले आहेत. अशी व्यक्ती जरी राजकुळात जन्माला आली नसली तरी ती व्यक्ती राजसत्ता उपभोगू शकते. राजा हा आपल्या धर्माचे रक्षण करणारा, प्रजेचे पालन करणारा, शत्रूला जिंकणारा, दान देणारा, क्षमाशील, शूर आणि निःस्पृह असला पाहिजे. छत्रपती शिवाजी महाराजांच्या अंगी हे गुण असल्यामुळे ते लोकराजे झाले.

६ जून १६७४ रोजी स्वराज्याच्या छत्रपती पदाला कायदेशीर अधिकार प्राप्त झाला. शिवाजी महाराजांनी स्थापन केलेले स्वराज्य हे मध्ययुगीन भारताच्या इतिहासातील एक क्रांतीकारक घटना मानली जाते. बलाढ्य अशा मुस्लिम सत्ताना शह देऊन स्वराज्याचा विस्तार घडवून आणला. हिंदुस्थानमध्ये हिंदू पदपादशाही स्थापन करून स्वधर्माचे रक्षण तर केलेच पण सर्वांना बरोबर घरून घेऊन परमधर्म सहिष्णुवृत्तीने कल्याणकारी राज्य पद्धतीने स्वराज्याला सर्वच दृष्टीने आदर्श बनवले. अत्याचार, अन्याय व पक्षपातीपणा यासारखे धोरण राबवणाऱ्या इस्लामी सत्तेविरुद्ध सर्वसामान्य जनतेच्या मनामध्ये तिरस्काराची भावना निर्माण झाली होती. त्यामुळे महाराजांनी स्वराज्याच्या कार्यात सर्वांना बरोबर घेऊन सामान्य लोकांच्या मनात नवचेतना निर्माण केली. स्वराज्य व स्वराज्याचा राजा छत्रपती शिवाजी महाराजांच्या विषयी सर्वसामान्य रयतेच्या मनात आपुलकीची भावना निर्माण झाली. स्वराज्याच्या ध्वजाखाली रयतेला एकत्र करून प्रजाहितदक्षक राज्यकारभाराचा आदर्श इतरापुढे निर्माण करण्याचे काम छत्रपती शिवाजी महाराजांनी केले.

छत्रपती शिवाजी महाराजांनी राजसत्तात्मक शासन पद्धती, कार्यक्षम अष्टप्रधान मंडळाची स्थापना, वतनदार पद्धती नष्ट करण्याचा प्रयत्न, व्यक्तीगुणांना प्राधान्य, समानसंधी, लोककल्याण, गनिमी कावा युद्धनीती, आदर्श करपद्धती व न्यायव्यवस्था ही आपल्या स्वराज्याची ध्येय उद्दिष्टे म्हणून ती पूर्ण करण्यासाठी पन्नास वर्षाच्या आयुष्यामधील ३० ते ३५ वर्षांचे आयुष्य त्यांनी खर्च केले. दूरदृष्टी, मुसद्दीपणा, काळाची अचूक जाण, शक्ती व युक्तीचा उपयोग करून त्यांनी स्वराज्याला आदर्श राज्य बनवले. आणीबाणीच्या प्रसंगी ही स्वराज्याची भिंत अभेद्य राहिल्याचे आपणास दिसून येते. स्वराज्याचा आदर्श पाया घातल्यामुळे त्याचे रूपांतर साम्राज्यात झाले.

११ मार्च १६८९ रोजी छत्रपती संभाजी महाराजांची हत्या झाल्यानंतर अत्यंत बिकटप्रसंगामध्ये मराठा राज्याची धूरा छत्रपती राजाराम महाराजांच्याकडे आली. या काळात मराठा राज्य वाचवण्यासाठीच मराठा मंडळ अस्तित्वात आले. बाळाजी विश्वनाथांनी मराठा मंडळाचा पाया बळकट केला. सर्व हिंदुस्थानमध्ये वर्चस्व प्रस्थापित करण्यात मराठा मंडळातील कर्तबगार सरदार यशस्वी ठरल्याचे दिसतात. एकीकडे मराठा सरदाराचे वर्चस्व वाढत असताना मराठा मंडळामध्ये विनाशाची बीजे देखील रोवली गेली. छत्रपती शाहू महाराजांच्या मृत्यूनंतर पेशवाईंच्या काळात काही पेशव्यांच्या धरसोड वृत्ती व धोरणामुळे मराठा मंडळात यादवी सुरू झाली. पर्यायाने पेशव्यांनी स्वतःच्या वर्चस्वासाठी मराठ्यांचे आरमार इंग्रजांच्या मदतीने उध्वस्त केले. धूर्त इंग्रजांनी पुढे या संधीचा फायदा घेतला सन १८१८ मध्ये मराठ्यांची सत्ता संपुष्टात आणली. सदर घटकांमध्ये हिंदवी स्वराज्याची स्थापना, हिंदवी स्वराज्याचे ध्येय व उद्दिष्टे, मराठा राजपद व मराठा मंडळ इत्यादी घटकांचा अभ्यास करावयाचा आहे.

## १.२ विषय विवेचन

### १.२.१ स्वराज्य: ध्येय आणि उद्दिष्टे:

भारतामध्ये सन १२०६ मध्ये मुस्लिम राजवट सुरू झाली. औरंगजेब बादशाहाच्या मृत्यूपर्यंत म्हणजे सन १७०७ पर्यंत टिकून होती. भारतातील या मुस्लिम राजवटीचे अभ्यासाच्या सोयीसाठी दोन भाग केले जातात. सुलतानशाही कालखंड (इ. स. १२०६ ते १५२६) मुघल कालखंड (इ. स. १५२६ ते १७०७) भारतामधील या दोन्ही मुस्लिम राजवटी परकीय होत्या. सुलतानशाही व मुघल कालखंडात भारतात मुस्लिम राज्यकर्त्यांच्या अनेक पिढ्या उदयास आल्या, राहिल्या मात्र आपण ऐतदेशीय सत्तेपेक्षा श्रेष्ठ आहोत या भूमिकेतून. अखंड हिंदुस्तान मुस्लिम सत्तेच्या राजवटीखाली आणावे या उद्देशाने मुघल सत्ताधिशांनी एकच राज्यपद्धती, भाषा, नाणी, वजन मापे, कायदे, न्याय पद्धती, एकच धर्म पद्धती असावी असा दृष्टिकोन ठेवला, परिणामी त्यांनी प्रजेच्या हिताकडे पूर्णपणे दुर्लक्ष केले. हिंदू प्रजेवर उघडपणे अन्याय–अत्याचार होत राहिले. परिणामी पर्यायी हिंदू पदपादशाही स्थापन करण्याची अथवा स्वतंत्र स्वराज्याची आवश्यकता भासू लागली. शहाजीराजे यांना आदिलशहाकडून मिळालेल्या पुण्याच्या जहागिरीमध्ये छत्रपती शिवाजी महाराजांनी स्वराज्य स्थापनेची शपथ घेतली. पुढील ३० वर्षे अंगभूत गुणांनी पराक्रमाची शर्थ करून स्वराज्याचा विस्तार केला. ६ जून १६७४ रोजी 'छत्रपती' पद धारण करून हिंदवी स्वराज्याला कायदेशीरपणा प्राप्त करून दिला. हिंदवी स्वराज्य याचा अर्थ केवळ हिंदूंचे अथवा मराठ्यांचे राज्य असा नाहीतर अखंड हिंदुस्थानमधील लोकांचे राज्य असा विस्तृत अर्थ या पाठीमागे होता. छत्रपती शिवाजी महाराजांनी स्वधर्माचे रक्षण करत असताना इतर धर्मियांचे स्वातंत्र्य अबाधित राखलेले दिसते. आपला धर्म इतरावर लादला नाही म्हणजेच 'परमधर्म सहिष्णुता' हे तत्व स्वराज्याचे मुख्य ध्येय होते. स्वराज्य हे स्वयंशासित होते, विस्ताराने जरी ते मोठे नसले तरी इतर राज्याचा किंवा साम्राज्याचा घटक नव्हते. स्वराज्याचे अस्तित्व मुस्लिम सत्तेवर अथवा राज्यकर्त्याच्या सहानुभूतीवर अवलंबून नव्हते. छत्रपती शिवाजी महाराजांनी निर्माण केलेल्या स्वराज्याची

संकल्पना छत्रपती संभाजी महाराजांनी पुढे चालवली. छत्रपती राजाराम महाराजांनी त्याचा पाठपुरावा केला. राजाराम महाराजांच्या मृत्यूनंतर महाराणी ताराबाई यांनी स्वराज्याचे जतन व संवर्धन केले. छत्रपती शाहू महाराजांच्या काळात अंतर्गत यादवीच्या परिस्थितीमुळे छत्रपतीची स्वतंत्र सत्ता अभाधित राखणे काहीसे अवघड झाले. तेव्हा त्यांनी राज्यकारभाराची जबाबदारी पेशवांच्याकडे दिली. पेशव्यांनी स्वराज्यासाठी चौथाई व सरदेशमुखीच्या सनदा आणल्या. परिणामी हिंदवी स्वराज्याच्या मूळ संकल्पनेवर प्रहार झाला. छत्रपती ते पेशवा असे सतांत्तर सुरू झाले. स्वराज्याचे साम्राज्यात रूपांतर झाले, मात्र छत्रपती शिवाजी महाराजांनी निर्माण केलेल्या आदर्श शासन पद्धतीत वतनदारीसारखी पद्धत पुन्हा सुरू झाली. परिणामी मराठी सत्ता कुमकुवत होऊन सन १८१८ मध्ये तिचा ऱ्हास झाला.

**अ) हिंदवी स्वराज्याची संकल्पना :**

हिंदवी म्हणजे हिंदूचे राज्य असा समज आहे. वास्तविक पाहता शिवाजी महाराजांना हिंदवी म्हणजे स्वराज्य हवे होते, अर्थात स्वकीयांचे राज्य. तत्कालीन भारताचा विचार करता बहुसंख्य शासक मुस्लिम होते. त्यामुळे स्वकीयांची सत्ता त्यांना अभिप्रेत होती. कारण ''हिंदवी हा शब्द धर्मवाचक ही आणि प्रदेश वाचकही आहे'' असे प्रा. सदाशिव आठवले म्हणतात. शिवाजी महाराजांनी स्वराज्याचे ध्येय आपल्यापुढे ठेवले, त्यांनी स्वराज्याची स्थापना केली ज्यामध्ये संपूर्ण वातावरण न्याय, नीती आणि सहिष्णुतेने भरलेले होते. या संबंधी न्या. म. गो. रानडे म्हणतात की, ''मराठी राज्याची स्थापना ही शिवाजी महाराजांकडून झालेली या देशाची थोर सेवा होय.'' तर डॉ. अ. रा. कुलकर्णी म्हणतात की, ''केवळ राज्य स्थापून ते स्वस्थ राहीले नाहीत, तर ते नूतन मराठी राज्य सुजलाम सुफलाम कसे होईल, त्यांचा आर्थिक पाया कसा बळकट होईल, हे राज्य कसें टिकून राहील याचाही त्यांनी विचार केला आणि हीच त्यांची देश सेवा होय.''

शिवाजी महाराजांच्या स्वराज्य निर्मिती संदर्भात जदुनाथ सरकार आपल्या हाऊस ऑफ शिवाजी या ग्रंथात म्हणतात की, ''आठ विविध भाषातून उपलब्ध असलेल्या सर्व साधनांचा अभ्यास केला असता शिवाजी राजाच्या इतिहासकाराला हे मान्य करावे लागेल की, शिवाजी हा केवळ मराठा-राष्ट्र निर्माता नव्हता तर मध्ययुगीन हिंदुस्थानातील तो एक श्रेष्ठ रचनात्मक कार्य करणारा अत्यंत बुद्धिमान, माणूस होता. राज्य नष्ठ होतात, साम्राज्याचे विघटन होते. राजघराणी लुप्त होतात परंतु काळातील ऐतिहासिक वारसा म्हणून, 'लोकनेता' राजा या नात्याने राजाचे स्मरण अखिल मानव जातीला दीर्घकाळ सचेतन करणारे, कल्पना शक्तीला चेतावणारे, बुध्दिला स्फुरण देणारे आणि उच्च पराक्रम करण्यास उद्युक्त करणारे राहील.''

**ब) ध्येय आणि उद्दिष्टे:**

**१) एका राज्याची निर्मिती:**

छत्रपती शिवाजी महाराजांनी पहिल्या टप्प्यात वडिलार्जित जहागिरीच्या प्रदेशावर काही प्रदेशांवर आपली सत्ता निर्माण केली. त्या प्रदेशांच्या संरक्षणासाठी व प्रदेश विस्तारासाठी सैन्य उभारले. स्वराज्यात आलेल्या

नवीन प्रदेशातील जमीन वसूल गोळा करण्यासाठी निश्चित पद्धत आखून दिली. ठिकठिकाणच्या लहान-मोठ्या अधिकाऱ्यांनी रहावे कसे वागावे याचेही नियम घालून दिले. हे सर्व पाहता एक गोष्ट निश्चितपणे दिसते की, शिवाजी महाराजांनी जे निर्माण केले, त्याची प्रत्यक्षातील मांडणी, त्यासंबंधात क्वचित त्यांनी स्वतः अथवा अधिकाऱ्यांनी व्यक्त केलेले अभिप्राय आणि तत्कालीन स्वकीय-परकीयांना प्रतीत झालेले त्याचे स्वरूप या सगळ्या गोष्टी साकल्याने लक्षात घेतल्या तर शिवाजी महाराजांच्या स्वराज्यासंबंधीच्या संकल्पना स्पष्ट दिसून येतात. ती एका स्वतंत्र राज्याची निर्मिती हे होते.

### २) राज्यच दौलत नव्हे!

शिवाजी महाराजांना याची स्पष्ट जाणीव होती की आपण जे उभारले आहे ते एक राज्य आहे. जे उभे केले आहे ती नुसती खासगी मालमत्ता, अथवा खाजगी दौलत नाही. त्याहून अधिक असे काही आहे हे महाराजांना माहिती होते आणि म्हणूनचं आपल्या प्रदेशाच्या बाबतीत आपल्या सार्वभौम अधिकाराविषयी ते आग्रही होते. त्यांनी स्वराज्याची जी उभारणी केली ती आपली जमीनजुमला आहे एवढ्यापुरते ते पाहत नव्हते, आणि जर असे नसते तर मुघलांची अथवा आदिलशाहीची अधिसत्ता मान्य केली असती. किंबहुना तशी भूमिका जर त्यांनी घेतली असती तर जे स्वराज्य निर्माण केले होते त्यापेक्षा कितीतरी मोठी जहागिर ते प्राप्त करू शकले असते. मात्र शिवाजी महाराजांनी दौलत आणि राज्य यांतील फरक जाणलेला होता, त्याचे त्यांना आकलन झालेले होते आणि म्हणूनच स्वराज्य हे तत्त्व त्याने कधीही सोडले नाही. राजकारणाचा भाग म्हणून, आपत्काली केवळ धोरण म्हणून त्यांनी क्वचित प्रसंगी मुघलांची अथवा आदिलशाहीची अधिसत्ता/ताबेदारी मान्य केलीही असेल; पण संधी मिळता क्षणी त्यांनी विविध प्रकारचे केलेले करार आणि तहनामे झुगारून पुन्हा स्वराज्य हे ध्येय निश्चित केलेले होते.

### ३) स्वातंत्र्य आणि सार्वभौमत्व

सन १६७४ मध्ये शिवाजी महाराजांनी स्वत:चा राज्याभिषेक करून घेतला. राज्याभिषेकाबरोबरच आपली स्वतंत्र बिरुदावली, स्वतंत्र राजमुद्रा आणि आपल्या नावाची नाणी प्रचलित केली. अनेक प्रकारांनी त्यांनी नव्या मराठी राज्याचे स्वातंत्र्य आणि सार्वभौमत्व स्वकीयांच्या मनावर पक्के बिंबविले आणि परराज्यांना त्याची सुस्पष्ट जाणीव दिली तेव्हा राज्याच्या ठिकाणी अंतर्गत आणि परराज्य संबंधातील सर्व व्यवहारांच्या बाबतीत सर्वाधिकारित्व असते; त्याच्यावर कोणत्याही अन्य सत्तास्थानाचे दडपण येऊ शकत नाही, सार्वभौमत्व हेच राज्यसंस्थेचे स्पष्ट वेगळे असे लक्षण ही जी राज्यशास्त्रीय विचारांतली मूलभूत अशी संकल्पना आहे, ती शिवाजी महाराजांनी चांगली जाणलेली होती. राज्याच्या सार्वभौमत्वावर गंडांतर येई, ते राज्याबाहेरून येई तसे आतून राज्यातूनही दडपण येऊ शके. त्यासंबंधीही शिवाजी महाराज हे सतत जागरूक होते.

### ४) राजसत्तात्मक शासन पद्धती:

छत्रपती शिवाजी महाराजांनी अंगभूत गुणाच्या बळावर स्वराज्याची निर्मिती केली. आपल्या राज्याभिषेका प्रसंगी छत्रपती पद धारण करून तेच स्वराज्याचे सर्व सत्ताधीश आहे हे दाखवले. कायदे करण्याचा व त्याची अंमलबजावणी करून न्यायदानाचे अंतिम अधिकार छत्रपतीकडे ठेवले तर राज्यात सत्तेचे स्वरूप अनुवांशिक ठेवले. राजसत्तात्मक शासन पद्धतीचा महाराजांनी स्वीकार केला असला तरी त्यांनी काही निर्बंध स्वतःवर व स्वतःच्या सत्तेवर घालून घेतले होते. कल्याणकारी राजकारभारासाठी निरनिराळे विभाग स्थापन करून त्यावर स्वतंत्र मंत्र्यांची नेमणूक केली होती. हे मंत्री छत्रपतींना जबाबदार होते. मंत्र्यांची नेमणूक व त्यांना प्रसंगी काढून टाकण्याचा अधिकार छत्रपतींना होता. मात्र महत्त्वाच्या वेळी मंत्र्यांचा सल्ला छत्रपती मान्य करत होते. उत्तम प्रशासनासाठी त्यांनी अष्टप्रधान मंडळ ही पद्धती स्वीकारली होती. सत्तेची विकेंद्रीकरण करून प्रशासनाचे सूत्रे सामान्य अधिकाऱ्याकडे सोपंवली, त्यांना प्रशासनात सहभागी करून घेतले. याशिवाय त्यांनी स्वत:हून अनेक धार्मिक, सामाजिक, नैतिक अशी बंधने घालून घेतलेली दिसतात. भारतीय संस्कृतीत राजाला एक राजधर्म असतो. तो प्रजेच्या कल्याणासाठी पाळला पाहिजे. या तत्त्वाचा स्वीकार करून काही  बंधने त्यांनी राजसत्तेवर घेतली होती.

### ५) अष्टप्रधान मंडळ:

शिवाजी महारजांच्या राज्यकारभाराचे अत्यंत महत्त्वाची वैशिष्ट्य अष्टप्रधान मंडळ होते. राज्यकारभार व्यवस्थित चालवा यासाठी महाराजांनी अष्टप्रधान मंडळाची निर्मिती केली. मात्र अष्टप्रधान मंडळाची ही पद्धत महाराजांनी कोणापासून घेतली यासंबंधी इतिहासकारांच्यामध्ये मतभेद दिसून येतात. अष्टप्रधान मंडळाची कल्पना रामायण, महाभारत, मनुस्मृती व शुक्रनीती यातून घेतली असावी असा एक प्रवाह आहे. तर अकबराच्या नवरत्न दरबारावरून घेतली असा दूसरा प्रवाह आहे, आणि तिसरा प्रवाह विजयनगरच्या कृष्णदेवरायाच्या दरबारातील अष्टदिग्गज मंत्री यावरून अष्टप्रधान मंडळाची प्रेरणा घेतली असावी या मताचा आहे. समकालीन राजकीय अथवा राजनीतीचा विचार करता याकाळात शुकनीती हा ग्रंथ अधिक परिचित होता असे दिसते, यामध्ये मंत्र्यांची संख्या दहा इतकी दिलेली आहे. प्रतिनिधी, प्रधान, सचिव, मंत्री, पंडित, सुमंत्रक, अमात्य, पुरोहित दूत, प्राडू:विवाकपंडित असे दहा मंत्री अथवा हुद्दे दिलेले आहेत. तर शिवाजी महाराजांनी आपल्या अष्टप्रधान मंडळामध्ये आठ मंत्री ठेवलेले दिसतात. यामध्ये मुख्य प्रधान, अमात्य, मंत्री, सुमंत, पंडितराव, सेनापती, सचिव आणि न्यायाधीश इत्यादीचा समावेश होता. सर जदुनाथ सरकार यांच्या मते शहाजीराजांनी ज्यावेळी पुण्याची जहागिर शिवाजी महारजांच्याकडे सोपवली तेव्हाच अष्टप्रधान मंडळाची सुरुवात झाली होती. प्रथम यामध्ये पेशवे, मुजुमदार, डबीर व सबनीस हे चार अधिकरी नेमून दिलेले होते, पुढे स्वराज्याच्या विस्ताराबरोबर मंत्र्यांची संख्या वाढत गेली. राज्याभिषेकाच्या वेळी हे अष्टप्रधान मंडळ पूर्णत्वास जाऊन प्रत्येक मंत्र्याच्या जबाबदाऱ्या वर कर्तव्य निश्चित करण्यात आली.

शिवाजी महाराजांनी निर्माण केलेल्या अष्टप्रधान मंडळात छत्रपती संभाजी महाराजांनी 'छंदोगामात्य' या नव्या मंत्र्यांची भर घातली, या काळात या मंत्र्याला जास्त महत्त्व प्राप्त झालेले दिसून येते. छत्रपती संभाजी महाराजांच्या मृत्यूनंतर स्वराज्याची धुरा छत्रपती राजाराम महाराजांच्याकडे आली. मराठ्यांच्या स्वातंत्र्य युद्धात राजाराम महाराजांना कर्नाटकातील जिंजी या ठिकाणी जावे लागले. दक्षिणेत अतिदूर गेल्यामुळे महाराष्ट्रातील इतर मंत्र्याशी त्यांचा संपर्क तुटल्याने त्यांनी स्वत:च्या विश्वासातील प्रल्हाद नीराजी यांना 'प्रतिनीधी' म्हणून नेमले आणि आणखी एका नव्या एका मंत्र्याची भर पडली. मात्र मराठ्यांच्या स्वातंत्र्य युद्धाच्या धामधुमीच्या काळात सर्वच मंत्री एक सारख्याच पद्धतीने काम करत होते असे मात्र नव्हते. छत्रपती संभाजी महाराजांनी निर्माण केलेले 'छंदोगामात्य' हे पद छत्रपती राजाराम महाराजांच्या काळात राहिलेले दिसत नाही. छत्रपती शाहू (थोरले) महाराजांच्या काळात पेशवा व प्रतिनीधी यांच्यात तीव्र संघर्ष झालेला दिसून येतो. शिवकालीन राजपद व वस्तुस्थिती यांचा अभ्यास केला असता पुढील काळात राजपदाची संकल्पना व वस्तुस्थिती यामध्ये बराच फरक पडलेला दिसून येतो.

### ६) रयतेची मुक्तता

छत्रपती शिवाजी महाराजांनी स्वराज्यातील रयतेवर होणारा अन्याय व अत्याचार बंद करण्यासाठी पराक्रमाची शर्त करून हिंदवी स्वराज्याची उभारणी केली. स्वराज्य हे केवळ रयतेच्या शाश्वत जीवनाच्या सुरक्षेतेसाठी व वृद्धीसाठी आहे अशी त्यांची धारणा होती. त्यामुळे प्रजा हा स्वराज्याचा मुख्य कणा आहे असा त्यांना विश्वास होता. सर्वसामान्य जनतेच्या मदतीने महाराजांनी जहागिरदारी व वतनदारी यासारख्या अन्याय पद्धतीला आळा घालून स्वराज्याचा विस्तार केला. स्वराज्यातील एकूण जमिनीची मोजणी करण्याचे ठरवून त्याचप्रमाणे दादोजी कोंडदेव, मोरोपंत पिंगळे, आण्णाजी दत्तो या अधिकाऱ्यांच्या नेतृत्वाखाली तीन वेळा जमिनीची अचूक मोजणी केली. जमिनीची प्रतवारी ठरवून जमिनीचा महसूल व इतर कर वसूल करण्याची निश्चित पद्धत त्यांनी घालून दिली. जमिनीचा दर्जा, सध्या मिळणारे उत्पादन यासंबंधी गावकरी व अधिकारी यांच्याशी चर्चा करून जमीन महसूल निश्चित केला. महसूल गोळा करण्यासाठी पगारी नोकर नेमले. त्यामुळे ठरवून दिलेला महसूल वसूल केला गेला व तो सर्व महसूल सरकारी तिजोरीत जमा होईल याची निश्चिती केली. लष्करी अधिकाऱ्यांना या महसुलाबाबत कसलाही हस्तक्षेप करण्याचा अधिकार नव्हता. देशमुख, देशपांडे यांच्याकडून वसूल गोळा करण्याचे पिढीजात अधिकार कमी केले. त्यामुळे प्रजेवरील अन्याय व अत्याचार कमी होण्यास मदत झाली. दुष्काळ, रोगराई यासारख्या संकटकाळी महसुलामधून सूट व हप्ते बांधून देण्याची पद्धत त्यांनी चालू केली. स्वराज्याच्या प्रदेशाचे स्वराज्य व  मोगलाई असे दोन भाग होते. स्वराज्यातही मराठी मुलुख व चंदीचे (जिंजी) राज्य असे दोन विभाग होते. कर्नाटक मोहिमेमुळे जो मुलुख मिळवला त्याचाही यात समावेश होता. महाराजांनी राज्यकारभाराच्या सोयीसाठी व मसुलात सुसूत्रता आणण्यासाठी स्वराज्याचे तीन विभाग पाडले होते. या विभागाचे पुन्हा १२ महाल व सुभ्यात विभाजन करून त्यावर स्वतंत्र अधिकाऱ्यांची नेमणूक केल्या. त्यामुळे लुटेरे दरोडेखोर खंडणीखोर याचा रयतेला अजिबात उपद्रव झाला नाही. राज्यातील

शेतकरी हा वर्षातील चार महिने शेतकरी उरलेल्या आठ महिन्यात स्वराज्याचा सेनानी होता. एकूणच अनेक उपाययोजना करून रयतेचे हित साधण्याचे काम केले.

**७) लोककल्याणकारी राज्ययंत्रणा:**

छत्रपती शिवाजी महाराजांनी स्वराज्यात राजसत्तात शासन पद्धतीचा अवलंब केलेला होता. सर्व अधिकार छत्रपती यांच्याकडे एकवटले होते. शिवकाळातील राजेशाही हा अनियंत्रीत राजेशाहीचा प्रकार असा वाटत असला तरी प्राचीन भारतातील राजकीय विचारवंतांनी मांडलेल्या तत्त्वानुसार राजा हा अनियंत्रित व सर्वाधिकारी असला तरी तो प्रजेचा पालक असतो. हे ध्येय आपल्या डोळ्यासमोर ठेवून अनियंत्रित राज्यसत्तेचा उपयोग करत लोककल्याणकारी राज्यव्यवस्था अमलात आणली. शिवाजी महाराजांनी स्वराज्यातील रयतेला सुखी करण्याचा आटोकाठ प्रयत्न केला. वतनदारी पद्धतीचे उच्चाटन करत असताना जनतेचे हिताचे अनेक कायदे केले. शेती उत्पन्न वाढवण्यासाठी सर्व प्रयत्न केले. शेतकऱ्यांना बी–बियाणे शेती अवजारे पुरवून पाणी पुरवठ्याच्या सोयी केल्या. तर व्यवसाय वर्गांना कर्जे कमीत कमी व्याजात कर्ज देऊन उत्पन्न वाढवले. उद्योगांना व व्यापाऱ्यांना चालना दिली. अनेक बाजारपेठा विकसित केल्या. शत्रूपासून त्याचे संरक्षण केले.

**८) धर्मातीत राज्य:**

प्राचीन काळापासून ते मध्ययुगीन व आधुनिक काळापर्यंत मानवी जीवनावर प्रभाव टाकणाऱ्या अनेक महत्वपूर्ण घटकापैकी एक घटक म्हणून धर्माकडे पाहिले जाते. आधुनिक काळातील महत्त्वाची संकल्पना म्हणजे धर्मातीत राज्य जे आपल्याला भारताच्या स्वतंत्र काळातील राज्यघटनेचे एक महत्त्वाचे वैशिष्ट्य मानले जाते. धर्मातीत म्हणजे या देशात कोणत्याही धर्माला श्रेष्ठ आगर कनिष्ठ न मानता सर्वांना समान वागणूक अथवा शासन कोणत्याही धर्माचा पुरस्कार करणार नाही. म्हणजेच घटनेसमोर सर्वजन एकसारखे आहेत. धर्मातीत या संकल्पनेचा उदय प्रबोधनाच्या काळानंतर युरोपमध्ये झाला. त्या अगोदर मध्ययुरोपमध्ये सर्व सत्ता ही पोपकडे होती. त्यामुळे राजाची नेमणूक, त्याला पदावरून दूर करणे हे सर्वस्वी पोपवर अवलंबून होते. मात्र युरोपीय राजांनी बंड करून त्याची सत्ता जुगारून दिली. राजे खऱ्या अर्थाने निरंकुश बनले.

छत्रपती शिवाजी महाराजांनी युरोपीय राजानी राबवलेली धर्मातीत राज्याची संकल्पना प्रत्यक्ष कार्यवाहीत आणली नाही. तर एक नवीन राज्यव्यवस्था आस्तित्वात आणली. त्यामुळे मध्ययुगाच्या इतिहासात धर्मातीत राज्याची संकल्पना प्रत्यक्ष राबवणारा पहिला राजा व प्रवर्तक म्हणून शिवाजी महाराजांच्याकडे पहिले जाते. शिवाजी महाराजांनी हिंदवी स्वराज्याची स्थापना केली त्यावेळी भारतामध्ये मुस्लिम सत्ता होत्या; त्यांचा धर्म वेगळा होता. पश्चिम किनारपट्टीवरील  पोर्तुगीज, सिद्धी व  इंग्रज हेही वेगवेगळे होते. त्यांच्या जुलमाविरुद्ध स्वधर्म रक्षणासाठी शिवाजी महाराजांनी हाक देवून स्वराज्य उभे केले. इस्लामी राज्यकर्त्यांसारखा इतर धर्मावर अथवा धर्मीयांवर अन्याय अत्याचार केला नाही. स्वराज्यातील हिंदू प्रमाणेच इतर धर्मिय लोकांना समानतेने वागवले. हिंदू मंदिराप्रमाणे इस्लाम धर्मियांच्या मशिदी व ख्रिश्चन धर्मियांचे चर्च यांचे पावित्र्य जपले. त्यांना

आर्थिक मदत केली. स्वराज्यात प्रत्येक व्यक्तीला धार्मिक स्वातंत्र देऊन सहिष्णुता हे धोरण राबवले. ते जरी हिंदू धर्माभिमानी असले तरी सर्व धर्मियांच्या जीवनाचे रक्षण करून एक वेगळा आदर्श त्यांनी समाजापुढे निर्माण केला. त्यामुळे खाफीखानसारखा धर्मांध मुस्लिम इतिहासकार देखील शिवाजी महारजांच्याबद्दल अनेक गौरवउदगार काढताना दिसतो.

**९) गनिमी कावा:**

गनिमी कावा या युद्धनीतीतत्त्वाचा अवलंब छत्रपती शिवाजी महाराजांनी केला, त्यांना स्वतःच्या सामर्थ्याची व कुमकुत बाजूची जाणीव होती. त्याचप्रमाणे महाराष्ट्राच्या भौगोलिक परिस्थितीची त्यांना पुरेपूर जाण होती. अशावेळी बलाढ्य अशा मुघल व आदिलशाही सत्तांना तोंड द्यायचे असेल तर एक नवीन युद्धनीतीचा अवलंब करावयास हवा हे त्यांनी पुरते ओळखले होते. छत्रपती शिवाजी गनिमी युद्धनीतीचा अवलंब करून हिंदवी स्वराज्याची स्थापना व विस्तार केला. बलाढ्याच्या इस्लामी शत्रूंना या युद्धातंत्राने शह देऊन स्वराज्याचे रक्षण केले. त्यामुळे ग्रँड डफ सारखा इंग्रजी इतिहासकार गनिमी कवा या युद्धतंत्राबाबत मराठ्यांचे कौतुक करतो

छत्रपती शिवाजी महाराजांनी स्वराज्याची उभारणी करत असताना अत्यंत उत्कृष्ट अशी प्रशासन व्यवस्था निर्माण केलेली होती. परंपरागत अनेक गोष्टींना बगल देत महाराजांनी अनेक नवीन नियम अथवा किंवा पद्धती प्रचलित केल्या. परिणामी स्वराज्यातील प्रशासनातील कार्यक्षमता खूपच वाढली. स्वराज्याची ध्येय उद्दिष्टे आणि धोरणांची आणखी काही गुणवैशिष्ट्ये पुढीलप्रमाणे सांगता येतील.

१) वंशपरंपरागत पदे देण्याची पद्धत बंद केली.

२) अधिकाऱ्यांची निवड महाराज स्वत: करत.

३) अकार्यशम प्रधानांना काढून टाकण्याची तरतूद.

४) रोख वेतन देण्याची पद्धत रूढ केली.

५) खात्याच्या कारभाराबरोबर लष्करी जबाबदारी.

६) जाती वैशिष्ट्यांचा उपययोग.

७) प्रधानांच्यावर प्रदेश कारभार पाहण्याची जबाबदारी.

८) राज्य कारभारतील निर्णयाची संयुक्तिक जबाबदारी.

९) अष्टप्रधान मंडळाचा सल्ला राजावर बंधनकारक नव्हता.

१०) प्रधानांची बदलती संख्या.

**स्वय अध्ययन प्रश्न क्र. १**

**अ) रिकाम्या जागा भरा.**

१) शुक्रनीती हा ग्रंथ यांनी .............. लिहिला आहे.

अ) चाणक्य ब) शुक्राचार्य क) आर्यभट्ट ड) व्यास

२) गनिमी कावा ही पद्धत .............. यांनी सुरू केली.

अ) अलाउद्दीन खिलजी ब) जयसिंह

क) मलिक अंबर ड) कृष्णदेवराय

३) ...................... रोजी छत्रपती शिवाजी महाराजांचा राज्याभिषेक झाला.

अ) ६ जून १६७४ ब) ३ मार्च १६७६ क) ५ जुलै १६७५ ड) १० मे १६७७

४) छत्रपती शिवाजी महाराजांची शासनपध्दती ..................... प्रकारची होती.

अ) लोकसत्ताक ब) सामंतसत्ताक क) राजसत्ताक ड) गणसत्ताक

५) शिवकालीन राजेशाहीच्या संकल्पनेवर ........................... प्रभाव दिसून येतो.

अ) रामायणाचा ब) अर्थशास्त्राचा क) महाभारताचा ड) शुक्रनीतीचा

**ब) एका वाक्यात उत्तरे लिहा.**

१) आज्ञापत्र हा ग्रंथ कोणी लिहिला आहे.

२) अष्टप्रधान मंडळात छत्रपती संभाजी महाराजांनी कोणत्या नव्या मंत्र्यांची नेमणूक केली.

३) प्रतिनीधी हे पद कोणत्या छत्रपतींनी निर्माण केले.

४) दक्षिणेत कोणत्या ठिकाणी मराठ्यांचे राज्य होते.

५) शुकनीतीमध्ये मंत्र्यांची संख्या किती दिलेली आहे.

## १.२.२ राजपदाचा सिद्धांत आणि पद्धती:

### १) मराठाकालीन राजपदाची संकल्पना:

महाराष्ट्रामध्ये १७ व्या शतकात छत्रपती शिवाजी महाराजांनी हिंदवी स्वराज्याची स्थापना करून एका नव युगाची सुरुवात केली. शिवाजी महाराजांनी केलेल्या मराठा राज्याला राष्ट्रीय ध्येय आणि हिंदूंच्या उदात्त परंपरा यापासून स्फूर्ती मिळालेली होती. शिवकालीन राजपदाची संकल्पना ही परंपरेनुसार चालत आलेल्या हिंदू परंपरेचे विकसित रूप होते. भारतात इस्लामी सत्तेच्या उदयापूर्वी भारतातील राजपदाच्या संकल्पनेवर हिंदू

धर्म, श्रुती, स्मृती, शुक्रनीती व चाणक्यनीचा प्रभाव होता. शुक्रनीतीनुसार राजा हा राज्याचा प्रमुख असतो. पराक्रम, बुद्धिमत्ता, शक्ती आणि शौर्य हे प्रमुख गुण त्याच्याजवळ आवश्यक मानलेले आहेत. अशी व्यक्ती जरी राजकुळात जन्माला आली नसली तरी ती व्यक्ती राजसत्ता उपभोगू शकते. राजा हा आपल्या धर्माचे रक्षण करणारा, प्रजेचे पालन करणारा, शत्रूला जिंकणारा, दान देणारा, क्षमाशील, शूर आणि निःस्पृह असला पाहिजे.

शिवकाळातील राजपदाची संकल्पना ही हिंदू परंपरेवर आधारलेली होती. शुक्रनीतीमध्ये सांगितल्याप्रमाणे शिवाजी महाराजांनी अष्टप्रधान मंडळाची नियुक्ती केलेली होती. शुक्रनीती आणि याज्ञवल्क्यस्मृतीमध्ये मांडलेल्या विचारांप्रमाणे राज्यकारभार चालत असल्याचे प्रतिबिंबीत होते. राज्यातील इतर सर्व अंगे राजापेक्षा कमी महत्त्वाची असून राज्यात राजा हाच सर्वश्रेष्ठ आहे हे तत्त्व त्यांनी प्रस्थापित केले. त्यांनी वतनदारी पद्धती बंद करण्याचा प्रयत्न केला आणि आपल्या सहकाऱ्यांच्या मदतीने राज्यकारभार केला. शिवाजी महाराजांनी आपल्या अष्टप्रधानांकडे राज्यातील एकेका विभागाच्या प्रशासनाची जबाबदारी सोपविलेली होती. अष्टप्रधानांतील प्रत्येक प्रधान आपल्या खात्याबद्दल राजालाच जबाबदार होता. शिवाजी महाराजांनी हिंदू परंपरागत राजपदाच्या संकल्पनेचा स्वीकार करून लोककल्याणकारी राज्याची निर्मिती केली. छत्रपती संभाजी महाराज, छत्रपती राजाराम महाराज व महाराणी ताराबाई यांच्या काळात मुघल आक्रमणाच्या संकटांमुळे राजपदाचे व शासनाचे स्वरूप बदल गेले. स्वराज्यात नाइलाजाने वतनदारी पद्धती पुन्हा सुरू करावी लागली आणि अष्टप्रधानांमध्ये 'छंदोगामात्य' या नवीन मंत्र्याची भर पडली. छत्रपती संभाजी महारजांच्या काळात छंदोगामात्य हाच प्रमुख बनला.

छत्रपती राजाराम महाराज आणि महाराणी ताराबाई यांच्यानंतर सन १७०८ मध्ये मुघलांच्या कैदेतून सुटका झाल्यानंतर छत्रपती संभाजी महाराजांचा पुत्र शाहू छत्रपती झाले. शाहू महाराजांनी अष्टप्रधानांची नेमणूक केली. मात्र शाहू महाराजांच्या कारकीर्दीत राजपदाचे महत्त्व कमी झाले आणि अष्टप्रधानांना अधिक महत्त्व प्राप्त झाले. छत्रपतींचे पूर्वीचे हक्क सकृतदर्शनी जरी शाहू महाराजांकडे असले तरी त्या हक्कांचा प्रत्यक्ष वापर पेशव्यांच्याकडे आला. मराठा स्वराज्याचे प्रमुख छत्रपती असले तरी प्रत्यक्ष कारभार पेशवेच करू लागल्याने राजपदाला दुय्यम स्थान प्राप्त होत गेलेले दिसते. पेशवाईतील पहिले चार पेशवे कर्तृत्ववान निघाल्यामुळे छत्रपतींचे महत्त्व आणखीनच कमी झाले. त्यानंतरचे पेशवे दुर्बल निघल्याने दरबारातील कारभाऱ्यांचे महत्त्व वाढले आणि पेशव्यांचे महत्त्व कमी झाले. अशा प्रकारे पुढील काळात राजपदाची संकल्पना इतिहासजमा झाली.

मराठा सत्तेच्या सुरुवातीच्या काळात राजपदाची संकल्पना ही प्राचीन काळापासून चालत आलेल्या परंपरागत हिंदू संकल्पनेवर आधारलेली होती. शुक्रनीतीनुसार स्मृतिग्रंथ हा या संकल्पनेचा आधार होता. मुस्लिम सत्तेच्या राजवटीमध्ये हिंदूंवर मोठ्या प्रमाणात जुलूम जबरदस्ती आणि अन्याय होत होते. म्हणून शिवाजी महाराजांनी स्वधर्म, स्वदेश, स्वभाषा आणि आत्मसंस्कृती यांच्या रक्षणासाठी हिंदवी स्वराज्याची

स्थापना केली. शिवाजी महाराज हेच स्वराज्याचे प्रमुख होते. स्वराज्यावर अनियंत्रित सत्ता होती. मात्र त्यांनी हाती असलेल्या सत्तेचा जुलूम जबरदस्तीसाठी उपयोग केला नाही. उलट त्यांनी प्रजाहितदक्ष शासनाची निर्मिती केली. शिवकाळात राजाकडे अगर राजपदाकडे जरी अनियंत्रित अधिकार असले तरी त्या अधिकारांचा दुरुपयोग करू नये हे बंधन त्यांच्यावर होते.

प्राचीन हिंदू परंपरेप्रमाणे राज्याचे संरक्षण, सज्जनांचे रक्षण, दुर्जनांना शिक्षा, खजिन्याचे संवर्धन आणि निष्पक्षपातीपणे न्यायदान ही राजाची मुख्य कर्तव्ये मानली जात होती. राजाच्या या कर्तव्याला धार्मिक बंधन मानले जात होते आणि शिवकाळात धर्म हा व्यक्तिगत जीवनाचा व समाजजीवनाचा कणा होता. त्या काळात राज्य हे धर्माधिष्ठित असणे आवश्यक होते. कारण त्या वेळच्या धार्मिक आणि सामाजिक प्रथेनुसार ब्राह्मण हा उच्चवर्ण मानला जाई आणि मराठा हा क्षत्रिय असला तरी त्या काळात ब्राह्मण हा क्षत्रियांपेक्षा श्रेष्ठ मानला जाई. त्यामुळे ब्राह्मणाला शिक्षा करण्याचा अधिकार क्षत्रियाला नव्हता पण क्षत्रियाने राजमुकुट परिधान केला, तो सिंहासनावर बसला आणि त्याने राजदंड धारण केला तर त्या राजाला तो क्षत्रिय असला तरी ब्राह्मणास शिक्षा करण्याचा अधिकार प्राप्त होत असे. म्हणून शिवाजी महाराजांनी राज्याभिषेक केला. या राज्याभिषेकामुळे शिवछत्रपतींच्या राजपदास धर्ममान्यता मिळाली आणि धर्ममान्यतेबरोबर समाजमान्यताही प्राप्त झाली.

शिवाजी महाराजांनी गागाभट्टाकडून वेदोक्त पद्धतीने राज्याभिषेक करून घेतला पण या गोष्टीला निश्चलपुरी गोसावी यांच्यासारख्यांनी विरोध केला आणि तांत्रिक राज्याभिषेक करण्याचा आग्रह धरला तेव्हा त्याच्या समजुतीसाठी शिवछत्रपतींनी निश्चलपुरी गोसावी यांच्याकडून दुसरा तांत्रिक पद्धतीने राज्याभिषेक करून घेतला. या सर्व गोष्टींमागचा हेतू हाच की, आपल्या. राजपदास निदान साऱ्या हिंदू धर्मीयांची मान्यता असावी. या राजपदास कोणाही हिंदूचा विरोध नसावा. म्हणजेच धर्ममान्यता असावी हा दुसरा राज्याभिषेक करण्यामागचा शिवाजी महाराजांचा उद्देश होता. त्याचप्रमाणे शिवाजी महाराजांनी राज्याभिषेक केल्यामुळे दुसऱ्याही काही गोष्टी सिद्ध झाल्या. शिवाजी महाराजांनी स्वराज्य निर्माण केले असले तरी मुघल बादशाहा औरंगजेब, विजापुरचा आदिलशाहा हे त्यांना चोर आणि लुटारू समजत होते. राज्याभिषेकामुळे शिवाजी महाराज हे चोर अथवा लुटारू नसून राजे आहेत हे आपोआप सिद्ध झाले. कारण चोर आणि लुटारू यांच्याकडे फक्त स्वार्थ असतो, सामर्थ्य असते. त्या सामर्थ्याच्या जोरावर ते दरारा निर्माण करतात. नीती आणि अनीती यांची त्यांना पर्वा नसते. शिवाजी महाराजांच्याकडे सामर्थ्य होते त्याचा उपयोग त्यांनी आपले उदात्त ध्येय साधण्यासाठी केला. धर्मरक्षणासाठी केला. सज्जनांच्या प्रतिपालनासाठी केला. त्यांनी लूट केली ती शत्रू प्रदेशाची आणि या लुटीतून शिवछत्रपतींनी स्वराज्याचे मंगल मंदिर उभारले, किल्ले बांधले, सैन्य ठेवले, प्रदेश जिंकला, त्यांचे संरक्षण केले, राज्यव्यवस्था निर्माण केली. 'हे राज्य व्हावे ही श्रींची इच्छा आहे' हा शिवाजी महाराजांचा ध्यास होता.

## २) हिंदू राज्य व राजपदाची संकल्पना

मराठाकालीन राजपदावर शुक्रनीतीचा प्रभाव असल्याचे आपणास दिसून येते. शुक्रनीतीमध्ये राजा हे राज्याचे मस्तक मानले आहे. शिवाय हिंदू परंपरेत राजाची जी सात महत्त्वाची अंगे सांगितले आहेत. त्यातमध्ये राजा, अमात्य, मित्र, कोश, राष्ट्र, दुर्ग आणि सैन्य इत्यादीचा समावेश केलेला आहे. शुक्रनीतीमध्ये राजाची व्याख्या केली आहे. काही भूप्रदेश व त्यावर असणारे निर्जीव पदार्थ व सजीव पदार्थ यांचे एकत्रित राहणे म्हणजे राज्य किंवा राष्ट्र होय. जेवढ्या भूप्रदेशावर एखादे व्यक्तीने सत्ता स्थापन केली. तेवढे त्याचे राज्य कोणतीही व्यक्ती भूप्रदेश मिळवून राज्यपद धारण करतो. याचाही संदर्भ शुक्रनीतीमध्ये दिसून येतो. बुद्धिबल आणि शौर्य अशी व्यक्ती राज्य प्राप्त करून राज्यपद मिळवते. पराक्रम, बुद्धिमत्ता, शक्ती आणि शौर्य हे राजाचे गुणविशेष सांगितले आहेत. त्यानुसार वरील गुणांनी युक्त असा राजा खरा जनतेला न्याय देऊ शकतो. अन्यथा वरील गुणांच्या अभावी राजाला राज्य करता येत नाही. एखादी व्यक्ती राजकुलात जन्माला आला नाही म्हणून राजेपदापासून वंचित करता येत नाही. असे सांगून शुक्रनीतीमध्ये म्हटले आहे की राजास त्याच्या ठिकाणी असलेल्या गुणामुळे मानसन्मान प्राप्त होतो. जन्माने राजयोग्य प्राप्त होत नाही. त्यामुळे त्याही पुढे जाऊन शुक्रनीतीमध्ये असे म्हटले आहे की जो राजा स्वधर्माचे पालन करतो, प्रजेचे रक्षण करतो, यज्ञ याग करतो, शत्रू वर विजय मिळवतो, दानधर्म करतो, क्षमाशील व योग्यवेळी कठोरपणे वागतो. तर ढोंगी, लोभी, अनितीवाण स्वैर प्रवृत्तीच्या व इतर दुर्गुणांनी दुर्गुण आणि सत्तेवर येतो. आणि शेवटी त्या राज्याचा विनाश होतो. शुक्राचार्यांनी शुक्रनीतीमध्ये सांगितलेली राजपदाची लक्षणे आणि छत्रपती शिवाजी महाराजांनी स्वराज्य स्थापन करून राज्यकारभारत केलेल्या सुधारणा याचा बारकाईने अभ्यास केला तर असे दिसून येते की शिवकालीन राजपदाची संकल्पना ही पूर्णपणे प्राचीन धर्म ग्रंथावर आधारित होती.

## ३) प्रधानाचे महत्व:

राजा कितीही गुणसंपन्न असला तर तो एकटा राज्य निर्माण करून त्याचा विस्तार व रक्षण करू शकत नाही. आदर्श राज्य निर्माण करून ते चालवायचे असेल तर राजा बरोबर प्रजेचे योगदान असणे गरजेचे आहे. या संदर्भात शुक्रनीतीत म्हटले आहे की एकमेकांच्या साह्याशिवाय कोणतेही काम यशस्वी होऊ शकत नाही. त्यामुळे राज्याच्या बाबतीत राजाला सहाय्य करण्यासाठी मंत्र्यांची आवश्यकता असते. प्रधान किंवा मंत्री हे राज्याचे हात असतात. मंत्राच्या साह्याने उभा केलेली राज्य हे पुढे योग्य रीतीने टिकवायचे व वाढवायचे असेल तर युवराजचीही राज्याच्या रक्षणामध्ये महत्त्वाची भूमिका व मंत्र्याची महत्त्वाची भूमिका असते. त्यालाही हात समजावा असे शुक्रनीतीमध्ये सांगितले आहे. प्रधान कसे असावे त्याची गुण वैशिष्ट्ये सांगताना शुक्रनीतीमध्ये म्हटले आहे की तत्कालीन समाज रचनेनुसार सर्व प्रधान किंवा मंत्री ब्राह्मण वर्णाचे असावे. ब्राह्मण नाही मिळाल्यास क्षत्रिय असावेत व क्षत्रिय न मिळाल्यास वैश्य असावे. मुख्य सेनापती हा क्षत्रिय असावा. मंत्री सत्यवचनी, गुणवान, बुद्धिवान, चांगल्या सवयीचा, सत्कर्म करणारा, निरलस व

आपल्या कामापेक्षा मालकाचे काम अधिक चांगले करणारा असावा. तो लोभी, लबाड, व्यसनी, रोगी, नास्तिक, खोटे बोलणारा, शत्रूशी स्नेह न ठेवणारा व जनतेची क्रुरतेने वागणारा नसावा. मंत्राच्या गुणवैशिष्ट्या सारखेच युवराजानेही आपल्या वर्तनाने कुटुंबात ऐक्य राखावे. विद्वत्तेने व कार्याने प्रजेच्या प्रती प्रजेची प्रीती संपादन करावी. याबाबत शिवाजी महाराजांनी अष्टप्रधानांची निवड करताना विशेष काळजी घेतल्याचे आपणास दिसते.

**४) मराठकालीन राजपदाची वस्तूस्थिती:**

मराठाकालीन राजपद व त्याची वस्तूस्थिती पाहता असे दिसून येते की शुक्रनीती व यज्ञवालक्य स्मृती यांना अनुसरून ज्या प्रकारच्या संकल्पना दिल्या आहेत. त्याचा अंगीकार छत्रपती शिवाजी महाराजांनी आपल्या राज्यकारभारात केलेला दिसतो. प्रत्यक्ष आपल्या कारकिर्दीत राज्यातील इतर सर्व आगे ही राजा पेक्षा कमी महत्त्वाचे आहे हे वस्तुस्थिती दाखवून दिले. स्वराज्य निर्मिती करून राजा हा मुख्य अधिकारी असून इतर सर्व मंत्री राजाला राज्यात दुय्यम असतात. यातून राजपद हे निसंकोचपणे शिवाजी महाराजांनी आपल्या हाती ठेवल्याचे दिसते, यामुळेच त्यांना कोणीही विरोध करण्याचे अथवा केल्याचीही दिसत नाही. शिवाजी महाराजांनी राजपद उभे करताना मंत्र्याची संख्या ठराविक ठेवली असली तरी मंत्राच्या नेमणुकीबाबत मात्र शुक्रणीती मधील सूचनेचे पालन केल्याचे आपणास दिसून येते. शिवाजी महाराजांनी सन १६४५-४६ ला स्वराज्य स्थापनेची प्रतिज्ञा घेतली. तेव्हापासून छत्रपती या संज्ञेने त्यांना ओळखले जाऊ लागले होते. यावरून शिवाजी महाराजांचे राजपद व मंत्रिमंडळ या दोन्ही कल्पना शुक्रणीतील सूचनेनुसार अस्तित्वात आल्याच्या दिसतात.

**५) छत्रपती शिवाजी महाराजांच्या नंतर मराठा राजपदाची संकल्पना व स्थिती**

मुघल बादशहा औरंगजेबच्या मृत्यूनंतर मुघलांच्या कैदेतून छत्रपती शाहू महाराजांची सुटका झाली. शाहू महाराजांनी सुटकेनंतर अनेक मराठा सदराच्या मदतीने इ. स. १७०८ मध्ये मराठा सत्तेवर आपला हक्क प्रतिपादित केला आणि अष्टप्रधान मंडळ व त्याचे मुतालिक यांच्या नेमणूक केल्या. मात्र छत्रपती शिवाजी महाराजांचे अष्टप्रधान मंडळ व शाहू महाराजांचे अष्टप्रधान मंडळ यात फार मोठा फरक पाहण्यास मिळतो. तो म्हणजे शिवकाळात एकूणच सत्तेचे केंद्रीकरण झालेले असल्यामुळे सर्व मंत्री छत्रपतींना अतिशय दुय्यम असत. मात्र शाहू महाराजांच्या काळात अशी स्थिती राहिली नाही. मुळात छत्रपती म्हणून शिवाजी महाराज व शाहू महाराज यांच्या कर्तबगारीमध्ये मोठा फरक होता व प्राप्त परिस्थितीही वेगळी होती. शाहू महाराजांचे व्यक्तिमत्व व शिवाजी महाराजांचे व्यक्तिमत्व यातही जमीन आसमानाचा फरक दिसून येतो. शिवाजी महाराजांच्याविषयी मंत्र्यांना आदर व धाक वाटत असे. तर उलटपक्षी शाहू महाराजांच्या स्वभावाचा फायदा घेऊन बाळाजी विश्वनाथाने मराठा मंडळ बळकट केले. मराठा मंडळातील सरदारांना जहागिरी वाटून देण्यात आल्या. महसूल गोळा करण्याचे हक्क प्रदान करण्यात आले. त्याचबरोबर राज्याची कामे नेमून देण्यात आली आणि त्यामोबदल्यात त्यांना सरंजाम दिले गेले. स्वत: शाहू महाराजांनी बाळाजी विश्वनाथ दिल्लीहून परत

आल्यानंतर पाच महालांची सरदेशमुखीचे हक्क बहाल केले. इतर मंत्र्यांनाही जहागिरीच्या व पैशाच्या स्वरूपात सरंजाम देवून ते वंशपरंपरागत हक्काने दिले गेले. यावरून असे दिसून येते की, छत्रपती शाहू महाराजांच्या कारकिर्दीच्या सुरुवातीच्या काळातच मराठा राजपदाच्या संकल्पनेत आमुलाग्र स्वरूपाचा बदल झाला होता. विशेत: स्वतः राजालाच असा एक विशेष हक्क राहिला नाही. उलट पक्षी सरदारानी छत्रपतींची बाजू राखावी असा प्रकार सुरू झाला. त्यामुळे या संकल्पनेमध्ये जरी शिवकालीन राजपद असले तरी प्रत्यक्षात मात्र राजपद हे मराठा मंडळापेक्षा दुय्यम झाल्याचे दिसून येते.

**६) पेशेवकालीन मराठा राजपद:**

पेशवेकालीन मराठा राजपदामध्ये मोठा बदल होत गेल्याचे दिसते. छत्रपती शाहू महाराजांच्या काळात दरबारातील प्रतिनिधींचे महत्व कमी झाले आणि पेशव्यांचे महत्त्व अधिक वाढले. सुरुवातीच्या काळात या दोघात संघर्ष सुरू झाल्याचे पाहायला मिळते. पहिल्या बाजीरावांच्या काळात पेशवा व सेनापती यांच्यात वर्चस्वा संदर्भात संघर्ष पाहावयास मिळतो. या संघर्षात पेशवे यशस्वी ठरल्यामुळे सेनापती व सेनापतीसह इतर मंत्री ही नामशेष झाल्या सारखी अवस्था निर्माण झाल्याचे दिसते. मराठा राज्याच्या दृष्टीने ही घटना फार हानिकारक ठरली. पहिले चार पेशवे कर्तबगार निघाल्याने छत्रपतीचे महत्व हळूहळू कमी होऊन पेशव्यांचे महत्त्व अधिक वाढले. पहिला माधवराव पेशवा, पेशवा नारायणराव, सवाई माधवराव आणि दुसरा बाजीराव पेशवा यांच्या काळात तर छत्रपतीं व पेशवा या दोघांचेही महत्त्व कमी झाले व कारभाऱ्यांचे महत्त्व अधिक वाढले. सवाई माधवरांच्या काळात पेशवा व इतर मंत्री नामशेष झाले. १८ व्या शतकाच्या शेवटी कारभारी म्हणजे राज्य अशी स्थिती निर्माण झालेली दिसते. याच काळात मराठा राजपद ही संकल्पनादेखील इतिहास जमा झाली. एकूणच मराठा राजपद हे प्रबळ राजकारणापासून सुरू झाले व शेवटी प्रबळ कारभाऱ्यापर्यंत येऊन ठेपले. पेशव्यांच्या उत्तरकाळात जी व्यक्ती प्रबळ होती तिच्या हातात सत्ता अशी स्थिती निर्माण झाली. दुसरा बाजीराव अतिशय दुर्बल निघाल्याने त्याचा खाजगी कारभारी सर्वाधिकारी बनला. त्याचाच परिणाम म्हणजे केंद्रीय सत्तेचे विभाजन होत गेले. पर्यायाने मराठी सत्ता व राजपद कुंमकूवत बनले एकंदरीत मराठा मंडळाच्या हस्तांनतर राजा, अष्टप्रधान मंडळ, पेशवा, कारभारी यांच्याकडे होत गेल्याचे दिसते.

**स्वय अध्ययन प्रश्न क्र. २**

**अ) रिकाम्या जागा भरा.**

१) मुस्लिम सत्तेच्या उदयापूर्वी भारतातील राजपदाच्या संकल्पनेवर ............ प्रभाव होता.

अ) हिंदू धर्म   ब) श्रुती स्मृती   क) शुक्रनीती   ड) वरील सर्व

२) शुक्रनीतीनुसार राजाजवळ ............ हे प्रमुख गुण त्याच्याजवळ आवश्यक मानलेले आहेत.

अ) पराक्रम   ब) बुद्धिमत्ता   क) शक्ती-शौर्य   ड) वरील सर्व

३) शिवाजी महाराजांनी ............ पद्धतीने राज्याभिषेक करून घेतला.

अ) वेदोक्त ब) पुराणोक्त क) वैदिक ड) यापैकी नाही

४) हिंदू परंपरेत राजाची ......... इतकी महत्त्वाची अंगे सांगितले आहेत.

अ) ७ ब) ८ क) ९ ड) १०

५) ................ मध्ये शाहू महाराजांची मुघलांच्या कैदेतून सुटका झाली.

अ) १७०५ ब) १७०६ क) १७०७ ड) १७०८

**ब) एका वाक्यात उत्तरे लिहा.**

१) मराठा दरबारातील प्रतिनिधींचे महत्व कोणाच्या काळात कमी झाले.

२) शिवाजी महाराजांचा तांत्रिक राज्याभिषेक कोणी केला.

३) अष्टप्रधानांतील प्रत्येक प्रधान आपल्या खात्याबद्दल कोणाला जबाबदार होता.

४) शिवाजी महाराजांनी कोणत्या वर्षी स्वराज्य स्थापनेची प्रतिज्ञा घेतली.

५) दुसरा बाजीराव अतिशय दुर्बल निघाल्याने त्याचा कोणता अधिकारी सर्वाधिकारी बनला.

## १.२.३ मराठा राजमंडळ: उदय आणि विकास

### १) मराठा मंडळाची निर्मिती व विकास

मराठ्यांच्या स्वातंत्र्ययुद्धाच्या कालखंडात अर्थात छत्रपती राजाराम महाराजांच्या काळात मराठा मंडळ अस्तित्वात येण्यास सुरुवात झाली. छत्रपती शाहू महारजांच्या काळात पेशवा बाळाजी विश्वनाथ, बाजीराव पहिला यांच्या प्रयत्नामुळे मराठा मंडळ अधिक बळकट होऊन विस्तार पावले. परिस्थितीतून निर्माण झालेली गरज होती तसेच छत्रपती शिवाजी महाराजांनी स्थापन केलेल्या व संवर्धित केलेल्या मराठा राज्याला विघटनापासून वाचवण्यासाठी व त्याचा विस्तार करण्यासाठी मराठा मंडळ अस्तित्वात आले. हे काम त्यांनी समर्थपणे पार पडल्याचे आपणास दिसते. त्याचा परिणाम म्हणून मराठा राज्याचे रूपांतर शाहू महाराजांच्या काळात साम्राज्यात झाल्याचे दिसते. दिल्लीपर्यंत अटकेपार मराठ्यांचा ध्वज या मंडळाने फडकवण्याचे काम केले. बंगाल प्रांतात मुसंडी मारून दक्षिण भारतातील अर्कट त्रिचनापल्लीपर्यंतचा प्रदेश त्यांनी आपल्या वर्चस्वाखाली आणला. मात्र पुढे मराठा मंडळाच्या अस्तित्वामागील कर्तृत्वशक्ती नाहीशी झाल्यामुळे पर्यायाने मराठा मंडळामध्ये अंतर्गत संघर्ष वाढतच गेला. पेशवा माधवरावांनी अंतर्गत संघर्ष कमी करण्याचे आटोकाठ प्रयत्न केला मात्र त्यांच्या अकाली निधनाने मराठा मंडळाचे भवितव्य अंधारात बुडाले. पुढील काळात मध्यवर्ती सत्तेचे नियंत्रण दुर्बळ होऊन शेवटी वैभवशाली शिखरावर गेलेल्या मराठा मंडळाचा नाश झाला.

## २) मराठा मंडळाची निर्मिती:

छत्रपती शिवाजी महाराजांनी स्थापन केलेले अष्टप्रधान मंडळ हे सल्लागार मंडळ होते. राजाला त्याची कर्तव्य जबाबदारी पार पाडण्यासाठी अष्टप्रधान मंडळ सल्लागार म्हणून मोलाची मदत करत होते. प्रधानांच्या निष्ठेमुळे राजा व राज्य एकत्र बांधले गेलेले होते. मात्र तत्कालीन अष्टप्रधान मंडळातच भावी मराठा मंडळाची बिजारोपण झालेले होते असे दिसते. कारण शिवाजी महाराजांच्या अष्टप्रधान मंडळापैकी सहा प्रधान लष्करी व मुलकी सेवेचे काम करत होते. फक्त पंडितराव व न्यायाधिशांना लष्करी कामगिरी नव्हती. शिवाजी महाराजांनी अष्टप्रधान मंडळाच्या माध्यमातून सत्तेचा समतोल राखलेला आपणास दिसतो. प्रत्येक मंत्र्यांचा दर्जा समान ठेवून मंत्र्याचे हुद्दे वंश परंपरागत न देता ते गुणवत्तेवर दिले. मंत्राच्या कामाचा मोबदला अथवा वेतन जहागिर म्हणून न देता रोख रकमेत दिले. वेतनाचे हे स्वरूप शिवाजी महाराजांच्या अखेर पर्यन्त टिकून होते. शिवाजी महाराजांच्या मृत्यूनंतर मराठा राज्यात थोडीसी गोंधळाची परिस्थिती निर्माण झाली. मुघल सैन्याने रायगड जिंकून घेतला. छत्रपती संभाजी महाराजांची निर्घून हत्या करून स्वराज्यातील मोठा प्रदेश जिंकून घेतला. शककर्ते शिवाजी महाराजांनी निर्माण केलेले राज्य नाहीसे होते की काय अशी स्थिती निर्माण झाली. तत्कालीन मराठा सरदारांच्यावर नेतृत्व व द्रव्यहीन अवस्थेत मराठा स्वातंत्र्य टिकवण्यासाठी अखेरचा आणि निखराचा लढा द्यावा लागला. अशा अतिशय बिकट परिस्थितीत मराठा मंडळाचा उदयास पूरक वातावरण तयार झाले. शिवाजी महाराजांच्या मृत्यूपश्च्यात अष्टप्रधान मंडळ दुभंगले गेले. प्रत्यक्ष रणक्षेत्रात कधी अमात्य तर कधी प्रतिनिधी तर कधी पेशवे यांचे वर्चस्व वाढू लागले. छत्रपती राजाराम महाराजांच्या काळात आणीबाणीच्या प्रसंगी न्यायाधीश निराजी रावजी यांचा मुलगा प्रल्हाद निराजी हा ही एकदम मराठा राज्यात पुढे आला. रघुनाथ हनुमंते हे ही मराठा राज्यात प्रभावी ठेवले. संभाजी महाराजांचे सचिव असलेले रामचंद्रपंत अमात्य यांनी या काळात मराठा राज्याची बहुमोल सेवा केली. दरम्यान औधचे प्रतिनिधी, भोरच्या पंतसचिवांचे वंशज मराठा सत्तेतील महत्त्वाच्या हुद्यापर्यंत पोहोचलेले दिसतात. मराठ्यांच्या स्वातंत्र्य लढ्यात अनेक सरदारांना आपल्या अंगातील लष्करी कौशल्य दाखवण्याची संधी मिळाली. संताजी घोरपडे, धनाजी जाधव, खंडेराव दाभाडे, परसोजी भोसले यासारखे अनेक मातब्बर सरदार पुढे आलेले दिसतात. एकूणच काय तर छत्रपती राजाराम यांनी आपले हितचिंतक व प्रमुख सल्लागार यांच्याशी विचार विनिमय करून आखलेल्या योजनेतून मराठा मंडळाचा उगम झाल्याचे दिसून येते.

## ३) मराठा मंडळची नांदी

मराठा मंडळाच्या उगमामुळे छत्रपती शिवाजी महाराजांनी मोठ्या चातुर्याने ज्या वतनदारी आणि जहागिरी पद्धतीला बाजूलेले होते, नेमकी ह्याच पद्धती छत्रपती राजाराम महाराजांना प्राप्त परिस्थिती अपर्याहर्यामुळे पुन्हा सुरू कराव्या लागल्या. औरंगजेब बादशहाच्या मृत्यूमुळे मराठा सत्तेवर आलेले संकट नाहीसे झाले असे वाटत असताना मुघलांनी मोठ्या हिकमतीने सन १७०८ मध्ये छत्रपती शाहू महाराजांची कैदेतून सुटका केली. मराठा सरदारांच्यात फुट पडली. जशी मराठा सरदारांच्यामध्ये फुट पडली तशीच मराठा

मंडळामध्येही दुही निर्माण झाली. परिणामी समान ध्येयासाठी एकत्र आलेल्या मराठा मंडळाची शक्ती पुन्हा विस्कळीत झाली. कारण मराठा मंडळातील काही सरदारांनी छत्रपती शाहूंची बाजू घेतली तर काहींनी महाराणी ताराबाई यांची बाजू घेतली. धनाजी जाधवांचा मुलगा चंद्रसेन जाधव हा शाहू महाराजांचा पक्ष सोडून निजामाकडे गेला. चंद्रसेन सारखा सरदार असलेले हैबतराव निंबाळकर निजामाकडे गेले. नेमाजी शिंदे मुघलांना मिळाले तर खंडेराव दाभाडे, परसोजी भोसले यांनी मराठा राज्यापेक्षा स्व:हिताकडे जास्त लक्ष दिले. कान्होजी आंग्रे यांचासारखा प्रबळ आरमाराचा प्रमुख महाराणी ताराबाईच्या पक्षाला मिळाला. एकूणच मराठा मंडळामध्ये फूट होऊन अंतर्गत यादवी सुरुवात झाली. सर्व मराठा सरदार आणि वतनदारांना लष्करी बळावर आपल्या वर्चस्वली आणण्यात छत्रपती शाहू महाराजांना स्वभावदोषामुळे अपयश आले. परिणामी हे सर्व सरदार आपापसात लढून मराठ्यांची ताकद कमी करू लागले.

### ४) मराठा मंडळाचा विस्तार आणि पेशवा बाळाजी विश्वनाथ:

मराठा राज्यातील अंतर्गत यादवी, सरदारातील अंतर्गत संघर्ष यामुळे मराठा राज्य दुभंगले जाण्याची शक्यता निर्माण झालेली होती. छत्रपती शिवाजी महाराजांनी पराक्रमाची शर्थ करून सर्वांना बरोबर घेऊन स्वराज्याचा नावलौकिक वाढवला. तेच हे मराठा राज्य यादवीने आतून पोखरत चाललेले होते. मराठा राज्यातील अंतर्गत यादवीत छत्रपती शाहू महाराजांच्या बाजूने पेशवा बाळाजी विश्वनाथ उभे राहिले. मराठा सरदारातील हेवे दावे कमी करून त्यांना एकत्र आणून राष्ट्र कार्यात एकत्र आणण्याचे कार्य बाळाची विश्वनाथांने केले. बाळाची विश्वनाथांला याची बक्षिशी म्हणून की काय शाहू महाराजांच्याकडून १७ नोव्हेंबर १७१३ रोजी पेशवे पद मिळाले. पेशव पदाच्या प्राप्तीनंतर बाळाजी विश्वनाथ यांनी कान्होजी आंग्रे यांची समजून काढून शाहू महाराजांच्या पक्षात आणले. याशिवाय या काळात अनेक बंडखोर मराठा सरदारांना त्यांच्या जागी इनामी बहाल करत शाहू महाराजांच्या बाजूस वळते केले. साम, दाम, दंड, भेद या तत्वांचा अवलंब करून अनेक मराठा सरदार शाहू महाराजांच्या पक्षात आणले. मराठी सरदारांना प्रदेश वाटून चौथाई व सरदेशमुखी वसूल करणाचे अधिकार बहाल केले. स्वतंत्र फौज उभारण्याची परवानगी दिली. बाळाजी विश्वनाथांनी आपल्या दूरदृष्टीने मराठा राज्याला समर्थशाली बनवले आपापसात संघर्ष करणाऱ्या मराठा सरदारांना स्व:कर्तुत्वाची दिशा दाखवण्याचे कार्य बाळाजीने करून दाखवले, त्यांच्या माध्यमातून मराठा मंडळाचा विस्तार घडवून आणला.

### ५) त्रिसनदा आणि मराठा मंडळाचा विस्तार:

पेशवा बाळाजी विश्वनाथ यांनी मराठा मंडळातील भेदाची भावना बाजूला करून राष्ट्रीय भावनेचा सेतु बांधण्याचे कार्य केले. यातून मराठा मंडळाची शक्ती एकवटली गेली. परिणामी मुघल बादशहाकडून मराठ्यांना ३ मार्च १७१९ रोजी चौथाई, १५ मार्च १७१९ रोजी सरदेशमुखी सनद व स्वराज्याची कायदेशीर सनद मिळवण्यात बळाजी विश्वनाथ यशस्वी झाले. यामध्ये बाळाजी विश्वनाथाची भूमिका महत्त्वाची ठरली. मराठा मंडळाला कायदेशीर मान्यता मिळाल्याबाबत इतिहासकार न्या. महादेव गोविंद रानडे म्हणतात ''ज्या

कायदेशीरपणाच्या अभावामुळे ही सत्ता ही सामर्थ्यापासून वेगळी दाखवता येत नाही. तो कायदेशीरपणा या बादशाही मान्यतेमुळे मराठी सत्तेला प्राप्त झाला.''

**अ) चौथाई**

चौथाई म्हणजे स्वराज्याबाहेरील किंवा शिवाजी महाराजांच्या मूळच्या स्वराज्याच्या बाहेरील प्रदेशातून वसूल झालेल्या एकूण उत्पन्नाचा एक चतुर्थांश भाग घेण्याचा मराठा राज्याला हक्क प्राप्त झाला. चौथाईच्या सनदेनुसार मराठ्यांना आपल्या लष्करी उदरनिर्वाह करिता स्वराज्याबाहेरील लोकांनी त्यांच्या एकूण महसुली उत्पनाच्या एक चतुर्थांश भाग मराठ्यांना द्यावयाचा होता. याच्या बदल्यात मराठ्यांनी त्या त्या प्रदेशाचे बाह्य आक्रमनापासून संरक्षण करायचे हे धोरण निश्चित झाले होते.

**ब) सरदेशमुखी**

सरदेशमुखीच्या अधिकाराबाबतचा हक्क महाराष्ट्रात फार पूर्वीपासून मान्य केल्याचे दिसून येते. महाराष्ट्रात ज्यावेळी जमीन लागवडीखाली आणल्या गेल्या. त्यावेळी त्या त्या भागातील देशमुखनावाचे अधिकारी सरकारच्या वतीने शेतसरा वसूल करत असत, महसूल वसुलीच्या बदल्यात जमा केलेल्या एकूण रकमेच्या १०% हिस्सा स्वतःसाठी राखून ठेवण्याचा त्यांना अधिकार प्राप्त झालेला होता. असे १०% उत्पन्न मिळवणाऱ्यास सरदेशमुख असे म्हणत. स्वराज्य प्राप्तीनंतर हा अधिकार आपोआप शिवाजी महाराजांना प्राप्त झालेला होता. मात्र नव्या सनदेप्रमाणे स्वराज्यातील काही प्रदेश मुघलांच्या ताब्यात गेला. पण स्वराज्याच्या मूळ प्रदेशातील सरदेशमुखीचे अधिकार मुघलांनी शाहू महाराजांना दिले. चौथाई व सरदेशमुखी यांमध्ये मुख्य फरक असा होता की चौथाई स्वराज्या बाहेरील मुघली प्रदेशातून वसूल केला जाणारा कर होता. तर सरदेशमुखी स्वराज्यातील मुलखातून वसूल केला जाणारा कर होता.

**ड) स्वराज्य:**

छत्रपती शिवाजी महाराजांनी निर्माण केलेल्या स्वराज्यातील बराचसा प्रदेश शाहू महाराजांच्या काळामध्ये मुघलांच्या ताब्यात गेला होता. त्यामुळे मराठ्यांना स्वराज्याच्या प्रदेशातून सरदेशमुखी करणे वसूल करणे अवघड झाले होते. इ. स. १७१९ च्या सनदेने मुघल बादशहाने शाहू महाराजांना स्वराज्य परत केले. मुघल अधिकाऱ्यांना बादशहाच्या आदेशाची आदर करणे भाग पाडले. वास्तविक पाहता जरी स्वरज्याचा प्रदेश शाहू महाराजांच्या ताब्यात आलेला असला तरी ते मुघलांचे लष्करी मांडलिक बनलेले होते. बाळाजी विश्वनाथ यांनी स्वराज्याची सनद शक्तीचा व युक्तीचा उपयोग करून मिळवली. साहजिकच छत्रपती शाहू महाराजांना सरदेशमुखी व सर्व महसूल वसूल करण्याचा अधिकार मराठ्यांना मिळाला. चौथाई व सदेशमुखीच्या बदल्यात मराठ्यांनी दक्षिणेकडील सहा सुभ्यांचे बाह्य आक्रमणंपासून संरक्षण करायचे होते. या संदर्भात इतिहासकारांच्यामध्ये मतभेद दिसून येतात. कारण एका अर्थाने मुघल बादशह स्वतःच

मराठ्यांच्या संरक्षणाखाली आला होता तर दुसऱ्या अर्थाने मुघल बादशहा मराठ्यांचा अश्रित तर मराठ्यांचा राजा मुगल बादशहाचा सरंजामदार सरदार असा देखावा आपणास पहावयास मिळतो.

**६) मराठा मंडळाचे विस्ताराची कारणे**

मराठा मंडळाच्या विस्ताराने १८ व्या शतकाच्या प्रारंभीच्या काळात जाहागिरी पद्धतीचा उदय झाला. मराठा सरदार स्वतंत्रपणे आपल्या हालचाली करू लागले. आपल्या जाहागीरी वाढवू लागले. तरीही बळाजी विश्वनाथाच्या मुत्सद्दगिरीच्या धोरणामुळे या मंडळात योग्य तो समन्वय टिकून राहिला होता. मराठा सरदार एका दिशेने, एका दिलाने, ऐक्याने वाटचाल करतील अशा पद्धतीची व्यवस्थ पेशवा बाळाजी विश्वनाथांने निर्माण केल्यामुळे मराठा सरदारांनी नेत्रदीपक विजय मिळवून आपल्या जहागिरीचा व पर्यायाने मराठा साम्राज्याच्या सीमा मोठ्या प्रमाणात विस्तारल्या. मुघलांच्या दक्षिणेकडील सहा सुभ्याच्या पुढे सर्व हिंदुस्तानभर मराठे विखुरले, देशभावना व प्राचीन परंपरेबाबत त्यांच्या मनात आदराची भावना होती. अटकेपार मराठे दौडत राहिले. त्यांच्या या कार्यामुळे न्या. महादेव गोविंद रानडे म्हणतात ''मराठा मंडळ समान परंपरा व देशभक्ती यांनी गुंफलेले नसते तर ते वाळूच्या दोरीसारखे टकलादू ठरले असते.'' हे जारी खरे असले तरी मराठा मंडळाच्या विकासातील पुढील टप्पे महत्त्वाचे होते. १) छत्रपती शिवाजी महाराजांच्या परंपरा व शाहू महाराजाबद्दल आस्था. २) सत्तेच्या समतोलाची जाणीव. ३) सामाजिक हितसंबंध असलेल्या सदस्यांनी सामाजिकरित्या बजवलेली कर्तव्य. ४) वंश परंपरागत इनाम व वतनाबद्दल त्यांना वाटणारा आपलेपणा. ५) सरकारी खजिन्यात त्यांनी आपले वार्षिक हिशोब सादर करण्याची सक्ती. ६) या सदस्यांच्या खर्चावर आपल्या हिशोबनिसा मार्फत मध्यवर्ती सरकार ठेवीत असलेले नियंत्रण. ७) ठराविक लष्कर सतत सज्ज ठेवून मध्यवर्ती सत्ता बोलविल तेंव्हा सेवेत सामील होण्याबाबत त्यांच्यावर असलेली सक्ती. ८) नवीन प्रदेश जिंकून घेण्यापूर्वी मध्यवर्ती सत्तेची घ्यावी लागणारी परवानगी. ९) त्यांच्या महत्वाच्या नोकरांच्या मध्यवर्ती सत्तेकडून होत असलेल्या नेमणूका. इ. बंधनामुळे सरदाराच्या फुटीरतावादी वृत्तीला आळा बसला. छत्रपती शाहू महाराज स्वतः फारसी कर्तबगारी दाखवू शकले नसले तरी शिवाजी महाराजांचे वारस म्हणून मराठा मंडळातील सर्व सदस्य सरदारांना त्यांच्याबद्दल आदर होता व तोच मराठा मंडळातील ऐक्याचा धुवा होता. छत्रपती शाहू महाराज या सरदारातील संघर्ष मिटवू शकत होते. एकूणच मराठा राज्याचे सर्व व्यवहार छत्रपती शाहू राज्यांच्या नावाने चालू होते. पुढे मात्र मराठा राज्याला योग्य वारस न मिळाल्याने मराठा मंडळाचा सत्ता प्रमुख या नात्याने पेशव्याकडे गेली. शाहू महाराजांच्या पश्चात मराठा राज्यामध्ये असलेला मराठा मंडळामध्ये असलेला समतोल राहिला नाही. पेशवे स्वतः मराठा मंडळाचे मालक समजून लागले. परिणामी मराठा मंडळ विनाशाकडे वाटचाल करू लागले.

**७) मराठा मंडळाची उपयुक्तता:**

छत्रपती शिवाजी महाराजांच्या मृत्यूनंतर मराठा राज्य आणीबाणीच्या प्रसंगात टिकवून ठेवण्याचे फार मोठे कार्य मराठा मंडळाने केले. त्यामुळे मराठा मंडळाची कामगिरी मराठ्यांच्या इतिहासामध्ये महत्त्वपूर्ण

मानली जाते. कर्तृत्वान मराठा सरदारांत एकजूट टिकवून त्यांना नवी कार्यक्षेत्र उपलब्ध करून देण्याची गरज होती. त्यावेळी मराठा सरदारानी व मराठा मंडळाने हे कार्य अत्यंत आत्मीयतेने केले. परिणामी दक्षिणेकडील सहा सुभे मुघलाकडून मराठ्यांकडे आले असताना या मंडळातील कर्तबगार सरदारानी उत्तर पूर्वेकडील गुजरात, माळवा, बुंदेलखंड, गोंडवाना, ओरिसा हे प्रदेश मराठ्यांच्या ताब्यात आणले. या प्रदेशाच्या प्राप्तीमुळे शिदे, पवार, होळकर, गायकवाड यासारखे मराठा सरदार कायमचे त्या प्रदेशात राहून मराठ्यांना मदत करू लागले. दिल्लीपर्यंत मराठ्यांना मजल मारता आली. पंजाब प्रांतात चौथाईचा अधिकार मिळवून मराठे अटकेपार पोचले. या मराठा मंडळातील सरदारांचा आदर्श घेऊन पुढे माधवराव पेशव्यांनी हैदरअली, टिपू सुलतान याच्यावरही वर्चस्व प्राप्त करणे शक्य झाले. संपूर्ण उत्तर व दक्षिण हिंदुस्थान प्रत्यक्ष-अप्रत्यक्षरीत्या मराठ्यांच्या ताब्यात असल्याचे दिसून येते. एकूणच मराठा मंडळाच्या आरंभापासून पुढील शंभर वर्षे हिंदुस्तानच्या इतिहासावर आपल्या कर्तुत्वाने ठसा उमटवण्याचे काम या मराठा मंडळाने केले. मराठ्यांचा भगवा ध्वज हिंदुस्थानच्या फार मोठ्या प्रदेशावर दिमाखाने फडकवीत ठेवण्याचे काम याच मराठा मंडळाने केल्याचे दिसून येते.

**८) मराठा मंडळाचा ऱ्हासाची करणे:**

१७ व्या शतकाच्या मध्यास छत्रपती शिवाजी महाराजांनी निर्माण केलेल्या स्वराज्याचे साम्राज्यात रूपांतर करण्याची ऐतिहासिक कामगिरी मराठा मंडळाने पार पाडली हे जरी खरे असले तरी जेव्हा हे मंडळ बळकट करण्याचे प्रयत्न केले जात होते तेव्हाच त्यामध्ये विभाजनाची बीजे नकळत पेरली गेलेली होती. मराठा मंडळाच्या ऱ्हासास जी प्रमुख कारणे कारणीभूत ठरली त्यामध्ये खालील घटक प्रामुख्याने दिसतात. १) शिवाजी महाराजांनी बंद केलेली वतनदारी व जहागिरी पद्धत पुन्हा सुरू केली, हिच पद्धत पुढील काळात फुटीर वृत्तीला फार मोठ्या प्रमाणात कारणीभूत ठरलली. २) शाहू महाराजांच्या मृत्यूनंतर मराठा सरदारातील फूट उत्तर-उत्तर वाढतच गेली. त्यांच्यामध्ये समेट घडवण्याचा प्रयत्न पेशव्यांनी केला नाही. उदा. नानासाहेबसारखा पेशवा, शिंदे-होळकर या प्रमुख सरदारांना एकत्र ठेवू शकले नाही. परिणामी मराठा मंडळाचे दोन आधारस्तंभ परस्परांवर शस्त्रे चालू लागले. ३) पेशवा नासाहेबांनी इंग्रजांच्या मदतीने मराठा आरमार बुडवून टाकले. ४) सुरुवातीला मराठा मंडळातील बहुसंख्य सदस्य मराठा जातीचे होते. पहिले बाजीराव पेशव्याने पवार, होळकर, शिंदे यासारखी इतर अनेक नवीन सदरांना संधी देऊन मराठा राज्याचा विस्तार घडवून आणला. मात्र पुढे नानासाहेब पेशवा व माधवराव यांच्या काळात मराठा सरदारांना डावलून आपल्या मर्जीतील ब्राह्मण सरदारांना जास्तीच्या संधी दिल्या गेल्या. साहजिकच जुने मराठी सरदार दुखवले गेले व हेवेदावे वाढले. ५) याशिवाय केंद्रीय अर्थात मध्यवर्ती सत्तेचा कुमकुतपणा, आर्थिक क्षेत्राकडे केले गेलेले दुर्लक्ष, जुने नवे असा भेद, दळणवळण साधनाचा अभाव, नवीन शास्त्र व तंत्रज्ञाकडे केलेले दुर्लक्ष, उच्च कोटीचा जातीभेद आणि अस्पृश्यता इत्यादी कारणामुळे कर्तबगारीच्या उंच शिखरावर असणारे मराठा मंडळ हळूहळू कुमकुवत होते गेले आणि पुर्णपणे नष्ट झाले.

**स्वय अध्ययन प्रश्न क्र. ३**

**अ) रिकाम्या जागा भरा.**

१) ...................... ने मराठा मंडळ अधिक मजबूत केले.

अ) बाळाजी विश्वनाथ ब) धनाजी जाधव

क) दूसरा बाजीराव ड) पेशवा नानासाहेब

२) ....................... यांनी सरदारांना जहागिरी देण्यास प्रारंभ केला.

अ) शिवाजी महाराज ब) संभाजी महाराज

क) राजाराम महाराज ड) महाराणी ताराबाई

३) मुघल बादशहाकडून चौथाई व सरदेशमुखच्या सनदाची ................ यांनी आणल्या.

अ) नानासाहेब पेशवे ब) बाळाजी विश्वनाथ

क) पहिले बाजीराव ड) पेशवे माधवराव

४) बाळाची विश्वनाथांला शाहू महाराजांच्याकडून ............... रोजी पेशवे पद मिळाले.

अ) १७ नोव्हेंबर १७१३ ब) १८ नोव्हेंबर १७१३

क) १९ नोव्हेंबर १७१३ ड) २० नोव्हेंबर १७१३

५) मुघल बादशहाकडून मराठ्यांना .................. रोजी चौथाईची सदन प्राप्त झाली.

अ) ३ मार्च १७१९ ब) ४ मार्च १७१९

क) ५ मार्च १७१९ ड) ६ मार्च १७१९

**ब) एका वाक्यात उत्तरे लिहा.**

१) मराठ्यांना सरदेशमुखी सनद केंव्हा प्राप्त झाली.

२) मराठी सत्तेचा उदय हा ग्रंथ कोणी लिहिला आहे.

३) एकूण महसुली उत्पनाच्या किती टक्के हिस्सा सरदेशमुखास मिळत असे.

४) कोणत्या वर्षीच्या सनदेने मुघल बादशहाने शाहू महाराजांना स्वराज्य परत केले.

५) चौथाई व सदेशमुखीच्या बदल्यात मराठ्यांना दक्षिणेकडील किती सुभ्यांचे संरक्षण करायचे होते.

## १.३ पारिभाषिक शब्द शब्दार्थ

- **वतनदारी :** कामाच्या अथचा सेवेच्या मोबदल्यात दिली जाणारी  इनामी जमीन किंवा प्रदेश.
- **गनिमी कावा :** शत्रू बेसावध असताना त्याच्यावर अचानक हल्ला करणे व हेतू साध्य होतास निघून जाणे.
- **धर्मातीत राज्य :** कोणत्याही धर्माला श्रेष्ठ अगर कनिष्ठ न मानता सर्वांना समान मानून राज्यकारभार पाहणारे राज्य
- **चाणक्य नीति :** चंद्रगुप्त मौर्य यांच्या दरबारात कार्यरत असणारा विष्णू गुप्त उर्फ आर्य चाणक्य यांनी सांगितलेली राज्य राज्यकारभाराची नीती
- **शुक्रनीती:** प्राचीन भारतातील थोर विचारवंत शुक्राचार्य यांनी राजनीति संदर्भात लिहिलेला ग्रंथ
- **चौथाई:** राज्याच्या एकूण उत्पन्नाचा एक चतुर्थांश भाग स्वसंरक्षणासाठी मित्र राज्याला देणे.
- **सरदेशमुखी :** राज्याच्या वसुलीच्या एकूण गोळा केलेल्या शेतसाऱ्यातील दहा टक्के हिस्सा राजा स्वतःसाठी राखून ठेवत राखून ठेवणे

## १.४ स्वय अध्ययन प्रश्नांची उत्तरे

✻ स्वय अध्ययन प्रश्न क्र. १ ची उत्तरे

अ) १– ब, २–क, ३–६ जून १६७४, ४– राजसत्ताक, ५– शुक्रनीती

ब) १– रामचंद्रपंत आमत्य, २– छंदोगामात्य, ३– राजाराम महाराज, ४–जिंजी, ५–१०

✻ स्वय अध्ययन प्रश्न क्र. २ ची उत्तरे

अ) १– वरील सर्व, २– वरील सर्व, ३– वेदोक्त, ४–१०, ५– १९०८

ब) १– शाहू महाराज, २– निश्चलपुरी गोसावी, ३–राजा, ४–१६४५–१६४६,
५– खाजगी कारभारी

✻ स्वय अध्ययन प्रश्न क्र. ३ ची उत्तरे

अ) १– बाळाजी विश्वनाथ, २– राजाराम महाराज, ३– बाळाजी विश्वनाथ,
४– १७ नोव्हेंबर १७१३,
५–३ मार्च १७१९

ब) १–१५ मार्च १७१९, २– न्या. एम. जी. रानडे, ३– १० टक्के, ४– १५ मार्च १७१९, ५– सहा

## १.५ सारांश

महाराष्ट्रामध्ये १७ व्या शतकात छत्रपती शिवाजी महाराजांनी हिंदवी स्वराज्याची स्थापना करून एका नव युगाची सुरुवात केली. शिवाजी महाराजांनी स्थापन केलेल्या मराठा राज्याला राष्ट्रीय ध्येय आणि हिंदूंच्या उदात्त परंपरा यापासून स्फूर्ती मिळालेली होती. शिवकाळातील राजपदाची संकल्पना ही परंपरेनुसार चालत आलेल्या हिंदू परंपरेचे विकसित रूप होते. भारतात इस्लामी सत्तेच्या अगोदर भारतातील राजपदाच्या संकल्पनेवर हिंदू धर्म, श्रुती, स्मृती, शुक्रनीती व चाणक्यनीचा प्रभाव होता. विजयनगरच्या साम्राज्याच्या विनाशानंतर शिवाजी महाराजांनी हिंदू धर्माच्या रक्षणासाठी हिंदू परंपरेवर आधारलेल्या स्वराज्याची स्थापना केली. सन १६७४ मध्ये स्वराज्याच्या छत्रपती पदाला कायदेशीर अधिकार प्राप्त झाला. हिंदुस्तानमध्ये हिंदू पदपादशाही स्थापन करून स्वधर्माचे रक्षण तर केलेच पण सर्वांना बरोबर घरून घेऊन परमधर्म सविष्णुवृत्तीने कल्याणकारी राज्य पद्धतीने स्वराज्याला सर्वच दृष्टीने आदर्श बनवले. स्वराज्याच्या कार्यात सर्वांना बरोबर घेऊन सामान्य लोकांच्या मनात नवचेतना निर्माण केली. स्वराज्याच्या ध्वजाखाली रयतेला एकत्र करून प्रजाहितक्षक राज्यकारभाराचा आदर्श इतरापुढे निर्माण करण्याचे काम छत्रपती शिवाजी महाराजांनी केले. छत्रपती शिवाजी महाराजांनी राजसत्तात्मक शासन पद्धती, कार्यक्षम अष्टप्रधान मंडळाची स्थापना, वतनदार पद्धतीचा शेवट, व्यक्तीगुणांना प्राधान्य, समानसंधी, लोककल्याण, गनिमी कावा युद्धनीती, आदर्श करपद्धती व न्यायव्यवस्था ही आपल्या स्वराज्याची ध्येय उद्दिष्टे म्हणून ती पूर्ण करण्यासाठी संपूर्ण आयुष्य खर्च केले. दूरदृष्टी, मुसद्दीपणा, काळाची अचूक जाण, शक्ती व युक्तीचा उपयोग करून त्यांनी स्वराज्याला आदर्श राज्य बनवले. आणीबाणीच्या प्रसंगी ही स्वराज्याची भिंत अभेद्य राहिल्याचे आपणास दिसून येते. स्वराज्याचा आदर्श पाया घातल्यामुळे त्याचे रूपांतर साम्राज्यात झाले.

सन १६८९ मध्ये छत्रपती संभाजी महाराजांची हत्या झाल्यानंतर अत्यंत बिकटप्रसंगामध्ये मराठा राज्याची सूत्रे छत्रपती राजाराम महाराजांच्याकडे आली. या काळात मराठा राज्य वाचवण्यासाठीच मराठा मंडळ अस्तित्वात आले. सर्व हिंदुस्थानमध्ये वर्चस्व प्रस्थापित करण्यात मराठा मंडळातील कर्तबगार सरदार यशस्वी ठरल्याचे दिसतात. एकीकडे मराठा सरदाराचे वर्चस्व वाढत असताना मराठा मंडळामध्ये विनाशाची बीजे देखील रोवली गेली. छत्रपती शाहू महाराजांच्या मृत्यूनंतर पेशवाईंच्या काळात काही पेशव्यांच्या धरसोड वृत्ती व धोरणामुळे मराठा मंडळात यादवी सुरू झाली. पर्यायाने पेशव्यांनी स्वतःच्या वर्चस्वासाठी मराठ्यांचे आरमार इंग्रजांच्या मदतीने उध्वस्त केले. धूर्त इंग्रजांनी पुढे या संधीचा फायदा घेतला आणि सन १८१८ मध्ये मराठ्यांची सत्ता संपुष्टात आणली.

## १.६ सरावासाठी स्वाध्याय

### अ) टिपा लिहा

१) हिंदवी स्वराज्याची संकल्पना सांगा.

२) मराठा मंडळ

३) मराठा मंडळाच्या कार्याचा आढावा घ्या

४) मराठा मंडळाच्या ऱ्हासाचे माहिती द्या.

**ब) खालील प्रश्नांची विस्तृत उत्तरे लिहा.**

१) मराठा स्वराज्याची ध्येय व उद्दिष्ट स्पष्ट करा.

२) हिंदू राज्य व राजपदाची संकल्पना स्पष्ट करा.

३) मराठा मंडळाच्या विकासातील पेशवे बळाची विश्वनाथ यांची भूमिका स्पष्ट करा.

४) मराठा मंडळाच्या कामगिरीच्या आढावा घ्या.

## १.७ संदर्भ ग्रंथ आणि अधिक वाचनासाठी पुस्तके


१) चिटणीस, के. एन., मध्ययुगीन संकल्पना व संस्था, भाग १, प्रकाशक, चिटणीस, के. एन.

२) जोशी, प्र. न.,(संपा.) आज्ञापत्र, व्हीनस प्रकाशन, पुणे.

३) कुलकर्णी, अ. रा., व खरे, ग. ह., (संपा.) मराठ्यांचा इतिहास खंड १ व २, कॉन्टिनेंटल प्रकाशन, पुणे

४) गायकवाड, आर. डी., मराठेकलीन संस्था आणि संकल्पना, फडके प्रकाशन, कोल्हापूर

५) सरदेसाई, बी. एन., मराठ्यांचा सामाजिक, आर्थिक व सांस्कृतिक इतिहास, फडके प्रकाशन, कोल्हापूर

६) आठवले, सदाशिव., शिवाजी आणि शिवयुग, जिजाई प्रकाशन, पुणे १९९२

७) पवार. ज. भा., (संपा.) छत्रपती शिवाजी महाराज स्मृतिग्रंथ, महाराष्ट्र राज्य पाठयपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ.


❑❑❑

## सत्र २ : घटक २

## प्रशासन (Administration)

**अनुक्रमणिका**


२.० उद्दिष्टे

२.१ प्रस्तावना

२.२ विषय विवेचन

२.२.१ अष्टप्रधान मंडळ

२.२.२ प्रांतिक प्रशासन – गोतसभा

२.२.३ खेडेगावातील प्रशासन

२.३ सारांश

२.४ पारिभाषिक शब्द व शब्दार्थ

२.५ स्वयं अध्ययन प्रश्नांची उत्तरे

२.६ सरावासाठी स्वाध्याय

२.७ संदर्भ ग्रंथ व अधिक वाचनासाठी पुस्तके


### २.० उद्दिष्टे:

या घटकाच्या अभ्यासानंतर आपणास खालील गोष्टींचे आकलन होईल.

१. अष्टप्रधान मंडळाच्या निर्मितीचा इतिहास, पदे व नावे यांची माहिती होईल.

२. अष्टप्रधान मंडळाचे स्वरूप आणि विकास समजून घेता येईल.

३. अष्टप्रधान मंडळातील प्रधानांचे हक्क व जबाबदाऱ्या यांची माहिती होईल.

४. अष्टप्रधान मंडळाची वैशिष्टे सांगता येतील.

५. गोतसभेच्या प्रशासन व्यवस्थेची रचना व स्वरूप स्पष्ट करता येईल.

६. गोतसभेतील न्यायनिवाड्याची पद्धत जाणून घेता येईल.

७. खेडे गावातील प्रशासन व्यवस्थेची माहिती जाणून घेता येईल.

८. खेडे गावातील वतनदारांचे स्थान व हक्क स्पष्ट करता येतील.

९. बलुतेदार व आलुतेदार यांची माहिती व कार्ये स्पष्ट करता येतील.

१०. खेडे गावातील मिरासदार व उपरे यांची माहिती व कार्य स्पष्ट करता येतील.

## २.१ प्रस्तावना :

सतरावे शतक महाराष्ट्रासाठी अत्यंत महत्वाचे शतक म्हणून ओळखले जाते. या शतकात महाराष्ट्रात छत्रपती शिवाजी महाराजांनी स्वराज्याची स्थापना केली. अनेक शत्रूंशी एकाचवेळी लढून स्वतंत्र राज्यच निर्माण करणे अवघड काम होते. स्वराज्य स्थापन केले असले तरी ते टिकवणे त्याहूनही अवघड कार्य होते. इतिहासामध्ये अनेक राज्यकर्ते स्वत: मिळविलेल्या विजयासाठी प्रसिध्द आहेत. तर काहीजण स्वत: केलेल्या सुधारणांसाठी प्रसिध्द आहेत. तथापि ज्यांनी ही दोन्ही प्रकारची कार्ये केली अशा शासकांमध्ये छत्रपती शिवाजी महारांचे स्थान वरचे आहे. शिवाजी महाराज केवळ स्वराज्य स्थापून थांबले नाहीत तर या स्वराज्याचे रूपांतर सुराज्यामध्ये व्हावे यासाठी त्यांनी कसोशीने प्रयत्न केले. आपले राज्य कायद्याचे व न्यायाचे असावे यावर त्यांचा कटाक्ष होता. त्यांनी केवळ स्वराज्याची स्थापना केली असे नाही तर ते स्वराज्य दिर्घकाळ टिकावे यासाठी उत्तम प्रकारची प्रशासन व्यवस्थाही निर्माण केली. स्वराज्याचे प्रशासन उत्कृष्टरित्या पार पाडण्यासाठी काही ध्येय, धोरणे आणि तत्वे निश्चित केलेली होती. त्यानुसारच प्रशासन चालविले जात होते. परिणामी ही प्रशासन व्यवस्था नंतरच्या कालखंडात अनेकांना मार्गदर्शक ठरली.

मध्ययुगीन भारतातील समाजव्यवस्था आणि धर्मव्यवस्था यांचा आधार घेऊन विकसित झालेली व्यवस्था असे या काळातील न्यायव्यवस्थेचे वर्णन करावे लागते. स्वराज्यात विकसित झालेली न्यायव्यवस्था ही शिवाजी महाराजांच्या पूर्वी विकसित होत गेलेली होती. शिवाजी महाराजांनी ही न्यायदान व्यवस्था अधिक परिणामकारकरित्या वापरण्याचा प्रयत्न केला. केंद्रीय न्यायव्यवस्थेबरोबरच प्रत्येक गावात, कसब्यात, महालात, प्रांतात त्यांच्या स्वतःच्या न्यायदान करणाऱ्या संस्था असत. ज्याचा उल्लेख 'गोतसभा' किंवा 'गोतमजलीस' असा केलेला आढळतो. प्राचीन काळापासून भारत हा खेड्यात राहणाऱ्या लोकांचा देश म्हणून ओळखला जातो. शिवकाळातही खेड्या पाड्यात राहणाऱ्या लोकांची संख्या जास्त होती. प्रस्तुत प्रकरणात शिवकालीन गावगाडा व त्याचे स्वरूप, गावचा कारभार कसा चालत होता हे समजाऊन घेणे आवश्यक आहे.

## २.२ विषय विवेचन

छत्रपती शिवाजी महाराजांनी राज्यविस्ताराबरोबरच राज्यव्यवस्थापनाकडे अधिक लक्ष दिल्यामुळे सर्वच इतिहासकारांनी शिवाजी महाराजांनी निर्माण केलेल्या प्रशासन व्यवस्थेला मध्ययुगातील 'उत्कृष्ट प्रशासन व्यवस्था' असे संबोधले आहे.

### २.२.१ अष्टप्रधान मंडळ :

अष्टप्रधान मंडळ हे छत्रपती शिवाजी महाराजांच्या मुलकी प्रशासनाचे खास वैशिष्ट्य होते. राज्यकारभार कार्यक्षमतेने चालावा हा त्यामागील उद्देश होता. भारतात प्राचीन काळी शुक्राचार्य व कौटिल्याने राज्यशास्त्रावर ग्रंथ लिहिलेले आहेत. शुक्राचार्यांनी 'शुक्रनीती' व कौटिल्याने 'अर्थशास्त्र' या ग्रंथातून प्रधान

मंडळाची कल्पना मांडलेली आहे. रामायण व महाभारतात देखील राजाच्या प्रधानाविषयी चर्चा आढळते. विजयनगर साम्राज्यातही प्रधानमंडळ अस्तित्वात होते. छत्रपती शिवाजी महाराजांचे अष्टप्रधान मंडळ हे बहुतांशी शुक्रनीतिवरच आधारित असलेले दिसून येते. शुक्रनीतीमध्ये दहा मंत्र्यांची नावे आहेत. शिवकाळात जरी आठच मंत्री असले तरी छत्रपती संभाजी महाराजांच्या काळात 'छंदोगामात्य' या नवव्या मंत्र्यांची नेमणूक करण्यात आली व पुढे छत्रपती राजाराम महाराजांच्या काळात 'प्रतिनिधी' या एका नवीन मंत्र्यांची भर पडली. शुक्रनीतिमध्ये 'दूत' यांचासुद्धा मंत्र्यांमध्ये समावेश केलेला होता. परंतु शिवकाळात मात्र अशा प्रकारचे महत्त्व दुताला दिलेले दिसत नाही. एकंदरीत प्राचीन भारतीय इतिहासातील शुक्राचार्य लिखित शुक्रनीती, कौटिल्य लिखित अर्थशास्त्र या ग्रंथातील राज्यकारभाराची प्रमुख तत्वे छत्रपती शिवाजी महाराजांनी अंगिकारली व आदर्शवत अशा अष्टप्रधान मंडळाची निर्मिती केलेली दिसते.

**अष्टप्रधान मंडळाचा विकास :**

छत्रपती शिवाजी महाराजांचे अष्टप्रधान मंडळ हे शिवराज्याभिषेकावेळी पूर्णत्वास आले असले तरी इ. स. १६४० पासून स्वराज्यात अष्टप्रधान मंडळाच्या निर्मितीची वाटचाल सुरू झाल्याचे दिसून येते. इ. स. १६४० मध्ये शहाजीराजांनी बेंगलोरहून छत्रपती शिवाजी महाराज व राजमाता जिजाबाई यांना पुण्याच्या जहागिरीमधे पाठवले. त्यावेळी त्यांनी शामराव नीळकंठ यांची पेशवा, बाळकृष्णपंत हणमंते यांची मुजुमदार, सोनोपंत यांची डबीर, व रघुनाथ बल्लाळ यांची सबनीस म्हणून नेमणूक करून त्यांना छत्रपती शिवाजी महाराजांच्या मदतीस दिलेले दिसते.

पुणे-सुपे-चाकण-इंदापूर या शहाजीराजांच्या जहागिरीत स्वराज्य आकारास आले. महाराजांनी आपल्या राज्यामध्ये सेनापतीपद निर्माण केले व तुकोजी चोर यांची नेमणूक केली. तथापि तुकोजी चोर यांना महाराजांनी या पदावर फार काळ ठेवले नाही, त्यांनी या पदावर पुढे माणकोजी दहातोंडे यांची नेमणूक केली. इ. स. १६५६ साली जावळी स्वराज्यात समाविष्ट झाली आणि स्वराज्याचा विस्तार दुप्पट झाला. जावळी विजयानंतर महाराजांनी आपल्या राज्यातील काही पदावर नव्याने नेमणुका केल्या. त्यामध्ये निळो सोनदेव-सुरणीस, गंगाजी मंगाची-वाकणीस, येसाजी कंक पायदळाचा मुख्य सेनानी, नेताजी पालकर - सर्व सैन्याचा सेनापती आणि प्रभाकर भट यांची उपाध्य म्हणून नियुक्त केली. यानंतर महाराजांच्या प्रधान मंडळाचा इतिहास तुटक-तुटक असा मिळतो. मिर्झाराजे जयसिंगाच्या स्वारीच्या वेळी त्यांच्याकडे वकील म्हणून रघुनाथपंत कोरडे (पंडितराव) यांना पाठवल्याचा उल्लेख मिळतो. म्हणजे पंडितराव पद त्यावेळी निर्माण झालेले होते.

इ.स. १६६२ साली महादेव मतिमंद हा महाराजांचा पेशवा होता, मात्र त्याच वर्षी महाराजांनी त्यास बाजूला केले व त्याच्याजागी मोरो त्रिंबक पिंगळे यास पेशवे पदावर नेमले. पुढे मोरोपंत महाराजांच्या मृत्यूपर्यंत पेशवे पदावर होते. इ.स. १६६८ साली महाराजांनी दोन महत्त्वाच्या नेमणुका केल्या. निळो सोनदेव यांना मुजुमदार व अण्णाजी दत्तो यांना सुरणीस (सचिव) म्हणून नेमले. दरम्यान न्यायाधीशाचे पद निर्माण करण्यात आले व निराजी रावजी यांची नियुक्ती करण्यात आली, तर गंगाजी मंगाजी यांच्या मृत्यूमुळे रिक्त

झालेल्या मंत्रीपदावर दत्ताजी त्रिंबक यांची नियुक्ती केली. बाळंभट आणि गोविंदभट यांची पुरोहित म्हणून नेमणूक केली. अशा रीतीने छत्रपती शिवाजी महाराजांचे अष्टप्रधान मंडळ हळूहळू विकसित होत गेले व त्यास अधिकृत स्वरूप राज्याभिषेकावेळी प्राप्त झाले. राज्याभिषेकावेळी जे 'अष्टप्रधानमंडळ' होते त्याची फारसी व संस्कृत नावे, त्या मंडळातील प्रधानांची नावे आणि त्यांना नेमून दिलेली कामगिरी थोडक्यात पुढीलप्रमाणे :

**अष्टप्रधान मंडळ**

| पद | प्रधानाचे नाव |
|---|---|
| १. मुख्य प्रधान (पेशवा) | मोरो त्रिंबक पिंगळे |
| २. अमात्य (मुजुमदार) | नारो निळकंठ व रामचंद्र निळकंठ |
| ३. सेनापती (सरलष्कर) | हंबीरराव मोहिते |
| ४. सचिव (सुरणीस) | अण्णाजी दत्तो |
| ५. मंत्री (वाकणीस) | दत्ताची त्रिंबक |
| ६. पंडितराव | रघुनाथपंत |
| ७. सुमंत (डबीर) | रामचंद्र त्रिंबक |
| ८. न्यायाधीश | निराजी रावजी |

(कंसातील नावे फारसी भाषेतील आहेत.)

**अष्टप्रधानांची कामे :**

सातारकर छत्रपतींच्या दप्तरखान्यात अष्टप्रधानांची कामे कोणती याविषयीचा एक कागद प्राप्त असून तो इतिहास संशोधक का. ना. साने यांनी 'सनदापत्रे' या पुस्तकात प्रसिद्ध केला आहे. तसेच मल्हार रामराव चिटणीस यांच्या 'शककर्ते श्री शिवछत्रपती महाराज' यांच्या बखरीतही अष्टप्रधानांची कामे सांगितली आहेत. छत्रपती शिवाजी महाराजांनी निर्माण केलेल्या अष्टप्रधानमंडळातील या सर्व मंत्र्यांची नावे व त्यांच्याकडे सोपवलेली कार्य विभाग खालीलप्रमाणे :

**१. मुख्य प्रधान (पेशवा) :**

छत्रपती शिवाजी महाराजांच्या अष्टप्रधान मंडळातील सर्वश्रेष्ठ मंत्री या नात्याने मुख्यप्रधान किंवा पेशवा यांचा समावेश होता. राजानंतर तोच राज्याचा सर्वप्रमुख होता. मुख्यप्रधानावर राज्यकारभाराची जबाबदारी असे. महाराजांच्या राजपत्रावर त्यांना आपली मुद्रा उमठवावी लागे. सैन्य घेऊन मोहिमेवर जावे लागे. परमुलुख ताब्यात येताच त्याच्या बंदोबस्ताची जबाबदारी त्याच्यावर असे. नेमून दिलेल्या प्रदेशाचा बंदोबस्त ठेवणे, राजाची व राज्याची निस्वार्थपणे सेवा करणे, मुख्य प्रधान या नात्याने सर्वांना बरोबर घेऊन

राज्यकारभार करणे, ही मुख्य प्रधानाची कामे होती. मुख्यप्रधान पदावर छत्रपती शिवाजी महाराजांनी मोरोपंत पिंगळे यांची नेमणूक केली होती.

**२. अमात्य (मुजुमदार):**

राज्याचा हिशोब ठेवण्याचे काम अमात्याकडे होते. दप्तरदार व फडणीस यांच्याकडून जमा खर्चाचे काम करावे लागे. छत्रपतीच्या आज्ञा पत्रावर, राज्याच्या व महालाच्या हिशोबी कागदपत्रावर, त्यास आपली मुद्रा उमठवावी लागे. वेळप्रसंगी युद्धावर जावे लागे. तसेच छत्रपतीनी दिलेल्या इतर जबाबदाऱ्या त्यांना सांभाळाव्या लागत.

**३. सेनापती (सरलष्कर) :**

राज्यातील सैन्य व्यवस्थेचा सेनापती हा प्रमुख होता. त्यादृष्टीने सैन्यभरती, सैन्याचे प्रशिक्षण, शस्त्रास्त्रांची व्यवस्था करणे, सैन्यात शिस्त राखणे, सैनिकांच्या पगाराची व्यवस्था पाहणे, कर्तबगार व पराक्रमी सैनिकांचा गौरव करणे, नवीन प्रदेश जिंकून घेणे व जिंकलेल्या प्रदेशाची संरक्षणाची व्यवस्था करणे, छत्रपतींच्या माध्यमातून सैन्याच्या अडीअडचणी सोडवणे इत्यादी लष्कराच्या संदर्भातील कामे सेनापतीकडे होती.

**४. सचिव (सुरणीस) :**

सचिव हा छत्रपती शिवाजी महाराजांचा व्यक्तिगत सहाय्यक म्हणून प्रारंभी कार्य करत असे. नंतर मात्र आपल्या राज्यातील व परराज्यातील पत्रव्यवहाराचा प्रमुख म्हणून तो काम करू लागला. राजपत्र स्वतः काळजीपूर्वक वाचणे व त्यातील मजकूर तपासून पाहणे, वेळप्रसंगी युद्धावर जाणे, नवीन प्रदेशाचा कारभार पाहणे, राजपत्रावर संमतीदर्शक मुद्रा उमठविणे इत्यादी कामे सचिवास पार पाडावी लागत होती.

**५. मंत्री (वाकणीस) :**

मंत्री हा राजाचा दैनंदिन व्यवहारातील सहाय्यक होता. राजाच्या दैनंदिन कार्यक्रमाचे आयोजन करणे, राजाच्या भेटीस येणाऱ्या लोकांच्या नोंदी व त्याचा तपशील ठेवण्याचे कार्य होते. छत्रपतींच्या भोजनातील पदार्थांची तो तपासणी करत असे. राजपत्रावर संमती चिन्ह उमठविणे, प्रसंगानुसार युद्ध मोहिमेवर जाणे, हेर व्यवस्थेवर लक्ष ठेवणे, गुप्तहेराकडून येणाऱ्या बातम्यांनुसार अत्यंत सावधतेने त्याचा विचार करणे, नेमून दिलेल्या प्रदेशाचा कारभार करणे इत्यादी कामे मंत्र्यास करावी लागत. याबरोबरच राजा व राजपरिवाराच्या संरक्षणाची जबाबदारी त्याच्याकडे होती. सतत राजाबरोबर असल्यामुळे मंत्री राजाशी सल्लामसलत करीत असे. या पदावर दत्तो त्रिमल उर्फ दत्ताजी त्रिंबक यांची नेमणूक करण्यात आली होती.

**६. पंडितराव :**

राज्यातील सर्व धार्मिक स्वरूपाची कामे करणे, धार्मिक स्थळांची व्यवस्था पहाणे, प्रजेचे धार्मिक व नैतिक आचरण पहाणे, धर्मस्थळांना अनुदाने देणे, पंडितजन, विद्वानांचा सन्मान करणे, समाजातील परंपरा, आचार-विचार, प्रायश्चित्त यासंबंधीच्या राजपत्रावर त्यास संमतीदर्शक मुद्रा उमठवावी लागे. जेव्हा यज्ञ, शांती, अनुष्ठान यासारख्या गोष्टी करणे आवश्यक असेल तेव्हा त्या छत्रपतीस सुचवून त्याचे संयोजन करून त्या पार पाडाव्या लागत. या पदावर रघुनाथ पंडित यांची नियुक्ती करण्यात आली होती.

**७. सुमंत (डबीर) :**

परराष्ट्र व्यवहार पाहणे हे सुमंताचे मुख्य काम होते. परराज्यातील राजकारणावर लक्ष ठेवावे, परदरबाराचे वकील जेव्हा आपल्या दरबारी येतील तेव्हा त्यांचे स्वागत करणे व त्यांची बडदास्त राखणे. परराज्य संबंधाबाबत छत्रपतीना निवेदन करणे, त्यांच्या संमतीने परराज्य धोरण आखणे, वेळप्रसंगी सैन्याचे नेतृत्व करून युद्धावर जाणे, राजपत्रावर संमतीदर्शक मुद्रा उमठविणे इत्यादी कामे सुमंतास करावी लागत.

**८. न्यायाधीश :**

न्यायदान करण्याचे मुख्य काम न्यायाधीशाला पार पाडावे लागे. खटल्यांचा बारकाईने अभ्यास करून पुरावे, साक्षी तपासून, न्याय-अन्यायाची बाजू पाहून न्यायाधीश निर्णय देत असे. न्यायदान करताना छत्रपतींच्या धोरणाला कोठेही बाधा न येईल असे नि:पक्षपातीपणे न्यायदान करावे असा दंडक होता. ब्रह्मसभेकडून होणाऱ्या न्यायदानावर लक्ष ठेवावे, राज्यातील प्रमुख खटल्यांच्या निकालपत्रावर त्यास आपली मुद्रा उमठवावी लागे.

**अष्टप्रधान मंडळाची वैशिष्ट्ये :**

छत्रपती शिवाजी महाराजांनी निर्माण केलेली राज्यव्यवस्था तत्कालीन भारतातील उत्कृष्ट राज्यव्यवस्था होती. परंपरागत अनेक बाबींना बगल देवून प्रशासनात अनेक नवे नियम त्यांनी आणले. यामुळे अष्टप्रधान मंडळाची कार्यक्षमता खूप वाढली. अष्टप्रधान मंडळाची वैशिष्ट्ये पुढीलप्रमाणे सांगता येतील.

**१. राज्यकारभाराच्या सोयीसाठी कामाची विभागणी :**

छत्रपती शिवाजी महाराजांनी स्वराज्याचा कारभार व्यवस्थित चालावा यासाठी अष्टप्रधान मंडळाची निर्मिती केली. प्रधान, अमात्य, सेनापती, सचिव, मंत्री, पंडितराव, सुमंत, न्यायाधीश या पदावर काम करणाऱ्या प्रधानांकडे स्वतंत्रपणे त्या-त्या खात्याची जबाबदारी सोपविली होती. हे सर्व प्रधान आपल्या कार्यासाठी छत्रपतींना जबाबदार असत. थोडक्यात छत्रपती शिवाजी महाराजांनी अष्टप्रधानांच्या माध्यमातून सत्तेचे विकेंद्रीकरण केलेले होते.

**२. पंडितराव व न्यायाधीश वगळता सर्व प्रधानांना लष्करी कामगिरी अनिवार्य :**

छत्रपती शिवाजी महाराजांनी रयतेचे हित लक्षात घेऊन दिवाणी कारभारास प्राधान्यक्रम व नंतर लष्करी कारभारास स्थान दिले. अष्टप्रधान मंडळातील सेनापती वगळता सर्व प्रधान प्रामुख्याने मुलकी खात्याचा कारभार पाहत होते. पंडितराव व न्यायाधीश यांच्या कामाच्या स्वरूपामुळे त्यांना लष्करी मोहिमांपासून अलिप्त ठेवण्याचा विवेकपूर्ण निर्णय छत्रपती शिवाजी महाराजांनी घेतला. मात्र या दोन प्रधानाशिवाय इतर सर्व प्रधानांना लष्करी कामगिरी पार पाडावी लागे.

**३. अष्टप्रधानातील पदे वंशपरंपरागत नाहीत :**

अष्टप्रधानमंडळातील कोणतेही पद वंशपरंपरेने देण्याची पद्धत नव्हती. जोपर्यंत त्यांच्या ठिकाणी स्वराज्याबद्दल निष्ठा, प्रामाणिकपणा व कर्तबगारी आहे तोपर्यंत ते त्या पदावर राहत. महाराजांनी अकार्यक्षम प्रधानांना अतिशय तत्परतेने दूर केलेली दिसते. उदा. तुकोजी चोर, माणकोजी दहातोंडे यांना फार दिवस त्यांच्या पदावर ठेवले नाही. तर नेताजी पालकर उद्धटपणे वागल्यावर त्यासही महाराजांनी काढून टाकले. त्याच्यानंतर सेनापतीपदी आलेल्या प्रतापराव गुजर यांनी स्वराज्याचे रक्षण करताना आपला देह रणांगणी ठेवला याचे महाराजांना खूप दुःख झाले. प्रतापरावांच्या कुटुंबाविषयी सहानुभूती असल्याने महाराजांनी प्रतापरावांची कन्या राजारामास केली. मात्र प्रतापरावांचे सेनापतीपद त्यांच्या मुलास दिले नाही. तत्कालीन कालखंडात भारतातील इतर सत्ताधीशांकडून दरबारातील पदे सरदारांना वंशपरंपरागत दिली जात असत. मात्र महाराजांनी ही पद्धत बंद करून कर्तबगारी बघूनच नियुक्या केल्या.

**४. अंतिम अधिकार छत्रपतींकडे :**

राज्याचे अष्टप्रधानमंडळ राज्यकारभाराच्या सोयीसाठी निर्माण करण्यात आलेले असल्यामुळे सर्व प्रधान हे आपल्या प्रत्येक कामासाठी अंतिमतः महाराजांनाच जबाबदार असत. छत्रपतींनी अष्टप्रधानमंडळास सल्ला मागितल्यास त्याप्रमाणे प्रधान सल्ला देत असत. मात्र प्रधानांचा सल्ला मानावयाचा की नाही ते छत्रपती ठरवित असत. छत्रपतींच्या आज्ञेनुसार प्रधानमंडळास आपापल्या खात्याचा कारभार पार पाडावा लागत होता. महाराजांच्या हाती अंतिम व सर्वोच्च अधिकार एकवटले असले तरी त्यांनी सतत जनकल्याणासाठी त्याचा वापर केला.

**५. प्रधानांना जहागिरीऐवजी रोख पगार :**

मध्ययुगीन काळात अधिकाऱ्यांना वतने व जहागिरी देण्याची प्रथा अस्तित्वात होती. परंतु महाराजांनी आपल्या कारकिर्दीमध्ये कोणत्याही प्रधानास जहागिरी देऊ केली नाही. जहागिरी प्रथेमुळे सरंजामशाही येते. सरंजामदार मध्यवर्ती सत्तेच्या अडचणीच्या काळात बंडखोरी करून सवतासुभा मांडतात. महाराजांनी हा संभाव्य धोका टाळण्यासाठी प्रधानांना जहागिरीऐवजी रोख पगार देऊ केला. पेशव्यांना दरवर्षी १५००० होन, अमात्यास दरवर्षी १२००० होन व इतर सर्व मंत्र्यांना दरवर्षी १०००० होन एवढे रोख वेतन दिले जाई. रोख

पगार देण्याच्या पद्धतीमुळे सर्व प्रधानांवर राजाचे थेट नियंत्रण प्रस्थापित झाले तसेच दिले जाणारे वेतन पुरेसे असेल याचीही काळजी महाराजांनी घेतली होती. पुढे राजाराम महाराजांच्या काळात वतने देण्याची पद्धत पुन्हा सुरू झाली.

**६. प्रधान मंडळातील जातीचे प्रमाण :**

छत्रपती शिवाजी महाराजांना राज्यकारभार चालविण्यासाठी शास्त्र व विद्या पारंगत असणारे लोक हवे होते. त्यासाठी या गुणाचे अस्तित्व असणाऱ्या प्रत्येक घटकास त्यांनी आपल्या प्रशासनामध्ये संधी दिली. राज्य उभारणीच्या कार्यात छत्रपती शिवाजी महाराजांनी शास्त्र पारंगत ब्राह्मण वर्गाचे सहकार्य घेऊन राज्यव्यवस्थेला गतिमान केले. महाराजांच्या आठ प्रधानापैकी सात प्रधान ब्राह्मण जातीतले व एक मराठा जातीतला होता. सेनापती हा मराठा जातीतला असावा असा संकेत होता.

**७. प्रधानांच्या सहायक अधिकाऱ्याची निवड :**

अष्टप्रधानांच्या सहाय्यक अधिकाऱ्याची निवड स्वतः महाराज करत असत. आपल्या सहाय्यक अधिकाऱ्याची निवड करण्याचा अधिकार प्रधानांना नव्हता. तथापि अशा निवडीच्यावेळी संबधित प्रधानांचा सल्ला घेतला जात असावा. प्रधानांच्या खात्यातील अधिकारीच नव्हे तर प्रधानांच्या अनुपस्थितीत त्यांच्यासाठी काम पाहणाऱ्या त्याच्या मुतालिकाची नेमणूकही महाराज करत असत. प्रधानांच्या अनुपस्थितीत मुतालिक कामकाज पहात असत.

**७. राज्यकारभारातील निर्णयांची संयुक्त जबाबदारी :**

राज्याच्या महत्त्वाच्या कागदपत्रांवर विशेषतः तह, करार, खटल्याची निकालपत्रे इत्यादीवर अष्टप्रधान मंडळातील महत्त्वाच्या प्रधानांच्या मुद्रा उमठविणे बंधनकारक होते. 'मुद्रा उमठविणे' म्हणजे आजच्या कारभाराच्या भाषेत 'सही' करणे होय. सर्व महत्त्वाच्या कागदपत्रांवर मुख्य प्रधान, अमात्य, सचिव, मंत्री, सुमंत यांच्या मुद्रा असत. ही पद्धत महाराजांनी रूढ केली याच्या पाठीमागचा महत्त्वाचा उद्देश म्हणजे निर्णय घेताना चुका होऊ नयेत तसेच तो निर्णय सर्वांच्या नजरेखालून जावा. हेन्री ऑक्झिडेंन हा इंग्रज वकील म्हणतो, 'छत्रपती शिवाजी महाराज व इंग्रज यांच्यात जो व्यापारी करार झाला, यावर महाराजांच्या अनेक मंत्र्यांनी आपल्या मुद्रा केल्याचे दिसून आले.' आपली मुद्रा संबंधित कागदपत्रावर उमठविली की तो प्रधान त्या निर्णयास प्रत्यक्ष व अप्रत्यक्षरीत्या जबाबदार राही. अशाप्रकारे आपल्या अष्टप्रधान मंडळात राज्यकारभारातील जबाबदारीची जाणीव वाढावी व कारभार अधिक कार्यक्षम व्हावा यासाठी महाराजांनी प्रधान मंडळात ही प्रथा पाडली होती.

**९. प्रधानांची बदलती संख्या:**

महाराजांच्या अष्टप्रधान मंडळास' अष्टप्रधानमंडळ' असे म्हटले जात असले तरी त्यांची संख्या आठच होती किंवा पुढे आठच राहिली असे नाही. राज्याभिषेकाच्या प्रसंगी असणाऱ्या अष्टप्रधानमंडळात आठ

ऐवजी नऊ प्रधान होते. अमात्य पदावर नारो नीळकंठ व रामचंद्र नीळकंठ या दोघा बंधूंची नियुक्ती केली होती. त्यामुळे अष्टप्रधान मंडळाच्या सदस्यांची संख्या नऊ झाल्याचे आढळून येते. पुढे छत्रपती संभाजी महाराजांच्या कालखंडात अष्टप्रधान मंडळाच्या कारस्थानामुळे त्याच्या अष्टप्रधान मंडळावरील विश्वास नाहीसा झाला. परिणामी सेनापती व पंडितराव या दोन प्रधानांव्यतिरिक्त इतर प्रधान निष्प्रभ ठरले. पंडितराव पदी असणारा कवी कलश हा मुख्य प्रधानाहून महत्त्वपूर्ण ठरला. छत्रपती राजाराम महाराजांच्या कालखंडात त्यांनी रामचंद्रपंत अमात्य यांना 'हुकमतपन्हा' हा किताब देऊन जादा अधिकार देऊ केले तसेच परशुरामपंतांना 'प्रतिनिधी' हे पद देऊ केले. अशाप्रकारे अष्टप्रधान मंडळातील संख्येत बदल होत गेले.

**१०. प्रधानाकडे मुलखाचा कारभार सोपविण्याची पद्धत :**

अष्टप्रधान मंडळातील प्रधानांना आपल्या खात्याच्या कारभाराबरोबरच इतर ज्यादा कार्यभार सोपविल्यास तो त्यांना पार पडावा लागे. राज्यकारभाराच्या सोयीसाठी महाराजांनी स्वराज्याचे चार भाग पाडले होते. त्यातील महाराष्ट्रातील तीन विभागांवर अष्टप्रधान मंडळातील मोरो त्रिंबक पिंगळे, दत्ताजी त्रिंबक व अण्णाजी दत्तो यांची सरसुभेदार म्हणून नियुक्ती केली. तर मैसूर व तामिळनाडू किनाऱ्यावरील प्रदेशावर मात्र त्यांनी प्रधान मंडळात नसलेल्या हरजी महाडिक या अधिकाऱ्याची सुभेदार म्हणून नियुक्ती केली होती.

**११. मुलकी कामाचा लष्करी कामाप्रमाणे दर्जा :**

छत्रपती शिवाजी महाराज जसे महान सेनानी होते तसेच ते कुशल प्रशासकही होते. परमुलुख ताब्यात येताच महाराज लगेचच तेथे आपला मुलकी अंमल निर्माण करत. महाराजांनी मुलकी कामास लष्करी कामगिरीहून अधिक प्राधान्यक्रम देऊ केला.

**१२. अकार्यक्षम प्रधानांना प्रधान मंडळात स्थान नाही :**

राज्याभिषेकानंतर मृत्यूपर्यंत महाराजांनी आपल्या अष्टप्रधान मंडळात फारसा काही बदल केला नाही. याचा अर्थ हे सर्व प्रधान महाराजांच्या परीक्षेस उतरले होते. कामात कुचराई करणाऱ्या किंवा गैरवर्तन करणाऱ्या प्रधानांचा कुठलाही मुलाहिजा न बाळगता त्यांना पदावरून दूर केले. महाराजांच्या कारकीर्दीत एकूण सहा सेनापती झाले. तुकोजी चोर, माणकोजी दहातोंडे यांना फार दिवस महाराजांनी त्यांच्या पदावर ठेवले नाही. नेताजी पालकर उद्धटपणे वागल्यावर त्यासही महाराजांनी काढून टाकले. पेशवेपदावरही अनेक मंडळी येऊन गेली. इ.स. १६६१ साली नरहरी आनंदराव याची पेशवा म्हणून नियुक्ती झाली. परंतु दुसऱ्याच वर्षी महाराजांनी त्यास काढून टाकून ते पद महादेव मतिमंद यास दिले. ते सुद्धा फार काळ या पदावर टिकला नाही. इ. स.१६६२ मध्ये महाराजांनी मोरोपंत पिंगळे यांना पेशवे पदावर नेमले. मोरोपंत अखेरपर्यंत या पदावर राहिले. जे कार्यक्षम प्रधान होते त्यांना महाराजांनी बदलले नाही मात्र अकार्यक्षम प्रधानांची त्यांनी पदावरून हकालपट्टी केली.

**स्वयं अध्ययनासाठी प्रश्न : १**

अ) एका वाक्यात उत्तरे द्या.

१. कौटिल्याने कोणत्या ग्रंथातून प्रधानमंडळाची कल्पना मांडली.

२. शुक्रनीती या ग्रंथाचे लेखक कोण होते.

३. राज्याचा हिशोब ठेवण्याचे काम कोणत्या मंत्र्याकडे असे.

४. कोणत्या दोन प्रधानावर लष्करी जबाबदारी नसे.

५. राज्याभिषेकाच्यावेळी मुख्य प्रधानपदी कोण होते.

ब) रिकाम्या जागी योग्य शब्द भरा.

१. शिवकालीन अष्टप्रधान मंडळाच्या निर्मितीचा इतिहास .... सालापर्यंत मागे जातो.

अ) १६४० ब) १६५० क) १६५९ ड) १६६०

२. पेशव्यांना दरवर्षी .... होन वेतन दिले जात होते.

अ) ५,००० ब) १०,००० क) १५,००० ड) २०,०००

३. परराष्ट्र व्यवहार सांभाळण्याचे कार्य .......... या प्रधानाकडे असे.

अ) सुमंत ब) अमात्य क) मंत्री ड) पंडितराव

४. अष्टप्रधान मंडळातील प्रधानांना ......... स्वरूपात पगार दिला जात असे.

अ) जहागिरीच्या ब) वतनाच्या क) रोख ड) सरंजामाच्या

५. अष्टप्रधान मंडळातील ----- हे पद मराठा जातीसाठी होते.

अ) पेशवा ब) न्यायाधीश क) अमात्य ड) सेनापती

## २.२.२ प्रांतिक प्रशासन– गोतसभा :

'गोतसभा' ही मराठाकालीन न्यायपद्धतीतील पायाभूत संस्था होती. 'गोत' याचा अर्थ ज्ञाती, धर्म, संस्कृती आणि सामाजिक व्यवहार यांनी एकमेकांशी संबंधित असणारे लोक. अशा लोकांची सभा म्हणजे 'गोतसभा'. परंपरेने चालत आलेली ही व्यवस्था लोकांनी लोकांमार्फत चालविलेली होती. या गोतसभेस मराठी कागदपत्रात 'थळ' (स्थल), सभा किंवा 'मायसभा' असेही म्हटलेले आहे.

**गोतसभेची रचना व स्वरूप:**

गोतसभा कोठे आयोजित केली आहे. यानुसार त्यामध्ये कोण सहभागी होणार हे ठरत असे. शिवकाळात गोतसभा खेड्यातील न्यायनिवाडा करणारी प्रमुख सभा होती.

**ग्राम मजलीस :**

शिवकाळात गोतसभा खेड्यातील न्यायनिवाडा करणारी प्रमुख सभा होती. राज्यकारभारातील सर्वात महत्त्वाचा पण सर्वात खालचा घटक म्हणजे 'गाव' अथवा 'खेडे' होय. अशा गावाला 'मौजा' असेही म्हणत असत. खेड्याच्या गोतसभेला गावचे पाटील, कुलकर्णी, चौगुला हे वतनदार, गावातील प्रतिष्ठित लोक व बारा बलुतेदारांपैकी गावात हजर असणारे बलुतेदार. उदा. महार, कोळी, तेली, न्हावी, गुरव, सुतार, चांभार मुलाणा, परीट इ. बलुतेदार हजर राहत असत.

'मौजा' पेक्षा मोठे ठिकाण म्हणजे 'कसबा'. आठ-दहा खेड्यांमध्ये असा एखादा कसबा असे. कसब्याच्या ठिकाणी भरलेल्या गोतसभेस कसब्याचे पाटील, कुलकर्णी, चौगुला इत्यादी वतनदार मंडळी उपस्थित असत. याशिवाय सभोवतालच्या गावातील पाटील, कुलकर्णी यांनाही बोलावले जाई, कसबा हे मौजापेक्षा मोठे गाव असल्याने त्या ठिकाणी व्यापार-उदीम करणारे लोक असत. या लोकांचे नेतृत्व शेटे-महाजन हे वतनदार करीत. तेव्हा तेही गोतसभेत असत. याशिवाय या गोतसभेस बलुतेदार-अलुतेदार ही मंडळीही उपस्थित राहत असत.

गोतसभा एखाद्या परगण्याच्या किंवा सुभ्याच्या ठिकाणी भरत असे. त्यावेळी त्या गोतसभेत त्या परगण्यातील अथवा आसपासच्या परगण्यातील देशमुख, देशपांडे, देशचौगुला, देशपाटील इत्यादी वरिष्ठ वर्गातील वतनदार, याशिवाय परगण्यातील महत्त्वाचे पाटील, कुलकर्णी इत्यादी कनिष्ठ वतनदार, शेटे-महाजन परगण्यातील मुकादम, बारा बलुतेदार ही मंडळी उपस्थित असत. अशा प्रकारची गोतसभा परगण्याच्या हवालदाराच्या किंवा सुभ्याच्या सुभेदाराच्या पुढाकाराखाली भरत असे. परगण्याच्या गोतसभेचा सरकारी अधिकारी म्हणून देशमुख अथवा देशपांडे सभास्थानी असत.

काही प्रसंगी गोतसभा परगण्यातील किल्ल्याच्या ठिकाणी भरत असे. अशावेळी किल्ल्याचे हवालदार, सबनीस, कारखानीस, तटसरनौबत इत्यादी अधिकारी उपस्थित असत. परंतु किल्ल्यातील गोतसभेतही देशमुख, देशपांडे, पाटील, कुलकर्णी, चौगुले, शेटे-महाजन व बारा बलुतेदार ही मंडळी सदस्य म्हणून उपस्थित राहत असत. काही गोतसभेत खुद्द छत्रपती शिवाजी महाराज उपस्थित असल्याची नोंद मिळते. पण तेव्हाही वतनदार व बलुतेदार मंडळी या सभेस हजर असत हे लक्षात घेतले पाहिजे. इ. स. १६५७ मध्ये गुंजण मावळच्या देशमुखीच्या भाऊपणाचा वाद मिटवण्यासाठी पुणे येथे बोलावलेल्या गोतसभेला स्वतः शिवाजी महाराज हजर होते. त्यांच्यासोबत शामराज निळकंठ पेशवे, सोनाजी डबीर, सुरणीस माणकोजी दहातोंडे, सरनोबत यांच्यासह अठरा देशमुख देशक मिळून एकूण पन्नास व्यक्ती गोतच्या बैठकीला उपस्थित होते.

इ. स. १६५२ च्या ऑक्टोबर महिन्यात भोर तालुक्यातील उत्रोली येथे बोलावलेल्या गोतसभेच्या स्थानी शिवाजी महाराज स्वतः उपस्थित असताना दादाजी नरसप्रभू आणि बाबाजी शिवदेव सोनटके यांच्यातील देशकुलकर्णी वतनाच्या वादाचा न्याय निवाडा झाला होता. शिवकाळातील अतिमहत्वाच्या

पाटीलकीच्या वतनाचा न्यायनिवाडा ज्या गोत मजलीसने केला त्या गोतसभेला शिवाजी महाराज स्वतः हजर होते. ते त्या सभेच्या अनेक सदस्यांपैकी एक सदस्य होते आणि त्या सभेच्या बैठकीत झालेल्या न्यायनिवाड्याला एक साक्षीदारही राहिले होते. परगण्याच्या ठिकाणी, सुभ्याच्या ठिकाणी अथवा महत्त्वाच्या किल्ल्याच्या ठिकाणी भरलेल्या गोतसभेस 'देशकसभा' अथवा 'धर्मसभा' असेही कागदपत्रात म्हटलेले आढळते. देशकसभेत अथवा धर्मसभेत देशमुख, देशपांडे, शेटे-महाजन अशा प्रमुख वरिष्ठ वतनदारांची उपस्थिती असे.

**पेशवेकालीन न्यायव्यवस्था :**

शाहू महाराजांच्या काळात गोतसभेला महत्त्व होते. मात्र इ.स. १७५० च्या नंतर गोतसभेचे महत्व कमी कमी होत गेले. गोतसभेचे काम पंचायत करू लागली. गोतसभेचे तीन प्रकार होते.

१. परगणा गोतसभा

२. कसबा (पेठ) गोतसभा

३. खेडेगावची गोतसभा

**परगणा गोतसभा :**

परगण्यातील एक महत्त्वाची न्यायसंस्था म्हणून या सभेकडे पहात असत. या सभेत देशमुख, देशपांडे, शेटे, महाजन, पाटील, नायकवडी, मिरासदार, सरकारी अधिकारी व रयत यांचा समावेश होत असे. परगणा गोतसभेचा मुख्य अधिकारी म्हणजे देशमुख व देशपांडे हा देशमुखाला न्यायदानाच्या कार्यात मदत करीत असे. देशमुख व देशपांडे हे दोघे मिळून परगण्याच्या बाबतीत निर्माण होणारे आर्थिक, न्यायालयीन व सार्वजनिक शांततेची प्रकरणे हाताळत असत. हे दोघेही परगण्यातील सर्व रयतेचे प्रतिनिधी म्हणून काम पाहत असत. काही वेळा दिवाण हा परगणा गोतसभेत निकाल देण्याचे काम करी.

**कसबा (पेठ) गोतसभा**

कसबा म्हणजे व्यापाराचे ठिकाण. त्यालाच पेठ असे म्हणत. या सभेमध्ये सर्व देशक म्हणजेच देशमुख, देशपांडे, शेटे, महाजन, नायकवडी, पाटील, कुलकर्णी, चौगुला व बलुतेदार यांचा समावेश असे. कसब्यामधील व्यापारी पेठेचे संरक्षण करण्याचे काम शेटे करीत असे. शेटे यांना मदत करण्याचे काम इतर बलुतेदार करीत असत. या बलुतेदारांना 'खूम' असेसुद्धा म्हणत. पेठ गोतसभेचा दिवाण कसबा मजलिसच्या मार्फत न्यायालयीन कामे पाहात असे. या गोतसभेमध्ये हजर असणारे सर्व सदस्य निवाडापत्रावर आपापल्या खुणा करीत असत. त्या पुढीलप्रमाणे : महाजन व शेटे-तराजू, सोनार-ऐरण, शिंपी-कात्री, ठाकूर-कट्यार, माळी-मोठी कात्री, आवटी-माप, जिनगर-करवत, नायकवडी-दंडुका अशा रीतीने ही पेठ गोतसभा न्यायविषयक कामे करत असे.

**खेडेगावची गोतसभा:**

खेडेगावच्या गोतसभेत गावचे सर्व वतनदार, पाटील, कुलकर्णी, मिरासदार, चौगुले व बारा बलुतेदार, उपरे व आलुतेदार यांचा समावेश होत असे. गावच्या वतनदारांपैकी सर्वात श्रेष्ठ वतनदार म्हणजे मुकादम किंवा पाटील होय. तोच खेडेगावच्या गोतसभेचा प्रमुख असे. त्याला सहाय्य करण्यासाठी कुलकर्णी व चौगुला हे वतनदार असत. थळकरी किंवा मिरासदार, बारा बलुतेदार व इतर प्रजा हे सर्व एकत्र बसून प्रशासकीय व न्यायविषयक कामे पाहत असत. लोकांचे संरक्षण करणे, गावात निर्माण होणाऱ्या खटल्याचा निकाल करणे व कर गोळा करणे ही यांची कामे असत. ग्रामगोतसभेने दिलेला निर्णय राजासुद्धा बदलू शकत नसे. एखाद्या निवाडापत्रावर सर्व उपस्थित अधिकाऱ्यांनी आपले शिक्के उठविले म्हणजे तो न्याय पक्का झाला असे समजत. बलुतेदारांची संमतचिन्हे पुढीलप्रमाणे होती. महार-विळा व दोर, चांभार-आरी, सुतार-पातळी, कुंभार-चाक, न्हावी-आरसा, भट-सही, मुलाणा-सुरा इत्यादी.

अशा रीतीने निवाडा पत्रावर सही शिक्के झाले म्हणजे तो न्याय निवाडा झाला असे समजत. परगणा गोतसभेच्या बाबतीत अव्वल किंवा अस्सल आणि फेरतपासणीचे अधिकार होते. पेठ गोतसभा व ग्रामगोतसभा यांना फक्त अस्सल न्याय निवाड्याचे अधिकार असत. अशा प्रकारच्या सभेत परगण्याचे हवालदार, किल्ल्याचे हवालदार, दरबारातील प्रमुख वरिष्ठ अधिकारी कधी कधी हजर असत.

**गोतसभेतील न्यायनिवाड्याची पद्धत :**

तत्कालीन समाजव्यवस्थेत गोतसभेस खूप महत्त्वाचे स्थान होते. गोतसभेने दिलेले निर्णय बहुतांशी मान्य केले जात. मराठा काळात बहुसंख्य समाज हा खेड्यात राहत असे. गावात जे वाद निर्माण होत ते विशेषत: वतन, इनाम, हक्क, वारसा अधिकार यासारख्या बाबीविषयी असत. अशावेळी वादी आपला वाद गावातील गोतसभेपुढे नेत असे. मात्र तक्रार दाखल करणाऱ्या वादी किंवा प्रतिवादी यांना गावातील गोतसभा ही पक्षपाती न्याय देईल असे वाटल्यास त्यांना दुसऱ्या गावच्या गोतसभेकडे किंवा परगण्याच्या गोतसभेकडे जाण्याची परवानगी होती. जो तक्रार दाखल करेल त्याला 'वादी' किंवा 'अग्रवादी' तर ज्याच्याविरुद्ध तक्रार केली जाई त्याला 'प्रतिवादी' किंवा 'पश्चिमवादी' असे म्हटले जाई. वादी-प्रतिवादींना त्या गोतसभेवर विश्वास आहे की नाही ते तपासून मगच पुढचे कामकाज सुरू होत असे. गोतसभेचा निर्णय हा दोघांनाही मान्य होणार आहे याची खात्री केल्यानंतर गोतसभेच्या कामकाजास सुरुवात होत असे. गोतसभा वादी-प्रतिवाद्यांना आपापल्या बाजूच्या 'तकरीरा' (हकिकती) लिहून द्यायला सांगे. या तकरीरांत उत्पन्न झालेल्या वादाचे स्वरूप मांडलेले असे. यानंतर दोन्ही पक्षकारांना आपले पुरावे सादर करायला सांगितले जात असे. त्याचवेळी गोतसभेच्या निर्णयाप्रमाणे उभय पक्ष वागतील अशा प्रकारचे 'जामीन' घेतले जात. त्यानंतर उभय पक्षांच्या साक्षीदारांच्या 'साक्षी' नोंदवल्या जात. कागदपत्राचा लेखी पुरावा व साक्षीदारांच्या साक्षी गोतसभेपुढे आल्यानंतर गोतसभेत चर्चा होऊन गोतसभा आपला लेखी निर्णय जाहीर करीत असे. अशा लेखी निर्णयास 'महजर' अथवा 'निवाडापत्र' असे म्हटले जाई, त्याचे लिखाण कुलकर्णी करत असे. गोतसभेचा

निवाडा हा लोकपरंपरा, रूढी आणि प्रसंगी विज्ञानेश्वराच्या मिताक्षरासारख्या धर्मशास्त्राचा ग्रंथ यांचे संदर्भ घेऊन केला जाई.

निवाडापत्राच्या सुरुवातीस गोतसभेस जे हजर असत त्या सर्वांची नावे व शिक्के असत. तत्कालीन काळात बहुतेक जणांना लिहिता-वाचता येत नसे. ज्यांना लिहिता येत नसेल अशी मंडळी आपल्या नावापुढे विशिष्ट अशी 'निशाणी' करीत असत. प्रत्येकाची निशाणी परंपरेने ठरलेली होती. उदा. पाटलाची निशाणी-नांगर, चौगुला-काठी, शेटे महाजन-तागडी, कुंभार-चाक, न्हावी-हात आरसा, मुलाणी-सुरी, महार-विळा व दोरी इत्यादी. थोडक्यात व्यवसाय करताना ज्या वस्तूंचा वापर करत ती त्यांची प्रमुख निशाणी असायची. एकदा निशाणी झाली की तो निर्णय पक्का समजला जात असे. गोतसभेने दिलेला निर्णय प्रत्येक वेळी वादी-प्रतिवादी यांना मान्य होतोच असे नाही. काही प्रसंगी उभयपक्षांपैकी एकाला आपल्यावर अन्याय झाला आहे असे वाटत असेल तर तो पक्ष परगण्याच्या गोतसभेकडे आपला वाद नेत असे. एवढेच नव्हे तर खुद्द छत्रपतींच्या समोरही तो आपला वाद उपस्थित करू शकत असे. अशाप्रसंगी पुन्हा गोतसभेचे आयोजन करून निर्णय दिला जात होता. थोडक्यात न्याय कोणाकडे मागायचा याचे स्वातंत्र्य समाजाला दिलेले होते.

**न्यायनिवाड्यासाठी आधारभूत ग्रंथ :**

मराठा काळात आजच्यासारख्या दिवाणी कायद्याच्या अथवा फौजदारी कायद्याच्या 'संहिता' अस्तित्वात नव्हत्या. त्याकाळी गोतसभेपुढे विशिष्ट असे सरकारमान्य कायदे नव्हते. गोतसभेपुढे आलेल्या पुराव्यांचा आपल्या सद्सद्विवेकबुद्धीने आणि पूर्वापार चालत आलेल्या रूढी, परंपरानुसार वादांचे निर्णय करीत असे. गोतसभेपुढे आलेल्या वादात सरळ सरळ न्याय-अन्याय दिसत असेल तर गोतसभेचे काम सोपे होत असे. पण वादांमध्ये काही क्लिष्ट मुद्दा उपस्थित होत असेल तर धर्मशास्त्राच्या ग्रंथाचा आधार घेतला जाई. शिवकालीन महाराष्ट्रात न्यायनिवाडा करण्यासाठी स्मृतिग्रंथ व त्यातील तपशील प्रमाणभूत मानले जाई. याशिवाय त्याकाळात न्यायनिवाड्यासाठी विज्ञानेश्वरांनी याज्ञवल्क्यस्मृतिवर 'मिताक्षरा' नावाचा लिहिलेला ग्रंथ प्रमाणभूत समजला जाई. कसबे तळबीडच्या मुकादमीच्या तंट्याचा निर्णय नेताजी पालकरांच्या उपस्थितीत देताना उपस्थित मजलीसच्या सभासदांनी विज्ञानेश्वराच्या वरील ग्रंथाच्या आधारावर वृत्तीचा हक्काची वाटणी केली होती.

बहुतेक गोतसभेत 'मिताक्षरा' हा ग्रंथ प्रमाण मानला जात असे. पण काही प्रसंगी मनुस्मृति, 'व्यवहारमुख' व 'दानकमलाकर' इ. ग्रंथाचाही आधार वादांचे निवाडे करताना घेतला जाई. पेशवेकाळात व्यवहारमुख या ग्रंथाला 'मिताक्षाराचा' दर्जा प्राप्त झाला. मनू, हेमाद्री व माधव यांची अवतरणे तर वारंवार देऊन एखादा खटला चालवणे ही तर त्यावेळची शिष्टसंमत पद्धती होती. 'यातिनिर्णय' किंवा 'जातीधर्म' या ग्रंथात सर्व जातीसंबंधी केलेले विविध कायदे असत. जर भिन्न जातीमधील खटला निर्माण झाला तर त्यासाठी 'यातिनिर्णय'या ग्रंथाचा आधार घेतला जात असे.

**स्वयं अध्ययनासाठी प्रश्न : २**

अ) एका वाक्यात उत्तरे द्या.

१. गोतसभेकडे जो पक्षकार तक्रार दाखल करीत असे त्याला कोणत्या नावाने संबोधत.

२. गोतसभेचा महजर म्हणजे निवाड पत्र लिहिण्याचे काम कोणाकडे असे.

३. पेशवेकाळात गोतसभेचे किती प्रकार होते.

४. महाजन व शेटे यांची निशाणी कोणती होती.

५. पेशवेकाळात कोणत्या ग्रंथाला 'मिताक्षराचा' दर्जा प्राप्त झाला होता.

ब) रिकाम्या जागी योग्य उत्तरे लिहा.

१. कसब्यामधील व्यापारी पेठेचे संरक्षण करण्याचे काम ......... करीत असे.

अ) शेटे ब) पाटील क) कुलकर्णी ड) देशपांडे

२. गोतसभेच्या निवाडा पत्रावर शेटे-महाजन आपली ......... ही निशाणी उठवीत.

अ) नांगर ब) आरसा क) आरी ड) तराजू

३. वेगवेगळ्या जातीमधील खटल्यांचा निर्णय देण्यासाठी ......... या ग्रंथाचा आधार घेतला जात असे.

अ) अर्थशास्त्र ब) ज्ञानेश्वरी क) यातिनिर्णय ड) आज्ञापत्र

४. न्यायदान करताना ........ या ग्रंथाचा आधार घेतला जात होता.

अ) अर्थशास्त्र ब) मिताक्षरा क) ज्ञानेश्वरी ड) आज्ञापत्र

५. खेडेगावच्या गोतसभेचा प्रमुख......... हा असे.

अ) पाटील ब) कुलकर्णी क) शेटे ड) महाजन

## २.२.३ खेडेगावातील प्रशासन :

१७ व्या शतकातील खेडे हा एक स्वयंपूर्ण घटक होता. अर्थव्यवस्था पूर्णपणे शेतीप्रधान होती. खेडेगावातील अथार्जनाचा मुख्य मार्ग म्हणजे शेती. शेती व त्यासंबंधी असणारे इतर सर्व सहाय्यकारी व्यवसायांचा एकमेकांशी घनिष्ठ संबंध होता. गावातील सर्व गरजा गावातच भागवल्या जात. त्यामुळे मराठा काळात ग्रामव्यवस्था ही स्वयंपूर्ण होती. गावच्या क्षेत्रफळाचे प्रामुख्याने दोन विभाग मानले जात. ज्या ठिकाणी गावातील लोक वसती करून राहत. त्या विभागाला 'पांढरी' किंवा 'पांढरी आई' असे म्हणत. तर

दुसरा विभाग म्हणजे शेतजमिनीचा. हिला 'काळी' अथवा 'काळी आई' असे म्हणत. काळी व पांढरी यांनी मिळून गाव बनत असे. अशा गावालाच शिवकालीन कागदपत्रात 'ग्राम', 'देहे', 'मौजा', 'खेडे' असेही म्हटलेले आढळते. खेडे गावचे जर काही वाढीव भाग असतील तर त्याचा उल्लेख 'मजरा', 'वाडी', 'पाडी' व 'खारी' इत्यादी शब्दाने करण्यात येतो. वरीलपैकी खेडेगाव व त्याचे वाढीव भाग यांच्या विभागणीमध्ये कोणतेही निश्चित तत्त्व पाळल्याचे दिसत नाही. काळाच्या ओघात गावच्या लोकसंख्येत वाढ झाल्याने नवीन वसाहतीच्या माध्यमातून नवीन गावाची निर्मिती होऊ लागली. मूळच्या मोठ्या गावास 'बुद्रुक' तर नवीन गावास 'खुर्द' असे संबोधले जाई. 'बुद्रुक' म्हणजे मोठे, 'खुर्द' म्हणजे छोटे. बुद्रुक व खुर्द हे दोन शब्द संस्कृतमधील 'ब्रह्त' व 'लघु' या शब्दापासून तयार झालेले आहेत.

शिवकालीन कागदपत्रांत गावांना 'मौजा', 'कसबा', 'पेठ' असे संबोधले जाई. लहान गावांना 'मौजे' म्हटले जाई. अशा मौजांचीच संख्या जास्त असे. अशा दहा-वीस मौजांमध्ये एखादे मोठे गाव असे त्यास 'कसबा' असे म्हणत. 'कसबा' हा शब्द 'कसब' या शब्दापासून तयार झाला आहे. ज्या गावात मौजापेक्षा कसबी कारागीर व्यापार-उदीम करणारे लोक अधिक संख्येने वस्ती करून राहतात त्यास 'कसबा' असे म्हटले जाई. 'कसबा' हा भाग आर्थिक दृष्टिकोनातून महत्त्वाचा समजला जात असे. अशा कसब्याचा काही वेळा 'पेठ' असासुद्धा उल्लेख केला जात असे. अशा पेठेमधून व्यापारी लोकांना विशेष सवलती देऊन वस्ती करण्यास प्रोत्साहन देत असत. जर एखादे असे खेडेगाव समुद्राच्या किनाऱ्याला असेल तर त्याचा उल्लेख 'मिरे' या शब्दाने करत असत. मिरे याचा उल्लेख जर ते गाव लहानसे बंदर असेल तर त्या अर्थानेसुद्धा करत असत. वर उल्लेख केल्याप्रमाणे खेडे हा एक स्वयंपूर्ण घटक होता. यामध्ये काही सरकारी अधिकारी व काही परंपरेने चालत आलेले अधिकारी असत. सरकारी अधिकाऱ्यांमध्ये पाटील, कुलकर्णी व चौगुले यांचा समावेश होतो. तर परंपरेने चालत आलेले अधिकाऱ्यांमध्ये बारा बलुतेदार व मिरासदार यांचाही समावेश होतो.

**पाटील :**

पाटील हा गावचा मुख्य सरकारी अधिकारी होय. शिवकालीन कागदपत्रांत पाटलाचा उल्लेख 'पाटील', 'गावचे पाटील', 'मुकादम' व 'मुकादम पाटील' असा केलेला आढळतो. राज्यव्यवहारकोषात त्यास 'ग्रामगोपक' असे म्हटले आहे. पाटील हा एकाच वेळी खेड्याचा व सरकारचा प्रतिनिधी होता. गावाच्या वसाहतीशी व जमिनीशी संबंध असल्याने 'नांगर' ही त्याची निशाणी होती. गावातील लोक बहुसंख्येने मराठा असल्याने सामान्यतः पाटील मराठा जातीचा असे. अपवादात्मक परिस्थितीत पाटील, ब्राह्मण, मुसलमान, धनगर, महार अशा समाजातीलही आढळून येतात. मराठ्यांच्या इतिहासात पाटील वतनदारांनी मोठे योगदान दिले आहे. महादजी शिंदे सारख्या पराक्रमी सरदारासही पाटील म्हणवून घेण्यात धन्यता वाटत होती.

**हक्क:**

पाटलाला काही विशेष हक्क असत. त्यांना हक्कलाजिमा म्हणत. हे हक्कलाजिमा म्हणजे परंपरेने मिळालेले हक्क असत. मात्र यांना कायदेशीरपणा नसे. त्यामुळे सर्वच पाटलांना सर्वच हक्कलाजिमे मिळत असत असे नसे. हे हक्कलाजिमे किंवा अधिकार सर्व साधारणपणे पुढीलप्रमाणे असत. गावातील प्रत्येक सणाच्यावेळी पाटलाचा मान पहिला असे. होळी, गणेश चतुर्थी, संक्रांत, दसरा, दिवाळी, पाडवा व पोळा या दिवशी पहिल्यांदा पाटलाला भेट द्यावी व नंतर इतरांना अशी पध्दत असे. गावाचे दिवाणी आणि मुलकी अधिकार पाटलाकडे होते. गावाच्या सेवेबद्दल पाटलास अनेक प्रकारचे हक्कलाजिमे मिळत. गावामधून गोळा होणाऱ्या महसुलाचा ठराविक हिस्सा पाटलास मिळत असे. त्यास 'खुर्दा' असे म्हणतात. गावातील प्रत्येक शेतकऱ्यांकडून पाटलाला काही धान्य अथवा वस्तू मिळत असत. या हक्कास 'गला' असे म्हणत. यामध्ये 'घुगरी', फसकी, हुर्डा असे अनेक हक्क असत. याचबरोबर गावातील कारगिरांकडून अनेकविध वस्तू मोफत मिळत. उदा. कुभांराकडून रांजण, चांभाराकडून पायपोसी, तेल्याकडून तेल, व्यापाऱ्यांकडून नारळ-सुपारी इत्यादी. याशिवाय पाटलाला 'वेठ बिगारीचा' हक्क असे. म्हणजे त्याच्या तैनातीला एक 'राबता महार' मिळत असे. प्रसंगाविशेष गावातील वाजंत्रीही आपली सेवा फुकट देत असत.

**कामे :**

गावामध्ये नवीन कुळे (रयत) आणून त्यांच्या माध्यमातून पडीक जमीन लागवडीखाली आणणे. गावचा जमीन महसूल ठरवून तो गोळा करणे. गोळा झालेला महसूल सरकारात भरणे, साऱ्याच्या तुटीस जबाबदार राहणे. याकामी पाटलास कुलकर्णी, चौगुला इत्यादींची मदत होत असे. महसुलाशिवाय पाटील इतरही कामे करत असे. त्यामध्ये गावची संरक्षण व सुव्यवस्था याची पूर्ण जबाबदारी पाटलाकडे होती. गावचा प्रमुख या नात्याने गोतसभेच्या निवाड्याचे कामकाज त्यास पार पाडावे लागत असे. गावामध्ये घडणाऱ्या गुन्ह्यांचा तपास करून गुन्हेगारांना शासन करण्याचे काम त्यास करावे लागे.

**कुलकर्णी :**

कुलकर्णी हा गावाचा दुसरा महत्वाचा मुलकी अधिकारी होय. त्यास स्थलपरत्वे पटवारी, कुलकर्णी म्हटले जाई. पट म्हणजे गावचा मुख्य हिशोबी कागद करणारा तो पटवारी, कुळवार गावाचा हिशोब देणारा म्हणून कुलकर्णी. कुलकर्णी हे एक वतन असे. कुलकर्ण्याच्या वतनाला लेखनवृत्ती असेही म्हणत. कुलकर्णी हा प्रामुख्याने ब्राह्मण जातीतील असे. पण क्वचित प्रसंगी लिंगायतसारख्या समाजातील व्यक्तीही 'कुलकर्णी' असल्याचे आढळते. त्याचे वतन वंशपरंपरागत असे. त्यामुळे लिखापढी करणारे वारसदार कुटुंबात तयार होत. जसा प्रत्येक गावी पाटील हा असेच. तसा प्रत्येक गावास कुलकर्णी असेलच असे नाही. याचे कारण त्या काळात समाजात साक्षरतेचे प्रमाण अतिशय कमी असल्याने कुलकर्णी पदासाठी लायक माणूस मिळणे अवघड होत असे. परिणामी एकेका कुलकर्ण्याकडे काही वेळात पाच दहा गावे नेमून दिलेली असत.

कुलकर्ण्यांच्या घरातच 'कुलकर्ण' वतन वंशपरंपरेने असे. काही ठिकाणी कुलकर्णी आपल्या वतनाचे कामकाज पाहण्यासाठी दुसऱ्या व्यक्तीची 'मुतालीक' म्हणून नियुक्ती करत असे. तर काही गावामध्ये

कुलकर्णी पद रिक्त राहिल्याने गावकरी एकत्र येऊन लायक माणसाची नियुक्ती करत व त्याच्या मान्यतेसाठी सरकार दरबारी अर्ज करत. कुलकर्णी जर निपुत्रीक मृत्यु पावला तर त्याचे वतन दुसऱ्या कार्यक्षम व्यक्तीला विकले जाई. या विक्रीच्या व्यवहारास 'शेरणी' असे म्हटले जाई. कुलकर्णीपणाचे वतन हे विशेषतः कोकणात वंशपरंपरागत दिसत नाही. उदा. चौलसुभा या ठिकाणी कुलकर्ण्याचे काम 'हुजूरदार' नावाचा अधिकारी पार पाडत असे. छत्रपती शिवाजी महाराजांच्या ताब्यात चौलचा प्रदेश आल्यानंतर तेथे कुलकर्णी नियुक्त केले. खरे तर गावात पाटलाचा दर्जा व स्थान कुलकर्ण्यापेक्षा उच्च असूनही काही प्रसंगी पाटलाच्या निरक्षरतेचा फायदा घेवून कुलकर्णी त्यास आपली अक्कल हुशारी दाखवी. हिशेबामध्ये गैरव्यवहार करे, काही दोषी कुलकर्ण्यावर शासनाकडून कारवाई झाल्याचे दिसून येते.

**हक्कलाजिमे:**

कुलकर्णी हा पाटलाचा सहकारी होता. त्याला पाटलाप्रमाणेच परंतु कमी प्रमाणात हक्क व सवलती होत्या. कुलकर्ण्याच्या कामाचा मोबदला म्हणून सरकारकडून इनाम जमीन मिळत असे. या जमिनीची मालकी त्याच्याकडे वंशपरंपरेने चालत राही. याशिवाय काही रोख रक्कमही सरकारकडून त्यास मिळत असे. दप्तर खर्चासाठी सरकारकडून व गावकऱ्यांकडून 'सादिलवार' या सदराखाली काही रक्कम त्यास मिळत असे. पाटलाप्रमाणेच त्यास गावकऱ्यांकडून अनेक वस्तू हक्कलाजिम्याच्या रूपाने मिळत असत. उदा. शेतकऱ्यांकडून घुगरी, हुडी, चांभाराकडून पायपोशी, व्यापाऱ्याकडून नारळ, सुपारी, फळे, तेल्याकडून तेल इत्यादी. कुलकर्ण्याच्या जनावरासाठी काही चारा त्याला हक्क परंपरेने मिळत असे. गावातील इतर व्यावसायिक व्यक्तींकडून काही भेटवस्तू मिळत असत. वेठबिगारीचा हक्क सुध्दा त्याला मिळत असे. उदा. पाटलाप्रमाणे घरी काम करण्यासाठी राबता महार मिळे. तसेच त्याच्या घरी पखालदार कोळी फुकट पाणी भरत असे. अनेक ठिकाणी कुलकर्णी हाच जोशी म्हणून धार्मिक काम पार पाडत असल्यामुळे देवळातील उत्पन्नाचे अडीच टक्के उत्पन्न त्यास मिळत असे. पाटलाप्रमाणेच हे हक्क त्याला कायदेशीर नसत प्रत्येक गावच्या परंपरेप्रमाणे ते बदलत असत.

**कामे:**

गावातील सर्व प्रकारच्या नोंदी ठेवण्याचे काम कुलकर्णी करत. गावातील शेतकऱ्यांच्या जमिनीचे क्षेत्र, गावातील लागवडीखालील क्षेत्र, पिकांच्या नोंदी, सारा व सारा वसुली इत्यादी सर्व नोंदी कुलकर्णी आपल्या दप्तरी ठेवीत असे. गावचा सरकारशी होणारा पत्रव्यवहार कुलकर्णी पार पाडत असे. गावातील गोतसभांच्या बैठकांना तो हजर असे व गोतसभेचा 'महजर' म्हणजे निवाडापत्र तोच लिहित असे. गावात लिहणे-वाचणे जाणणारा तो एकमेव माणूस असल्याने गावची सर्व लिखापडी त्यालाच करावी लागे. एवढेच नव्हे तर काही गावचे कुलकर्णी कुलकर्णीवृत्ती बरोबरच 'जोतिष' बघत असत. त्यांच्याकडे जोशीवृत्तीचे काम सोपविण्यात आले होते. पाटलाचा तो सहाय्यक म्हणून कार्य करीत असे. तसेच पाटलाप्रमाणे त्यास देखील आपल्या गावातील शेती सुधारण्यास, पडीक जमीन लागवडीखाली आणण्यास, शेतकऱ्यांना प्रोत्साहन देण्याचे कार्य करावे लागत असे.

**चौगुला:**

परंपरेने चालत आलेल्या अधिकाऱ्यांमध्ये चौगुला हा एक अधिकारी होता. खेड्याच्या व्यवस्थापनातील तिसरा प्रमुख अधिकारी म्हणून चौगुला याचा क्रम लागतो. चौगुला म्हणजे चार कुळ बाळगणारा असाही त्याच्या व्युत्पत्तीचा अर्थ लावला जातो. तो गावचा वतनदारच होता तसेच तो पाटलाचा मदतनीस होता. पाटलाप्रमाणेच त्याची निशाणी 'नांगर' ही होती. काही तत्कालीन कागदपत्रात त्याची निशाणी 'काठी' अशी दाखविली आहे. यावरून गावच्या क्षेत्रफळाच्या मोजणी मापणाशी संबंधित कामही तो करीत असावा असा तर्क संभवतो. राज्यव्यवहारकोषात त्यास 'ग्रामणी' म्हटले आहे.

सामान्यतः चौगुला हा मराठा जातीतीलच असे मात्र अपवादात्मक परिस्थितीमध्ये जैन, लिंगायत, मुसलमान इत्यादी समाजातील व्यक्तीकडे हे पद असल्याचे दिसून येते. एकंदरीत पाटलाच्या खालोखाल चौगुला वतनास प्रतिष्ठा असावी म्हणूनच लोकगीतात एका चौगुले कन्येस चिडवण्यासाठी असे म्हटले आहे की,

''चौगुल्याच्या लेकी नको बोलूस चढईरू<br>
कागदाचा भार तुझ्या बापाच्या डोईवरु''

**हक्कजाजिमे:**

चौगुल्याच्या हक्कलाजिम्या संबंधी फारशी माहिती मिळत नसली तरी त्यास कुलकर्ण्याप्रमाणे हक्कलाजिमे मिळत असावेत. शेतसाऱ्याची रक्कम जमा करताना हवालदारांकडून काही प्रमाणात रक्कम त्यास मिळत असे. चौगुल्याचे पद हे वंशपरंपरेने चालत येत असे. गोतसभेत पाटील, कुलकर्णी यानंतर चौगुल्याचे स्थान होते.

**कामे:**

चौगुल्याचे मुख्य काम म्हणजे गावच्या कारभारात पाटलास हरएक प्रकारची मदत करणे, शेतसारा वसुलीत तो पाटलास मदत करीत असे. शेतसाऱ्याची नोंद ठेवण्याचे काम कुलकर्ण्याचे असले तरी प्रत्यक्ष वसुलीत चौगुला हा पाटलास फार मोठी मदत करीत असे. शेतसाऱ्याची रक्कम सरकारी खजिन्यात पोहोचविण्याची जबाबदारी त्याच्यावरच होती. सरकार दरबारात गावचा पत्रव्यवहार व हिशोबाची कागदपत्रे पोहचविणे. गाव सोडून गेलेल्या कुळांना परत आणून त्यांना गावात स्थिर करणे, गावात जमा होणाऱ्या महसूलाचे रक्षण करणे, गावातील धान्य कोठारांची सुव्यवस्था ठेवण्याचे कामही चौगुल्याचे असे. गोतसभेत पाटील प्रमुख तर चौगुला उपप्रमुख म्हणून कार्य करीत असे. काही कागदपत्रातून नांगरा बरोबर 'काठी' हे चिन्ह दाखविण्यात आल्याने तो जमिनीच्या मोजणीचे कार्यही करीत असावा तसेच जास्तीत जास्त जमीन लागवडीखाली आणण्यासाठी तो प्रयत्न करीत असे.

**शेटे महाजन –**

शेटे महाजन हे खेडेगावातील इतर अधिकारी असत. प्रत्येक खेड्यात हे दोन अधिकारी असतीलच असे नाही. तर ज्या गावात पेठ किंवा कसबा असेल त्या ठिकाणी हे अधिकारी असत. एकंदरीत शेटे-महाराज हे व्यापाऱ्यांचे प्रतिनिधीत्व करणारे अधिकारी होते. 'तराजू' ही त्यांची व्यावसायिक निशाणी होती.

**हक्कलाजिमे:**

शेटे-महाजन यांना त्यांच्या कामानुसार वतनी जमीन, ठरावीक हक्क व रोख रक्कम मिळे, गावकऱ्यांकडून व बलुतेदारांकडून त्यांना काही वस्तू भेट मिळत. बाजाराच्या दिवशी प्रत्येक दुकानदारांकडून ठराविक वस्तू त्यांना दिल्या जात. प्रत्येक सणादिवशी प्रत्येक दुकानदारांकडून पावशेर गहू किंवा धान्य त्यांना दिले जाई. गोतसभेचे सभासद म्हणून काम पाहण्याचा त्यांना अधिकार होता.

**कामे**

कसब्याच्या ठिकाणी व्यापारी पेठ वसविण्याचे काम शेटे-महाजन यांना पार पाडावे लागे. शेटेला पेठेचा प्रमुख म्हणून कार्य करावे लागे. पंचक्रोशीतील मोठ्या गावामध्ये कारागीर, व्यापारी, लोकांच्या सहकार्याने तो पेठ वसवत असे. पेठेमधून जमा होणाऱ्या धान्याची व्यवस्था ठेवण्याची कामगिरी शेटेस पार पाडावी लागे. त्याचबरोबर गोतसभेचा महत्वपूर्ण सदस्य म्हणून तो कार्य पार पाडत असे.

शेटेस मदत करण्याचे काम महाजन या वतनदारास पार पाडावे लागे. पेठेचा हिशोब ठेवण्याची मुख्य कामगिरी त्यास पार पाडावी लागे. धान्य रूपाने गोळा होणारा महसूल एकत्र करणे, त्याची नोंद ठेवणे इत्यादी प्रकारची कामे महाजन करत असे. गावगाड्यातील सावकारी व्यवहार मुख्यतः शेटे-महाजन कडून केले जात.

**५) बलुतेदार व आलुतेदार:**

बलुतेदारी हे शिवकालीन ग्रामव्यवस्थेचे महत्वाचे वैशिष्ये होत. खेडेगावात परंपरेने चालत आलेल्या अधिकाऱ्यांमध्ये बलुतेदार वर्गाचा समावेश होतो. बलुतेदार व अलुतेदार हा एक स्वतंत्र वर्ग होता. गावामध्ये वतनदार, मिरासदार यांच्यानंतर बलुतेदारांना महत्वाचे स्थान होते. बलुतेदार शेतकऱ्यांना शेतीच्या कामासाठी लागणाऱ्या सर्व वस्तू पुरविण्याचे काम करीत. त्याचबरोबर गावाला लागणाऱ्या सर्व सेवा पुरविण्याचे काम बलुतेदारांना करावे लागे. वर्षभर केलेल्या या सर्व कामाबद्दल शेतकऱ्यांकडून बलुतेदारांना उदरनिर्वाहासाठी जो मोबदला मिळेल त्यास 'बलुते' असे म्हणत. बलुतेदार हे गावाच्या विकासासाठी आणि गावाच्या स्थैर्यासाठी आपले योगदान देत असत म्हणून ते गावातील महत्वाचे ग्रामसेवक होते. अलुतेदाराला त्याच्या सेवेसाठी देण्यात येई तो 'अलुता' होय. 'अलुते-बलुते' यास कागदपत्रातून 'घुगरी', पेंढीकाडी, सळई, भिकणे, शेर, हक्क इत्यादी नावांनी संबोधल्याचे आढळते.

बलुते-अलुतेदारांना 'कारू' व 'नारू' या नावानेही ओळखले जाते. कारूला बलुतेदार तर नारूला आलुतेदार म्हणतात. ज्याच्या सेवेवाचून शेतकऱ्यांचे हरघडी नडते तो 'कारू' व ज्याची सेवा मिळाली नाही तरी शेतकऱ्याचे फारसे नडत नाही तो 'नारू' होय. समाजव्यवस्थेत बारा बलुतेदार व अठरा अलुतेदार असल्याचे दिसते. प्रत्येक गावामध्ये याप्रमाणे संख्या असेलच असे नाही. गावाच्या गरजेनुसार अलुतेदार-बलुतेदार असल्याचे दिसते. बलुतेदार कोण? आलुतेदार कोण? याबाबतही एकवाक्यता नाही. 'गावगाडा' या पुस्तकाचे लेखक त्रिं. ना. अत्रे म्हणतात, ''साधरणतः पाटील, कुलकर्णी सोडून चौगुला, महार, सुतार, लोहार, चांभार, कुंभार, न्हावी, सोनार, जोशी, परीट, गुरव, कोळी यांना बारा बलुतेदार म्हणतात. तेली, तांबोळी, साळी, धनगर, शिंपी, माळी, गोंधळी, डवऱ्या, भाट, ठाकर, गोसावी, जंगम, मुलाणा, वाजंत्री, घडशी, कलावंत, तराळ, भोई इत्यादींना अलुतेदार म्हणतात.

मराठ्यांचा इतिहासकार ग्रँट डफने, "History of the Marathas' या ग्रंथात बलुतेदार व अलुतेदार यांची यादी दिली आहे. ती डॉ. अ. रा. कुलकर्णी यांनी आपल्या 'शिवकालीन महाराष्ट्र' या ग्रंथात दिली आहे ती पुढीलप्रमाणे. बलुते - सुतार, लोहार, चांभार, महार, मांग, कुंभार, न्हावी, धोबी, गुरव, जोशी, भाट, मुलाणा, अलुते - सोनार, जंगम, शिंपी, कोळी, तराळ अथवा येसकर, माळी अथवा बागवान, डवरी गोसावी, घडशी, तेली, तांबोळी, गोंधळी. परंतु ही यादी प्रमाणभूत आहे असे मानता येणार नाही. कारण काही कागदपत्रांमध्ये सोनार, तराळ, रामोशी, तेली, तांबोळी, कोष्टी, शिंपी, धनगर इत्यादी ग्रामसेवकांचा बलुतेदार असा उल्लेख केलेला आढळतो. ज्येष्ठ इतिहासकार डॉ. अ. रा. कुलकर्णी यांनी गावगाड्यातील बलुतेदार व अलुतेदार या सेवकांचे तीन वर्ग केले आहेत.

१. कारागीर वर्ग: सुतार कुंभार, लोहार, न्हावी, परीट, चांभार इत्यादी

२. सेवक वर्ग: महार, मांग, रामोशी, तराळ इत्यादी

३. धार्मिक सेवक वर्ग: जोशी, गुरव, जंगम, ठाकूर, मुलाणा इत्यादी

शेतकऱ्यांना सुतार, लोहार, चांभार, कुंभार, न्हावी, महार, मांग या बलुतेदारांची सेवा अत्यावश्यक असे. गावगाड्यामध्ये त्यांचे स्थान अत्यंत महत्वाचे होते. शेतकऱ्यांकडून त्यांना त्यांच्या कामाचा योग्य मोबदलाही मिळत असे. सुतारास प्रमुख बलुतेदार मानले गेल्याने त्यास 'सुतार-पाटील' असे संबोधतात. सुतार या बलुतेदाराप्रमाणेच इतर बलुतेदारांचे कार्यही महत्वपूर्ण होते. महार या बलुतेदाराची कामगिरी विशद करताना त्रिं. ना. अत्रे म्हणतात, ''पट्टीसाठी असाम्यांना बोलावणे व तगादा करणे, गावचा वसूल तहशिलात घेऊन जाणे, कागदपत्र परगावी पोहोचविणे, पाटील-कुलकर्णी यांच्याबरोबर गावात हिंडणे, गावात मुक्कामास अधिकारी आले म्हणजे त्यांच्यासाठी सरपण-चारा आणणे, त्यांच्या जनावरांना मालिश करणे, त्यांना दाणापाणी दाखविणे, शेणलीद काढणे, त्यांच्या तळावर बशा म्हणून बसून राहणे, गावात दवंडी देणे, गावाची शीव व शेताच्या बांध-उरळ्या ध्यानात धरणे. त्या न मोडल्या जातील अशी खबरदारी घेणे, त्यांच्याबद्दल भांडणात पुरावा देणे, दरोबस्त पिके व खळी राखणे, रात्री काळी पांढरीत गस्त घालणे, गावचे जंगल व झाडे

जतन करणे, जंगली जनावरे मारणे, रात्रंदिवस घाटात पहारा देणे, चोरवाटा व मारेकऱ्यांच्या जागा यांची माहिती मिळविणे व त्या रोखणे, गावात आल्यागेल्याची खबर काढणे, वाहिमी लोकांची पाटलाला वर्दी देणे, चोरांचा तपास लावणे, गावचे रस्ते झाडणे, मेलेली जनावरे ओढणे इत्यादी'' त्रिं. ना. अत्रे यांच्या माहितीवरून 'महार' या बलुतेदारास अनेक प्रकारची कामे करावी लागत होती असे दिसून येते.

सर्वच बलुतेदार- अलुतेदार एकाच गावात होते असे दिसत नाही. मौजे, खुर्द अशा गावामध्ये चार, पाच इतकेच बलुतेदार असत तर बुद्रुक, कसबा अशा गावामध्ये मोठ्या प्रमाणात बलुतेदार आणि अलुतेदारांची संख्या पहावयास मिळते. गावच्या गोतसभांना हजर राहून कामकाजात भाग घेण्याचा अधिकार बलुतेदार व अलुतेदारांना होता. गावच्या महजरावर बलुतेदार व अलुतेदारांच्या निशाण्या उठविण्यात येत असत. त्यांच्या उद्योगाच्या प्रमुख वस्तूवरून निशाणी ठरविण्यात येत असे. ती त्यांच्या नावासमोर उठविण्यात येई. कुंभाराची निशाणी चाक, न्हाव्याचा आरसा, सुताराची तारणी, चांभाराचा टोचा व दोरा, गुरवाची धूपारती, सोनाराची ऐरण, मुलाण्याचा चाकू इत्यादी निशाण्या महजरावर दिसून येतात.

एकंदरीतच बलुतेदार पध्दतीने महाराष्ट्रातील खेडेगावच्या समाज रचनेत व राजकीय जीवनात महत्वाची कामगिरी बजावली. जात व सामाजिक स्थान यांचा विचार करून प्रत्येक बलुता हा गावच्या प्रशासनात महत्वाची कामगिरी बजावत असे. छत्रपती शिवाजी महाराजांनी वतनदार, मिरासदार, उपरे, बलुतेदार, अलुतेदार या सर्वांना गावगाड्याच्या प्रशासनामध्ये सहभागी करून घेऊन प्रशासनाच्या विकासासाठी प्रयत्न केले. ज्यामधून स्वयंपूर्ण आणि उत्कृष्ट प्रशासन व्यवस्था उदयाला आली आणि ही प्रशासन व्यवस्था मध्ययुगीन कालखंडातील इतर राजव्यवस्थेच्या प्रशासन व्यवस्थेच्या तुलनेमध्ये अतिशय दर्जेदार होती.

**मिरासदार व उपरे:**

वंशपरंपरेने अस्तित्वात असलेला खेडेगावातील दुसरा वर्ग म्हणजे मिरासदार व उपरे यांचा होता. गावातील लागवडीखालील जमीन कसण्याचे काम दोन प्रकारचे लोक करत असत. त्यापैकी एक मिरासदार किंवा थळकरी आणि दुसरा उपरे. यापैकी मिरासदार हेच गावाचे जमिनीचे वंशपरंपरागत व वहिवाटीने जमिनी कसत आलेले लोक होते. मिरासदार हा वर्ग स्वतःच्या जमिनी स्वतः कसत असे. मिरासदार जमिनीचे मालक असल्याने त्यांना गावात सन्मान होता. खेडेगावात वसाहत करणे, जमिनी लागवडीखाली आणणे, बाहेरच्या लोकांना जमिनी लावडीखाली आणण्याबद्दल प्रोत्साहन देणे अशी विविध कामे त्यांना करावी लागत. हे मिरासदार ठरावीक कर सरकारात भरत असत व आपल्या गावात राहून सर्व तऱ्हेचे हक्क उपभोगत असत. गावच्या गोतसभेत, न्यायव्यवस्थेत हे मिरासदार भाग घेत असत. यांच्या हक्कांना मिराशी हक्क असे म्हणतात. मिरासदारांच्या शिवाय जमिनी कसणारा दुसरा वर्ग म्हणजे उपऱ्यांचा होय. हे लोक बाहेरून येऊन गावामध्ये शेती करत. परंतु जमिनीवर त्यांची मालकी नसे. उपऱ्यांचा गोतसभेशी काहीही संबंध नसे. उपऱ्या लोकांनी ग्रामीण समाज रचनेत महत्वाचे योगदान दिले असले तरी मिरासदारांच्या तुलनेत त्यांचा आर्थिक व सामाजिक दर्जा दुय्यम असल्याचे दिसून येते.

छत्रपती शिवाजी महाराजांना त्यांच्या प्रचंड कार्यामुळे सामाजिक सुधारणा करण्यास संधी मिळाली नाही. राजकीय स्वातंत्र्य हा त्यांच्या कार्याचा मुख्य हेतू होता. सामाजिक क्रांतिकडे त्यांना लक्ष देता आले नाही. महाराष्ट्रातून परकीय सत्तांचे उच्चाटन करणे हा त्यांचा मुख्य हेतू असल्याने ग्रामरचना जवळजवळ पूर्वीसारखीच टिकून राहीली. महाराजांनी वतनदारांचे महत्व कमी केले परंतु बाकीची समाजरचना मात्र तशीच ठेवली.

शिवकाळातील हीच ग्रामव्यवस्था थोड्याफार फरकाने पेशवाईतही अस्तित्वात होती. पूर्वीप्रमाणेच खेडेगावातील संरक्षणाची सर्व जबाबदारी पाटलावरच असे. पाटलाला चोरीच्या तपासाच्या कामात गावचा महार मदत करत असे. जर हे काम महाराकडून पूर्ण झाले नाही तर इतर गावकऱ्यांची तो मदत घेत असे. चोरीचा तपास लावण्याची पध्दत अतिशय अपरिपक्व असल्याचे दिसून येते. चोराच्या पावलाच्या ठस्यावरून माग काढला जात असे व ज्या ठिकाणी पावलांच्या खुणा थांबतील त्या ठिकाणीच शोध घेतला जात असे. जर चोरीचा मुद्देमाल मिळाला नाही तर त्या खेडेगावातील लोकांच्यावर नुकसान भरपाई बसविली जात असे. थोडक्यात म्हणजे सर्व गावकरी हेच गावच्या संरक्षणास सामुदायिकरित्या जबाबदार असत. काही वेळा बेरडाचा संरक्षणासाठी उपयोग करून घेत असत. अशा बेरडाचा पगार हा सरकारमधून मिळत नसे. तर संबंधित गावातून असा पगार भागविला जात असे. काही वेळा गावच्या संरक्षणासाठी शिबंदी म्हणजे अनियमित पायदळसुध्दा गावाला निर्माण करावे लागत असे. पेशवेकाळात ग्रामरचनेत मोठ्या प्रमाणात स्वातंत्र्य मिळाल्याचे दिसून येते. गावात देवालये, धार्मिक विधी, दानधर्म, आतिथ्य इत्यादी बाबतीत लोकांना पुष्कळ स्वातंत्र्य दिसून येते. या काळातील ग्राम व्यवस्थेमध्ये स्वायत्तता, आर्थिक स्वयंपूर्णतः व पुष्कळच्या प्रमाणात एकात्मता दिसून येते.

**स्वयं अध्ययनासाठी प्रश्न : ३**

अ) एका वाक्यात उत्तरे द्या.

१. राज्यव्यवहारकोषात पाटलाचा उल्लेख कोणत्या नावाने करण्यात आला आहे.

२. खुर्दा म्हणजे काय.

३. शेरणी म्हणजे काय.

४. 'कारू-नारू' असा कोणाचा उल्लेख केला जातो.

५. पेठेचा हिशोब ठेवण्याचे काम कोणता अधिकारी पार पाडत होता.

ब) रिकाम्या जागी योग्य शब्द भरा.

१. प्रत्यक्ष शेती करण्यात येई त्या जमिनीस ...... असे म्हटले जाई.

अ) पांढरी आई ब) काळी आई क) सीम ड) चारहम

२. शिवकालीन मुळच्या मोठ्या गावास ........ म्हटले जाई.

अ) बुद्रुक ब) खुर्द क) मजरा ड) मिरे

३. ........ च्या वतनास 'लेखनवृत्ती' असे म्हटले आहे.

अ) पाटील ब) कुलकर्णी क) चौगुला ड) महाजन

४. पेठेचा मुख्य अधिकारी .......... हा होय.

अ) शेटे ब) महाजन क) बिडवई ड) चौगुला

५. गावच्या पाटलाची ........ ही निशाणी होती.

अ) तराजू ब) नांगर क) काठी ड) दोरखंड

## २.३ सारांश

छत्रपती शिवाजी महाराज स्वराज्य निर्माण करणारे युगपुरूष होते. अतिशय प्रतिकुल परिस्थितीमध्ये महाराजांनी फक्त स्वराज्याची मुहूर्तमेढच रोवली नाही तर प्रस्थापित मुगल सत्तेशी व इतर सत्तांशी संघर्ष करून प्रादेशिक विस्ताराबरोबरच प्रशासकीय विस्तार करून कल्याणकारी व कायद्याचे राज्य निर्माण केले. त्यामुळे मध्ययुगातील उत्कृष्ट प्रशासन व्यवस्था निर्माण करणारा राज्यकर्ता म्हणून सर्वच इतिहासकार छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रशासन व्यवस्थेची व त्यांनी प्रशासन व्यवस्थेला दिलेल्या नैतिक अधिष्ठानाची स्तृती करताना दिसून येतात. मध्ययुगातील एक उत्कृष्ट प्रशासन व्यवस्था छत्रपती शिवाजी महाराजांनी निर्माण केली. अनियंत्रीत राजेशाहीच्या कालखंडामध्ये आणि लहरी राज्यकर्तेंच्या बाहुवलीमध्ये छत्रपती शिवाजी महाराजांनी आपल्या प्रशासन व्यवस्थेला व राज्यव्यवस्थेला राष्ट्रीय ऐक्य मिळवून दिले.

## २.४ पारिभाषिक शब्द व शब्दार्थ :

- **हक्कलाजिमे :** हक्क म्हणजे वतनदारास हक्काने मिळणारी बाब व लाजिमे म्हणजे वतनदारास ऐच्छिक स्वरूपात मिळणाऱ्या बाबी
- **पांढरी आई :** ज्या ठिकाणी गावातील लोक वस्ती करून राहत त्यास पांढरी किंवा पांढरी आई असे म्हटले जात असे.
- **काळी आई :** ज्या शेतजमिनीवर गावची गुजराण चाले त्या जमिनीस काळी आई असे म्हटले जाई.
- **बुद्रक :** एखाद्या खेड्याच्या शेजारी अधिक वस्ती झाल्यास मुळ खेड्यास बुद्रक तर नवीन गावास खुर्द असे म्हणत.
- **गोतसभा:** मराठी न्याय पध्दतीतील पायाभूत संस्था

- **देशकसभा अथवा धर्मसभा:** परगण्याच्या ठिकाणी, सुभ्याच्या ठिकाणी अथवा महत्वाच्या किल्ल्याच्या ठिकाणी भरलेल्या गातसभेस देशकसभा अथवा धर्मसभा असेही कागदपत्रात म्हटलेले आढळते.
- **महजर :** गोतसभेचा लेखी निर्णय.
- **गला :** शेतकऱ्याकडून पाटील किंवा तत्सम अधिकाऱ्यास धान्य तसेच काही वस्तू मिळत असत. त्याला गला असे म्हणत असत.
- **घुगरी :** शेतात पिकणाऱ्या धान्याचा काही भाग.
- **वादी किंवा अग्रवादी :** जो तक्रार दाखल करीत असे त्याला वादी किंवा अग्रवादी असे म्हणत.
- **प्रतिवादी किंवा पश्चिमवादी :** ज्याच्या विरूध्द तक्रार केली जाई त्याला प्रतिवादी किंवा पश्चिमवादी असे म्हणत.
- **होन :** सोन्यापासून बनवलेले शिवकालीन नाणे.

## २.५. स्वयं अध्ययन प्रश्नांची उत्तरे

स्वयं अध्ययनासाठी प्रश्न : १ ची उत्तरे

अ) एका वाक्यात उत्तरे द्या.

१) अर्थशास्त्र २) शुक्राचार्य ३) अमात्य ४) पंडितराव व न्यायाधीश

५) मोरोपंत पिंगळे

ब) रिकाम्या जागी योग्य शब्द भरा.

१) इ.स. १६४० २) १५,००० ३) सुमंत ४) रोख ५) सेनापती

**स्वयं अध्ययनासाठी प्रश्न : २उत्तरे**

अ) एका वाक्यात उत्तरे द्या.

१) वादी किंवा अग्रवादी २) कुलकर्णी ३) तीन ४) तराजू ५) व्यवहारमुख

ब) रिकाम्या जागी योग्य उत्तरे लिहा.

१) शेटे २) तराजू ३) यातिनिर्णय ४) मिताक्षरा ५) पाटील

**स्वयं अध्ययनासाठी प्रश्न : ३ उत्तरे**

अ) एका वाक्यात उत्तरे द्या.

१) ग्रामगोपक २) गावामधून गोळा होणाऱ्या महसुलाचा ठरावीक हिस्सा पाटलास मिळत असे त्यास खुर्दा असे म्हणतात. ३) कुलकर्णी जर निपुत्रीक मृत्यु पावला तर त्याचे वतन दुसऱ्या कार्यक्षम

व्यक्तीला विकले जाई. या विक्रीच्या व्यवहारास शेरणी असे म्हणले जाई. ४) ‘बलुतेदार व आलुतेदार ५) महाजन

ब) रिकाम्या जागी योग्य शब्द भरा.

१) काळी आई  २) बुद्रुक  ३) कुलकर्णी  ४) शेटे  ५) नांगर

## २.६ सरावासाठी स्वाध्याय

अ) दीघोत्तरी प्रश्न

१. छत्रपती शिवाजी महाराजांच्या अष्टप्रधान मंडळाचा सविस्तर आढावा घ्या.

२. अष्टप्रधान मंडळाची रचना स्पष्ट करुन त्याची वैशिष्टय सांगा.

३. गोतसभेची रचना आणि वैशिष्टय स्पष्ट करा.

४. शिवकालीन पाटलाचे हक्क व कामे स्पष्ट करा.

५. शिवकालीन गावगाड्यातील प्रमुख वतनदार व त्यांची कार्ये सांगा.

ब) टीपा लिहा.

१. अष्टप्रधानमंडळ

२. गोतसभा

३. पाटील

४. कुलकर्णी

५. चौगुला

## २.७. संदर्भ ग्रंथ व अधिक वाचनासाठी पुस्तके

१. कुलकर्णी, (डॉ.) अ. रा., शिवकालीन महाराष्ट्र, राजहंस प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती, १५ ऑगस्ट, १९९३

२. कुलकर्णी, (डॉ.) अ. रा. (संपा), आज्ञापत्र, डायमंड पब्लिकेशन, पुणे, २००७

३. कुलकर्णी, (डॉ.) अ. रा., अशी होती शिवशाही, राजहंस प्रकाशन, पुणे, २००९

४. कुलकर्णी, (डॉ.) अ. रा., ग. ह. खरे, मराठ्यांचा इतिहास, खंड १, २, ३, महाराष्ट्र विद्यापीठ ग्रंथनिर्मितीमंडळासाठी, कॉन्टिनेटल प्रकाशन, पुणे

५. कुलकर्णी, (डॉ.) अ. रा., देशपांडे प्र. न., मराठ्यांचा इतिहास (भाग १), स्नेहवर्धन पब्लिसिंग हाऊस, पुणे, नोव्हेंबर १९५५

६. कुलकर्णी, (डॉ.) मधुकर रा., पेशवाईतील न्यायदान, मानसन्मान प्रकाशन, पुणे, १९९८

७. कोलारकर, (डॉ.) श. गो., मराठ्यांचा इतिहास, श्री मंगेश प्रकाशन, नागपूर, तिसरी आवृत्ती १९९२
८. अत्रे, त्र्यंबक नारायण, गावगाडा, मोटे प्रकाशन, मुंबई, तिसरी आवृत्ती, १९५९
९. आठल्ये, (डॉ.) विभा, मराठ्यांचा इतिहास, अंशुल पब्लिकेशन्स, नागपूर, २००६
१०. आचार्य धनंजय, मराठी सत्तेचा उदय, श्री साईनाथ प्रकाशन, नागपूर, जानेवारी २००७
११. बिरादार, टी. के., मराठ्यांचा इतिहास, विद्याभारती प्रकाशन, लातूर, २०००
१२. गाठाळ, (डॉ.) एस. एस., मराठ्यांचा इतिहास (१६३०-१८१८), कैलास पब्लिकेशन्स, औरंगाबाद, २०१०
१३. महाजन, टी. टी., शिवछत्रपतींची न्यायनीती, शुभदा- सारस्वत प्रकाशन, पुणे, १९९९
१४. शिवदे, (डॉ.) सदाशिव, मराठ्यांची प्रशासकीय व्यवस्था (डॉ. सुरेंद्रनाथ सेन यांच्या - Administrative System of Marathas या ग्रंथाचा अनुवाद) स्नेहल प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती, २६ जानेवारी २०१५
१५. गायकवाड, आर. डी आणि इतर, मराठेकालीन संस्था व विचार, फडके बुक सेलर्स, कोल्हापूर १९८२
१६. सावंत, बी. एस., व्ही. के. जाधव, मराठ्यांचा प्रशासकीय, सामाजिक आणि आर्थिक इतिहास, विद्या प्रकाशन, नागपूर, प्रथमावृत्ती, १९९७
१७. भावे, वा. कृ., शिवकालीन महाराष्ट्र, वरदा प्रकाशन, पुणे, १९९८
१८. भावे, वा. कृ., पेशवेकालीन महाराष्ट्र, वरदा प्रकाशन, पुणे, दुसरी आवृत्ती, १९९८
१९. भट, बी. व्ही., शिवाजीची राजनिती, राजवाडे संशोधन मंडळ, धुळे, १९४१
२०. Gordon Stewart, The Marathas (1600-1818), Cambridge University Press, New Delhi, 1993
२१. Gune, V. T., Judicial System of the Marathas, Deccan College, Pune, 1953
२२. Sen, S. N., dministrative System of the Marathas, K.P. Bagchi, Calcutta, 1976
२३. Sarkar, Jadunath, Shivaji and his times, Orient Longaman Limited, Mumbai, Reprint 1997
२४. Sardesai, H.S., Shivaji The Great Maratha, Vol.3, Cosmo Publications, New Delhi, 2002
२५. Desai, Sudha V., Social life in Maharashtra under the peshwas, Popular Prakashan, Bombay, 1980

❑❑❑

## सत्र २ : घटक ३

## समाज (Society)

**अनुक्रमणिका**

३.० उद्दिष्टे

३.१ प्रास्तावना

३.२ विषय विवेचन

　३.२.१ जातीव्यवस्था

　३.२.२ स्त्रियांची परिस्थिती

　३.२.३ गुलामगिरी

३.३ पारिभाषिक शब्द व शब्दार्थ

३.४ स्वयं अध्ययनासाठी प्रश्नांची उत्तरे

३.५ सारांश

३.६ सरावासाठी स्वाध्याय

३.७ अधिक वाचनासाठी पुस्तके

## ३.० उद्दिष्टे

या घटकाच्या अभ्यासानंतर खालील गोष्टींचे आकलन होईल.

१) मराठेकालीन सामाजिक जीवन समजून येईल.

२) मराठेकालीन जातीव्यवस्था कशी होती यांची माहिती मिळेल.

३) मराठाकालीन स्त्रियांची स्थिती व दर्जा याची माहिती समजेल.

४) मराठाकालीन गुलामगिरी व वेठबिगारी याची माहिती सांगता येईल.

## ३.१ प्रस्तावना

शिवजन्मापूर्वी महाराष्ट्रामध्ये सामाजिक व धार्मिक स्थितीत अनेक स्थित्यंतरे चालू होती. शिवाजी महाराजांनी हिंदवी स्वराज्याची स्थापना केली. हिंदवी स्वराज्याच्या स्थापनेमुळे पूर्वी चालू असणारी सामाजिक अस्थिरता काही अंशी कमी होण्यास मदत झाली. जून १६७४ मध्ये छत्रपती शिवाजी महाराजांनी स्वतःचा राज्याभिषेक करून घेतला. स्वतंत्र सार्वभौम राज्य अस्तित्वात आले. एका बाजूला राजकीय स्थिरता लाभली तर दुसऱ्या बाजूला सामाजिक व सांस्कृतिक स्थिरता लाभण्यास सुरुवात झाली. शिवकाळात जीवित व वित्ताच्या संरक्षणाची हमी मिळाली. त्याचा दृश्य परिणाम हिंदू धर्म, संस्कृती, रूढी व परंपरा यांचे पुर्नज्जीवन होण्यास मदत झाली.

शिवकाळात प्रचलित असलेली समाजव्यवस्था ही यादवकालीन समाज व्यवस्थेप्रमाणे होती. समाजात पूर्वीपासून आस्तित्वात असणाऱ्या अनेक रूढी परंपरा काळाच्या ओघात मागे पडल्या. वर्णव्यवस्था मागे पडून जातीव्यवस्था रूढ झाली होती. स्मृतिकाळात विविध बंधने येऊन जाती व्यवस्था अधिकच क्लिष्ट व ताठर बनली. जातीची व उपजातींची निर्मिती होण्यास सुरुवात झाली होती. शिवकालीन प्रशासन व्यवस्थेमध्ये गावास अनन्यसाधारण महत्त्व होते. गाव स्वयंपूर्ण होते व यामध्ये जातींना अनन्यसाधारण महत्त्व होते. महाराष्ट्रातील सर्व सामाजिक घटकांना निश्चित कामे व अधिकार कर्तव्य वाटून दिली गेल्यामुळे गावगाडा चालण्यास मदत झाली. स्त्रियांची स्थिती, अस्पृश्यता, वेठबिगारी अशा विविध प्रथांना विविध धार्मिक ग्रंथ व स्मृती वाङ्मयाचा आधार असल्यामुळे परिस्थिती अधिकच क्लिष्ट बनल्याचे दिसते.

सदर घटकामध्ये मराठेकलीन सामाजिक जीवन, स्त्रियांचे समाजातील स्थान, गुलामगिरी व वेठबिगारी इत्यादी घटकांचा अभ्यास करणार आहोत. राजकारणामध्ये शासक व शाशीत असे दोन प्रमुख गट पहावयास मिळतात. त्याचप्रमाणे सामाजिक परिस्थितीचा अभ्यास करत असताना समाजाच्या भिन्न घटकांचे परस्परांशी संबंध कसे आहेत हे पाहणे गरजेचे असते. त्यामध्ये असणारे भेदाभेद कोणत्या घटकांवर अवलंबून आहेत हे तपासून पहावयास हवे. महाराष्ट्रातील सामाजिक परिस्थितीचा अभ्यास करत असताना व्यक्ती व समाजाचे संबंध, विवाह संस्था, स्त्री-पुरुष संबंध, जातीव्यवस्था, वर्णव्यवस्था, अस्पृश्यता यांचा अभ्यास करणे गरजेचे आहे, त्याचप्रमाणे धर्म व समाज हे एकाच नाण्याच्या दोन बाजू असल्याचे दिसते. सामाजिक परिस्थितीची निर्मिती होत असताना धर्म महत्त्वाची भूमिका बजावत असतो हे प्रामुख्याने लक्षात घेतले पाहिजे. एकंदरीत सामाजिक स्थिती नियंत्रित करण्यात धर्माचा मोठा हात असतो. महाराष्ट्रात व महाराष्ट्राच्या समाज व्यवस्थेमध्ये अनेक जाती उपजाती पहावयास मिळतात. शिवकाळात ही त्यांच्यातील भेदाभेदाचे निवारण होणे अशक्य होते. पूर्वीपासून चालत आलेली परिस्थिती शिवकाळात चालूच होती. मात्र या काळामध्ये थोडाबहुत फरक पडत चालला होता. वंश, कुल, व्यवसाय, खानपान, विवाह यामुळे जाती उपजातींची निर्मिती झाली. त्यातून समाजाचे तुकड्या तुकड्यात विभाजन होण्यास सुरुवात झाली. शिवकाळापर्यंत अशा विविध जाती व उपजातीनी मिळून बनलेला समाज पहाण्यास मिळतो. भारतात चातुर्वर्ण्य पद्धत अस्तित्वात

आल्यानंतर समाजाची विभागणी चार वर्गात झाली. ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य, शूद्र हे चार वर्ण व त्यातून जातींचा उदय झाल्याचे दिसते.

छत्रपती शिवाजी महाराजांना लाभलेल्या पन्नास वर्षांच्या आयुष्याचा विचार करता बराचसा काळ हा राजकीय संघर्ष करण्यात गेल्याचा दिसून येतो. उरलेला थोडा काळ त्यांना प्रशासकीय व सामाजिक स्थिती सुधारण्यासाठी मिळाला. प्रशासन व राजकीय घटक यामध्ये सहजासहजी बदल करणे शक्य नसते. मात्र सामाजिक परिवर्तन ही निरंतर चालणारी प्रक्रिया असून त्यामध्ये अनेक घटकांचा सहभाग होतो. अशा सामाजिक परिस्थितीचे दृश्य परिणाम लगेच दिसून येत नाहीत. असे परिणाम दिसून येण्यास खूप कालावधी जातो. छत्रपती शिवाजी महाराजांच्या काळात सामाजिक परिस्थिती ही शिवपूर्वकालीन परिस्थितीपेक्षा खूपच भिन्न नव्हती. मात्र त्यांच्या काळात सामाजिक बदलास सुरुवात होण्यास सुरुवात झाली होती.

छत्रपती शिवाजी महाराजांनी विविध सामाजिक घटकांना एक समान ध्येय व उदात्त हेतूसाठी एकत्र आणून कार्य सिद्धीस नेले. प्रशासनाच्या कार्यात विविध जातीमधील घटकांना त्यांच्या कर्तुत्वावर गुणाच्या आधारे संधी देऊन सहभागी करून घेतले. उदाहरण म्हणून पाहिल्यास किल्लयाच्या प्रशासनामध्ये मराठा, कायस्थ, ब्राह्मण प्रभू शेणवी या विविध जातीतील लोकांना सहभागी करून घेतले. याचाच अर्थ सत्ता संतुलन व्हावा म्हणून त्यांचा वापर न करता त्यांच्यामधील जातीय संबंध सुधारण्यासाठी केल्याचे दिसते. एक क्रांतिकारक पाऊल म्हणून बघितले पाहिजे. राष्ट्रीय ध्येय साध्य करण्यासाठी त्यांना एकत्र आणण्याचा जातिव्यवस्थेचे उच्चाटण करण्यासाठी केला गेलेला हा प्रयत्न होता. निश्चितच कौतुकास्पद होते. मात्र नंतरच्या काळात ही प्रथा बंद झाल्याने सामाजिक जातीभेदाचा प्रश्न मराठा काळाच्या शेवटीपर्यंत कायम राहिल्याचे दिसून येते.

## ३.२ विषय विवेचन

### ३.२.१ जाती व्यवस्था

'जात' हा शब्द प्रथम पोर्तुगीजांनी त्यांच्या युरोपीय समाजात वारसा वर्ग स्थितीचे वर्णन करण्यासाठी प्रथम वापरला होता. 'Caste' हा शब्द पोर्तुगीज शब्द 'Castas' या शब्दातून निर्माण झाला असून पुढे लॅटिन भाषेत 'casts' वरून इंग्रजी भाषेत caste व भारतात जात या नावाने तो रूढ झाला. साधारणपणे युरोपमध्ये कास्ट म्हणजे वेगळा कप्पा बंद या अर्थाने हा शब्द रूढ होता. जॉर्जेस डायसिल यांच्या मते जात मुख्यता तीन गटांमध्ये विभागणी केली गेली आहे. धार्मिक कृतीने विभागली गेलेले, योद्धांची जात व विविध कार्ये करणारी जात. मात्र भारतीय समाजाचा विचार करत असताना यामध्ये थोडे बहुत वेगळेपण पहावयास मिळते. भारतीय समाजाची रचना चार स्थरिय असून यामध्ये ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य व शूद्र यांचा समावेश होतो. शिवकाळात व पेशवेकाळात चार वर्ण आस्तित्वात असल्याचे दिसून येतात. मात्र जाती व उपजाती यांची संख्या खूप मोठ्या प्रमाणात अस्तित्वात होती. जातीची निर्मिती होण्यास अनेक घटक व व्यवहार कारणीभूत आहेत. रक्तसंकर, गुण विशिष्ट कार्य, व्यवसायनिविष्ठ कार्य, मिश्रविवाह, विवाह संकर, प्रतिलोम विवाह,

शस्त्र व शास्त्र व्यवहार यामुळे विविध जातींची निर्मिती झाली. सुरुवातीच्या काळात जातीव्यवस्था एकदम ताठर नसल्याचे दिसते. उत्तर वैदिक काळात हळूहळू जातव्यवस्था मजबूत होण्यास सुरुवात झाली. यास धर्मशास्त्रीय साहित्य, स्मृती वाङ्मय सामाजिक व मानवी व्यवहाराचे नियमन करणारी मनुस्मृति यांनी यास अधिक गती दिली. पुढील काळात जाती विघटनास सुरुवात होऊन जातींचे उपजातीत रूपांतर झाले. त्यामुळे सामाजिक स्थिती अधिक शोचनीय झाल्याचे आपणास दिसून येते.

मुस्लिम कालखंडामध्ये धर्मप्रचार व धर्मावरील आक्रमण मोठ्या प्रमाणात वाढले. त्यामुळे हिंदूधर्म टिकवण्यासाठी जातीव्यवसथ्येस पाठिंबा देण्याचे धोरण हिंदू सत्ताधिशानी बाळगल्याचे आपणास दिसून येते. मात्र शिवाजी महाराजांनी या अठरापगड जातीमधील लोकांना बरोबर घेऊन स्वराज्य निर्मिती केली. त्यात त्यांना यश आले या काळात राजकीय यशाबरोबर सामाजिक परिस्थिती सुधारण्यासाठी काही प्रयत्न झाले. प्रशासनामध्ये गुणकर्म व कर्तुत्वाचा विचार करून विविध जाती धर्माच्या लोकांना सामावून घेतले. त्याद्वारे समाजातील जातीय संबंध सुधारण्याचा केला गेलेला हा पहिला प्रयत्न होता असे म्हणता येईल.

**अ) वर्ण व्यवस्था**

**१) ब्राह्मण :**

चार वर्णाची निर्मिती ही ब्रम्हाच्या शरीरापासून झाली आहे असा समज धर्मशास्त्रानुसार प्रचलित असल्याचे अपणास दिसते. मुखापासून ब्राह्मण, बाहूपासून क्षत्रिय, मांड्यापासून वैश्य व पायापासून शुद्राची निर्मिती झाल्याचे उल्लेख प्राचीन धर्मग्रंथांमध्ये पहावयास मिळतात. चातुर्वर्ण्य पद्धतीमध्ये ब्राह्मण वर्णाला अनन्य साधारण महत्त्व प्राप्त झाले होते. अध्ययन व अध्यापन त्यांना प्रामुख्याचे कार्य करावे लागत असे. ब्राह्मणास शिक्षा केल्यास पाप होते हा समज समाजात रूढ होता. ब्राह्मणाच्या समाजामध्ये कोणतीही जाती उपजाती नव्हती. मात्र नंतरच्या काळात प्रदेशानुसार त्यांच्यात वेगवेगळ्या जाती व वर्ग निर्माण झाल्याचे आपणास दिसून येते. उदाहरणार्थ देशस्थ, कोकणस्थ, वऱ्हाडस्थ इत्यादी.

शिवकालीन समाज व्यवस्थेस तो आपले महत्व टिकून होता तर पेशवेकळात त्यांना अधिक महत्त्व व सामाजिक अधिकार प्राप्त झाले होते. लिहिता वाचता येत असनारा हा वर्ग असल्यामुळे त्यांना जमा खर्च, लिहिण्यासंबंधीचे कार्य, धर्मशास्त्र व न्यायक्षेत्र इत्यादी कार्यात त्यांचा सहभाग अनिवार्य होता. त्यामुळे सामाजिक महत्त्वाप्रमाणे त्याचे राजकीय महत्त्व सुद्धा वाढीस लागले होते. एकंदरीत समाज व्यवस्थेमध्ये त्यांचे महत्त्व अधिक होते.

**२) क्षत्रिय :**

प्राचीन काळापासून गोधनाचे व समाजाचे संरक्षण करणारा वर्ग म्हणून त्यांच्याकडे पाहिले जात होते. काळाच्या ओघांमध्ये राजकीय सत्ता त्यांच्या ताब्यात आल्यामुळे समाज व्यवस्थेमध्ये त्यांचे महत्त्व टिकवून होता. असे असले तरी समाज व्यवस्थेमध्ये ब्राह्मण वर्गाच्या खालोखाल त्यांना स्थान होते. मध्ययुगामध्ये

धर्मसत्तेपेक्षा राजसत्ता श्रेष्ठ आहे हा समज रूढ झाल्यामुळे या वर्गास राजकीयदृष्ट्या अनन्य साधारण महत्व झाले. शिवकाळात सतत होणारी युद्धे व परकीयापासून जनतेचे करावे लागणारे संरक्षण, जनतेच्या जीविताचे व वित्ताचे संरक्षण करण्याची जबाबदारी या वर्गावर असल्यामुळे शिवकाळ व पेशवे काळामध्ये या वर्गाला समाजात मानाचे स्थान प्राप्त झालेले दिसते.

**३) वैश्य :**

वर्णव्यस्थेमध्ये तिसरा वर्ण हा प्रामुख्याने अर्थव्यवस्थेशी संबंधित होता. प्राचीन काळात व्यापार करणारा 'वनी' नावाचा वर्ग अस्तित्वात होता. राज्याचा आर्थिक भार प्रामुख्याने या वर्गावर होता. त्याचप्रमाणे या वर्गास राज्यव्यवस्थेकडून अनेक सोयी सवलती प्रदान केल्या जात होत्या. द्वितीय नागरिकरणानंतर व्यापार वाढल्यामुळे समाज व्यवस्थेमध्ये यांना मानाचे स्थान मिळवण्यास सुरुवात झाली. विविध प्रकारचे व्यवसाय करणाऱ्या लोकांचा भरणा यामध्ये होता. त्यामुळे पुढील काळात अनेक जातींची निर्मिती याच वर्गातून झाल्याचे दिसते. शिवकाळात हा वर्ग आपले महत्त्व टिकूवून असल्याचे दिसते. राज्याच्या एकूण महसुल उत्पादनामध्ये त्यांचा वाटा लक्षणीय होता. छत्रपती शिवाजी महाराजांनी व्यापार वाढीस दिलेल्या प्रोत्सहनामुळे त्यांचे सामाजिक, आर्थिक महत्त्व वाढण्यास मदत झाल्याचे दिसते.

**४) शूद्र :**

प्राचीन काळापासून शूद्र वर्गास कोणतेही खास अधिकार नसल्यामुळे शूद्रांच्या स्थितीमध्ये लक्षनीय आधोगती झाल्याचे दिसते. उत्तर वैदिक काळामध्ये सूत्र वाङ्मय व स्मृती काळामध्ये शूद्रांची स्थिती खूप शोचनीय बनली. मराठा काळापर्यंत त्यांच्या परिस्थितीमध्ये मुलगामी बदल जाणवत नाहीत. छत्रपती शिवाजी महाराजांच्या काळात काही अंशी सामाजिक बदलास सुरुवात झाली होती. वर्णाऐवजी गुणाधिष्ठित कार्यपद्धतीचा छत्रपती शिवाजी महाराजांनी अवलंब केल्यामुळे विविध जातीच्या लोकांना स्वराज्यात सामावून घेत त्यांच्यामध्ये आपलेपणाची जाणीव जागृत केली व विविध जाती धर्माच्या लोकांना प्रशासनामध्ये, ग्रामव्यवस्थेमध्ये, सैन्य, महसूल, राज्यकारभाराबरोबर बलुतेदारी पद्धतीमध्ये सहभागी करून घेतले. काही अंशी परंपरागत चालत आलेल्या समाजव्यवस्थेला शह देण्याचा त्यांनी प्रयत्न केला. छत्रपती संभाजी महाराज, छत्रपती राजाराम महाराज, महाराणी ताराबाई यांच्या काळात मुघलाच्याबरोबरचा संघर्ष अधिक तीव्र झाल्यामुळे सामाजिक सुधारणाप्रती त्यांना कमी वेळ मिळाला. सन १७२० नंतर मात्र सामाजिक परिस्थितीमध्ये प्रतिगामीस्वरूपाचे बदल होण्यास सुरुवात झाली. या काळात ब्राह्मणी वर्चस्व वाढून इतर जातींना गौण स्थान निर्माण होण्यास सुरुवात झाली. त्यात शूद्रांची स्थिती अधिक सोचनीय झाल्याचे दिसते.

**ब) जात व्यवस्था:**

कोणतीही व्यवस्था निर्माण होत असताना वाद-प्रतिवाद-संवाद या तीन टप्प्यातून होत असते. आर्यांच्या आगमनानंतर मूलनिवासी लोक अनार्य व द्रविड यांच्याशी त्यांचा झालेला संघर्ष, मूळच्या लोकांनी

केलेला विरोध व नंतरच्या काळामध्ये या दोघांमध्ये झालेल्या समन्वयातून आजची सामाजिक रचना उदयास आल्याची दिसते. वर्ण व जाती या प्राचीन संकल्पना असून त्यामध्ये जातींची निर्मिती झाली असा समज प्रचलीत आहे. सुरुवातीच्या काळामध्ये वर्णवस्था व जातीव्यवस्था जास्त ताठर नव्हती. मात्र उत्तर वैदिककाळ व स्मृतीकालखंडामध्ये अधिक ताठरता निर्माण झाली. मनुस्मृतीसारख्या मानवाचे आचार व विचार नियमन करणाऱ्या ग्रंथामुळे परिस्थिती अधिकच गंभीर बनली. इतर अनेक कारणामुळे चार वर्ण असले तरी असंख्य जाती व उपजातीची निर्मिती झाल्याचे दिसते. मध्ययुगीन कालखंडात इस्लामचा प्रभाव वाढल्यामुळे हिंदूधर्मासमोर मोठी संकटे उभी राहिली. धर्मांतराचे प्रमाण वाढले. त्यामुळे हिंदूधर्म टिकवणे, वाढवणे यासाठी तत्कालीन सत्ताधिशांना अनेक पर्यायांचा विचार करावा लागला.

शिवाजी महाराजांनी आपल्या कालखंडात शिवछत्रपतींच्या काळात गुणावर आधिरीत शासन पद्धतीचा अवलंब केल्यामुळे अनेक जाती धर्माच्या लोकांना गुणकर्मानुसार प्रशासनामध्ये, राज्यकारभारामध्ये स्थान मिळाले असे असले तरी सामाजिक क्षेत्रामध्ये फार मोठे बदल झाल्याचे पहावयास मिळत नाही. विविध जाती, उपजाती, जातीसंकेत, रूढी, परंपरा ह्या प्रत्येक जात पाळत असल्यामुळे त्यांचा त्यांनी आपापल्या जातीचे महत्त्व वाढण्यास प्रयत्न केल्याचे दिसून येते. त्यामुळे एकसंघ समाजाची निर्मिती होण्याऐवजी जाती-जातीमध्ये संघर्ष निर्माण झाल्याचे पहावयास मिळते. या काळात ब्राह्मण स्वतःला श्रेष्ठ समजत नव्हता, तर इतर जातीचे लोक सुद्धा स्वतःला श्रेष्ठ समजू लागले होते. यामुळे रोटीबेटी व्यवहारावर अनेक बंधने पडली. त्यामुळे जातीव्यवस्थेमध्ये अमुलाग्र बदल होणे एवढे सहजासहजी शक्य नव्हते. मात्र काही अंशी शिवकाळामध्ये सामाजिक सलोखा निर्माण होण्यास मदत झाली. शिवकालीन गावगडाच्या स्थितीवरून जातीची रचना समजण्यास मदत होते. उत्तर भारताप्रमाणे मराठा कालखंडामध्ये जातव्यवस्था असंख्य जाती, उपजाती यांची विभागणी झाल्याचे दिसते. जातीव्यवस्था ही लोक त्यांचे निवासस्थान, त्यांचे पंथ, गोत्र यावर अवलंबून होते.

**१) ब्राह्मण:**

ब्रह्माच्या मुखापासून ब्राह्मणांचा उदय झाला असा उल्लेख पुराणांच्यामध्ये मिळतो. अध्ययन व अध्यापन हे त्याचे प्रमुख काम होते. मात्र काळाच्या ओघांमध्ये या जातीच्या लोकांनी अनेक व्यवसाय केल्याचे दिसून येते. व्यापार, शेती, शास्त्र व शस्त्र, राजकारण, धर्म इत्यादी सर्व क्षेत्रांमध्ये त्यांचा वावर होता. त्यामुळे वेगवेगळ्या कालखंडामध्ये राजकीय स्थिती कोणतीही असली तरी सामाजिक स्थितीमध्ये ब्राह्मणांचे अनन्यसाधारण स्थान कायम राहिल्याचे दिसते. लिहिने व वाचण्याच्या कार्यामध्ये ब्राह्मण तज्ञ असल्यामुळे शिवकाळामध्ये प्रशासनाचे विविध भागात त्यांना काम मिळणे सहज शक्य झाले. शासकीय पत्रव्यवहार, महसुलाच्या नोंदी, दप्तरखाना इत्यादी विभागांमध्ये ते कार्य करत असल्यामुळे त्यांची प्रगती झाली. प्रत्येक गावात ब्राह्मणांची वस्ती असल्याचे दिसते. गावातील पाटलांना मदत करणारा कुलकर्णी नावाचा अधिकारी हा ब्राह्मण जातीतील होता. शिवकाळामध्ये विविध धार्मिक विधी केले जात होते. त्यामध्ये ब्राह्मणाचा

समावेश होता. देवालयातील पूजाअर्चा, भविष्य पाहणे, विविध धार्मिक कार्यामध्ये सहभागी होणे, कीर्तन करणे यामुळे त्यांना सामाजिक प्रतिष्ठा आपोआप निर्माण झाली.

काही प्रसंगी प्रभू आणि ब्राह्मण जातीमध्ये संघर्ष निर्माण झाल्याचे उल्लेख आपणास पहावयास मिळतात. याचे मुख्य कारण प्रभू जातीतील लोकांचा राजकीय क्षेत्रामध्ये झालेला प्रवेश होय. यामुळे ब्राह्मण जातीच्या सामाजिक स्थानाला धक्का निर्माण होण्यास सुरुवात झाली. पेशवे काळामध्ये मात्र ब्राह्मण जातीच्या लोकाना सामाजिक, आर्थिक, राजकीयदृष्ट्या अधिक महत्त्व प्राप्त झाले. त्याचप्रमाणे ब्राह्मण-ब्राह्मण यांच्यामध्येही संघर्ष ही अनेक वेळा निर्माण झाल्याचे आपणास तत्कालीन पत्र व्यवहारावरून पहावयास मिळते. कोकणस्थ-ऋग्वेदी-यजुर्वेदी, देशस्थ-कराडस्थ, देशस्थ या ब्राह्मण जातीमध्ये अनेक वेळा संघर्ष निर्माण झाल्याचे दिसून येते. राजकीय धार्मिक महत्त्व प्राप्त करण्याच्या भूमिकेतून हे संघर्ष निर्माण झाल्याचे दिसते. पेशव्यांच्या दरबारामध्ये जेवणाच्या पंगतीवरून, त्याचप्रमाणे नारायणराव पेशवे यांच्या काळात कोकणस्थ लोकांकडून व्रतवैकल्य काढून घेण्याच्या घेतलेल्या निर्णयावरून ब्राह्मण-ब्राह्मण जातीमध्ये असलेले संघर्ष आपणास पहावयास मिळतात. शिवकाळापेक्षा पेशवेकाळामध्ये जात अधिक बळकट झाली. ब्राह्मण सोडून इतर जातीतील लोकांवर अनेक निर्बंध येण्यास सुरुवात झाली. त्यामुळे ब्राह्मण-ब्राह्मणेत्तर यांच्यामधील संघर्ष वाढण्यास सुरुवात झाली. अगदी मराठेशाहीच्या ऱ्हासापर्यंत या समाजाचे महत्त्व अधिक राहिल्याचे दिसून येते.

**२) मराठा:**

मराठा हा जात विषयक शब्द नसून भाषा वचक शब्द असल्याचे अनेक इतिहासकार आपले मत प्रतिपादित करतात. मराठा शब्द महाराष्ट्र या शब्दापासून तयार झालेला आहे. हे महाराष्ट्रातील पराक्रमी लोक असून त्यांचा 'राष्ट्रीक' असा उल्लेख केला जाऊ लागला. महाराष्ट्रात राज्य करणारे अनेक सत्ता सातवाहन, वाकटक, चालुक्य, शिलाहार, यादव यानंतरचे मराठा हे याच जातीतले असावेत असे इतिहासकार म्हणतात. शिवकालीन समाजव्यवस्थेत मराठा जातीस महत्त्वाचे स्थान प्राप्त झालेले दिसते. शिवपूर्वकाळात व शिवोत्तरकाळामध्ये मराठा जात ही प्रामुख्याने क्षत्रिय जात म्हणून उल्लेख केल्याचे दिसते. शिवाजी महाराजांच्या राज्याभिषेकानंतर राज्य करणारे म्हणून मराठ्याकडे पाहिले जाऊ लागले होते. मराठा जरी राज्यकर्ते असली तरी समाजव्यवस्थेमध्ये ब्राह्मणांच्या खालोखाल त्यांना मान होता. मराठा कालखंडामध्ये मराठा जातीमधील लोक राजकारण व लष्कर व्यवस्थेमध्ये प्रभावीपणे कार्य करत असल्याचे दिसतात. त्यामुळे पाटील, देशमुख, किल्ल्यावरील अधिकारी किंवा शिवकालीन प्रशासनामध्ये अनेक मराठा जातीतील लोकांना स्थान मिळालेले होते. त्यामुळे त्यांची सामाजिक प्रतिष्ठा वाढण्यास मदत झाली.

**३) बलुतेदार/अलुतेदार पद्धतीमधील जाती व्यवस्था**

१) शिवकालीन जाती व्यवस्थेचे खरे रूप समजून घ्यायचे असेल तर बलुतेदारी व अलुतेदारी पद्धतीमध्ये प्रामुख्याने पहावयास मिळते. बलुतेदारी शब्द हा बलुता शब्दापासून तयार झाला असून याचा अर्थ

कामाच्या मोबदल्यात अथवा सेवेच्या मोबदल्यात दिला जाणारा धान्याच्या स्वरूपात दिला जाणारा मोबदला होय.

२) गावाच्या गरजेनुसार बलुतेदारांचे महत्त्व कमी जास्त होत असल्याचे दिसते. शिवकालीन समाज व्यवस्थेचे अभ्यासक व संशोधक डॉ. अ. रा. कुलकर्णी यांनी १२ बलुतेदार व १८ अलुतेदार यांचे गाव सेवक म्हणून तीन गटांमध्ये विभाजन केलेले आहे.

अ) कारागीर वर्ग : सुतार, लोहार, चांभार, कुंभार, न्हावी (नाभिक), शिंपी.

ब) सेवक वर्ग : महार, मांग, कोळी, तराळ, रामोशी, तेली.

क) धार्मिक विधी करणारा वर्ग : जोशी, गुरव, ठाकूर, जंगम, गोंधळी.

**१) सुतार :**

१२ बलुतेदारमधील एक प्रमुख जात म्हणून त्यांना ओळखले जाते. त्यांचा संबंध लाकूड व्यवसाय व त्याचे संबंधित उत्पादनाशी प्रामुख्याने येतो. या जातीमधील लोक विश्वकर्मा यास आपला इष्ट देव मानतात. प्राचीन काळापासून ते लाकडाच्या वस्तू तयार करणे, रथाची बैलगाड्यांची निर्मिती करणे, शेतीची अवजारे तयार करणे इत्यादी कामे करत होता. मराठा कलखंडामध्ये विशेषता शेतीशी निगडित शेतकऱ्यांना लागणाऱ्या अवजारांची निर्मिती त्यांना करावी लागत असे. त्याचप्रमाणे व्यापारासाठी लागणारी वाहतुकीच्या साधनांची निर्मिती करणे, शेतीची अवजारे, राज प्रसादाचे काम, सार्वजनिक इमारतींमध्ये आवश्यक असणारी लाकूड काम इत्यादी कामे त्यांना करावी लागत असे. त्यांच्या कामाच्या मोबदल्यामध्ये त्यांना गावकरी, व्यापारी व राज्यप्रशासनाकडून कामाचा योग्य तो मोबदला दिला जाई.

**२) लोहार :**

लोखंड कामाशी संबंधित असणारा हा वर्ग प्राचीन काळापासून अस्तित्व होता. लोखंडी अवजारे, शस्त्रे, शेतीशी उपयोगी अवजारे तयार करणे इत्यादी काम हा वर्ग करत असे. शिवकाळात लढाईसाठी लागणारी शस्त्रे, तलवारी, भाले इत्यादी कामे ते करत होते. त्याचप्रमाणे गावातील शेतकऱ्यांना लागणाऱ्या लोखंडी वस्तू, फास, लोखंडी नांगर तयार करून तो देत असे. त्याच्या सेवेच्या बदल्यात शेतकऱ्याकडून त्यास योग्य तो मोबदला दिला जाई.

**३) चांभार :**

चमार या शब्दाचा आपभ्रंश होऊन चांभार हा शब्द तयार झाला असावा. चांभार हा प्रामुख्याने चामड्यापासून वस्तू बनवणारा वर्ग म्हणून ओळखला जातो. चामड्यापासून जीवन उपयोगी वस्तू बनवण्याचे काम तो करत होता. चपला बूट, लगाम, मोट (पाणी वाहण्यासाठी) इत्यादी वस्तू, त्याचप्रमाणे शेतकऱ्यांना

लागणाऱ्या वस्तू, बैलाच्या गळ्यातील वाद्या, पट्टा तयार करण्याचे काम तो करत असे. काही प्रदेशात ते आपला मूळ व्यवसाय सोडून शेती, विणकाम करत असल्याचे उल्लेख आपणास दिसून येतात.

**४) कुंभार :**

प्राचीन कालखंडापासून ते मराठा कालखंडापर्यंत कुंभार वर्गाचे अस्तित्व प्रामुख्याने जाणवते. माती कामाशी संबंधित असणारा हा वर्ग भांडी, मातीची विविध खेळणी, वस्तू तयार करण्याचे काम करत असे. मराठा कालखंडाचा विचार करताना एक मोठा वर्ग मातीच्या व्यवसाया संबंधित असल्याचे दिसते. राजे, राजवाडे, जहागिरदार, जमीनदार सोडल्यास बाकीचे लोक मातीची भांडी मोठ्या प्रमाणात वापरत असत. धान्य साठवण्यासाठी, पाणी साठवण्यासाठी पासून ते दैनंदिन गरजेच्या अनेक वस्तू तयार करण्याचे काम हा वर्ग करत असे. कुंभार समाजामध्ये अनेक जाती उपजातीचे उल्लेख सापडतात. लिंगायत कुंभार, मराठा कुंभार, कोकणी कुंभार, गुजराती कुंभार अशा अनेक जातीमध्ये तो विभागला गेला होता. त्यांच्या जाती पोटजातीमध्ये रोटीबेटी व्यवहार होत नसे.

**५) न्हावी (नाभिक) :**

केस कर्तनाचे काम, दाढी, हजामत इत्यादी कार्ये त्यास करावी लागत. इतर व्यवसायिकाप्रमाणे त्यालाही त्याच्या सेवेचा योग्य मोबदला दिला जात असे.

**६) महार :**

महार लोकांचे काम बाहेरील लोकांपासून गावाचे संरक्षण करणे हे होते. प्रशासकीय दृष्टीकोणातून गावातील कायदा व सुव्यवस्था राखण्यामध्ये त्यांनी महत्त्वाची भूमिका बजावल्याचे अनेक उल्लेख पहावयास मिळतात. गावातील मरण पावलेली जनावरे बाहेर नेऊन टाकणे, संदेशवहन करणे. तराळ म्हणून त्यांना मान असल्याचे अनेक उल्लेख पहावयास मिळतात. स्वच्छता संदर्भातील कामे यांना करावी लागत असत. इतर अस्पृश्य घटकापेक्षा महारांचा समाजातील दर्जा वरचा होता. कारण ते प्रशासकीय कार्यामध्येही सहभागी होत होते. महाराष्ट्रातील मूळचे लोक म्हणून त्यांच्याकडे पाहिले जाते. काही प्रदेशांमध्ये त्यांचा काठी, भाला असा उल्लेख सापडतो. हे त्याच्या प्रशासकीय सहभागाचे दर्शन चिन्ह असावे असे इतिहासकार मानतात. या जातीतील लोकांच्या निष्ठा व शौर्यामुळे मराठा सैन्यामध्ये त्यांना सेवा करण्याची संधी दिली गेली होती. त्यांच्या कार्याच्या बदल्यात गावातील लोक रोख किंवा धान्याच्या बदल्यास मोबदला दिला जात असे. अनेक वेळा त्यांची सेवा लक्षात घेऊन त्यांना वतन दिल्याचेही आढळते.

महारांच्या बारा उपजाती असल्याचे उल्लेख पहावयास मिळतात. सोमवंशी, लाडवंशी, अंदवंशी, भवानी महार, गोडवंशी, सूर्यवंशी, कंटकवंशी, कोसरे इत्यादी उपजातीचे लोक आपणास आढळतात. महार लोक भेटल्यानंतर नमस्ते किंवा जोहर म्हणत असल्याचे उल्लेख मिळतात.

**७) मांग:**

मांग लोक दोरी, केरसुणी, दोरखंड, झाडू इत्यादी बनवण्याचे काम करत. त्याचप्रमाणे अंत्यसंस्कारांच्या वेळी स्मशान भूमीमध्ये हे लोक काम करत असल्याचे उल्लेख मिळतात.

**८) गुरव:**

गुरव हा समाज प्राचीन काळापासून भारतात अस्तित्वात होता. प्राचीन काळापासून धर्म हा मानवी जीवनाचा अविभाज्य भाग असल्याचे पहावयास मिळते. भारतात अनेक धर्म व देवता त्यांचे मंदिरे पहावयास मिळतात. या मंदिरामध्ये मंदिरांची देखभाल करणे, स्वच्छता करणे, मूर्तीची पूजा-अर्चा करणे, सण-उत्सव समारंभ साजरे करणे इत्यादी कामे त्यांना करावी लागत असे. त्यांना कामाच्या मोबदल्यात धान्याच्या किंवा रोख स्वरूपात मोबदला मिळत असे.

**९) जोशी :**

जोशी प्रामुख्याने ब्राह्मण जातीतील असून लोकांचे भविष्य सांगणे, पंचांग सांगणे, भविष्य वर्तवणे पूजा-अर्चना करणे, धार्मिक विधीच्या संदर्भात योग्य तो दिवस ठरवणे इत्यादी कामे करत असे.

अलुतेदार मधील इतर जाती

**१) सोनार :**

सोन्याची नाणी, त्याचा दर्जा तपासणे, अलंकार तयार करणे इत्यादी कामे या वर्गास करावी लागत असे. त्याचप्रमाणे चलन अदलाबदली हे काम हा वर्ग करत असल्यामुळे त्यांना व्यापारी वर्गामध्ये महत्त्वाचे स्थान होते. त्याचप्रमाणे ग्रामीण जीवनात या वर्गास कमी महत्त्वाचे स्थान असल्याचे दिसते.

**२) माळी :**

फुल व्यवसायाशी निगडित असणारी ही जात होती. विविध धार्मिक प्रसंगी फुले, हार तयार करून देण्याचे काम करत असे. माळी जातीमधील फुलमाळी, जिरेमाळी, लिंगायत माळी यासारख्या विविध पोटजाती असल्याचे आपणास दिसून येतात.

**३) गोंधळी :**

गोंधळी हा शब्द गोंधळ या शब्दावरून आला असावा. पार्वतीला संगीत देणारा, पार्वतीच्या कथा वाचणारा समाज असा त्याचा उल्लेख मिळतो. महाराष्ट्रात देवीची जी शक्तिपीठे आहेत त्या परिसरामध्ये त्यांचा वावर पाहावयास मिळतो. गोंधळी मुळात भटके जीवन जगत असणारा, गावोगावी जाऊन उदरनिर्वाह करणारी जमात म्हणून शिवकाळापूर्वी पासून हा समाज भारतात अस्तित्वात असल्याचा उल्लेख मिळतो. रात्रभर गोंधळ घलणारा देवीची पूजाअर्चा करणे इत्यादी कामे हा समाज करत असे. यांच्या अनेक उपजाती

असल्याचेही आढळते. मराठा गोंधळी, कुंभार गोंधळी, ब्राह्मण गोंधळी अशा प्रकारच्या विविध उपजाती गोंधळी समाजामध्ये अस्तित्वात असल्याचे दिसतात.

**४) जंगम**

महादेवाची भक्ती व पूजा करणारी जमात, सतत फिरत राहणारी जमात म्हणून यांच्याकडे पाहिले जाते. मराठा कालखंडामध्ये विविध धार्मिक पूजा-अर्चा करणे विशेषत: वाणी समाजामध्ये पूजा करण्याचे काम ते करत असत. लिंगायत समाजामध्ये जंगमाचे स्थान महत्त्वाचे होते.

**५) तेली:**

विविध तेलबियापासून तेल निर्माण करणाऱ्या तेली लोकांची जात प्राचीन काळापासून अस्तित्वात असल्याचे दिसते. कोणार्कचे सूर्य मंदिरांमधील दिवाबत्तीची सोय करण्याची जबाबदारी तेली या श्रेणीकडे असल्याचा प्राचीन उल्लेख मिळतो. गावातील लोकांना तेलाची सोय करून देणे. सार्वजनिक ठिकाणी दिवाबत्तीसाठी लागणारे तेल पुरवण्याचे काम ते करत असत. त्यांना योग्य तो मोबदला समाजाकडून व राज्य प्रशासनाकडून मिळत असे.

**६) रामोशी :**

महाराष्ट्रातील एक भटकी जात म्हणून रामोशाकडे पाहिले जाते. रामोशांची वस्ती संपूर्ण महाराष्ट्रभर दिसते. रामोशी स्वतःला रामवंशी म्हणून घेत. रानमळात भटकत असल्यामुळे रामवंशी या शब्दाचा अपभ्रंश होऊन रामोशी झाला असावा अशी दंतकथा प्रचलित आहे. मराठाकाळात गावगाड्यांमधील ग्रामव्यवस्थेत अलुतेदार म्हणून त्यांना मान्यता मिळाली होती. इतर अलुतेदाराप्रमाणे त्यांना स्वतःचा कोणताही खास पारंपरिक व्यवसाय नव्हता. गावाचे रक्षण करणे हेच त्यांचे काम होते. त्या बदल्यात गावाकडून धान्याच्या स्वरूपात मोबदला त्यांना मिळत असे. रामोशी समाजामध्ये चार प्रमुख पोट जाती आहेत. हलगी रामोशी, कोळी रामोशी, भिल्ल रामोशी, मांग रामोशी या पोटजाती आढळतात. रामोशी लोक बोया, बिदर, वेद या नावाने यांना ओळखले जातात. चोर व लढाऊ डाकू या नावानेही ओळखले जात असत.

**७) कोळी :**

महाराष्ट्रात सर्व दूर कोळ्यांची वस्ती असल्याचा उल्लेख सापडतो. त्यांच्या अनेक उपजाती पहावयास मिळतात. ठाकर, महादेव कोळी, स्वालिया कोळी, गुजरात बरिया, खाट इत्यादी कोळींच्या उपजाती असल्याचे दिसते. महादेव कोळी स्वतःला वाल्मिकीचे वंशज मानतात. वेगवेगळ्या प्रदेशात वेगवेगळा व्यवसाय ते करत असत. राज्यसत्ता जहागीरदार जमीनदार सैन्य स्वरूपात इथे काम करत असल्याचे उल्लेख मिळतात. शिवकाळात मोठ्या प्रमाणात यांनी सैन्यामध्ये सहभाग नोंदवला होता. प्रामुख्याने हा समाज मासेमारी व्यवसाय करून गुजराण करीत होता.

८) **शिंपी:**

शिवकाळामध्ये कापड शिवून देणारा एक वर्ग म्हणून शिंप्याकडे पाहिले जात असे. सर्वसामान्य लोक वर्षातून एखादा दुसरा पोशाख शिवत असे. मात्र राज परिवारातील व्यक्ती, जमीनदार, जहागीरदार यांच्याकडे शिंपी वर्षातील बरेचसे दिवस काम करत असत. त्याचप्रमाणे राहुट्या तयार करण्यासाठी लागणारे कापड, छावणी तयार करण्यासाठी लागणारे कापड, सैनिकांचे पोषाक इत्यादी शिवून देण्याची जबाबदारी प्रामुख्याने या वर्गाकडे होती.

**जातिव्यवस्थेची वैशिष्ट्ये**

१) **व्यवसाय :**

जातीची निर्मिती होत असताना महत्त्वाचा घटक व्यवसाय असल्याचा दिसतो. कामाच्या विभागणीपासून अनेक व्यवसाय समुदायाची निर्मिती झाल्याचे दिसते. पुढे जाऊन हेच समुदाय जातीमध्ये परावर्तित झाले. ते करत असलेले व्यवसायावरून त्या-त्या समुदायास नावे मिळाल्याचे आपणास दिसते. कपडे शिवणारा शिंपी, तेलाचा व्यवसाय करणारा तेली, चामड्याचा व्यवसाय करणारा चांभार, मातीची भांडी बनवणारा कुंभार असे अनेक जातींची नावे आपणास पाहावयास मिळतात. स्मृती कालखंडामध्ये जातीव्यवस्था अधिकच कठोर झाल्याचे दिसते. प्रारंभीच्या काळात व्यावसायिक किंवा गुणकार्यानुसार, श्रमविभागणीनुसार जातीव्यवस्था निर्माण झाल्याची दिसते.

पुढील काळात समाजाची विभागणी जन्माधिष्ठित बनली. ज्या जातीत जन्म झाला तीच जात व्यक्तीला आपोआप मिळण्यास सुरुवात झाली. मराठा कालखंडामध्ये हीच व्यवस्था कायम असल्याची दिसते. आप-आपल्या जातीमध्ये विवाह, गोत्रामध्ये विवाह करावा अशी सक्ती पुढे निर्माण झाल्याचे दिसते. याच काळात प्रतिलोम विवाह झाल्याचे अनेक उल्लेख पहावयास मिळतात. त्यातून अनेक जाती उपजाती निर्माण झाल्या. रोटी बेटी व्यवहार याबाबत प्रत्येक समाजाची काहीतरी बंधने स्वतःवर घालून घेतली होती. त्यामुळे जाती व्यवस्था अधिकच कठोर बनली व जातीबाहेर विवाह झाल्यामुळे अनेक उपजातींची निर्मिती झाल्याचे आपणास दिसते.

२) **जातपंचायती :**

जातपंचायतीचे उल्लेख खूप पूर्वीपासून मिळतात. आज २१ व्या शतकामध्ये उत्तर भारतामध्ये व महाराष्ट्रामध्ये अनेक जातपंचायती, खापपंचायती अस्तित्वात असल्याचे दिसते. शिवकाळात व पेशवे काळामध्ये जाती-जातीमध्ये उद्भवणारे संघर्ष सोडवण्यासाठी या जातपंचायतीनी महत्त्वाची भूमिका बजावल्याचे दिसते. न्याय निवाडा करताना प्राचीन परंपरा रीतीरिवाज जातीसंकेत इत्यादीच्या आधारे न्याय दिला जात होता. लिखित स्वरूपात कोणताही कायदा प्रचलित नव्हता. जातपंचायतीने दिलेला न्याय पाळणे हे त्या त्या जातींना बंधनकारक होते. न्याय न पळणाऱ्या जातींना धर्म बहिष्कृत केले जात होते. त्यामुळे

जातपंचायतीने दिलेला निर्णय मानाने त्या त्या जातींना पाळणे बंधनकारक होते. या जातपंचायतमुळे सामाजिक शांतता व न्याय मिळण्यास मदत झाली. मात्र केव्हा केव्हा या जात पंचायतीमुळे लोकांवर अन्याय अत्याचार होत असल्याची उदाहरणे ही दिसून येतात.

**३) जातीभ्रष्टता :**

जाती जातीचे पवित्र टिकवण्याचे काम जातपंचायत करीत होती. कनिष्ठ जातीबरोबर, जातीबाहेरील विवाह, खानपान व अन्य कारणामुळे जाती बहिष्कृत केल्याचे अनेक उल्लेख पहावयास मिळतात. जाती बहिष्कृत केलेल्या लोकांना परत जातीमध्ये घेण्यास शुद्धीकरण करणे असे अनेक प्रकार केल्याचे उल्लेख मिळतात. जातीदृढता व जातीसंकेत जाती-जातीमध्ये दृढता निर्माण करणाऱ्या विविध कारणांबरोबरच जातीसंकेतानी महत्वाची भूमिका बजावल्याची दिसते. प्रत्येक जातीमधील लोक इतरापेक्षा स्वतःला श्रेष्ठ समजत असल्यामुळे जाती-जातीमध्ये दृढता निर्माण झाल्याचे दिसते. विविध समाजामध्ये विविध सामाजिक संकेत, प्रथा, परंपरा, पद्धती यामुळे जाती भिन्नता व उपजाती लक्षात येण्यास सुरुवात झाली. विभिन्न जाती जातीमधील लोकांचा पेहराव, आचरण, खानपान, पगडी, टोपी घालण्याची पद्धत, विवाह पद्धती या जाती संकेतामुळे जाती व उपजाती यांच्यामधील दरी अधिक दृढ होत गेली. समाजात असणाऱ्या विविध जातीसंख्येमुळे जाती व्यवस्थेमधील उतरंड कायम राहिल असे म्हणता येते.

**४) अस्पृश्यता :**

पेशवे काळामध्ये जाती-जातीमधील अंतरभेद वाढल्यामुळे कर्मठपणाच्या दृष्टीने परिसिमा झाल्याचे दिसते. कर्मठपणाच्या खोट्या समजुतीमुळे ऐहिक जीवनामध्ये लोक प्रथा परंपरा पाळण्यासाठी खूप आटापिटा करत असल्याचे दिसते. प्रत्येक जातीने, वर्णाने कोणता व्यवसाय करावा, कर्तव्यपालन, धर्मपालन करावे हे ठरलेले होते. त्याचप्रमाणे याचे उल्लंघन होणार नाही हे पाहणारा राज्यकर्ता वर्ग व त्यास धार्मिक आधार कसा आहे हे पटवून देणारा शास्त्री, पंडित व ब्राह्मण वर्ग पेशवे काळात अस्तित्वात असल्यामुळे परिस्थिती अधिकच गंभीर बनण्याचे दिसते. संपूर्ण समाज हा कर्मठपणाच्या व अंतरभेदाच्या अधीन झाल्यामुळे, अगदी तळाशी असलेला सामाजिक वर्गाची परिस्थिती कशी असेल याची कल्पना करवत नाही. पेशवे काळातील कागदपत्रामध्ये महार, मांग, चांभार या जातीचा उल्लेख अस्पृश्य म्हणून दिसतो. महार हा ढेड, भूमीया, मार्गदर्शक, वाटाड्या, चेसकर, तराळ, भूमिपुत्र, पांडेदार या नावाने ओळखले जात होता. तर मांग हा वाजंत्री अथवा गारुडी या नावाने ओळखले जात होते.

शिवा-शिव या प्रथेमुळे अस्पृश्यता अधिकच क्लिष्ट व शोचनीय बनली होती. मनुस्मृतीमध्ये अस्पृश्याने किंवा खालच्या जातीतील लोकांनी काय केल्यास शिवा-शीव होते याबद्दल सविस्तर माहिती मिळते. चांडाळाचा स्पर्श, बाहेर बसलेली स्त्री, बाळंतीण स्त्री, प्रेताला शिवने यामुळे माणूस भ्रष्ट होतो असे उल्लेख मिळतात. शूद्र व अतिशुद्रांना सार्वजनिक उत्साह वेळी वेगळी कामे करावी लागत होती. पोळा सणाच्या वेळी पाटलाच्या घराला रंग देणे, तोरण बांधणे इत्यादी कामे त्यास करावी लागत होती. पेशवे काळात

व्यवसाय करण्याचा मूलभूत हक्क नाकारल्यामुळे शूद्र व अतिशुद्राना उदरनिर्वाहासाठी चोरी व दरोडे करण्याशिवाय इतर पर्याय शिल्लक राहिल्याचा दिसत नाही. पेशवेकाळात शिक्षा देत असताना माणसांनी केलेल्या गुन्ह्यापेक्षा त्या गुन्हेगारांची जात कोणती आहे. याचा विचार करून शिक्षा दिली जात होती. अस्पृश्य लोकांना गावात फिरताना गळ्यात गाडगे व पाठीमागे खराटा बांधून फिरावे लागत असे.

पेशवे काळात शूद्राना देवालयात प्रवेश करण्यास बंदी केल्याची अनेक उदाहरणे दिसतात. या पाठीमागे शिवा-शिव विटाळ यासारख्या भ्रामक कल्पनाच होत्या. याविरुद्ध कधी कधी शूद्रांनी बंड केल्याचे उल्लेखही पेशवे काळामध्ये पहावयास मिळतात. एकंदरीत पेशवेकाळात ब्राह्मण वर्गास अनन्य साधारण महत्व प्राप्त झाले होते. त्यातच शुद्रांची स्थिती यातनामय, कष्टदायक होती.

**स्वाध्यायनासाठी प्रश्न क्र. १**

अ) रिकाम्या जागी योग्य पर्याय निवडा.

१) भारतात चातुर्वर्ण व्यवस्थेमध्ये ............या वर्गाला सर्वात वरचे स्थान होते.

अ) ब्राह्मण ब) क्षत्रिय क) वैश्य ड) शूद्र

२) व्यापार व्यवसायाशी हा ........... वर्ण संबंधीत होता.

अ) वैश्य ब) शूद्र क) क्षत्रिय ड) यापैकी नाही

३) प्राचीन काळापासून मानवाचे आचार विचार नियमन करणारा ग्रंथ म्हणून ............ कडे पाहिले जाते.

अ) मिताक्षरा ब) दाह्यभाग क) मनुस्मृती ड) यापैकी नाही

४) डॉ. अ. रा. कुलकर्णी यांनी बलुतेदारांची संख्या ............ इतकी सांगितली आहे.

अ) १२ ब) १८ क) १५ ड) १४

५) जातीव्यवस्थेमधील प्रत्येक जातीची सामाजिक दर्जा हा ............ स्थिती वरून मोजला जात होता.

अ) सामाजिक ब) आर्थिक क) धार्मिक ड) यापैकी नाही

ब) एका वाक्यात उत्तरे लिहा

१) भारतीय वर्ण व्यवस्थेमधील चार वर्ण कोणते ते सांगा?

२) संरक्षण क्षेत्रासंबंधी असणाऱ्या वर्ण व्यवस्थेतील वर्णनाची माहिती लिहा?

३) शिवकालीन जाती व्यवस्थेमधील प्रभू जातीचे कार्य सांगा ?

४) जात व्यवस्थेच्या निर्धारणांमध्ये महत्त्वपूर्ण भूमिका बजावणाऱ्या घटकांची माहिती लिहा?

५) बलुतेदारांना मिळणारा मोबदला कोणत्या स्वरूपात मिळत असे?

### ३.२.२ मराठेकलीन स्त्री जीवन:

मराठेकालीन एकूणच परिस्थितीचा विचार करता स्त्रियांकडे पाहण्याचा समाजाचा दृष्टिकोन पारंपारीक रूढीवादी होता. समाजाचा सांस्कृतिक दृष्टिकोन हा सामाजिक तत्त्वज्ञान व समाजात विकसित झालेल्या सामाजिक संस्था यावर अवलंबून असतो. प्राचीन काळापासून स्त्रियांना कुटुंबात मानाचे स्थान होते. उपनयन संस्कार होत होता. पूजाअर्चा, धार्मिक विधी याबाबत त्यांना महत्त्वाचे स्थान होते. मात्र काळाच्या ओघात सूत्र वाङ्मय, स्मृती कालखंड, मुस्लिम कालखंडात त्यांच्यावरती अनेक बंधने व निर्बंध येण्यास सुरुवात झाली. अशातच मुस्लिम आक्रमणामुळे स्त्रियांची स्थिती अधिक शोचनीय बनली. भारतात पितृसत्ताक कुटुंब पद्धती अस्तित्वात असल्यामुळे स्त्रियांना आपोआप समाजात दुय्यम स्थान मिळाले. एकंदरीत शिवकाळापर्यंत अनेक निर्बंधानी युक्त असे स्त्रियांचे जीवन अधिक क्लिष्ट व शोचनीय बनल्याचे चित्र पहावयास मिळते. सती प्रथा, बालविवाह, विधवा विवाह, संपत्तीचा कोणताही अधिकार नसणे, शिक्षण, सामाजिक स्वातंत्र्य यापासून वंचित ठेवणे यासारख्या अनेक वाईट चालीरीती समाजामध्ये आस्तित्वात होत्या.

**१) स्त्रियांचे कुटुंबामधील स्थान :**

भारतात पूर्वीपासून एकत्र कुटुंबपद्धती असल्यामुळे तीन चार पिढ्या एकत्र राहत होत्या. घरात माता, मुलगी म्हणून धार्मिक प्रसंगी सहभागाच्या वेळी त्यांना मानाचे स्थान होते. मात्र सामाजिक जीवनामध्ये त्यांना कोणतेही स्वातंत्र्य असल्याचे दिसत नाही. सर्व कुटुंबाची मनोभावी सेवा करणे, कौटुंबिक कार्याची पूर्तता करणे, मुलांचे संगोपन करणे इत्यादी कार्यामध्ये ती दिवसभर गुंतून होती. एक प्रकारे उपेक्षित सामाजिक जीवन त्यांना जगावे लागत असल्याचे चित्र दिसून येते.

**२) विवाह :**

प्राचीन काळापासून विवाह एक सामाजिक संस्कार म्हणून पाळण्याची पद्धत होती. प्राचीन भारताच्या इतिहासामध्ये चार आश्रमाची संकल्पना असून विवाह करून गृहस्थ आश्रम स्वीकारल्याशिवाय मोक्ष मिळणार नाही असा नियम होता. त्यामुळे विवाह संस्कार किती महत्त्वाचा होत आहे यावरून दिसून येते. भारतीय समाजात विवाहाचे अनेक प्रकार पहावयास मिळतात. विवाह करत असताना स्त्रियांना कोणतेही स्वातंत्र्य नव्हते. घरातील लोक ज्याच्याशी लग्न लावून देत त्याच्याबरोबर तिला विवाह करावा लागत होता. क्वचित प्रसंगी राज परिवारातील व सरदार घरातील स्त्रियांना थोडे बहुत स्वातंत्र्य होते.

**३) बालविवाह :**

भारतात पूर्वीपासून बालविवाहाची प्रथा अस्तित्वात होती. हिंदू धर्मशास्त्राप्रमाणे व इतर धर्मामध्ये ही प्रथा अस्तित्वात होती. बालविवाहाचे वय किती असले पाहिजे याबाबत प्रत्येक धर्मामध्ये वयाचे विविध

मापदंड पहायला मिळतात. हिंदू धर्मशास्त्रानुसार मुलाचे वय चौदा व मुलीचे वय आठ वर्ष असावे असे निर्देशित केले होते. मात्र काही प्रसंगी पाळण्यात लग्ने लावली जात असत. बालविवाहामुळे पुढील काळात अनेक प्रश्न निर्माण झाल्याचे दिसते. विधवांचे जास्त प्रमाण, विविध कौटुंबिक अडचणी यामुळे मुलींच्या मृत्यूंचे प्रमाण वाढलेले होते. मुलीचे वाढते वय हा आई-वडिलांच्या समोरील व समाजामधील थट्टेचा विषय असे. सततची युद्धे यामुळे अकाली वैधव्याचा मोठा प्रश्न होता.

**४) विषमविवाह (जरठ विवाह) :**

समाजाने पुरुषापेक्षा स्त्रियावर अनेक बंधने घातली होती. समाजात बालविवाहाची प्रथा अस्तित्वात होती. पुरुष कोणतेही वयामध्ये लग्न करत असे. प्रामुख्याने जरठ विवाहामध्ये पुरुषांचे वय स्त्रियांचे वयापेक्षा कितीतरी पटीने अधिक होते. असे असले तरी हा प्रकार मराठा काळात सर्रासपणे रूढ होता. उदाहरणार्थ नाना फडनीस यांनी चाळीसाव्या वर्षी लग्न केले तेव्हा त्याच्या पत्नीचे वय नऊ वर्षाचे होते. असे अनेक उल्लेख मराठे काळात व पेशवे काळात पहावयास मिळतात.

**६) असुर विवाह :**

वधू विकत घेऊन लग्न करणे यास असुर विवाह म्हणतात. असुर विवाहाचे ही अनेक उल्लेख मराठा काळात पहायला मिळतात. कुडाळ मधील तांबोळी नावाच्या व्यक्तीने आपली मुलगी दोनशे रुपयेला विकली होती. विकत घेणाऱ्या व्यक्तीने पैसे न देताच विवाह केला. अशा प्रकारची तक्रार पेशवे दप्तरांमध्ये पाहावयाला मिळते.

**७) राक्षस विवाह :**

वधूला जबरदस्तीने पळून नेऊन तिच्याबरोबर विवाह करणे. या प्रथेला राक्षस विवाह असे म्हणत.

**८) बहुपत्नीत्व :**

प्राचीन काळापासून बहुपत्नीत्वाची पद्धत अस्तित्वात असल्याचे दिसते. मुघल व मराठा काळामध्ये ही प्रथा रूढ असल्याचे दिसते. राजे राजवाडे अनेक विवाह करत होते. महाराणी पट्टराणी अशा अनेक राण्यांचे उल्लेख पहावयास मिळतात. प्रथम पत्नीस मुलगा न होणे किंवा अन्य कारणामुळे अपवादातून स्थितीमध्ये पुनर्विवाह केले जात होते. नंतरच्या काळात राज्याला स्थिरता लाभावी म्हणून राजाने अनेक विवाह केल्याचे दिसते. राजे-रजवाडे अनेक विवाह करू लागले. त्याचेच अनुकरण सरंजामदार, जहागिरदार, वतनदार करू लागले होते. एकंदरीत सधन वर्गामध्ये बहुपत्नीत्त्वाची पद्धत जास्त प्रचलित होती. बहुपत्नीत्वाच्या बरोबर अंग वस्त्र म्हणून लग्न न करता अनेक स्त्रिया तो जवळ बाळगू लागला होता. मराठा काळामध्ये ही अनेक व्यक्तींनी अनेक विवाह केल्याचे उल्लेख आपणास दिसून येते. छत्रपती शिवाजी महाराजांना आठ पत्नी होत्या. छत्रपती शाहू महाराजांना चार, नानासाहेब पेशवे यांना दोन, रघुनाथराव पेशवे यांना सहा, नाना फडणीस यांना नऊ, दुसरा बाजीराव यांना आकरा, महादजी शिंदे यांना नऊ बायका होत्या इत्यादी. बहुपत्नीत्व प्रथेमुळे पारिवारिक संघर्ष, कलह, राजकारण, द्वेष यामुळे कौटुंबिक वातावरण ढवळून निघाल्याचे संदर्भ मिळतात.

## ९) विधवा विवाह :

बालवयात लग्न होत असल्यामुळे पुढील काळात साथीचे रोग, युद्धे, लढाई यामुळे समाजात विधवांचे प्रमाण वाढल्याचे दिसते. मराठा कालखंडाचा विचार केल्यास विधवांचा पुनर्विवाह होणे जवळजवळ अशक्य होते. विधवांचा सामाजिक दर्जा अतिशय हिन होता. समाजामध्ये कोणताही मानसन्मान मिळत नव्हता. सण समारंभामध्ये सहभागी होण्यावर अनेक निर्बंध घालण्यात आले होते. विधवांचे दर्शन अशुभ मानले जात होते. वैद्यव्य ही दैवी आपत्ती असून तिचे तिने संन्यासी पद्धतीने जीवन जगावे अशी त्यांची इच्छा होते.

## ११) सती प्रथा :

सती प्रथेचा उल्लेख अगदी ऋग्वेद काळापासून पहावयास मिळतो. पतीच्या निधनांतर तिने सती गेलेच पाहिजे असे कोणतेही निर्बंध नव्हते. नंतरच्या काळात तिला सती जाणे सक्तीचे करण्यात आले. सती या शब्दाचा अर्थ 'सहगमन' होय. पतीच्या निधनानंतर स्वतःहून पतीच्या चितेत आहुती देणे असा अर्थ अभिप्रेत होतो. पतीच्या निधनानंतर स्त्री जर सती गेली तर तिच्या हातून दोन्ही कुळाचा उद्धार होतो असे मानले जात असल्यामुळे तिला सती जाण्यास भाग पाडण्यात येऊ लागले. विशेषता बंगालमध्ये सती प्रथा मोठ्या प्रमाणात अस्तित्वात होती. पतीच्या मृत्यूनंतर पतीच्या मालमत्तेवर पत्नीचा अधिकार होता. अशा मालमत्तेच्या अधिकारापासून तिला वंचित करण्यासाठी तिला धर्माच्या पावित्र्याच्या खोट्या भ्रामक कल्पनेला बळी पाडले जात असे. इतर प्रथांचा विचार करता महाराष्ट्रात सती प्रथेचा इतका मोठ्याप्रमाणात प्रसार झाल्याचा पाहावयास मिळत नाहीत. लॉर्ड विल्यम बेंटिंग याने इ.स.१९३० मध्ये सतीबंदीचा कायदा करून अमानुश सती प्रथा बंद केली.

## १२) केशवपण पद्धती :

पतीच्या मृत्यूनंतर पत्नीचे केशवपन करावे ही प्रथा समाजामध्ये अस्तित्वात होती. या केशवपनाचा मुख्य हेतू स्त्रीला विद्रुप करून सोडणे हा होता. कारण समाजातील विघातक प्रवृत्तीच्या लोकांची नजर तिच्यावर पडू नये व व्याभिचाराचे कृत्य तिच्या हातून घडू नये म्हणून तिला विद्रूप करण्यावर भर दिला जात होता. त्यास धर्म रूढीनी अधिक बळ दिल्याचे दिसते. विधवेचा केससंभार मृत पतीच्या बंधनात कारणीभूत ठरतो असे मानल्यामुळे केशवपण करण्याच्या प्रवृत्तीस अधिक बळ मिळाले. ही प्रथा प्रामुख्याने ब्राह्मण समाजात पाळली जात होती.

## १३) मराठाकालीन स्त्रियांचा राजकारणातील सहभाग :

मराठाकालीन स्त्रियांच्या बाबतीत विचार करताना तीन भाग पाडणे आवश्यक आहे.

अ) राज परिवारातील स्त्रिया

ब) सरदार व जमीनदार कुटुंबातील स्त्रिया

क) सर्वसामान्य कुटुंबातील स्त्रिया

सर्वसामान्य कुटुंबातील स्त्रियांच्या तुलनेत राज परिवार व अन्य स्त्रिया होत्या त्यांना सामाजिक राजकीय उच्च दर्जा प्राप्त झाला होता असे म्हणता येईल. मराठा कालखंडामधील अनेक कागदपत्राच्या अभ्यासाद्वारे राजमाता जिजाबाई, महाराणी ताराबाई, अहिल्यादेवी होळकर, राधाबाई, गोपिकाबाई, आनंदीबाई, अनुबाई घोरपडे, लक्ष्मीबाई व यमुनाबाई, उमाबाई दाभाडे, तुळसाबाई इत्यादी स्त्रियांनी राजकारणामध्ये उत्तम छाप पाडल्याचे दिसते. धैर्य, राजकीय मुत्सदेगिरी प्रशासकीय कार्यक्षमता, लष्करी नेतृत्व इत्यादी गुणांचा समुच्चय त्यांच्या ठाई होता. असे असले तरी या स्त्रियांनी काही अंशी सामाजिक बंधने, परंपरा, रुढी जुगारून दिल्याचे दिसते.

सर्वसामान्य कुटुंबातील स्त्रिया या राजकारणापासून दूर होत्या, पुरुषांच्या अथवा पतीच्याजोडीने काबाडकष्ट करून आपल्या परिवाराचा उदरनिर्वाह करत होत्या. सर्वसाधारणपणे काही कौटुंबिक मानपान त्यांना मिळत होते. मात्र सार्वजनिक जीवन जगत असताना अनेक रूढी, परंपरा, आचार, विचार राहणीमान, संस्कृती या दृष्टीने अनेक निर्बंधाचा सामना त्यांना करावा लागत होता.

मध्यमवर्गीय स्त्रियांची स्थिती अत्यंत दयनीय असल्याचे दिसते. अनेक संकटांचा सामना त्यांना करावा लागत होता. मध्यमवर्ग समाजामध्ये बहुपत्नीत्त्व व अंगवस्त्रे ठेवणे. विधवा विवाह न होणे यासारख्या अनेक रुढीमुळें दुःखमय व कष्टमय जीवन यांना जगावे लागत होते.

**१४) स्त्री शिक्षण :**

प्राचीन काळापासून स्त्रियांना उपनयन हा संस्कार होत होता. स्त्रियांना शिक्षण घेण्याचा अधिकार होता. मात्र उत्तर वैदिक काळात उपनिषदे स्मृति कालखंडानंतर त्यांचा उपनयन संस्कार बंद झाला. मुस्लिमांच्या आक्रमणामुळे ही स्थिती अधिकशोचनीय बनल्याचे दिसते. स्त्रियांच्या शिक्षणावर त्यामुळे अनेक निर्बंध आले. सर्वसामान्य स्त्रियांचा विचार करता त्यांना कोणताही शिक्षणाचा अधिकार नव्हता. मात्र राजघराण्याचे स्थिती थोडीशी वेगळी असल्याचे दिसते. ब्राह्मण वर्गातील स्त्रियांना लिहिता वाचता येईल एवढे शिक्षण दिले जात होते. तर राजघरातील स्त्रियांना घोड्यावर बसणे, राजकारणाचे धडे, तलवारबाजी, भालाफेक इत्यादीचे शिक्षण दिले जात असल्याचे उल्लेख मिळतात. त्याचप्रमाणे पाककला, विणकाम, कातरकाम, शिवणकाम इत्यादी प्रकारचे शिक्षण स्त्रियांना घरीच दिले जात होते.

**१५) मालमत्तेचा अधिकार :**

मालमत्तेच्या संदर्भात स्त्रियांना कोणतेही अधिकार नव्हते. काही प्रमाणात स्त्रीधन व इतर थोडे बहुत मालमत्तेत त्यांचा वाटा होता. मात्र सर्वस्व त्यांना परिवाराच्या मर्जीवर अवलंबून राहावे लागत होते. त्याचप्रमाणे काही स्त्रियांना वतने दिली असल्याचे उल्लेखही मिळतात. साडी-चोळी वतन, दूध-भात वतन, होळकरांसाठी खाजगी जहागिर गौतम बाईच्या नावाने दिल्याचे दिसते. एकंदरीत मालमत्तेच्या संदर्भात

स्त्रियांच्या अधिकारास काही प्रमाणात मान्यता दिसते. तर काही प्रमाणात स्त्रियांना मालमत्तेच्या अधिकारापासून दूर ठेवल्याचे उल्लेख आपणास पहावयास मिळतात.

**स्वाध्यायनासाठी प्रश्न क्र. २**

अ) रिकाम्या जागी योग्य पर्याय निवडा.

१) मराठाकालीन राजकारणामध्ये उल्लेखनीय भूमिका बजावलेल्या स्त्रिया............ह्या होत्या.

अ) अहिल्याबाई होळकर ब) राजमाता जिजाबाई

क) करवीरकर जिजाबाई ड) वरील सर्व

२) पतीच्या मृत्यूनंतर स्त्रीचे केस कापण्याच्या पद्धतीस............ या नावाने ओळखले जाते.

अ) सती प्रथा ब) जरटविवाह क) बहुपत्नीत्व ड) केशवपण

३) सतीबंदीचा कायदा............ याच्या काळामध्ये पास झाला.

अ) लॉर्ड विल्यम बेटिंग ब) लॉर्ड कॉर्नवॉलिस

क) लॉर्ड वेलस्ली ड) यापैकी नाही

४) शिवकाळात व शिवोत्तरकाळातील समाजामध्ये ........... ह्या प्रथा अस्तित्वात होती.

अ) बालविवाह ब) जरठविवाह क) बहुपत्नीत्व ड) वरील सर्व

ब) एका वाक्यात उत्तरे लिहा

१) मराठीकालीन जरठ विवाहाची प्रथा याबद्दल माहिती लिहा?

२) केशवपण ही प्रथा कोणत्या वर्णांमध्ये जास्त प्रमाणात प्रचलित होती?

३) बालविवाह प्रथेबद्दल माहिती लिहा?

४) सती प्रथेबद्दल माहिती लिहा?

५) स्त्रीधनाची संकल्पना कोणत्या ग्रंथात प्रथम मांडली आहे

## ३.२.३ मराठीकालीन गुलामगिरी व वेठबिगारी :

प्राचीन काळापासून गुलामगिरीची पद्धत भारतात अस्तित्वात होती. गुलामाची खरेदी विक्री मोठ्या प्रमाणात होत होती. घरकाम, सेवा करणे इत्यादी कामे गुलामास करावे लागत होती. या काळात पैसे देऊन तो आपली मुक्तता करून घेण्याची संधी गुलामास होती. मध्ययुगीन कालखंडामध्ये गुलामगिरीमध्ये मोठ्या प्रमाणामध्ये वाढ झाल्याचे दिसते. मध्यकाळामध्ये घरगुती कामे करण्यासाठी मोठ्या प्रमाणात गुलामाची

आवश्यकता होती. अल्लाउद्दीन खिलजी यांच्याजवळ पन्नास हजार गुलाम होते. तर मोहम्मद तुगलक यांच्याजवळही मोठ्या प्रमाणात गुलाम होते. गुलामाच्या अडचणी जाणून घेण्यासाठी आठवड्यातून एक दिवस त्यांना द्यावा लागत होता. मध्ययुगीन काळामध्ये गुलाम पुरुषांच्या बरोबर स्त्रियांना गुलाम म्हणून ठेवण्याची प्रथा रूढ झाली होती. अमीर खुसरो यांच्या 'इजाज-ए- खुश्रवी' या ग्रंथामध्ये स्त्री गुलामांची वैशिष्ट्ये विशद केली आहेत. नाजूक तुर्की गुलाम स्त्री सहवासासाठी तर सुगंधित चिनी स्त्री सहवासासाठी वापरली जात होती. भारतीय मृदू स्त्री मुलींचा मुलाच्या संगोपनासाठी उपयोग करून घेतला जात होता. मुघल काळात मोठ्या प्रमाणात गुलामांचा व्यापार होत होता. हा व्यापार दिनारा या नाण्यामध्ये होत असल्याचे उल्लेख मिळतात. मलिक कपूर हा दस हजारी दिनार म्हणून ओळखला जात होता. गुलामांचा वापर बंद करण्यासाठी सम्राट अकबराने हुकूम काढून गुलामांचा वापर बंद केल्याचे उल्लेख मिळतात. मराठाकालखंडात देखील गुलामगीरी व वेठबिगारी अस्तितवात होती. पेशवे काळात ही प्रथा अधिक दृढमूल झालेली दिसते. स्त्री गुलामास बटीक, कुणबीस अथवा दासी म्हटले जात होते, तर पुरुष गुलामास पोरणा असे म्हणत. शिवकाठापेक्षा पेशवेकाळात गुलामगिरी मोठ्या प्रमाणात अस्तित्वात होती. गुलामगिरीबरोबर वेठबिगारी देखील करावी लागत होती.

**अ) गुलामांच्या निर्मितीची कारणे :**

**१) कर्जबाजारीपणा :**

एखादी व्यक्ती घेतलेले कर्ज फेडू शकला नाही आणि कर्जाचा डोंगर वाढतच राहिल्यास कर्ज चुकते करण्यासाठी त्या व्यक्तीला स्वतःला विकावे लागत असे. त्यातूनच गुलामगिरी वाढत गेल्याची उदाहरणे आपणास पहावयास मिळतात.

**२) दुष्काळ :**

मराठा कालखंडात वारंवार पडणाऱ्या दुष्काळांची संख्या मोठी होती. या नैसर्गिक आपत्तीमुळेही गुलामांच्या संख्येत वाढ झाल्याची अनेक उदाहरणे मिळतात. दुष्काळी परिस्थितीमुळे व उपासमारीमुळे अनेक लोकांना जीव गमवावा लागत होता. अशावेळी अनेकांनी स्वतःला किंवा स्वतःसह आपल्या मुलाबाळांना विकल्याचे उल्लेख पेशवे काळात पहावयास मिळतात.

**३) बदकर्म करण्यामुळे स्त्रियांचा समावेश गुलाम गटामध्ये :**

पेशवे काळामध्ये व्याभिचाराचे अनेक उल्लेख पहावयास मिळतात. बदकर्म करणाऱ्या स्त्रियांना समाजातून बहिष्कृत केले जात होते. त्यामुळे तिला समाज व घरच्या लोकांपासून दूर राहावे लागत असे. त्यामुळे अशा स्त्रिया वेश्या व्यवसायाकडे वळत होत्या. आयुष्यभर त्यांना गुलाम बटीक म्हणून जीवन जगावे लागत असे.

४) युद्धात पराभूत झालेले अथवा गुलाम झालेल्या लोकांचा गट.

५) बक्षीस म्हणून गुलाम दिले गेलेले.

६) शारीरिक अपंगत्व निर्माण झाल्यामुळे मुलांना किंवा स्वतःला गुलाम म्हणून विकला गेलेला वर्ग.

६) फूस लावून पळवून नेऊन करण्यात येणारे गुलाम. पेशवे काळामध्ये प्रामुख्याने कोकणात स्त्रियांना फूस लावून पळून नेऊन त्यांची विक्री गुलाम म्हणून केल्याचे उल्लेख सापडतात.

**ब) गुलामांना मिळणारी वागणूक :**

गुलामगिरीची प्रथा जरी अमानुष निर्दयी असली तरी, मराठा कालखंडामध्ये गुलामांना मिळणारी वागणूक व त्यांचा सामाजिक दर्जा हा सर्वस्वी त्याचे व मालकाचे संबंध कोणत्या प्रकारचे आहेत त्यावर अवलंबून होता. गुलाम व मालक यांच्यातील संबंध जितके चांगले, तितका चांगला मान सन्मान गुलामांना मिळत असे. गुलामावरती अंतिम सत्ता ही मालकाची असल्यामुळे मालकांचा शब्द अंतिम होता. कधी कधी गुलामांना अत्यंत अमानवीय रीतीने वागवले जात होते. तर काही वेळा त्यांना बक्षीस म्हणून गुलामगिरीतून मुक्तता करणे. गुलामाचे लग्न लावून देणे. त्यांना उत्पन्नाची साधने भेट म्हणून देणे. इत्यादी उल्लेख मिळतात.

**भाग्यवान गुलाम :**

मराठाकालखंडामध्ये काही गुलामानी आपल्या कर्तृत्व, कार्यामुळे, आचार, विचारामुळे ते मालकाशी एकरूप झाल्याचे दिसते. गुलाम व मालक यांचे नाते त्यांच्यात राहिलेचे दिसत नाही. नागपूरचे रघुजी भोसले हे मरण पावल्यानंतर त्यांच्या दासी सती केल्याचे उल्लेख पहावयास मिळतो. तर काही गुलामांनी केलेल्या स्वामीनिष्ठेमुळे त्यांना दरबारामधील महत्त्वाची पदे व स्थान भूषवल्याचे दिसते. गुलाम हे जरी गुलाम असले तरी त्यांना काही प्रमाणात हक्क व अधिकार सुद्धा होते. गुलामांना मालमत्ता मिळवण्याचा अधिकार होता. गुलाम जरी मालकाच्या सेवेत असला तरी त्याला मालमत्ता निर्माण करण्याचा अधिकार होता. तो सामर्थ्यवान असेल तर त्याला कायदेशीर काम करण्याची परवानगी होती. गुलामगिरीतून सुटका करून घेण्याचा अधिकार होता. त्याचबरोबर त्यास लग्न करण्याचा अधिकार होता. शिपाईगिरी करण्याचा त्यास अधिकार होता. शेतजमीन कसण्याचा अधिकार होता. मात्र गुलामांना मिळालेले हे अधिकार सर्वांनाच मिळत होते असे म्हणता येत नाही. म्हणून हे अधिकार ज्यांना मिळाले त्यांना भाग्यवान गुलाम असे संबोधले जात होते.

**२) वेठबिगारी :**

निराधार, दुर्बल, परावलंबी, असंघटित, व्यक्तीच्या अज्ञानाचा व दुबळेपणाचा गैरफायदा उठवून त्यांना अंकित करून त्यांच्या इच्छा विरुद्ध त्यांना राबवून घेणे म्हणजेच वेठबिगारी होय. विनावेतन मजुरी न देता, अल्प वेतनावर जमीनदार, सरदार, वतनदार, जनतेकडून जुलूम जबरदस्तीने कामे करून घेत असे. अशा पद्धतीने राबणाऱ्याच्या कामाला अथवा काम करणाऱ्या व्यक्तीला वेठबिगार अथवा बिगारी असे संबोधण्यात

येत असे. वेटबगारी ही कर्जाच्या बंधनापोटी, कर्जाची फेड न करू शकल्यामुळे लोकांच्या असाह्यतेतून निर्माण झाल्याची शोषण प्रवृत्ती होती.

प्राचीन काळापासून वेठबिगारी भारतात अस्तित्वात असल्याचे दिसते. प्राचीन काळात त्यांना 'विष्टी' असे म्हणत. जे लोक संरक्षणासाठी असलेला कर राज्यास देऊ शकत नव्हते. त्यांना महिन्यातून एक दिवस राज्यासाठी निशुल्क काम करावे लागत असे. मात्र पुढील काळात त्यामध्ये बदल होऊन त्यात क्लिष्टता प्राप्त झाल्याची दिसते. मराठा कालखंडामध्ये वेठबिगारीची पद्धत अस्तित्वात होती. वेठबिगारीमध्ये सामान्यपणे गरीब, दरिद्री, खालच्या जातीमधील लोकांचा समावेश होता. शूद्र व अतिशूद्र समाजाला वेठबिगारी करावी लागत होती. लग्नकार्यात पत्रावळी उचलणे, लाकूड फाटा आणणे, वैरणीची सोय करणे, सरकारी निवासस्थाने व सरकारी छोटे-मोठे उद्योग यामध्ये त्यांना निशुल्कपणे काम करावे लागत असे, सावकाराकडून घेतलेले कर्ज न फेडता आल्यामुळे अनेकांना पिढ्यानपिढ्या वेठबिगारी करण्याचे काम करावे लागल्याचे उल्लेख मिळतात. खेड्यातील गावगाड्यातील, जमीनदार, सरंजामदार, पाटील, देशमुख हे अलुतेदार व बलुतेदार यांच्याकडून बिगारीसारखी कामे करून घेत होते. समाजातील प्रतिष्ठित वर्गाने दलितांना वेठबिगारासारखी वागवून दिल्याचे अनेक उल्लेख मिळतात.

एकंदरीत वेठबिगारी हा गुलामगिरीचाच प्रकार होता असे म्हणता येईल. वेठबिगारीमध्ये एकापेक्षा अनेक व्यक्तींचा समूहांचा सहभाग असतो तर गुलामगिरीमध्ये मालकाची गुलामवर मालकी असते. तर वेठबिगारीमध्ये व्यक्तींच्या श्रमशक्तीचे शोषण केले जाते. गुलामगिरीप्रमाणे वेठबिगारी ही अन्यायमूलक दमनकारी प्रवृत्ती आहे असे म्हणता येते.

**स्वयं अध्ययनासाठी प्रश्न क्र. ३**

अ) रिकाम्या जागी योग्य पर्याय निवडा

१) मराठा कालखंडामध्ये गुलामांचा व्यापार करणाऱ्यांना ............असे म्हणत.

अ) व्यापारी ब) दलाल क) मध्यस्थ ड) हेडे

२) मराठा काळात गुलाम स्त्रीला ..........या नावाने संबोधले जात होते.

अ) बटीक ब) दासी क) स्त्री ड) बाई

३) गुलाम पुरुषाला ............ या नावाने संबोधले जात होते.

अ) मुलगा ब) वडील क) पोरगा ड) यापैकी नाही

४) ............ या काळापासून भारतात वेठबिगाराची पद्धत अस्तित्वात होती.

अ) प्राचीन ब) मध्ययुगीन क) शिवकाल ड) ब्रिटिश

ब) एका वाक्यात उत्तरे लिहा

१) वेठबिगाराना करावी लागणारी कामे सांगा?

२) मुस्लिम समाजातील गुलामगिरी प्रथा स्पष्ट करा?

३) गुलाम निर्मितीची कारणे सांगा?

४) मराठीकालीन गुलामांचा सामाजिक दर्जा कसा होता स्पष्ट करा?

५) वेठबिगार शब्दाचा थोडक्यात अर्थ स्पष्ट करा?

## ३.३ पारिभाषिक शब्द व शब्दार्थ

- **बलुते :** बलुतेदारांना सुगीच्या दिवसात उदरनिर्वाहासाठी दिलेला मोबदला अथवा वर्षभराचा कामाचा मोबदला.
- **खापपंचायत :** त्या-त्या जातीतील निवडक पुढाऱ्यांची खाजगी पातळीवर न्यायनिवाडा करणारी पंचायत.
- **जरठ विवाह :** आपल्यापेक्षा वयाने अतिशय लहान मुलीशी विवाह करणे.
- **असुर विवाह :** वधु विकत घेवून लग्न करणे.
- **आसूर विवाह :** वधूला पळवून विवाह करणे.
- **वेठबिगारी :** विनामोबदला काम करून घेण्याची प्रथा.

## ३.४ स्वयं अध्ययनासाठीच्या प्रश्नांची उत्तरे

**स्वाध्याय क्रमांक १ ची उत्तरे**

अ) १) ब्राह्मण

२) वैश्य

३) मनुस्मृती

४) १२

५) सामाजिक

ब) एका वाक्यात उत्तरे लिहा

१) चार

२) क्षत्रिय

३) किल्ला प्रशासनामधील कारखानीस हा प्रभू जातीचा होता. किल्ल्यावर लागणाऱ्या सर्व वस्तूंची तजवीज यास करावी लागत असे.

४) व्यवसाय, जन्म, आंतरजातीय विवाह

५) रोख किंवा धान्याच्या स्वरूपात दिला जाणारा मोबदला

**स्वाध्याय क्रमांक २ ची उत्तरे**

अ) १) वरील सर्व

२) केशवपण

३) लॉर्ड विल्यम बेटिंग

४) वरील सर्व

ब) १) वधू पेक्षा वराच्या वायातील आंतर जास्त असणे

२) ब्राह्मण

३) मराठी काळामध्ये खूप कमी वयात लहान वयात, पाळण्यात लग्न लावली जात असे या प्रथेस बालविवाह असे म्हणतात.

४) पतीच्या मृत्यूनंतर स्वच्छने पतीच्या चितेमध्ये स्वतःला समर्पित करणे किंवा पतीच्या मृत्यूनंतर सहगमन करणे या प्रथेस सती प्रथा असे म्हणतात.

५) मिताक्षरा या ग्रंथामध्ये

**स्वाध्याय क्रमांक ३ ची उत्तरे**

अ) १) हेडे

२) बटिक

३) पोरगा

४) प्राचीन

ब) एक वाक्यात उत्तरे लिहा

१) घरातील व इतर सर्व कामे

२) मराठा समाजाप्रमाणे मुस्लिम समाजामध्ये ही गुलामगिरीची प्रथा अस्तित्वात असल्याचे आपणास दिसते यामध्ये घरकाम व इतर सर्व कामे गुलामांना करावी लागत होती.

३) कर्जे, बक्षीस दिलेले, दुष्काळामुळे स्वतःहून विकले गेलेले, फूस लावून पळवून नेलेले.

४) गुलामाचा दर्जा मराठा काळामध्ये मिश्र स्वरूपाचा असल्याचा दिसतो. मालकाबरोबर गुलामांचे असणारे संबंध यावरून त्याचा सामाजिक दर्जा ठरत असे.

५) निराधार, दुर्बल, परावलंबी व्यक्तीच्या अज्ञानाचा व दुबळेपणाचा गैरफायदा घेऊन त्यांच्या इच्छेविरुद्ध त्यांना राबवून घेणे यास वेठबिगारी असे म्हणतात.

## ३.५ सारांश :

कोणत्याही काळात समाजाची निर्मिती होत असताना अनेक घटक त्यास कारणीभूत असतात. धर्म, अर्थ, राजकारण संस्कृती परंपरा, रुढी, रीतीरिवाज, उत्पादनाच्या पद्धती व उत्पादनाचे संबंध यातून समाजाची सामाजिक परिस्थिती निर्माण होत असते. शिवकालीन समाजाचा विचार करत असताना पूर्वीपासून चालत असणाऱ्या रूढी, परंपरा, वर्णव्यवस्था, धार्मिक स्थिती, स्त्रियांची स्थिती ही सामाजिक परिस्थितीप्रमाणेच होती असे म्हणता येते. या सामाजिक परिस्थितीमध्ये फारसे अमुलाग्र बदल झाल्याचे दिसत नाही. छत्रपती शिवाजी महाराजांनी हिंदवी स्वराज्याची स्थापना केल्यानंतर राजकीय जीवनात एक प्रकारची स्थिरता निर्माण झाली. बराचसा कालावधी त्यांना राजकीय संघर्ष करण्यात गेल्यामुळे सामाजिक क्षेत्राकडे फारसे लक्ष देता आले नाही. त्यामुळे पूर्वीपासून चालू असणारी वर्णव्यवस्था, जातव्यवस्था, जातीबंधने, स्त्रियांच्या स्थितीमध्ये झालेली अनेक स्थित्यरे, बालविवाह, सतीप्रथा, जरठ विवाह, विधवा विवाह, बहुपत्नीत्व यासारख्या अनिष्ठ प्रथा समाजात चालतच होत्या. असे असले तरी या व्यवस्थेमध्ये थोडे बहुत बदल घडवून आणण्यात छत्रपती शिवाजी महाराजांनी महत्त्वाची भूमिका बजावली असे म्हणता येते.

छत्रपती शिवाजी महाराजांनी गुणानिश्चिष्टित कार्यपद्धतीचा अवलंब करत आठरा पगड जातीच्या लोकांच्यामध्ये राष्ट्रीय ऐक्य निर्माण केले. त्यांच्या गुणकार्याचा उपयोग स्वराज्यासाठी करत एक नवीन सेवकवर्ग त्यांनी तयार केला. ज्यामध्ये जातिबंधने, रूढी, परंपरा यांना स्थान न देता स्वराज्यासाठी त्यांच्या कार्याचे महत्त्व ओळखून त्यांना सहभागी करून घेतले. छत्रपती शिवाजी महाराजांनी विविध सामाजिक घटकांना एक समान ध्येय व उदात्त हेतू यासाठी विभिन्न सामाजिक परिस्थिती असतानाही एकत्र आणले व आपला हेतू साध्य करून घेतला. प्रशासनामधील विविध जातींना एकत्र आणून त्यांच्यातील सामाजिक संबंध सुधारण्याची एक संधी निर्माण करून दिली. मुलत:हा प्रशासकीय व सामाजिक स्थितीमध्ये केलेले बदलांचा परिणाम लवकरच दिसून येतो. मात्र सामाजिक परिस्थितीमधील बदल ही प्रक्रिया याच्या नेमकीच उलटे आहे. यासाठी खूप मोठ्या कालावधीची गरज असते. छत्रपती शिवाजी महाराजांनी सामाजिक सुधारण्यासाठी अनेक क्रांतिकारक पावले उचलली. त्यांना मिळालेले कमी आयुष्य व पेशवेकाळात छत्रपती शिवाजी महाराजांच्या धोरणाचा केलेला त्याग यामुळे सामाजिक परिस्थितीमध्ये सुधारणाऐवजी अधिक सामाजिक क्लिष्टता निर्माण झाल्याचे दिसते.

## ३.६ सरावासाठी स्वाध्याय

अ) टिपा लिहा

१) वर्ण व्यवस्था

२) जाती व्यवस्थेची वैशिष्ट्ये

३) विवाहाचे प्रकार

४) गुलामांच्या निर्मितीची कारणे

५) वेठबिगारी

**ब) दीर्घोत्तरी प्रश्न**

१) मराठेकालीन जात व्यवस्थेची रचना व वैशिष्ट्ये विशद करा?

२) मराठेकालीन बलुतेदारी पद्धतीची माहिती स्पष्ठ करा.

३) मराठेकालीन स्त्रियांचे समाजातील स्थान स्पष्ट करा.

४) मराठेकालीन गुलामगिरीची चर्चा करा.

५) मराठेकालीन वेठबिगारी पद्धतीची माहिती द्या.

## ३.७ संदर्भ व अधिक वाचनसाठीचे ग्रंथ


१) गवळी, पी. ए., पेशवेकालीन गुलामगिरी व अस्पृश्यता, प्रचार प्रकाशन, कोल्हापूर, १९८१

२) सुमंत, यशवंत., पुंड, द. वी., (संपा) महाराष्ट्रातील जात विषयक विचार, पुणे, १९८८

३) कुलकर्णी, अ. रा., शिवकालीन महाराष्ट्र, राजहंस प्रकाशन, पुणे

४) सहस्रबुद्धे, पू. ग., महाराष्ट्र संस्कृती, पुणे १९७९

५) बेंद्रे, वा. सी., साधन चिकित्सा, लोक वाङ्मय गृह, १९८८

६) खरे, ग. ह., कुलकर्णी, अ. रा., मराठ्यांचा इतिहास, खंड-क- कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे. १९८८

७) भावे, वा. कृ., पेशवेकालीन महाराष्ट्र भारतीय अनुसंधान परिषद, नवी दिल्ली. १९७६

८) गवळी, पी. ए., पेशवेकाने समाज व जातीय संघर्ष प्रचार प्रकाशन, कोल्हापूर


❑❑❑

**सत्र २ : घटक ४**

# धर्म (Religion)

अनुक्रमणिका

४.० उद्दिष्ट्ये

४.१ प्रास्ताविक

४.२ विषय विवेचन

४.२.१ भक्ती चळवळ : दत्त संप्रदाय, महानुभाव, शाक्त संप्रदाय

४.२.२ महाराष्ट्र धर्म

४.२.३ इस्लामचा प्रभाव

४.३ पारिभाषिक शब्द, शब्दार्थ

४.४ स्वयं-अध्ययन प्रश्नांची उत्तरे

४.५ सारांश

४.६ सरावासाठी स्वाध्याय

४.७ संदर्भ ग्रंथ व अधिक वाचनासाठी पुस्तके

## ४.० उद्दिष्ट्ये :

या घटकाच्या अभ्यासानंतर आपल्याला -

- मराठेकालीन भक्ती संप्रदायाची माहिती होईल.
- दत्त संप्रदायाच्या इतिहासाची माहिती होईल.
- महानुभाव संप्रदायाचे कार्य स्पष्ट होईल.
- शाक्त संप्रदायाच्या परंपरांचे ज्ञान होईल.
- महाराष्ट्र धर्म ही संकल्पना स्पष्ट होईल.
- इस्लाम धर्माचा मराठेकालीन समाजावरील प्रभाव स्पष्ट होईल.

## ४.१ प्रास्ताविक :

विद्यार्थी मित्रहो, या पुस्तकाच्या मागील घटकांमध्ये आपण मराठा काळातील राज्यव्यवस्था, प्रशासनव्यवस्था आणि समाजव्यवस्था यांचा अभ्यास केला. मराठा काळातील या विविध संस्थांचे स्वरूप आणि त्यांचे महत्त्व यांचा आढावा आपण घेतला आहे. प्रस्तुत घटकामध्ये आपण मराठा काळातील धर्म संस्थेची माहिती घेणार आहोत. मराठेकालीन समाजावर भक्ती चळवळीचा मोठा प्रभाव होता. दक्षिण भारतात उगम पावलेल्या भक्ती चळवळीचा प्रसार उत्तर भारतापर्यंत झाला. महाराष्ट्रात देखील भक्ती चळवळीचा प्रसार होऊन त्या अनेक पंथांचा उदय झाला. महानुभाव पंथ, वारकरी पंथ, नाथ संप्रदाय, दत्त संप्रदाय असे अनेक भक्ती संप्रदाय महाराष्ट्रात प्रभावी होते. या शिवाय शाक्त संप्रदायाचा प्रभाव देखील महाराष्ट्रात मोठ्या प्रमाणात होता. दत्त संप्रदाय, महानुभाव आणि शाक्त संप्रदाय यांचा अभ्यास आपण या घटकात करणार आहोत. भक्ती चळवळीच्या माध्यमातून महाराष्ट्राच्या सामाजिक-धार्मिक स्वरूपाला एक आकार आला. भक्ती चळवळीचा आणि परंपरेने चालत आलेल्या लोकपरंपरा यांच्या समन्वयातून 'महाराष्ट्र धर्म'ची संकल्पना उदयाला आली. 'महाराष्ट्र धर्म' ही संकल्पना देखील आपण या घटकात जाणून घेणार आहोत. मराठेकाळात महाराष्ट्रात अस्तित्वात असलेल्या इस्लाम धर्माचा मुख्यत: त्यातील सुफी पंथाचा महाराष्ट्रातील भक्ती चळवळीशी संबंध आला. सुफी आणि भक्ती चळवळीच्या समन्वयाचा प्रभाव महाराष्ट्रातील समाजावर पडला त्याचा देखील अभ्यास आपण या घटकात करणार आहोत.

## ४.२ विषय विवेचन :

### ४.२.१ भक्ती चळवळ : दत्त संप्रदाय, महानुभाव, शाक्त संप्रदाय

व्यक्ती ज्या भावनेच्या योगाने ईश्वराला सर्वथा शरण जाते, ती भावना म्हणजे 'भक्ती' होय. ईश्वराविषयीचे आत्यंतिक व अनन्य प्रेम म्हणजे ईश्वराची भक्ती असे देखील म्हणता येईल. ईश्वराचा अनुग्रह करून देण्याचे सामर्थ्य असलेली आचार पद्धती म्हणजे ईश्वरप्राप्तीचा मार्ग होय. वेगवेगळ्या तत्त्वचिंतकांनी ईश्वराचा अनुग्रह मिळविण्याचे (कृपा प्राप्त करण्याचे) जे मार्ग सांगितले आहेत, त्यापैकी ईश्वर भक्ती हा एक महत्त्वाचा मार्ग आहे. ईश्वराच्या अस्तित्वाविषयीची व्यक्तीच्या मनातील श्रद्धा, सेवाभाव, समर्पणवृत्ती, भीती, ईश्वराचा अनुग्रह वा साक्षात्कार मिळविण्याची उत्कट इच्छा इत्यादींमधून व्यक्तीच्या मनात भक्तीची भावना निर्माण होते. ईश्वर हा सर्वज्ञ, सर्वशक्तिमान, सर्वगुणसंपन्न, सृष्टीचा निर्माता आणि आपला उद्धारकर्ता आहे, हा विश्वासच या भावनेच्या निर्मितीला कारणीभूत होतो. भक्तीच्या स्वरूपा बद्दल डॉ. चिटणीस म्हणतात की, 'भक्तीचा उगम प्रेमात होतो, तिची वाढ प्रेमात होते व तिचे पर्यावसानही प्रेमातच होते. हे प्रेमलौकिक नसून अलौकिक असते. परमेश्वराबद्दलचे प्रेम म्हणजेच भक्ती होय.' या व्यापक अर्थाने जगातील सर्व समाजांतून भक्तिभावना आढळते.

आपल्याला जर जीवनमुक्ती मिळवायची असेल तर त्यास ज्ञानमार्ग, कर्ममार्ग आणि भक्तीमार्ग असे तीन मार्ग प्राचीन हिंदू विचारवंतांनी सांगितले होते. त्यापैकी भक्तीमार्गाचा स्वीकार अनेक संतांनी केला व यामधूनच ही भक्तीमार्गाची चळवळ निर्माण झाली. भारतात भक्तीच्या प्रभावातून अनेक पंथ-संप्रदाय निर्माण झाले असून प्रत्येक संप्रदायाची स्वतःची अशी काही खास वैशिष्ट्ये आहेत. मात्र, विविध संप्रदायांचा मूलाधार हा 'ईश्वराप्रति भक्ती'च आहे. त्यामुळे या संप्रदायांना 'भक्तीमार्ग', 'भक्ती चळवळ' किंवा 'भक्ती संप्रदाय' असे देखील म्हणतात. विविध देवता, माता, पिता, गुरू इ. विषयीच्या आदरभावालाही लक्षणेने भक्ती असे म्हटले जाते. 'भक्ती' हा शब्द 'भज्' (सेवा करणे) या संस्कृत धातूपांसून बनला आहे. भक्त, भगवान, भागवत इ. शब्द त्याच धातूपासून बनले असून अर्थदृष्टया ते 'भक्ती' या शब्दाशी संबद्ध आहेत.

भारतीय इतिहासातील मध्ययुगीन कालखंडात भक्ती चळवळही अत्यंत प्रभावी धार्मिक चळवळ होती. भक्तीला भारतीय समाजात महत्त्वाचे स्थान आहे. भारतीय समाजाच्या उद्धारासाठी भक्ती चळवळीने केलेले कार्य वाखाणण्याजोगे आहे. समाजातील तळागाळातील लोकांना भक्तीमार्गाने मोक्षप्राप्ती करण्याचा मार्ग भक्तीचळवळीने दाखवला. उपनिषदे, भगवद्गीता, पुराणे आणि सूत्रे या प्राचीन काळातील धार्मिक ग्रंथांमध्ये 'भक्ती'चा उल्लेख असल्याचे आढळते. प्राचीन काळानंतर मध्ययुगीन काळातही भक्ती चळवळ भारतात ठिकठिकाणी दिसून येऊ लागली.

दक्षिण भारतातील तमिळ प्रदेशात भक्ती चळवळीचा इ. स. ७ व्या व ८ व्या शतकात आरंभ झाला असे मानले जाते. तामिळनाडूमध्ये वैष्णव पंथीय असलेला 'अलवार' संतांचा समूह आणि शैवपंथीय असलेला 'नयनार' संतांचा समूह यांच्या माध्यमातून भक्ती चळवळीची सुरवात झाली. पुढे १५ व्या शतकात भारताच्या उत्तरेकडील आणि पूर्वेकडील भागात वेगवेगळ्या संतांच्याद्वारे विविध पंथ, संप्रदायांच्या स्वरूपात भक्ती चळवळीचा प्रसार झाला. इ. स. १५ व्या व १७ व्या शतकाच्या दरम्यान भक्ती चळवळ आपल्या परमोच्च बिंदूवर होती.

पंथ-संप्रदाय वेगवेगळे असले आणि ज्याच्या प्रतिभक्ती असते ते दैवत वेगवेगळे असले तरी ईश्वराची भक्ती (आराधना) करणे आणि त्यामाध्यमातून मोक्ष मिळवणे हा भक्ती चळवळीतील विविध पंथ, संप्रदायांमधील मूळ गाभा होता. वैष्णव म्हणजे भगवान विष्णूची आराधना करणारे, शैव म्हणजे भगवान शिवची आराधना करणारे आणि शाक्त म्हणजे शक्ती स्वरूपातील देवतांची आराधना करणारे असे भक्तीचळवळीतील प्रमुख प्रवाह होते. भक्ती चळवळीने सर्वसामान्य जनतेच्या स्थानिक भाषांचा वापर करून त्यांच्यापर्यंत आपला भक्तीचा संदेश पोहोचवला. अनेक भक्ती परंपरेतील संतानी स्थानिक भाषेत रचना केल्या ज्या अजरामर ठरल्या. बंगालमध्ये कृष्ण चैतन्य, पंजाबमध्ये शीख धर्म, महाराष्ट्रात वारकरी संप्रदाय, नाथ संप्रदाय, कर्नाटकात अल्लमप्रभ व बसवेश्वर यांच्या कालखंडात लिंगायत संप्रदाय लोकप्रिय झाला.

महाराष्ट्रात भक्ती चळवळीत वारकरी संप्रदायाचे योगदान मोठे आहे. संत ज्ञानेश्वरांच्यापासून संत तुकाराम महाराजांच्यापर्यंत संतांची मोठी परंपरा वारकरी संप्रदायास लाभली आहे. वैष्णव भक्ती प्रवाहातील वारकरी

पंथ हा पंढरपूरस्थित विठ्ठलाला आपले आराध्य दैवत मानतो आणि त्याची भक्ती करतो. वारकरी पंथातील संतानी केलेल्या साहित्यरचना या महाराष्ट्राचे लोकमानस घडविण्यात अत्यंत महत्त्वपूर्ण ठरल्या आहेत. वैष्णव भक्ती प्रवाहातील वारकरी पंथाप्रमाणेच शैव भक्ती परंपरेतील नाथ संप्रदाय देखील महाराष्ट्रात प्रभावी होता. वारकरी संप्रदाय, नाथ संप्रदाय यांच्या सोबतच महाराष्ट्रात दत्तसंप्रदाय, महानुभाव संप्रदाय आणि शाक्त संप्रदाय यांचा देखील प्रभाव होता. दत्त संप्रदाय, महानुभाव संप्रदाय आणि शाक्त संप्रदाय यांचा आढावा आपण या घटकात घेणार आहोत.

**अ) दत्त संप्रदाय :**

दत्त संप्रदाय हा 'दत्तात्रेय' यांना उपास्य दैवत मानणाऱ्यांचा भक्ती संप्रदाय आहे. पंधराव्या शतकात नरसिंह सरस्वती यांच्या कार्यामुळे दत्तोपासनेचा संप्रदाय बनला. पुराणे व उपनिषदांतून दत्तास वर्णाश्रमधर्माची प्रतिष्ठा राखणारा, गुरुतत्त्वाचा आदर्श आणि योगाचा उपदेशक म्हटले आहे. दत्तात्रेय हा अवधूत जोगी आहे म्हणून नाथसंप्रदायातही त्याची उपासना होते. नाथसंप्रदायास त्यावरूनच 'अवधूत' पंथ असे म्हटले जाते. नाथसंप्रदायात दत्त व गोरखनाथ यांच्या संबंधाबाबतच्या अद्भुत कथा रूढ आहेत. महानुभावपंथाचे आदिकारण 'दत्त' होय, असे चक्रधरांनी म्हटले आहे. त्यांचा दत्तात्रेय त्रिमुखी नसून तो एकमुखी, चतुर्भुज आहे. तो परब्रह्माचा अवतार आहे. सूत्रपाठ, लीळाचरित्र इ. महानुभव ग्रंथांतूनही दत्तमाहात्म्य वर्णिले आहे. वारकरी संप्रदायातील संतांनी तसेच आनंद संप्रदायी लोकांनी दत्तात्रेयाविषयी आदर व्यक्त केला आहे. दत्तात्रेयाने प्रवर्तिलेल्या चैतन्य संप्रदायाच्या एका शाखेत एकोणिसाव्या शतकात भैरव अवधूत नावाचे एक सत्पुरुष झाले. त्यांनी आपल्या ज्ञानसागरनामक ग्रंथात दत्तोपासनेचा प्रचार केला आहे.

दत्तोउपासक पूर्वीपासून होत असली, तरी तिला संप्रदायाचे स्वरूप नरसिंह सरस्वतींच्या प्रभावामुळेच आले. श्रीपाद श्रीवल्लभ हे दत्तात्रेयाचे पहिले अवतार असल्याचे मानले जाते. तर नरसिंह सरस्वती यांना दत्तात्रेयांचे दुसरे अवतार मानतात. जनार्दन स्वामी, एकनाथ, दासोपंत, मुक्तेश्वर, निरंजन रघुनाथ, माणिकप्रभू, अक्कलकोट स्वामी समर्थ व वासुदेवानंद सरस्वती इ. महापुरुषांनी संप्रदायाची परंपरा चालू ठेवली. आजही अनेक दत्तोउपासक महाराष्ट्रात मोठ्या प्रमाणात आढळतात.

दत्तात्रेय हे महायोगी असल्याने योगमार्गास दत्त संप्रदायात प्राधान्य मिळाले. महाराष्ट्रातील बहुतेक योगमार्गी दत्तोपासकच होते. या संप्रदायात शैव आणि वैष्णव तसेच हिंदू व मुसलमान यांच्यात समन्वय साधला आहे. माणिक प्रभूसारख्यांनी समन्वयवादी विचार मांडले असले, तरी या संप्रदायातील अवतारी पुरुषांनी वर्णाश्रमधर्मावरच जोर दिला आहे. दत्तमाहात्म्य व दत्तप्रबोध ह्या ग्रंथांत ह्या संप्रदायाचे तत्त्वज्ञान आले आहे. गुरुचरित्रात संप्रदायाचा आचारधर्म सांगितला आहे. अवधूतगीता, गुरुगीता व जीवन्मुक्तगीता ह्या ग्रंथांतून संप्रदायाच्या सिद्धांतांचे विवरण आढळते. पूजोपचारांसाठी मूर्तीऐवजी पादुका प्रशस्त मानल्या आहेत. औदुंबर, नरसोबाची वाडी व गाणगापूर ह्या क्षेत्री दत्तात्रेयांच्या पादुकांची स्थापना केलेली आहे. पांचाळेश्वर, नरसोबाची वाडी, माहूर, गाणगापूर, लाड कारंजे, कुरुगड्डी, गिरनार ही या संप्रदायाची प्रमुख क्षेत्रे

आहेत. पंथाचा प्रसार महाराष्ट्राइतका अन्यत्र आढळत नाही. नरसिंह सरस्वतींचा निवास गाणगापूरला झाल्यामुळे कर्नाटकात दत्त संप्रदायाचा विपुल प्रसार झाला. मराठी भाषेत 'गुरुचरित्र' लिहिणारा गृहस्थ हा कानडी होता. आंध्रामधल्या दत्त संप्रदायाची माहिती वेंकटराव यांनी आपल्या लेखात दिली आहे. या संप्रदायात मान्यता पावलेले अनेक ग्रंथ तेलगू भाषेत लिहिले गेले आहेत. सौराष्ट्रात गिरनार येथे दत्तोउपासनेची प्रेरणा घेतलेला बाबा किनराम अघोरी या नावाचा एक सत्पुरुष अठराव्या शतकाच्या आरंभी होऊन गेले. गिरनार येथे मला दत्तात्रेयाचा साक्षात्कार झाला, असे त्यांनी आपल्या 'विवेकसार' नावाच्या ग्रंथात लिहिले आहे.

रा. चिं. ढेरे यांच्या मते, दत्तात्रेय ही भारतीय संस्कृतीच्या विकासातील एक अद्भूत निर्मिती आहे. शैव, वैष्णव व शाक्त या तीनही प्रमुख उपासना प्रवाहांना व्यापून उरणारा दत्तात्रेयाचा प्रभाव गेली हजार बाराशे वर्ष भारतात विशेषतः महाराष्ट्रात गाजत आहे. महाराष्ट्रात दत्तभक्तीचा प्रसार जातिभेदातीत, संप्रदायातीत, किंबहुना धर्मातीत आहे. महानुभाव संप्रदाय, नाथ संप्रदाय, वारकरी संप्रदाय आणि समर्थ संप्रदाय या चारही संप्रदायात दत्तात्रेयाविषयी उत्कट श्रद्धाभाव आहे. तसेच खास दत्तभक्तीची परंपरा चालविणारा दत्तसंप्रदायही गेली पाचशे वर्ष महाराष्ट्रात नांदत आहे. या संप्रदायात दत्तात्रेयाला श्रद्धेय मानणाऱ्या उपासकांत हिंदूंबरोबर मुसलमानही आहेत. भारतीय संस्कृतीत वेदांतील इंद्र ही वीरदेवता आहे, तर मध्ययुगातील दत्त ही सिद्धदेवता आहे. दत्तात्रेय ही देवता भारतीयांच्या प्रगल्भ चिंतनाची निर्मिती आहे. भारतीय संस्कृतीत अत्यंत परिणत विचार आणि निगूढ भावना व्यक्त करण्यासाठी इतिहासाच्या गर्भातून हे अद्भूत प्रतीक जन्म पावले आहे. त्यात समग्रता आणि सामंजस्य असल्याने ते सार्वत्रिक श्रद्धेचा विषय बनले आहे.

दत्त चरित्र हे सगुण साकार ईश्वरावताराचे नसून चिरंतन मुल्यांच्या विकास प्रक्रियेचे आहे आणि म्हणूनच दत्तात्रेयाची उपासना ही सर्वोच्च जीवन मुल्याची साधना आहे. या देवतेच्या उपासनेला सर्वाधिक प्रेरणा मिळाली ती श्रीनरसिंह सरस्वतींच्या अवतारामुळे. त्यांच्या अवतारानंतर महाराष्ट्रात खास दत्तोउपासनेचा संप्रदाय निर्माण झाला आणि औदूंबर, नरसोबावाडी व गाणगापूर ही त्या संप्रदायाची प्रधान तीर्थस्थाने बनली. श्रीनरसिंह सरस्वतींच्या अवतारातून जो दत्तोपासनेचा प्रवाह प्रवर्तित झाला. त्या प्रवाहाशिवाय दत्तोउपासनेच्या क्षेत्रात अन्य प्रवाहही नांदत राहिले. परंतु, त्यांचे प्रवाह व्यापक नसल्याने ते वैयक्तिक उपासनेपुरतेच मर्यादित राहिले. त्यांना संप्रदायाचे स्वरूप आले नाही. आज ज्याला आपण दत्त संप्रदाय म्हणून ओळखतो, तो प्रवाह श्रीनरसिंह सरस्वतींच्या अवतार कार्यातून प्रकटला आहे.

दत्त संप्रदायाचे उपास्य असलेला दत्तात्रेय हा गुरूदेव आहे. त्याची उपासना गुरूस्वरूपातच करायची असते. 'श्रीगुरू' किंवा 'गुरूदेव दत्त' हा त्याचा जयघोष आहे. त्याचमुळे गुरूसंस्थेला प्राधान्य असलेल्या सर्व साधनप्रणालीत दत्तात्रेयाची पुज्यता रूढ झाली. परमार्थात गुरूसंस्थेचे महत्त्व स्वयंसिद्ध आहे. विकल्पविकारांचे तिमिर दूर सारून यथार्थज्ञानाचा प्रकाश दाखविण्यासाठी सद्‌गुरूची नितांत आवश्यक्ता असते. दत्तात्रेय हा परमगुरू असल्याने पथदर्शक गुरू आणि गुरूच्या मार्गदर्शनामुळे होणारी परमप्राप्ती हे दोन्ही विशेष त्याच्या स्वरूपात सामावले आहेत.

दत्त संप्रदायात सगुण ध्यानासाठी जरी दत्तात्रेयांचे सालंकृत सगुणरूप वापरले जात असले तरी पूजोपचारासाठी मूर्तीऐवजी पादुकांचे स्वरूप विशेष मानले जाते. औदुंबर, नरसोबाचीवाडी व गाणगापूर या तीनही ठिकाणी दत्तात्रेयांच्या पादुकाच आहेत. 'गुरूचरित्र', 'दत्तप्रबोध', 'दत्तमहात्म्य' आणि 'गुरूलीलामृत' हे ग्रंथ दत्त संप्रदायात विशेष मान्यता पावलेले आहेत.

**श्रीनरसिंह सरस्वती (इ. स. १३७८ – १४५८):**

श्रीनरसिंह सरस्वती हे दत्तात्रेयाचे दुसरे अवतार समजले जाणारे सत्पुरुष होते. वऱ्हाडातील लाडकारंजे या गावी त्यांचा जन्म झाला. गुरुचरित्र या ग्रंथावरूनच त्यांच्या चरित्राची माहिती मिळते. दत्तात्रेयाचे पहिले अवतारी पुरुष श्रीपाद श्रीवल्लभ हे होते. दत्तात्रेय स्वरूप अवधूतांच्या कृपेने श्रीपाद श्रीवल्लभांचा जन्म झाला. हेच पुढील जन्मी श्रीनरसिंह सरस्वती म्हणून जन्मले. यांच्या चरित्राशी अनेक आख्यायिका निगडित आहेत. या दोन्ही अवतारी पुरुषांची चरित्रे गुरुचरित्रात वर्णिलेली आहेत.

वयाच्या आठव्या वर्षी गृहत्याग करून त्यांनी काशीस प्रयाण केले. विश्वेश्वराची उपासना, योगसाधना व ब्रह्मचर्य व्रताचे पालन करीत असता आद्य शंकराचार्यप्रणीत शृंगेरी पीठाच्या परंपरेतील कृष्णसरस्वती नामक वृद्ध संन्याशाशी त्यांची भेट झाली. त्यांच्याकडूनच त्यांनी संन्यासदीक्षा घेतली. यानंतर नरसिंह सरस्वती या नावाने ते प्रसिद्ध झाले. नरसिंह सरस्वतींनी कोणाकडे अध्ययन केले, याची माहिती मिळत नाही परंतु संन्यासग्रहणानंतर त्यांनी काशी येथे अनेकांना अध्यात्ममार्गाचा उपदेश केला, वर्णाश्रमधर्माची कर्तव्ये समजून सांगितरी आणि धर्माचरणाकडे प्रवृत्त केले. येथेच त्यांनी शिष्यांचा संघही निर्माण केला. नंतर बद्रीकेदारनाथाची यात्रा करून ते सुमारे तीस वर्षांनी पुन्हा महाराष्ट्रात आले. प्रथम ते स्वग्रामी गेले आणि नंतर त्र्यंबकेश्वर, नाशिक, परळी वैजनाथ, कोल्हापूर, औदुंबर इ. क्षेत्रांना त्यांनी भेटी दिल्या. परळीस ते एक वर्ष एकांतवासात राहिले, पुढे चार महिने ते औदुंबर या क्षेत्री राहिले व नंतर ते कृष्णा–पंचगंगेच्या संगमावर असलेल्या अमरापूर या गावी आले. येथे त्यांनी बारा वर्षे वास्तव्य केले, यामुळेच हे गाव 'नरसोबाची वाडी' म्हणून प्रसिद्ध झाले. यानंतर त्यांनी भीमा–अमरणा यांच्या संगमावर असलेल्या गाणगापूर येथे सुमारे चोवीस वर्षे वास्तव्य केले. येथे त्यांनी अनेक चमत्कार केल्याचे सांगतात. शेवटी श्रीशैलमजवळ पाताळगंगेच्या प्रवाहात त्यांनी जलसमाधी घेतली.

महाराष्ट्रातील वास्तव्यात श्रीनरसिंह सरस्वतींनी अनेकांना अध्यात्माचा उपदेश केला, पीडित लोकांची दुःखे दूर केली व पर्यायाने स्वधर्माचा पुरस्कार केला. त्यांच्या काळात सुलतानी आक्रमणामुळे प्रजा गांजली होती. अशा वेळी समाजात मनोधैर्य निर्माण करण्याचे, दुःख–दैन्य दूर करण्याचे महान कार्य त्यांनी केले म्हणून ते अवतारी पुरुष मानले गेले. त्यांच्या शिष्यांपैकी माधव सरस्वती, सायंदेव, नंदी कवीश्वर, नरहरी कवीश्वर, सिद्धसरस्वती, बीदरचा सुलतान दुसरा अल्लाउद्दीन हे शिष्य प्रसिद्ध आहेत. श्रीनरसिंह सरस्वतींच्या वास्तव्याने पावन झालेली औदुंबर, नरसोबाची वाडी, गाणगापूर इ. ठिकाणे दत्तक्षेत्रे म्हणून प्रसिद्धीस आली.

संकटात सापडलेल्यांना, व्याधिग्रस्तांना, दुःखीतांना शांतीचा, अध्यात्माचा मार्ग दाखविणाऱ्या दत्त संप्रदायात श्रीनरसिंह सरस्वतींचे स्थान अनन्यसाधारण आहे.

**गुरुचरित्र :** महाराष्ट्रातील दत्तसंप्रदायाचा प्रमाणभूत उपासनाग्रंथ म्हणून 'गुरुचरित्र' हा ग्रंथ ओळखला जातो. दत्तसंप्रदायाचे एक आद्य प्रणेते श्रीनरसिंह सरस्वती (१३८३-१४५८) ह्यांचे हे चरित्र होय. श्रीनरसिंह सरस्वतींचे एक प्रमुख शिष्य सिद्ध मुनी यांनी रचिलेल्या संस्कृत गुरुचरित्राचाच हा विस्तृत अनुवाद असावा. सरस्वती गंगाधर हे ह्या ग्रंथाचे कर्ते आहेत असून त्यांनी साधारण १५३८ सालामध्ये हा ग्रंथ पूर्ण केला. सिद्ध व नामधारक यांच्या संवादरूपाने लिहिलेल्या या ग्रंथात एकूण ५२ अध्याय आहेत. दत्तसंप्रदायाचे प्रवर्तक श्रीपाद श्रीवल्लभ व श्रीनरसिंह सरस्वती यांची लीलाचरित्रे गुरुभक्ती, निरनिराळ्या क्षेत्रांचे माहात्म्य इ. विषयांची सश्रद्ध वर्णने वर्णाश्रमधर्म, ब्राह्मणवर्गाचा वेदोक्त आचारधर्म, स्त्रियांची कर्तव्ये व नीतिधर्म इ. विषयांचे उपदेशपर निरूपण भक्तीचा पुरस्कार इ. विशेष या ग्रंथात आढळतात. तत्कालीन सांप्रदायिक संकेतांनुसार चमत्कारकथांचा भरणाही त्यात आढळतो. हा ग्रंथ शुचिर्भूतपणे सोवळ्यात वाचावा व सोवळ्यातच पूजावा, असा सांप्रदायिक संकेत आहे. ह्या ग्रंथातील शब्दांत मंत्रासारखे सामर्थ्य आहे, असे भाविक समजतात.

गुरुचरित्राच्या रचनेवर मुकुंदराजाच्या 'विवेकसिंधू'चा प्रभाव असावा असे मानले जाते. कारण विवेकसिंधूतील कित्येक दृष्टांत आणि ओव्या थोड्याफार फरकाने तशाच घेतलेल्या दिसतात. गुरुचरित्रातील वाङ्मयीन गुणवत्तेपेक्षाही दत्तसंप्रदायाचा पूज्य ग्रंथ म्हणूनच त्याला मुख्यतः मान्यता लाभलेली आहे. ह्या ग्रंथाची भाषाशैली सरळ, सुबोध असली, तरी गद्यप्राय आहे. सरस्वती गंगाधराची मातृभाषा कानडी असल्याने काही ठिकाणी कानडी लकबी आढळतात. 'भाषा न ये महाराष्ट्र' असे सरस्वती गंगाधराने ह्या ग्रंथात नमूद केले आहे. सांप्रदायिक-असांप्रदायिक या दोहोंवरही या ग्रंथाची जबरदस्त पकड आहे. आकांक्षांच्या इष्ट फलश्रुतीसाठी याची सकाम पारायणे वा सप्ताह करतात. हा ग्रंथ मराठी-कानडीच्या स्नेहानुबंधाचे दृढीकरण करणारा आहे, असेही म्हटले जाते.

**ब) महानुभाव संप्रदाय :**

इ. स. बाराव्या शतकात महाराष्ट्रात देवगिरीच्या यादवांची सत्ता असताना महानुभाव संप्रदायाचा उदय झाला. सर्वसामान्य जनतेला मोक्षमार्ग सुलभ करून सांगणारे अनेक संप्रदाय फार पूर्वीपासूनच अस्तित्वात होते. मात्र, कालांतराने काळात कर्मकांडाचे प्रस्थ वाढून सकाम भक्तीचे (कोणत्यातरी इच्छे पायी केल्या जाणाऱ्या भक्तीचे) स्तोम माजले होते. याकाळात निष्काम भक्तीचा (कोणत्यातरी इच्छेशिवाय केल्या जाणाऱ्या भक्तीचा) पुरस्कार करणाऱ्या आणि सर्वांसाठी खुल्या असणाऱ्या महानुभव पंथाने जनमानसामध्ये जातिनिरपेक्षतेचा आणि अहिंसा तत्त्वाचा प्रसार केला. उगमानंतर ३०० वर्षे हा पंथ वैभवाच्या शिखरावर जाऊन पोहचला.

सद्यकाळात ‘महानुभाव’ या नावाने ओळखल्या जाणाऱ्या या पंथाला पूर्वी ‘जयकृष्णी’, ‘अच्युत’, ‘महात्मा’, ‘परमार्ग’ ‘भटमार्ग’ अशी प्रकारची अन्य नावे देखील होती. पंजाबमध्ये ‘जयकृष्णी पंथ’ आणि गुजराततेत ‘अच्युत पंथ’ ही नावे आज ही मोठ्याप्रमाणात वापरली जातात. ही दोन्ही श्रीकृष्णभक्तीचा द्योतक आहेत. या पंथातील अनुयायी परस्परांस ‘महात्मा’ म्हणत. चक्रधर यांच्यावरून ‘महात्मा’ हे नाव पंथाला मिळाले असावे असे देखील मानले जाते. ‘भटमार्ग’ हे नाव पंथसंस्थापक चक्रधारांचा पट्टशिष्य नागदेवाचार्य किंवा भटोबास याच्या नावावरून आलेले असावे. हा पंथ संत एकनाथ यांच्या काळापासून ‘मानभावपंथ’ या नावाने परिचित आहे. ‘महानुभाव’ शब्दाचा ‘महान् अनुभवः तेजः बलं वा यस्य’ म्हणजेच ‘मोठ्या तेजाने युक्त असलेल्या लोकांचा पंथ’ असाही अर्थ केला जातो. महानुभाव पंथाविषयी मुलभूत संशोधन करणारे संशोधक डॉ. वि. भि. कोलते यांच्या मते महानुभाव संप्रदायाचे मूळ नाव हे ‘परमार्ग’ असे होते.

मध्ययुगीन महाराष्ट्रातील महानुभव पंथ हा एक महत्त्वाचा पंथ होता. या पंथाचे मूळ पुरूष गोविंदप्रभू उर्फ गुंडम राऊळ हे होते. महानुभाव पंथाचे मुख्य प्रणेते हे चक्रधरस्वामी आहेत असे मानले जाते. गोविंदप्रभू किंवा गुंडम राऊळ हे या पंथाचे  मूळ महापुरुष होय. यांचा जन्म सिद्धपूरजवळ काटसरे या गावी झाला. त्यांनी चांगदेव राऊळ यांच्यापासून दिक्षा घेतल्यानंतर ते परत सिद्धपुरला आले. येथे असतानाच गोविंदप्रभू यांनी मेलेल्यांना उठवणे, पाऊस पाडणे, दुरुन गायीचे दूध काढणे, मुक्याला वाचा फोडणे, सर्पाचे विष उतरणे असे वेगवेगळे चमत्कार करून दाखवले. गोविंदप्रभूनी चक्रधरस्वामींच्या शरीरात प्रवेश केला त्यामुळे ते ‘चक्रधर’ या नावाने प्रसिद्ध झाले. चक्रधरांचे मुळ नाव ‘हरपालदेव’ असे होते. इ. स. ११९४ मध्ये म्हणजे वयाच्या २७ व्या वर्षी अनपेक्षितपणे ते मरण पावले. मात्र पुन्हा पुनर्जीवित होऊन पुढे त्यांनी हंसाबा नावाच्या मुलीशी लग्न केले. परत त्यांच्या मनात वैराग्य निर्माण झाले. भोगावती नदीच्या काठी त्यांना दत्तात्रेयाचे दर्शन झाले व त्यानंतर त्यांनी संन्यासदीक्षा घेतली व आपल्या पंथाच्या प्रचारास सुरवात केली. जवळजवळ महाराष्ट्रामध्ये त्यांना ५०० शिष्य मिळाले. चक्रधरांनी स्वत: ग्रंथ लिहिले नाहीत परंतु त्यांचे अनुभव व वचने ‘सूत्रपाठ’ या ग्रंथात केसोबाने दिलेली असून त्यामध्ये १२५५ सूत्रे आहेत.

भास्करभट बोरीकर हे एक प्रसिद्ध विद्वान पंडित होते. त्यांनी महानुभाव पंथाचे तत्त्वज्ञान आपल्या विविध ग्रंथात शब्दबद्ध केलेले आहे. 'शिशुपालवध' व 'उद्धवगीता' यासारखे प्रसिद्ध ग्रंथ आहेत. पुढे म्हाईंभट्ट यांनी  ‘लीळाचरित्र’ व ‘गोविंदप्रभू चरित्र’ या नावाचे ग्रंथ लिहिले. त्यांचे हे ग्रंथ प्रसिद्ध आहेत.

**महानुभवपंथाचे तत्त्वज्ञान :**

चक्रधर स्वामींचे तत्त्वज्ञान, आचार-विचार म्हणजेच महानुभाव संप्रदायाचे तत्त्वज्ञान होय. हा पंथ यादवकालीन आहे. त्यामुळे तत्कालीन अध्यात्म विचारांचा प्रभाव या तत्त्वज्ञानावर पडला आहे. यादव काळात वैदिक धर्माची प्रतिष्ठा मानत असत. त्यामुळे स्वाभाविकपणे शंकराचार्याच्या मायावादी अद्वैत तत्त्वज्ञानाचा प्रभाव पारमार्थिक मनावर अधिक होता. शंकराचार्याच्या मते, ‘ब्रह्म हा एकच पदार्थ नित्य असून जीव-जगत हे पदार्थ अनित्य किंवा मायिक आहेत. शंकराचार्य ते श्रीचक्रधरस्वामीपूर्व काळात रामानुजाचार्य

व निंबकाचार्य हे दोन आचार्य होऊन गेले. यामध्ये रामानुजाचार्य यांनी 'विशिष्ठादैती' तर निंबकाचार्यांनी 'द्वैताद्वैती' तत्त्वज्ञान मांडले. चक्रधरांनी त्यांच्या विरोधात 'द्वैतप्रधान' तत्त्वज्ञानावर संप्रदायाची उभारणी केली. या तत्त्वज्ञानामध्ये जीव, देवता, प्रपंच आणि परमेश्वर असे चार स्वतंत्र घटक मानले. हे स्वतंत्र घटक अनादी व अनंत आहेत. त्यातील प्रत्येक घटक इतरापासून पूर्णपणे स्वतंत्र आहे. त्यापैकी कोणत्याही दोघांत पूर्णपणे ऐक्य होऊ शकत नाही. वरील त्यांच्या भूमिकेमुळेच त्यांच्या तत्त्वज्ञानाला 'पूर्णद्वैती' म्हणतात.

महानुभव पंथाचा 'सूत्रपाठ' नावाचा ग्रंथ असून त्या ग्रंथास पंथाचा वेद मानतात. या पंथामध्ये मूर्तिपूजेचा त्याग केला आहे. जातिभेद व स्पृश्यास्पृश्य या कल्पना त्यांना मान्य नाहीत. स्त्रिया व शुद्र यांना संन्यास घ्यावयास परवानगी आहे. चक्रधराने आत्मज्ञान, भक्ती व गुरूकृपा यांना महत्त्व दिले. ज्ञानामुळे ईश्वराची ओळख होते. ज्ञानाचे शब्दज्ञान, सामान्यज्ञान, अपरोक्षज्ञान व विशेषज्ञान असे चार प्रकार आहेत. पैशाचा मोह व नातलगाचे प्रेम यांचा त्याग करून परमेश्वरास स्वीकारले पाहिजे. सर्व इंद्रिये कार्यक्षम असतानाच परमेश्वरास अनुसरले पाहिजे. शिवाय ज्ञान आणि भक्ती यांचा समन्वय साधणारा हा पंथ आहे.

महानुभावाची श्रद्धा होती की  ज्ञानापेक्षा प्रेम किंवा भक्ती श्रेष्ठ असून हा संप्रदाय संन्यासी' व 'गृहस्थी' अशा दोन वर्गात विभागला आहे. सदरच्या संप्रदायाच्या आचारधर्मात विषयसुखाच्या त्यागाला मानाचे स्थान आहे. स्त्री आणि संपत्ती या दोन्हीचा त्याग करण्यास हा संप्रदाय सांगतो. महानुभावाचे प्रवक्ते चक्रधर व नागदेव सोडल्यास सारे उच्चवर्णीय पंडितच होते. मठस्थापना भिक्षावृत्ती, शिष्यशाखा व राजमान्यता यांच्या घोळात सापडून महानुभाव पंथ सामान्यपासून दूर जाऊन आचार्य लोकांच्या रोषाला घाबरून लोकांशी तुटकपणे वागू लागले. तसेच पंथीय निर्बंध आणि सांकेतिक लिप्या यामुळे पंथ संकुचित होत गेला. त्यामुळे या पंथात या उणिवा होत्या.

**महानुभाव संप्रदायाचे कार्य :**

महानुभाव पंथ सुमारे ६०० वर्षापूर्वी स्थापन झालेला असून तत्कालीन समाजव्यवस्थेमध्ये काही अन्यायकारक रीतीरिवाजांच्या विरुद्ध आवाज उठवून एक नवीन विचारधारा चक्रधरस्वामींनी सुरू केली. त्यांनी आपल्या शिष्यांच्या पुढे परमेश्वराची प्राप्ती करण्यासाठी ज्ञानमार्ग व भक्तीचा प्रेममार्ग हे दोन मार्ग ठेवले. वैदिक धर्मामध्ये वेदांना जे महत्त्व प्राप्त झाले तेच महत्त्व चक्रधरांच्या शब्दांना प्राप्त झाले. याशिवाय वैदिक काळापासून ज्या देवता उपासल्या जात असत त्या सर्व देवता या पंथाने त्याज्य ठरवल्या. चक्रधरांच्या मते, ईश्वर मोठा असून ब्रह्माचा ईश्वरामध्ये समावेश होतो.

या पंथामध्ये स्त्रियांना व शूद्रांना इतरांच्या जोडीने प्रवेश मिळू लागला. वैदिक परंपरेनुसार स्त्रिया व क्षुद्र हे मोक्षाला पात्र नसत. वैदिक परंपरागत चालत आलेल्या चातुवर्णाला या पंथाने मान्यता दिली नाहीच तर उलट त्यावर टीका केली. चक्रधरांनी आपल्या शिष्यांना चार ही वर्णात भिक्षा मागण्याची परवानगी दिली. विशेष म्हणजे स्वत: चक्रधरांनी  अस्पृश्य मानलेल्या समाजातील व्यक्तीद्वारे  दिलेला लाडू खाल्ला व तो

इतरांनाही वाटून खाण्यास सांगितले. महानुभाव संप्रदायाने उच्चवर्णीयांची मिरासदारी यांच्याविरुद्ध आवाज उठवला.

'ज्ञान' व 'भक्ती' या दोन तत्त्वावर चक्रधरांनी आपल्या संप्रदायाची उभारणी केली. सर्वसामान्य माणसे याकडे आकृष्ट झाली. शिवाय कर्मकांडाला विटलेले वैदिक पंडित आणि प्रतिभावंतही या पंथाकडे वळले. महानुभाव संप्रदायाने बहुजन समाजाला एकत्र राखण्याचा प्रयत्न केला. याशिवाय मराठी भाषेला धर्मभाषेचे स्थान चक्रधरांनी दिले. महानुभाव पंथाद्वारे निर्मिले गेलेले साहित्य हे मध्ययुगीन मराठी साहित्य आणि संत साहित्याचा महत्त्वपूर्ण भाग आहे.

चक्रधरस्वामींनी भक्तिमार्गाचा पुरस्कार केला. परंतु वारकरी संप्रदायासारखी लोकप्रियता या संप्रदायाला लाभली नाही त्याची कारणे म्हणजे,

१) महानुभाव संप्रदायाने आचारधर्मातील संन्यास मार्गावर अवास्तव भर दिला.

२) डॉ. मु. ग. पानसेंच्या मते, महानुभवाच्या निषेधात्मक नैतिक मूल्यामुळेच हा पंथ वाढला नाही.

३) डॉ. मु. म. जावडेकर यांच्या मते, महानुभवाची व्यक्तिनिष्ठ म्हणजेच आत्यंतिक समाजभिमुखता कारणीभूत ठरली.

४) या पंथाने मूर्तिपुजेस विरोध केला. त्यामुळे हिंदुच्या मनात संप्रदायाच्या हेतूसंबंधी शंका निर्माण झाल्या.

५) या संप्रदायाचे वाङ्‌मय सांकेतिक लिपीत गुप्त ठेवल्याने जनमानसात सांप्रदायाविषयी संशयास्पद वातावरण निर्माण झाले.

**क) शाक्त संप्रदाय :**

भारतीय तंत्रमार्गातील एक संप्रदाय म्हणून शाक्त संप्रदायास ओळखले जाते. पारंपारिक धर्मग्रंथामध्ये तंत्रमार्गातील वेगवेगळ्या शाखांच्या उदयासंबधी उल्लेख सापडतात. शिवाच्या उर्ध्व मुखातून शाक्त तंत्रे जन्मास आली असल्यामुळे त्यांना 'ऊर्ध्वाम्याय' असेही समजले जाते. 'भोग' आणि 'मोक्ष' हे तांत्रिक उपासनेचे लक्ष दुहेरी प्रकारचे आहे. शाक्त तंत्रामध्ये 'भोग' हा शब्द 'उपभोग' या अर्थी आलेला आहे. त्या विशिष्ठ संदर्भात त्या तांत्रिक उपासनेला 'कुलाचार' किंवा 'वामाचार' म्हटले जाते. तथापि, सर्वच शाक्तपंथ आणि त्यांचा सर्व तंत्र संप्रदाय हा 'वामाचार' आहे असा गैरसमज कित्येक वेळा दिसून येतो.

शैव संप्रदायाचा एक भाग शाक्तपंथ असला तरी त्याचा वेगळेपणा जाणवतो. शैव पंथ हा शिवप्रधान तर शाक्त पंथ हा शक्तीप्रधान आहे. या पंथातील बऱ्याच ग्रंथाची रचना शिव व शक्ती यांच्या संवादाच्या रूपात केलेली आहे. ज्या ग्रंथामध्ये 'पार्वती' (शक्ती) ही प्रश्न विचारणारी असून 'शिव' हा उत्तर देणारा असतो अशा प्रकारे पार्वती-शंकर संवादात्मक ग्रंथ शाक्त संप्रदायातील ग्रंथ होय. या ग्रंथामध्ये त्याच्या उलटही

स्थिती दिसून येते. शाक्तगर्भामध्ये सृष्टी, स्मिती, संहार, अनाख्या व भासा अशा पाच पराशक्ती मानलेल्या आहेत. त्यांचे विवेचन शाक्त संप्रदायाच्या आगमसंहितांमध्ये केलेले आढळते.

शैव संप्रदाय व शिवाची उपासना सिंधू संस्कृती इतकीच प्राचीन असल्याचे संशोधकांचे मत आहे. शैव व शाक्त पंथाचे अस्तित्व दाखविणारे संदर्भ महाभारतात आढळतात. ८४ सिद्धांपैकी मत्स्येंद्रनाथ किंवा मच्छिंद्रनाथ (सुमार १० वे शतक) हे नाथपंथाचे तसेच कौलतंत्राचे प्रवर्तक मानले जातात. कौलमार्ग हा शाक्त संप्रदायातीलच एक उपपंथ आहे. 'कुर्जिकामन', 'कुब्जिकोपनिषद', 'मतोत्तर', 'भिदगमनचंद्रिका' इ. ग्रंथ शाक्त परंपरेचे आधारभूत ग्रंथ आहेत.

'शाक्त' म्हणजे 'शक्ती' ही या पंथाची उपास्य देवता आहे. तिची 'परमतत्त्व' स्वरूपात उपासना हा पंथ करतो. या पंथामध्ये 'काली' व 'त्रिपुरी' असे दोन संप्रदाय आहेत. शाक्त पंथात शक्ती व शक्तीमान त्यांची एकात्मता (अद्वैत) प्रस्थापित केलेली आढळते. शुद्ध परब्रह्म ते अदिवर्ण आकार रूपात प्रकट होते. या आकारास शाक्त पंथात 'अनुत्तर अकार' असे म्हणतात. ह्या आकाराच्या चार कला असून जया, विजया अजिसा आणि अपराजिसा अशा परब्रह्माच्या चार शक्ती त्या – त्या कलांच्या रूपांत प्रकट होतात.

परब्रह्माच्या चार पराशक्ती, चार परंपरा शक्ती व अपरा शक्ती मानाच्या आहेत. जया इत्यादी चार गुह्य शक्ती ह्या चार अपरा शक्ती आहेत. योगवासिष्ठात ह्या चार शक्तीसमवेत सिद्धा, रक्ता अलम्बुषा व उत्पला अशी आणखी चार शक्तींची नावे येतात. ह्या आठ शक्ती मातृकामध्ये श्रेष्ठ असून त्यांचा स्वभाव रौद्र आहे. त्या तुंबरू नामक रुद्राच्या आश्रीत आहेत. नित्या नामक शाक्त संप्रदायात त्या शक्तीचे नाव नित्या असे आहे. नित्या, त्रिक, क्रम, कुल इ. शाक्त पंथ हे अद्वैतवादी असून त्यामध्ये शक्ती ही परमशक्ती मानली जाते. शिवा आदी सर्व तत्त्वांची उत्पत्ती भगवती अंबेपासून आली आहे. सर्व विश्व हे मूलत: शक्तीमध्ये आस्त्रित असून ती त्यास बाह्य स्वरूपात प्रकट करते. ह्या सिद्धांतास 'शक्तिपारम्यवाद' असे नाव आहे. पुढील काळात शैव व शाक्त दर्शन मिळून शांभव दर्शन निर्माण झाले. त्यामध्ये शिव व शक्ती यांची समानता प्रस्थापित केली आहे. काश्मिरमध्ये प्रस्थापित झालेला 'क्रम संप्रदाय' हा ह्या शक्ती पारम्यवादाचा प्रमुख पुरस्कर्ता आहे. सदरच्या पंथानुसार काली पाच प्रकारची कृत्ये करते. ती पाच कृत्ये म्हणजे क्षेप, ज्ञान, प्रसंख्यान, गती आणि नाद ही ती पाच कृत्ये आहेत. याचा अर्थ क्षेप म्हणजे स्वात्म्यांचे भेदन होय. त्याची निर्विकल्प स्थिती म्हणजे ज्ञान होय. तसेच सविकल्प रूप हे प्रसंख्यान होय. प्रतिबिंबाच्या रूपात प्रकट होणे ही गती आणि आत्मस्वरूपात पुन्हा विलीन होणे हा नाद होय. अशा प्रकारे ही पाच कृत्ये करणारी म्हणजेच – कलनांना करणारी – देवी ही 'काली' या नावाने ओळखली जाते. तसेच सृष्टी, स्थिती, संहार व अनाख्या असा चार तत्त्वांचा क्रम मानणारा 'संप्रदाय क्रम' या नावाने प्रसिद्ध आहे. तर काही आचार्य 'भासा' हे पाचवे तत्त्व मानतात. महेश्वरानंद विरचित 'महार्थमंजरी' व त्या ग्रंथावरील 'परिमल टिका' क्रमदर्शनाचे विस्ताराने विवेचन करतात.

'त्रिपुरा' हा देखील संप्रदाय क्रमदर्शनाप्रमाणेच कौल संप्रदायाचे अनुकरण करतो. त्रिपुरा संप्रदायात तीन शक्ती, तीन चक्रे, तीन धाम, तीन बिजे, तीन तत्त्वे इ. तीन पदार्थांची जननी त्रिपुरा आहे असे मानतात.

शिव-शक्ती व नर वा तीन स्वरूपाचे विशेष विवेचन या संप्रदायात आढळते. त्यामुळे यास 'त्रिक दर्शन' म्हणतात. त्रिपुरा दर्शनाचा खरा प्रसार काश्मीरमध्ये झाला. राजा अवंतीवर्मन (इ. स. ८५५-८३) राज्य करीत असताना कौल व क्रम हे संप्रदाय प्रतिष्ठीत झालेले होते. त्रिपुरा दर्शनाचा प्रसार त्या सुमारास होऊ लागला. ह्या दर्शनाचा काश्मीरमध्ये बंगाल व केरळात प्रसार झालेला दिसतो.

तसेच त्रिपुरा संप्रदायात 'वामकेश्वर दर्शन' हे महत्त्वाचे शास्त्र आहे. त्या मतानुसार परमतत्त्वास संविच्छशक्ती म्हणतात. तिच्यापासून सर्व सृष्टी निर्माण होते. शिव व शक्ती अशी दोन तत्त्वेही तिच्यापासून निर्माण होतात. हिला 'महात्रिपुरसुंदरी' असेही नाव आहे. तिच्या उपासनेचे अंतर्याग व बहिर्यांग असे दोन प्रकार आहेत या प्रकारे उपासना करणाऱ्या साधकास भोग आणि मोक्ष ह्या दोहोंचीही प्राप्ती होते. या संप्रदायातील ग्रंथामध्ये मातृका (वर्ण), मंत्र व मुद्रा यांच्या सहाय्या केल्या जाणाऱ्या उपासनेचे विस्ताराने वर्णन आढळते. नित्योषोड शिकार्णव अथवा वामकेश्वर तंत्र हा संप्रदायातील एक प्रमुख ग्रंथ होय. सौंदर्य लहरी हे प्रसिद्ध स्तोत्रही या संप्रदायाचे प्रतिपादन करते.

'त्रिपुरसुंदरी' हे परमोच्च शक्तीचेच स्वरूप आहे. ती सुंदर युवतीच्या रूपात प्रकट होते. तिच्या संप्रदायास 'सौभाग्य संप्रदाय' असे नाव आहे. श्रीचक्र आणि श्रीविद्या ह्यांची उपासना ह्या संप्रदायाची महत्त्वाची अंगे आहेत. श्रीचक्र किंवा श्रीयंत्र ही नऊ त्रिकोपंनी बनलेली रेखाकृती आहे. श्रीविद्या ही १५ संस्कृत वर्णाची मालिका असून लौकिक भाषेच्या दृष्टिकोणातून अर्थहिन आहे. ती वाग्भव, कामराज व शक्ती अशा तीन विभागांनी युक्त आहे. अमृतानंद, शिवानंद, लक्ष्मीधर, भास्करराव इ. आचार्यांनी नित्याषोड शिकार्णव, योगिनीहृदय इ. ग्रंथावर लिहिलेल्या टिकांमध्ये या संप्रदायाचे तत्त्वज्ञान विस्तृत स्वरूपात सापडते.

शाक्त संप्रदायातील ग्रंथ संस्कृतप्रमाणे बंगाली, मैथिली, हिंदी, राजस्थानी, ब्रज, पंजाबी अशा भाषांमधूनही निर्माण झाले. या संप्रदायातील चंडीमंगल, कालिकामंगल इ. गीते व स्तोत्रे या भाषांमध्ये रचली गेली आहेत. प्राचीन काळापासून चालत आलेल्या ह्या संप्रदायाने १८ व्या शतकात नवे स्वरूप धारण केले. शक्तीची उपासना व भक्तिसंप्रदायाचे मिश्रण असलेल्या ह्या संप्रदायातील महानसाधक रामकृष्ण परमहंस हे होत. त्यांच्या उपदेशात ह्या नवशाक्त पंथाचे सार सापडते.

**स्वयं अध्ययनासाठी प्रश्न - १**

(अ) एका वाक्यात उत्तरे लिहा.

(१) दत्त संप्रदायात पूजोपचारांसाठी मूर्तीऐवजी कशाला प्रशस्त मानले आहेत.

(२) 'गुरुचरित्र' हा ग्रंथ कोणाचे चरित्र आहे.

(३) महानुभाव पंथाचे मूळ पुरुष कोणाला मानले जाते.

(४) कोणत्या ग्रंथास महानुभाव संप्रदायाचा वेद मानतात.

(५) शाक्त पंथामध्ये परमोच्च शक्तीचे स्वरूप काय आहे.

(ब) रिकाम्या जागी योग्य शब्द भरा.

(१) गुरुचरित्राच्या रचनेवर मुकुंदराजाच्या ................ चा प्रभाव असावा असे मानले जाते.

(२) महानुभाव पंथाचे मुख्य प्रणेते हे ................ आहेत असे मानले जाते.

(३) डॉ. वि. भि. कोलते यांच्या मते महानुभाव संप्रदायाचे मूळ नाव हे ................ असे होते.

(४) म्हाईंभट्ट यांनी .................... आणि 'गोविंदप्रभूचरित्र' हे ग्रंथ लिहिले.

(५) .......................... हा शाक्त संप्रदायातीलच एक उपपंथ आहे.

### ४.२.२ महाराष्ट्र धर्म :

महाराष्ट्राची भौगोलिक रचना ही महाराष्ट्राला उत्तर भारत आणि दक्षिण भारत यांच्या पासून सामजिक-सांस्कृतिक-राजकीय भिन्नता प्रदान करते. महाराष्ट्राला मिळालेल्या या सामाजिक-सांस्कृतिक-राजकीय भिन्नतेचा परिणाम हा महाराष्ट्राच्या ऐतिहासिक जडणघडणीवर झाल्याचे आपल्याला दिसून येते. महाराष्ट्राची ऐतिहासिक जडणघडण ही छत्रपती शिवाजी महाराजांच्या स्वराज्य स्थापनेमागील एक महत्त्वाचे कारण असल्याचे इतिहासकार मानतात. महाराष्ट्रातील सामाजिक-सांस्कृतिक परिस्थितीमुळे महाराष्ट्राची एक वैशिष्ट्यपूर्ण आचारपरंपरा-विचारपरंपरा अस्तित्वात आल्याचे मानले जाते, ज्याला 'महाराष्ट्रधर्म' म्हणून ओळखले जाते.

मराठा इतिहासात 'महाराष्ट्रधर्म' या संकल्पनेला एक वेगळे महत्त्व आहे. 'महाराष्ट्रधर्म'चा आरंभीचा उल्लेख साधारणपणे इ. स. १४ व्या शतकात लिहिलेल्या 'महिकावतीची बखर' अथवा 'माहीमची बखर' यामध्ये मिळतो. 'श्रीदेवी आदिशक्ती जगदंबिका महाराष्ट्रधर्मराक्षिका' असा माहीममधील स्थानिक देवतेचा उल्लेख महिकावतीच्या बखरमध्ये करण्यात आला आहे. महिकावतीच्या बखर मध्ये महाराष्ट्रधर्म हा कुळाचार, वंशाचार, देशाचार आणि परंपरा या अर्थाने वापरण्यात आला आहे. दत्त संप्रदायाचा महत्त्वपूर्ण ग्रंथ असलेल्या 'गुरुचरित्र' मध्ये वेदप्रामाण्य, वर्णाश्रमधर्म, सदाचार, व्रत-वैकल्ये अशा अर्थाने 'महाराष्ट्रधर्म' हा उल्लेख आला असल्याचे दिसून येते. संत रामदास स्वामी यांनी लिहिलेल्या साहित्यात शिवाजी महाराजांच्या संदर्भात 'महाराष्ट्रधर्म राहिला तुम्हां कारणे', असा उल्लेख आला आहे. तर छत्रपती संभाजी महाराजांच्या संदर्भात 'मराठा तितुका मेळवावा, आपला महाराष्ट्रधर्म वाढवावा' असा उल्लेख समर्थ रामदास यांनी केल्याचे दिसून येते. सन १७६१ च्या पानिपतच्या युद्धाशी संबंधित 'भाऊसाहेबांची बखर'मध्ये देखील 'महाराष्ट्रधर्म' ही संकल्पना सामाजिक जीवनातील आणि लष्करी जीवनातील आदर्श स्वरूपातील विशिष्ट वर्तवणूकीच्या अनुषंगाने वापरण्यात आला आहे. याशिवाय इतर बखरींमध्ये व काही ऐतिहासिक पत्रांमध्ये देखील 'महाराष्ट्रधर्म'चा उल्लेख करण्यात आल्याचे आढळते. महाराष्ट्रधर्म संबंधी वरील उल्लेखांचा विचार करता महाराष्ट्रधर्म ही संकल्पना वेगवेगळ्या अर्थाने वापरण्यात आल्याचे आपणास दिसून येते. मात्र, 'महाराष्ट्रधर्म'

ही संकल्पना प्रादेशिक अर्थाने 'महाराष्ट्र' आणि येथील सामाजिक-सांस्कृतिक परंपरा आणि वर्तवणूकीशी संबंधित असल्याचे स्पष्ट होते.

'महाराष्ट्रधर्म'चे अनेक उल्लेख मराठा काळात आपणास दिसून येत असले तरी या संकल्पनेच्या अर्थनिर्धारणासंदर्भाने विस्तृत चर्चा ही २० व्या शतकातील महाराष्ट्रात घडून आली. महाराष्ट्रात ब्रिटीश सत्ता स्थापन झाल्यानंतर मराठा इतिहासाच्या संदर्भाने नव्या आधुनिक दृष्टीकोनातून इतिहासलेखनाला आरंभ झाला. ग्रँट डफ नावाच्या ब्रिटीश प्रशासकीय अधिकाऱ्याने "History of the Marathas' हा मराठा इतिहासावरील ग्रंथ सन १८२६ मध्ये प्रकाशित केला. शिवपूर्वकालीन महाराष्ट्रापासून आरंभ करून पेशवाईच्या अस्तापर्यंतचा इतिहास ग्रँट डफ याने आपल्या ग्रंथात मांडला. ग्रँट डफ याने छत्रपती शिवाजी महाराज यांनी स्थापन केलेल्या मराठा राज्याचे वर्णन करताना 'सह्याद्रीच्या डोंगर रांगामध्ये ज्या प्रकारे अचानक वणवा लागतो तसे मराठा राज्य अस्तित्वात आले' अशा आशयाची मांडणी केली. मराठ्यांनी राज्य स्थापून त्याचा संपूर्ण हिंदुस्थान विस्तार करण्याची मोठी कामगिरी केली असली तरी यामागे कोणत्याही प्रकारची राष्ट्रीय भावना नव्हती, असे मत ग्रँट डफने आपल्या ग्रंथात नोंदवले आहे. अशाच प्रकारचे मत जॉन सील यांच्या सारख्या ब्रिटीश इतिहासकारांनी देखील मांडले. ग्रँट डफच्या या मांडणीमूळे मराठा राज्य हे अचानक स्थापन झाले आणि त्याच्या स्थापनेमागे कोणतीही विचारधारा अथवा उद्दिष्ट नव्हते असे अभिप्रेत होते. ग्रँट डफच्या या मांडणीच्या आणि एकूणच या ग्रंथातील आशयामूळे महाराष्ट्रात तीव्र प्रतिक्रिया उमटलेली दिसते.

ब्रिटीश सत्तेच्या स्थापनेनंतर महाराष्ट्रात ब्रिटीशांनी आधुनिक शिक्षण पद्धतीची सुरवात केली. तसेच नवशिक्षित भारतीयांना नव्या प्रकारच्या नोकऱ्यांमध्ये संधी मिळाली. आधुनिक शिक्षण घेतलेल्या आणि नोकरी प्राप्त झाल्यामुळे मध्यमवर्गीय जाणीवा जागृत झालेल्या महाराष्ट्रातील नवशिक्षित मध्यमवर्गीय समुदायात 'राष्ट्रवादी' भावनेचा उदय झाला होता. मराठ्यांच्या सत्तेच्या स्थापनेच्या प्रक्रियेचे ग्रँट डफ द्वारे झालेले अवमूल्यन हे महाराष्ट्रातील नवशिक्षित राष्ट्रवादी अभ्यासकांना योग्य वाटले नाही. नीलकंठ जनार्दन कीर्तने यांनी ग्रँट डफने लिहिलेल्या ग्रंथावर टीका करणारा लेख लिहिला. ग्रँट डफच्या मांडणीचा सुव्यवस्थित प्रतिवाद न्या. महादेव गोविंद रानडे यांनी आपल्या "Rise of Maratha Power' या सन १९०० मध्ये प्रकाशित ग्रंथाद्वारे केला. इ. स. १५ व्या शतका दरम्यान युरोपात झालेल्या पुर्नजागरणामुळे युरोपात मोठी वैचारिक क्रांती घडून आली होती. अगदी त्याच प्रमाणे इ. स. १५ ते १७ व्या शतकात महाराष्ट्रात देखील वैचारिक क्रांती होऊन त्या आधारेच मराठा सत्तेची स्थापना आणि विस्तार झाला असे मत न्या. रानडे यांनी मांडले. युरोपात ज्या प्रकारे चर्च आणि धर्मगुरूंनी विचार स्वातंत्र्यावर घातलेल्या बंधनांना पुर्नजागरण काळात झुगारून देऊन वैचारिक क्रांती केली होती. महाराष्ट्रातील साधू-संतानी श्रुतीस्मृतीप्रणीत पारंपारिक कर्मकांडवादी धर्मआचरणाच्या रूढी झुगारून युरोपातील पुर्नजागरणाइतकीच सामाजिक क्रांती घडविली असल्याचे मत न्या. रानडे यांनी आपल्या ग्रंथात मांडले. महाराष्ट्रीय साधूसंतानी दोन तीनशे वर्षे महाराष्ट्रातील जनतेस सतत उपदेशिलेल्या धर्मामुळे म्हणजेच 'भागवतधर्म' अथवा 'महाराष्ट्रधर्मा'मुळे छत्रपती शिवाजी

महाराजांच्या स्वराज्य स्थापनेच्या महान कार्यात महाराष्ट्रातील जनता सहभागी झाली. संतानी दिलेल्या महाराष्ट्र धर्माच्या शिकवणुकीमुळे सर्वप्रकारच्या स्वार्थाचा त्याग करून स्वराज्य स्थापनेत सहभागी झालेली सामान्य जनता, सैनिक, वतनदार, एकनिष्ठ व धाडसी सहकारी, एकनिष्ठ सैन्य या शक्तींचा समन्वय होऊन छत्रपती शिवाजी महाराज यांच्या नेतृत्त्वात स्वराज्याची स्थापना झाली. स्वराज्य स्थापनेस जसा 'भागवतधर्म' अथवा 'महाराष्ट्रधर्म' कारणीभूत ठरला तसाच स्वराज्याच्या प्रसाराच्या प्रेरणेमागे देखील 'महाराष्ट्रधर्म' महत्त्वाचा ठरला, असे न्या. रानडे यांचे मत होते. महाराष्ट्रातील महानुभाव संप्रदाय, वारकरी संप्रदाय, नाथ संप्रदाय, दत्त संप्रदाय इत्यादी भक्ती संप्रदायातील चक्रधर स्वामी– संत ज्ञानेश्वरांपासून ते संत तुकाराम यांच्यापर्यंतच्या संत मंडळींनी महाराष्ट्रात सनातन धर्मातील वर्णव्यवस्था, जातीव्यवस्थेची तीव्रता पुष्कळ कमी करून समाजातील आध्यात्मिक गुणांची वाढ करण्याचे महत्त्वपूर्ण कार्य केले. मानवता, सहिष्णुता, सलोखा इत्यादी मूल्यांच्या वाढीस या संत मंडळीनी प्रेरणा दिली. विधी, कर्मकांडे, सोहळे, यात्रा, उपोषणे, विद्वत्ता यांच्या पेक्षा प्रेम व भक्ती यांच्या सहाय्याने केलेल्या ईश्वर आराधनेला जास्त महत्त्व असल्याचा विचार संत मंडळीनी लोकांमध्ये रुजवला. अशाप्रकारे वैचारिकता आणि क्रियाशीलता या दोन्ही क्षेत्रातील समाजाची कार्यक्षमता वाढली. परकीय वर्चस्वातून स्वत:ला सोडवून स्वराज्य स्थापनेस अनुकूल असे जनमानस हे महाराष्ट्रात संतमंडळीच्या कार्यामुळे तयार झाले. असे मत न्या. रानडे यांनी मांडले.

सन १९१७ साली मुंबई विद्यापीठातर्फे 'महाराष्ट्रातील भक्तीमार्गी संत, त्यांचे वाङ्मय व कार्य' या विषयावर संत साहित्याचे अभ्यासक आणि समीक्षक वासुदेव बळवंत पटवर्धन यांनी इंग्रजीतून सात व्याख्याने "Wilson Philological Lectures" या व्याख्यानमालेतून दिली. त्यांपैकी सहा व्याख्यानांचा मराठी अनुवाद 'मासिक मनोरंजन' मध्ये प्रसिद्ध झाला होता. या व्याख्यानांतून पटवर्धनांनी काही नवे विचार मांडले ज्यात 'महाराष्ट्रधर्म' संबधीच्या विवेचन देखील होते. वा. ब. पटवर्धन यांच्या मते, भक्तीपंथाच्या पूर्वीच्या काळात महाराष्ट्रात अनेक समूह नांदत असून एकत्रित समाजा अस्तित्वात नव्हता. भक्ती संप्रदायाने महाराष्ट्रातील वेगवेगळ्या समूहांना एकत्र आणून एक समाज निर्माण करण्याचे कार्य केले. भक्तीसंप्रदायातील साहित्य हे अध्यात्मिक लोकशाहीचे साहित्य होते. या साहित्यातून समता, बंधुता आणि आध्यात्मिक स्वातंत्र्य यांचा प्रसार झाला. संत साहित्याने समाजाला मातृभाषेविषयी, मराठी भाषेविषयी अस्मिता दिली. संतांच्या साहित्यामुळे साहित्य हे एका विशिष्ट समाज घटकाचे न राहता मराठी साहित्य झाले. संत साहित्याने निर्माण केलेले आध्यात्मिक आदर्श आणि ध्येय यांच्यात एकात्मकता स्थापित केली. या एकात्मतेचा परिणामी समाजात भौतिक आदर्श, ध्येय व भाषा यांचीही एकात्मता झाली. म्हणून भक्तीपंथाच्या संतानी केवळ साहित्य निर्माण केले नसून महाराष्ट्रातील लोकांना त्यांनी राष्ट्र म्हणून आकार दिला. म्हणजेच महाराष्ट्रधर्माच्या रूपाने वैचारिक बदल घडवून आणला असा वा. ब. पटवर्धन यांच्या मांडणीचा मतितार्थ होता.

न्या. रानडे यांच्या मांडणीने 'महाराष्ट्रधर्म'च्या संकल्पनेच्या अर्थान्वयावरून मोठ्या वैचारिक वादास तोंड फुटले. वा. ब. पटवर्धन सारखे विचारवंत न्या. रानडे यांच्या मताशी साधर्म्य व्यक्त करणारी मते मांडत

असले तरी न्या. रानडे यांच्या मताच्या एकदम विरुद्ध मत असणारे विचारवंत महाराष्ट्रात होते. न्या. रानडे यांचे समकालीन असलेले प्रख्यात इतिहाससंशोधक वि. का. राजवाडे यांनी 'महाराष्ट्रधर्म' या संकल्पनेची केलेली व्याख्या न्या. रानडे यांच्या पेक्षा भिन्न होती. 'मराठ्यांच्या इतिहासाची साधने' या ग्रंथाच्या प्रथम खंडाच्या प्रस्तावनेत विश्वनाथ काशिनाथ राजवाडे यांनी महाराष्ट्र धर्माच्या व्याप्ती बद्दल व अर्थाबद्दल विवेचन केले आहे. समर्थ रामदास यांनी शिवाजी महाराजांच्या मृत्यूनंतर संभाजी महाराजांना लिहिलेल्या पत्रामध्ये 'मराठा तितका मेळवावा । आपुला महाराष्ट्र धर्म वाढवावा ।।' अशा प्रसिद्ध वाक्याच्या आधारावर राजवाडे यांनी हे विवेचन केले आहे. महाराष्ट्रातील लोकांवर मुस्लिम राज्यकर्त्यांच्या आक्रमणामुळे झालेला अत्याचार त्यांच्यावर उडवलेली संकटे यांचे वर्णन करून राजवाडे यांनी महाराष्ट्र धर्माची व्याख्या केली आहे. ख्रिस्ती धर्म, इस्लाम धर्म, यहुदी धर्म यांच्यासारखा 'महाराष्ट्र धर्म' आहे का? त्याचप्रमाणे महाराष्ट्र धर्म म्हणजे हिंदूधर्मच की काय? असे प्रश्न उपस्थित करून राजवाडे म्हणतात की, ख्रिस्ती धर्म, इस्लाम धर्म, यहुदी धर्म यांच्यासारखा महाराष्ट्रधर्म नाही. 'महाराष्ट्र धर्म' म्हणजे केवळ हिंदू धर्म देखील नाही. महाराष्ट्रधर्माची व्याख्या ही हिंदू धर्माच्या व्याख्येहून जास्त विस्तृत आहे. असे विवेचन करून राजवाड्यांनी महाराष्ट्रधर्माची फोड पुढील प्रमाणे केली आहे.

*हिंदू धर्म + धर्मस्थापना + गोब्राह्मणप्रतिपालन = स्वराज्यस्थापना + एकीकरण + धुरीधारण = महाराष्ट्रातील हिंदू धर्म*

महाराष्ट्रधर्माची फोड करून सांगण्याकरिता राजवाडे यांनी मांडलेल्या समीकरणामध्ये पहिल्या भागातील तिन्ही मुद्द्यांचे म्हणजे 'हिंदू धर्म + धर्मस्थापना + गोब्राह्मणप्रतिपालन' यांचे एकत्रिकरण केल्यानंतर जो एक अर्थ तयार होतो तो म्हणजे 'हिंदू धर्माची पुनर्स्थापना' होय. समीकरणातील दुसऱ्या भागात मध्ये असलेले तीन भाग म्हणजे 'स्वराज्यस्थापना + एकीकरण + धुरीधारण' एकत्र केल्यानंतर त्याचा साधारणपणे अर्थ 'लोकांना एकत्रित करून स्वराज्याची स्थापना करणे' असा होतो. त्यामुळे वि. का. राजवाडे यांच्या मते, 'महाराष्ट्रधर्म' म्हणजे हिंदू धर्माची पूर्ण स्थापना आणि स्वराज्यस्थापना होय. राजवाडे हे महाराष्ट्रधर्माला राजकीय संकल्पनेच्या दृष्टिकोनातून पाहत असल्यामुळे महाराष्ट्रधर्मातील मूल तत्त्व हे स्वराज्याची स्थापना असे आहे हे राजवाडे मानतात. वि. का. राजवाडे असे देखील म्हणतात की, शिवाजी महाराजांच्या काळात 'धर्म स्थापना' या शब्दामध्ये 'स्वराज्य स्थापना' समाविष्ट आहे अथवा 'धर्म स्थापना' म्हणजेच 'स्वराज्य स्थापना' होय.

राजवाड्यांच्या मते, महाराष्ट्र बाहेरील हिंदू धर्म हा 'सहिष्णू' म्हणजेच समावेशी अथवा सहनशील होता. मात्र महाराष्ट्रातील हिंदू धर्म हा 'जयुष्णू' म्हणजे जिंकणारा किंवा जय मिळवणारा होता. मराठी भाषेतील 'धर्म' या संकल्पनेमध्ये 'गुण', 'कर्तव्य', 'दान' आणि 'दुःखाच्या नाशाचे मार्ग' समाविष्ट आहेत. न्या. रानडे यांनी महाराष्ट्र धर्माचा अर्थ लावताना 'धर्म' म्हणजे 'दुःखाच्या नाशाचे मार्ग' असा अर्थ लावून सनातन धर्म विरुद्ध महाराष्ट्र धर्म आहे अशी आपली समजूत करून घेऊन मांडणी केली असल्याचे राजवाडे मानतात. मात्र महाराष्ट्र धर्म या शब्दचा उल्लेख करणाऱ्या मराठाकालीन व्यक्तींना महाराष्ट्रधर्म मधील 'धर्म'

म्हणजे 'कर्तव्य' म्हणून अभिप्रेत होता. जसा क्षात्रधर्म, सेवाधर्म, राजधर्म, स्त्रीधर्म, पुरुषधर्म वगैरे शब्दांमध्ये जसा 'धर्म'चा अर्थ 'कर्तव्य' आहे तसाच अर्थ महाराष्ट्र धर्मासाठी आहे. 'महाराष्ट्रधर्म' म्हणजे 'सर्व महाराष्ट्राच्या मराठ्यांचे कर्तव्य' असा रामदासप्रणीत आशय असल्याचे मत राजवाडे यांनी मांडले.

आतापर्यंत चर्चिले गेलेल्या मुद्यांच्या आधारे असे म्हणता येते की, मराठा काळातील कागदपत्रे, संतसाहित्य, बखरी इत्यादीमधील उल्लेखावरून महाराष्ट्रधर्म ही संकल्पना विविध अर्थाने वापरली गेल्याचे दिसून येते. महाराष्ट्रातील सामाजिक-सांस्कृतिक परंपरा, नीती मुल्ये, आचारपरंपरा इत्यादी अर्थाने 'महाराष्ट्रधर्म' चा उल्लेख आपल्याला मराठाकालीन कागदपत्रांमध्ये आढळतो. आधुनिक काळात मराठा इतिहासाचे लेखन सुरु झाल्यानंतर 'महाराष्ट्रधर्म' या संकल्पनेच्या अर्थावरून महाराष्ट्रातील अभ्यासक-विचारवंत यांच्यात मोठ्याप्रमाणात वैचारिक चर्चा झाली. या वैचारिक चर्चेत प्रामुख्याने न्या. रानडे आणि वि. का. राजवाडे यांचे दोन प्रवाह ढोबळमानाने दिसतात. परकीय सत्तेला विरोध, हिंदू धर्म पुनर्स्थापना, गोब्राम्हणप्रतिपालन इत्यादी वि. का. राजवाडे यांच्या मांडणीतील 'महाराष्ट्रधर्म' मधील ठळक मुद्दे होते. तसेच 'महाराष्ट्रधर्म' ची प्रेरणा समर्थ रामदास असून त्यांनी 'महाराष्ट्रधर्म' चे समाजास निरुपण केले, असे राजवाडे यांचे मत होते. संत ज्ञानेश्वर यांच्या पासून ते संत तुकाराम यांच्या पर्यंतच्या संतांचा भक्तीमार्ग हा वेगळा होता किंबहुना 'महाराष्ट्रधर्म'ला आडकाठी ठरेल अशा स्वरूपाचा होता, असे देखील वि. का. राजवाडे यांचे मत होते. राजवाडे यांनी व्यक्त केल्या मतासारखीच मांडणी चिं. वि. वैद्य, वि. वा. भट, वि. दा. सावरकर इत्यादींनी केलेली आहे.

राजवाडे यांच्या मांडणी पेक्षा वेगळी मांडणी न्या. रानडे यांनी केली. न्या. रानडे यांच्या मताप्रमाणेच मांडणी ही राजारामशास्त्री भागवत, सर रामकृष्ण गोपाळ भांडारकर, वा. ब. पटवर्धन इत्यादींनी केली असल्याचे दिसून येते. न्या. रानडे आणि त्यांच्या मताशी सहमत असलेल्या अभ्यासकांनी छत्रपती शिवाजी महाराजांच्या स्वराज्य स्थापनेसाठी पृष्ठभूमी तयार करणाऱ्या, सर्वसमावेशक असलेल्या, युरोपातील वैचारिक क्रांतीच्या समक्ष असलेल्या, महाराष्ट्रीय संतमंडळींचे योगदान असलेल्या व्यापक स्वरूपातील 'महाराष्ट्रधर्म' संबधीची मांडणी केली.

**स्वयं अध्ययनासाठी प्रश्न – २**

(अ) एका वाक्यात उत्तरे लिहा.

(१) सन १७६१ च्या पानिपतच्या युद्धाशी संबंधित कोणत्या बखरीमध्ये महाराष्ट्रधर्मचा उल्लेख आहे.

(२) "Rise of Maratha Power' हा ग्रंथ कोणी लिहिला.

(३) राजवाडे यांच्या मते 'महाराष्ट्रधर्म' ची प्रेरणा कोणी दिली.

(४) मराठ्यांच्या इतिहासाची साधने हा ग्रंथ कोणी संपादित केला.

(५) राजवाडे यांच्या मते महाराष्ट्रधर्मातील मूल तत्त्व कोणते.

(ब) रिकाम्या जागी योग्य शब्द भरा.

(१) 'महाराष्ट्रधर्म'चा आरंभीचा उल्लेख इ.स. १४ व्या शतकात लिहिलेल्या ......................... बखरमध्ये मिळतो.

(२) महाराष्ट्रातील साधू-संतानी पारंपारिक रूढी झुगारून युरोपातील ...................... इतकीच सामाजिक क्रांती घडविली असल्याचे मत न्या. रानडे यांनी मांडले.

(३) .................. म्हणजे 'सर्व महाराष्ट्राच्या मराठ्यांचे कर्तव्य' असा रामदासप्रणीत आशय असल्याचे मत राजवाडे यांनी मांडले.

(४) राजवाडे यांच्या मते, महाराष्ट्रातील हिंदू धर्म हा ......................... म्हणजे जिंकणारा किंवा जय मिळवणारा होता.

(५) .............................. मध्ये वेदप्रामाण्य, वर्णाश्रमधर्म, सदाचार, व्रत-वैकल्ये अशा अर्थाने 'महाराष्ट्रधर्म' हा उल्लेख आला असल्याचे दिसून येते.

### ४.२.३ इस्लामचा प्रभाव :

भारतात इस्लाम धर्माचे आगमन हे मध्य आशिया मधून उत्तर भारतावर स्वारी करणाऱ्या इस्लामिक सत्ताधीशांच्या आक्रमणासोबत झाल्याचा समज रूढ आहे. मात्र, वास्तवात भारतामध्ये इस्लामचा पहिल्यांदा प्रवेश हा दक्षिण भारतात झाला. सागरी मार्गे व्यापाराच्या निमित्ताने भारताच्या किनारपट्टीवर येणाऱ्या अरब व्यापाऱ्यांच्या माध्यमातून दक्षिण भारतातील केरळच्या किनारपट्टीच्या प्रदेशात इस्लाम धर्माचे आगमन झाले. भारतातील इस्लामच्या आगमनाबाबत हा जसा गैरसमज आहे तसाच गैरसमज महाराष्ट्रात इस्लाम धर्माच्या आगमनाबाबत आहे.

उत्तर भारतातील इस्लाम धर्मीय सत्तांच्या आक्रमणासोबत महाराष्ट्रात इस्लाम धर्माचे आगमन झाल्याचे पारंपारिकरित्या मानले जाते. मात्र, हे मत वस्तुस्थितीला धरून नाही. उत्तरेकडून झालेल्या आक्रमणाच्या अनेक वर्षांपूर्वी महाराष्ट्राच्या पश्चिमेस असलेल्या कोकण किनारपट्टीवर अरब व्यापाऱ्यांच्या माध्यमातून इस्लाम धर्माचे आगमन झालेले होते. उत्तर भारतात दिल्ली सल्तनतची स्थापना झाल्यानंतर सुफी संप्रदायाचा प्रसार भारतात सर्वत्र झाला. महाराष्ट्रातदेखील देवगिरीच्या यादवांच्या सत्तेच्या अस्तानंतर दिल्ली सल्तनतची सत्ता महाराष्ट्रात स्थापित झाली. याकाळात महाराष्ट्रात देखील मोठ्या प्रमाणात सुफी संतांचे आगमन झाले. दिल्ली सल्तनत, बहामनी सत्ता, त्यातून फुटलेल्या पाच शाह्या आणि मराठा काळात देखील सुफी संतांचा प्रसार होत राहिला. महाराष्ट्रात सुफी संप्रदाय आणि भक्ती संप्रदाय यांच्या दरम्यान मोठ्याप्रमाणात आध्यात्मिक देवाणघेवाण होऊन वैचारिक समन्वय घडून आला. त्यातून महाराष्ट्रात सुफी-भक्ती अशा दोन्ही संप्रदायांचा प्रभाव असलेल्या संतांचा उदय झाला. भक्ती संप्रदायाने ज्या पद्धतीने संस्कृत या अभिजन वर्गात प्रचलित असलेल्या भाषेऐवजी अवधी, ब्रज, मराठी, कन्नड, मैथिली, उडिया, बंगाली, इत्यादी स्थानिय

लोकभाषांमध्ये साहित्य रचना केल्या. भारतात आलेल्या सुफी संतानी देखील भक्ती संप्रदायातील संतांप्रमाणे स्थानिक लोकभाषांना प्राधान्य देऊन अवधी, ब्रज, मराठी, हिंदवी, दखनी, सिंधी, गुजराती, मैथिली, पंजाबी इत्यादी भाषांमध्ये साहित्य रचना केली. दख्खनमध्ये आलेल्या सुफीच्या रचनेतून फारसी भाषा आणि इथल्या मराठी, कन्नड व तेलगु भाषेच्या संमिश्रणातून 'दखनी' ही भाषा उदयाला येण्यास हातभार लावला. हीच दखनी भाषा औरंगजेबाच्या काळात उत्तर भारतात जाऊन विकसित होऊन 'उर्दू' या नावाने प्रसिद्ध झाली. बिदरच्या फक्रुद्दीन निजामी याने १५ व्या शतकात सुफी मसनवीच्या स्वरुपात लिहिलेला 'कदमराव पदमराव' हा ग्रंथ दखनी भाषेचा आद्यग्रंथ मानला जातो. या ग्रंथात मोठ्या प्रमाणत मराठी शब्द आढळून येतात. दखनी भाषेव्यतिरिक्त मराठी भाषेच्या आणि आध्यत्मिक बाबतीत महाराष्ट्रातील मराठी सुफी-भक्ती परंपरेतील संतांचे योगदान मोठे आहे.

सुफी संत हे अनेक संप्रदायामध्ये विभागलेले होते. सुफी संतांच्या संप्रदायांना 'सिलसिले' असे म्हणतात. साधारणपणे १४ प्रमुख सिलसिले म्हणजे संप्रदाय आहेत. नक्शबंदी, कादरिया, चिश्ती, सुऱ्हावर्दी, जुनैदी हे प्रमुख सिलसिले भारतात पसरलेले आहेत. महाराष्ट्रात सुफी संप्रदायामधील कादरिया आणि चिश्ती संप्रदाय हे लोकप्रिय असल्याचे दिसून येते. चिश्ती संप्रदायातील सुफी हे सत्ताकारणापासून नेहमीच दूर असल्याचे दिसतात. प्रत्यक्ष इस्लाम धर्माच्या प्रसाराच्या ऐवजी परमेश्वराच्या सर्व व्यापकतेचा, निर्गुण निराकाराचा सिद्धांत लोकप्रिय करण्याचे प्रयत्न सुफी संतांनी केले. पृथ्वीवरील सर्व माणसेही एकाच ईश्वराची निर्मिती असल्याने माणसांमध्ये भेद करणे हे ईश्वराच्या शिकवणीच्या विरुद्ध आहे अशा विचारांचा प्रसार हे सुफी संत करत असत. मानवी ऐक्य समता व बंधुत्व यांचा प्रचार करणे यावर सुफींनी भर दिला होता. मानवी ऐक्याचा आणि प्रेमाचा संदेश घेऊन समता व बंधुत्वावर आधारित सहिष्णू जीवनपद्धतीची शिकवणूक देणारे अनेक सुफी भारताच्या कानाकोपऱ्यात पसरले. समता, बंधुत्व आणि मानवी ऐक्याच्या संदेशाचा पारंपारिक व्यवस्था, पुरोहीतशाही आणि कर्मकांडांनी ग्रस्त असलेल्या भारतीय समाजावर दूरगामी परिणाम झाला. चातुर्वर्णाला आणि पुरोहितशाहीला भक्ती संप्रदायाप्रमाणेच सुफी संतांनी देखील आव्हान दिले. सूफी संतांच्या या समतावादी शिकवणीच्या परिणामामुळे पारंपारिक समाज व्यवस्थेत खळबळ माजली

मूर्तीपूजेचे अवलंबन कमी करण्याच्या आणि एकेश्वरवादाचा प्रसार करण्याची चळवळ ही हिंदू धार्मिक संप्रदायांमध्ये जोमाने सुरू झाली. इतिहासकार प्रा. ताराचंद यांच्या मते, आद्य शंकराचार्यांच्या एकतत्ववादाच्या सिद्धांतावर सुफी प्रणित इस्लामचा प्रभाव असल्याचे निश्चितपणे दिसून येते. शंकराचार्यांचे शिष्य असलेले श्री रामानुजन, विष्णूस्वामी, माधवाचार्य, निंबार्क इत्यादी संत हे एकतत्ववादाकडून एकेश्वर वादाकडे झुकल्याचे आपल्याला दिसून येते. प्रा. ताराचंद यांच्या मते, भारतीय अध्यात्म क्षेत्रामध्ये एक ईश्वराची संकल्पना होती. मात्र, ती नंतरच्या कर्मकांडांच्या काळात दुय्यम झाली. सुफी संप्रदायांच्या माध्यमातून आलेल्या इस्लामच्या प्रभावामुळे एकेश्वरवाद हा भारतीय अध्यात्मात पुन्हा एकदा अधोरेखित झाला. ईश्वर भक्तीचे महत्त्व ईश्वराच्या मार्गात, आत्मा समर्पण, गुरुमहिमा इत्यादी गोष्टी भक्ती चळवळीत इस्लामच्या प्रभावामुळे स्वीकारण्यात आल्या. चैतन्य संप्रदाय, आनंद संप्रदाय, गुरु नानक, संत कबीर,

दक्षिण भारतातील भक्ती संप्रदाय इत्यादींवर सुफी संप्रदायाचा परिणामकारक प्रभाव पडला. सूफीनी वैदिक तत्त्वज्ञानातील 'ब्रह्म' किंवा 'आत्मन' आणि कुराणातील 'सर्वव्यापी अल्लाह' यांच्या सिद्धांतामागील साम्य ओळखले. अल्लाहचे म्हणजे परमेश्वराच्या सृजनशील, दयावंत व कृपाशील या गुणांचा प्रसार केला. त्याची दूरगामी परिणाम हे भक्ती पंथावर झालेली दिसून येतात. काही सुफींनी आणि महाराष्ट्रातील मुस्लिम मराठी संतांनी सगुण भक्तीचाही विचार मांडला. 'मुस्लिम गुरूंचे हिंदू शिष्य' व 'हिंदू गुरूंचे मुस्लिम शिष्य' असाही प्रकार सुरू झाला. महाराष्ट्रातील अनेक मुस्लिम संतांनी मुस्लिम राहून देखील इस्लाम बरोबरच विठ्ठलभक्ती, दत्त संप्रदाय, कृष्णभक्ती यांचा स्वीकार केला होता.

सूफी संतांनी सर्व प्रकारच्या कर्मकांडाला विरोध केला होता. त्यांनी इस्लाममधील उलेमांनी प्रस्थापित केलेली पोथीनिष्ठता, शब्दप्रामाण्यवाद यांच्याही विरोधात आघाडी उघडली होती. सुफींचे म्हणणे होते की, वेद आणि उपनिषद यांच्यामधील एकतत्त्ववाद आणि इस्लाममधील एकेश्वरवाद यात फार फरक नाही. सुफी परंपरेमध्ये 'फना' म्हणून ओळखली जाणारी संकल्पना आहे. 'फना होणे' म्हणजे 'ईश्वरसाधनेत आत्म्याने परमात्म्यात विलीन होणे', 'स्वत्व नष्ट करणे', 'मीपणाचा त्याग करणे' होय. भारतातील सुफींचे म्हणणे होते की, बुद्धांची निर्वाण संकल्पना आणि वेदांमधील एकत्ववाद यांच्याशी 'फना'चे तत्व जुळणारे आहे. कुराणानुसार इस्लाम हा नवा धर्म नसून परमेश्वराचे एकत्र आणि मानवी ऐक्याचे सिद्धांत मांडले गेले त्याची पुन्हा सर्वांना आठवण करून देण्यासाठी इस्लामचा उदय झाला आहे या प्रतिपादनाचा आधार घेऊन सुफींनी हिंदू धर्म आणि इस्लाम यांच्या समन्वय साधण्याचा प्रयत्न केला होता. सुफींचे हे प्रतिपादन उलेमांच्या पोथीनिष्ठ विचारांशी विचारांपेक्षा वेगळे होते परिणामी हिंदू आणि मुस्लिम यांच्यामध्ये समन्वय साधण्याची प्रक्रिया घडून आली. हा समन्वय खूपच खोलवर असल्यामुळे संत एकनाथ, संत नामदेव, संत तुकाराम यांनी दखनी भाषेमध्ये अभंग रचना केल्याचे आपणास दिसून येते. तसेच या संत मंडळींच्या साहित्यामध्ये अल्लाह, पीर इत्यादी इस्लामी परंपरेतील शब्द देखील आपणास दिसून येतात. या समन्वयामुळेच महाराष्ट्रातील अनेक हिंदू धर्मीय हे दर्ग्यांमध्ये पिराच्या दर्शनासाठी जातात. तसेच अनेक मुस्लिम धर्मीय हे देखील पंढरपूरला जाणाऱ्या वारीत सहभागी होतात. हिंदू - मुस्लिम यांच्यातील या आध्यत्मिक समन्वयातून महाराष्ट्रात मुस्लिम मराठी संत कवींचा मोठा प्रवाह निर्माण झाला.

महाराष्ट्रामध्ये मुस्लिम मराठी संतकवींची मोठी परंपरा आहे. मध्ययुगाच्या संदर्भात महाराष्ट्राचा आणि मराठी भाषेचा विचार केला तर मुस्लिम संतांनी किती कार्य केले होते याची कल्पना येते. वारकरी संप्रदायात 'ज्ञानाचा एका' या उक्ती बरोबर 'नामयाचा तुका' ही युक्ती आढळते आणि त्यालाच पुढे 'कबीराचा शेका' ही उक्ती जोडलेली आहे. संत ज्ञानेश्वर आणि संत एकनाथ या संतांच्यामध्ये जशी एकरूपता आढळते तशीच संत नामदेव - संत तुकाराम, संत कबीर - संत शेख महंमद यांच्यामध्ये आढळते असे वारकरी संप्रदायात मानले जाते.

वारकरी संप्रदायाला जशी शेख महंमद या संतकवी विषयी जवळीक वाटली तशीच जवळीक शेख मोहम्मद यांना देखील वारकरी संप्रदायाबद्दल वाटत होती. अशाप्रकारची आत्मीयता विविध मुस्लिम संतांना

महाराष्ट्रातल्या अन्य धार्मिक संप्रदायांबद्दलही वाटत आली आहे. स्वधर्माचरण करता करता ते या विविध संप्रदायांशी देखील एकरूप झाले असल्याचे दिसून येते. आश्चर्याची गोष्ट अशी की ज्या वेळेपासून महाराष्ट्रात हे धर्मसंप्रदाय निर्माण झाले जवळपास त्यावेळी पासून म्हणजे अगदी मध्ययुगीन संत साहित्याच्या निर्मितीपासून (यादवकाळ वगळता) इस्लाम धर्मीय संतांची महाराष्ट्रीयन धर्मसंप्रदायांशी जवळीक होती. त्यांना मऱ्हाटी संस्कृतीने आपल्यामध्ये सामावून घेतले होते आणि मराठी माणसांशी त्यांनीही अत्यंत जिव्हाळ्याने संवाद साधला होता. मराठी माणसांनी देखील त्यांच्यामध्ये आणि आपल्यामध्ये परकेपणा येऊ दिला नाही. परिणामी या मुस्लिम मराठी संतकवींचा महाराष्ट्राच्या लोकमानसावर लक्षात येण्याजोगा प्रभाव असल्याचे चित्र आपल्याला महाराष्ट्राचा सांस्कृतिक इतिहास अभ्यासत असताना लक्षात येते.

महाराष्ट्रातील मुस्लिम संतकवींचा येथील कोणकोणत्या धर्मसंप्रदायांची संबंध आला होता हे पाहणे महत्त्वाचे आहे. महाराष्ट्रातील बहुतेक मुस्लिम संत कवींचे सुफी संप्रदायांच्या चार सिलसिल्या पैकी कादरिया या शाखेशी विशेष संबंध होते. चौदाव्या शतकापासून कादरीया संप्रदायातील सुफींचा महाराष्ट्रातील विविध धर्मसंप्रदायांशीची संबंध आला होता. यासंदर्भात नागेश संप्रदाय हा जुन्यातला जुना संप्रदाय असावा. चौदाव्या शतकातील नागेश उर्फ नागनाथ या सद्पुरुषांना वडवळ सिद्ध नागेश असेही म्हटलं जात असे. इस्लाम धर्मियांना असे वाटेल की तेच आपले प्रख्यात सुफी संत नसरुद्दीन चिराग देहलवी असावेत. आलम खान नावाच्या मुस्लिम मराठी संत कवीला देखील असेच वाटत होते. नागेश संप्रदाय हा चौदाव्या शतकातील समन्ववादी संप्रदाय होता. नागेश संप्रदायाच्या शिष्य परंपरेतील आलम खान या संत कवीच्या रचना मराठवाड्यातील काही गावांच्या मठ मंदिरात आढळते.

वारकरी संप्रदायाचे संबंधित असलेले अनेक मुस्लिम संत कवी आहेत. शेख महंमद त्यातले अग्रगण्य होय. शेख महंमद हे अहमदनगर जिल्ह्यातील श्रीगोंदा येथील रहिवासी होते. 'योगसंग्राम' हा त्यांचा प्रमुख ग्रंथ विख्यात आहे. 'योगसंग्राम' या ग्रंथांमध्ये वारकरी संप्रदायाच्या तत्त्वज्ञान सोबतच इस्लाम धर्मातील तत्त्वज्ञान देखील शेख महंमद यांनी मांडलेले आपल्याला दिसून येते. सुफी आणि वारकरी ही दोन्ही तत्त्वज्ञाने ही एकाच समान उद्दिष्टाकडे म्हणजेच 'भक्त आणि परमेश्वर यांच्या एकीकरणाकडे अंगुलीनिर्देश करताना दिसतात. शेख महंमद यांचे अनेक शेकडो अभंग आहेत. देवदासी प्रथा आणि बुवाबाजी यांच्या विरोधात समाज प्रबोधन करण्याचं काम शेख महंमद यांनी आपल्या अभंगातून केलेले दिसून येते. शेख महंमद यांनी सर्वधर्म सहिष्णुतेचा पुरस्कार केला तसेच विविध धर्मातील कर्मठपणावर त्यांनी टीका केली आहे.

शहामुनी हे मुस्लिम संत कवी मराठवाड्यातील शहागडचे होते त्यांनी 'सिद्धांतबोध' हा एक मोठा ग्रंथ लिहिला. 'सिद्धांतबोध' या ग्रंथांमध्ये त्यांनी द्वैत आणि अद्वैत या दोन्ही तत्त्वज्ञानाचे विवरण दिलेले आहे. द्वैत तत्त्वज्ञानाचा शाहमुनी यांनी पुरस्कार केला आहे. इस्लामी तत्त्वज्ञान आणि महानुभाव तत्त्वज्ञान हे दोन्ही द्वैतवादी आहेत. शाहमुनी यांचा 'सिद्धांतबोध' हा महानुभव संप्रदायातील अत्यंत लोकप्रिय ग्रंथ असून तो चातुर्मासात वाचला जातो. काही अभ्यासकांच्या मते, शेख महंमद यांचे गुरु चांद साहेब कादरी म्हणजेच चांद बोधले हे सुफींच्या कादरी शाखेचे होते. संत एकनाथांना 'दत्तदर्शन' हे 'मलंग' म्हणजेच फकीरवेशात

झालं असा उल्लेख त्यांच्या चरित्रात येतो. यातूनही मुसलमान संत व महाराष्ट्रातील धर्म संप्रदाय यांच्या घनिष्ठ संबंधावर प्रकाश पडतो. अनेक नाथ संप्रदायातील संतांना मुस्लिम संतांच्या पर्यायी नावांनीही ओळखले जाते. समर्थ रामदासांची काही दख्खनी पदे ही 'सफेद कलंदर' या सारख्या मुस्लिम नावाने अंकित केलेली आहेत. परभणीचे प्रसिद्ध सुफी संत शेख तुराब (तुरूत वली) यांनी समर्थ रामदास यांच्या 'मनाच्या श्लोक' याचे 'मन समझावन' या नावाने दख्खनी भाषेत रुपांतर केले आहे. यातून समर्थ संप्रदाय आणि सुफी संप्रदाय यांच्यातील वैचारिक आदानप्रदान लक्षात येतो.

शहा मुंतोजी ब्राम्हणी, अंबर हुसेन, चांद बोधले, शेख महंमद, आलमखान, जंगली फकीर, शहामुनी, लतीफ शाह, शेख सुलतान यांच्यासह इतर अनेक मुस्लिम मराठी संतांनी सुफी संप्रदाय आणि भक्ती संप्रदाय यांच्या समन्वय घडवून आणण्यास हातभार लावला.

न्यायमूर्ती रानडे यांच्या मते, महाराष्ट्रात मुस्लिम सत्ताधीशांचा अंमल सुरू होताच सुमारे दोन-तीनशे वर्षे महाराष्ट्रीय लोकांत धर्म जागृती सुरू होऊन हे कार्य दोन तीनशे वर्षे चालू होते. इस्लाम धर्माच्या एकेश्वरी मताचा परिणाम महाराष्ट्रातील तत्कालीन साधूसंतांच्या मनावर झाला व एकंदर मुसलमानांच्या संसर्गाचे योगाने हिंदू मनास जरा निराळे वळण लागले. राम आणि रहीम हे दोघे एकच आहेत, जातीभेद व आचार्य विषयक धार्मिक वर्तनाचा भाग एका बाजूस ठेवून एक परमेश्वरावर भाव ठेवावा व परमेश्वर सर्वव्यापी आहे अशी भावना करून अखिल प्राणिमात्रास प्रेमाने वागवावे असा महाराष्ट्रातील सर्व साधुसंत महाराष्ट्र जनतेस उपदेश करू लागले.

संत साहित्याचे अभ्यासक रा. चिं. ढेरे यांच्या मते, महाराष्ट्रातील हिंदू-मुस्लिम एकात्मतेचे शिल्प घडविण्यात मुस्लिम मराठी संत कवींचा वाटा मोठा आहे. सर्व भेदांच्या पलीकडे जाऊन एकात्मतेची घडण करणाऱ्या मुस्लिम मराठी संत कवींनी भक्ती संप्रदायातील हिंदू संतांना उत्कट सहयोग देऊन महाराष्ट्राची उदार व समन्वयशील सांस्कृतिक परंपरा समृद्ध करण्यात मोठा वाटा उचलला.

**स्वयं अध्ययनासाठी प्रश्न – ३**

(अ) एका वाक्यात उत्तरे लिहा.

(१) संत एकनाथांना 'दत्तदर्शन' हे कोणत्या वेषात झालं असा उल्लेख एकनाथांच्या चरित्रात येतो.

(२) शेख महंमद यांनी आपल्या अभंगातून कोणते समाज प्रबोधन करण्याचं काम केलेले.

(३) सुफी आणि वारकरी ही दोन्ही तत्त्वज्ञाने ही कोणत्या एकाच समान उद्दिष्टाकडे अंगुलीनिर्देश करताना दिसतात.

(४) 'सिद्धांतबोध' या ग्रंथांमध्ये कोणत्या तत्त्वज्ञानाचे विवरण दिलेले आहे.

(५) महाराष्ट्रात सुफी संप्रदायामधील कादरिया आणि .......................... हे लोकप्रिय असल्याचे दिसून येते.

(ब) रिकाम्या जागी योग्य शब्द भरा.

(१) सुफी संतांच्या संप्रदायांना ......................... असे म्हणतात.

(२) प्रा. ताराचंद यांच्या मते, .............................. यांच्या एकतत्ववादाच्या सिद्धांतावर सुफीप्रणित इस्लामचा प्रभाव असल्याचे निश्चितपणे दिसून येते.

(३) नागेश संप्रदायाच्या शिष्य परंपरेतील ......................... या मुस्लिम संत कवीच्या रचना मराठवाड्यातील काही गावांच्या मठ मंदिरात आढळते.

(४) ......................... यांचा 'सिद्धांतबोध' हा महानुभव संप्रदायातील अत्यंत लोकप्रिय ग्रंथ आहे.

(५) ........................ यांच्या मते, महाराष्ट्रातील हिंदू-मुस्लिम एकात्मतेचे शिल्प घडविण्यात मुस्लिम मराठी संत कवींचा वाटा मोठा आहे.

## ४.३ पारिभाषिक शब्द, शब्दार्थ

- **भक्ती :** परमेश्वरा संबंधी निस्सीम समर्पणाची भावना
- **गोब्राम्हणप्रतिपालन :** गाई व ब्राम्हण यांचे संरक्षण करण्याचे कर्तव्य
- **मोक्ष :** जन्म व मृत्यू यांच्या चक्रातून आत्म्याची मुक्ती
- **सगुण :** ईश्वराचे साकार स्वरूपातील रूप
- **निर्गुण :** ईश्वराचे निराकार स्वरूपातील रूप
- **द्वैत :** जीव आणि परमात्मा यांना भिन्न भिन्न मानणे.
- **अद्वैत :** जीव आणि परमेश्वर हे एकच आहेत असे मानणे.

## ४.४ स्वयं-अध्ययन प्रश्नांची उत्तरे

**स्वयं अध्ययनासाठी प्रश्न - १**

(अ) एका वाक्यात उत्तरे लिहा.

(१) पादुका (२) श्रीनरसिंह सरस्वती (३) गोविंदप्रभू किंवा गुंडम राऊळ

(४) सूत्रपाठ (५) त्रिपुरसुंदरी

(ब) रिकाम्या जागी योग्य शब्द भरा.

(१) विवेकसिंधू (२) चक्रधरस्वामी (३) परमार्ग

(४) लीळाचरित्र (५) कौलमार्ग

**स्वयं अध्ययनासाठी प्रश्न – २**

(अ) एका वाक्यात उत्तरे लिहा.

(१) भाऊसाहेबांची बखर

(२) न्या. महादेव गोविंद रानडे

(३) समर्थ रामदास

(४) वि. का. राजवाडे

(५) स्वराज्याची स्थापना

(ब) रिकाम्या जागी योग्य शब्द भरा.

(१) महिकावतीची बखर अथवा माहीमची बखर

(२) पुर्नजागरण

(३) महाराष्ट्रधर्म

(४) जयुष्णू

(५) गुरुचरित्र

**स्वयं अध्ययनासाठी प्रश्न – ३**

(अ) एका वाक्यात उत्तरे लिहा.

(१) मलंग' म्हणजेच फकीरवेशात

(२) देवदासी प्रथा आणि बुवाबाजीला विरोध

(३) भक्त आणि परमेश्वर यांच्या एकीकरणाकडे

(४) द्वैत आणि अद्वैत

(५) चिश्ती संप्रदाय

(ब) रिकाम्या जागी योग्य शब्द भरा.

(१) सिलसिले

(२) आद्य शंकराचार्यांच्या

(३) आलम खान

(४) शाहमुनी

(५) रा. चिं. ढेरे

## ४.५ सारांश :

मराठेकालीन संस्थांचा अभ्यास करताना त्याकाळातील धर्म या संस्थेची माहिती आपण या घटकाच्या माध्यमातून घेतली. इ. स. १३ व्या आणि १४ व्या शतकात दक्षिण भारतात उदयाला आलेल्या भक्ती चळवळीचा प्रसार संपूर्ण भारतात झाला. महाराष्ट्रात देखील भक्ती चळवळीचा मोठा प्रभाव होता. वारकरी संप्रदाय, महानुभाव संप्रदाय, दत्त संप्रदाय, नाथ संप्रदाय, शाक्त संप्रदाय असे अनेक संप्रदाय या काळात उदयाला आले. यातील वारकरी सांप्रदायाइतकेच महत्त्वपूर्ण असणाऱ्या महानुभाव संप्रदाय, दत्त संप्रदाय आणि शाक्त संप्रदाय यांची माहिती आपण घेतली. भक्ती चळवळीचा मुख्य गाभा असलेल्या भक्त आणि ईश्वर यांच्या नातेसंबंधांच्या बाबत या सर्व संप्रदायांनी आपले आपले मत समाजात प्रसारित केले. कोणत्याही प्रकारच्या भेदभेदाशिवाय भक्त आणि परमेश्वर यांच्यात नाते निर्माण होते व भक्ताचा भक्तीच्या माध्यमातून मोक्ष प्राप्ती होते अशी शिकवण या भक्ती पंथाने दिली. जातीभेद, चातुर्वर्ण व्यवस्था यांच्यावर टीका करणाऱ्या भक्ती चळवळीने महाराष्ट्रीयन जनतेस एका धाग्यात गुंफले. भक्ती चळवळीच्या कार्यामुळे महाराष्ट्रधर्मच्या स्वरुपात महाराष्ट्रात एक विशिष्ट प्रकारचा आचारधर्म अस्तित्वात आला. भक्ती चळवळीच्या या कार्याच्या परिणामस्वरूप छत्रपती शिवाजी महाराजांना जनतेचा मोठा पाठींबा लाभला. महाराष्ट्रधर्म ही संकल्पना वेगवेगळ्या काळात वेगवेगळ्या अर्थाने वापरली गेली. आधुनिक काळात महाराष्ट्रधर्म या संकल्पनेची विस्तृत वैचारिक चर्चा घडून आली. महाराष्ट्रात इस्लाम धर्माचा प्रसार हा सुफी संतांच्या माध्यमातून झाला. भक्ती संप्रदाय आणि सुफी संप्रदाय यांच्यातील आध्यात्मिक देवाण घेवाणीचा खोलवर प्रभाव महाराष्ट्रातील धर्म व आध्यत्मिक संस्थेवर पडला. भक्ती आणि सुफी यांच्या समन्वयातून मुस्लिम मराठी संत कवींचा प्रवाह महाराष्ट्रात उदयाला आला.

## ४.६ सरावासाठी स्वाध्याय

(अ) खालील प्रश्नांनी उत्तरे द्या. (दीर्घोत्तरी प्रश्न)

१) भक्ती चळवळीचा अर्थ सांगून महाराष्ट्रातील भक्ती संप्रदायांची माहिती द्या.

२) महाराष्ट्र धर्म या संकल्पनेची विस्तृत चर्चा करा.

३) महाराष्ट्रातील इस्लामच्या प्रभावामधील सुफी संतांचे कार्य स्पष्ट करा.

४) महानुभाव संप्रदाय आणि महानुभाव संप्रदायातील साहित्य यांची चर्चा करा.

५) न्या. रानडे आणि राजवाडे यांच्या 'महाराष्ट्रधर्म' संकल्पनेतील फरक स्पष्ट करा.

(ब) टिपा लिहा. (लघुत्तरी प्रश्न)

१) दत्त संप्रदाय

२) शाक्त संप्रदाय

३) महाराष्ट्रधर्माचे मध्ययुगीन उल्लेख

४) राजवाडे यांची महाराष्ट्रधर्मची संकल्पना

५) मुस्लिम मराठी संतकवी

## ४.७ संदर्भ ग्रंथ व अधिक वाचनासाठी पुस्तके


1) Ranade, Mahadev Govind, Rise of the Maratha Power, Punalekar and Co. Bombay, 1900

२) सरदार, गं. बा., 'संत वाङ्मय सामाजिक फलश्रुती', लोकवाङ्मय गृह, २०१०

३) बेन्नुर, फक्रुद्दीन., 'सूफी संप्रदाय : वाङ्मय, विचार आणि कार्य', भूमी प्रकाशन, लातूर, २०१६

४) राजवाड़े, वि. का. 'राजवाड़े लेखसंग्रहः भाग एक : ऐतिहासिक प्रस्तावना', वरदा बुक्स, पुणे, १९९१(पुनर्प्रकाशित)

५) ढेरे, रा. चिं., 'मुसलमान मराठी संतकवी', पद्मगंधा प्रकाशन, पुणे, १९६७


❑❑❑